# एस . वाय . बी . ए .

## अर्थशास्त्र - भारतीय अर्थशास्त्र-1980 पासुन

# घटक १

# भारतीय अर्थव्यवस्था

## अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

- १.२.१ – अर्थव्यवस्थेची व्याख्या
- १.२.२ – अर्थव्यवस्थांचे वर्गीकरण
- १.२.३ – विकसनशील अर्थव्यवस्थेची मूलभूत वैशिष्ट्ये
- १.२.४ – नैसर्गिक संसाधने
- १.२.५ – नैसर्गिक संसाधने आणि आर्थिक विकास
- १.२.६ – जमीन उपयोगाच्या समस्या आणि उपाययोजना
- १.२.७ – जल संसाधन व सरकारी धोरणे
- १.२.८ – वनसंपत्तीस्वरूप, वन क्षेत्र कमी झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या

१.३. स्वयं अध्यायनासाठी प्रश्न

१.४ सारांश

१.५ पारिभाषिक शब्द

१.६ संदर्भ सूची

१.७ सरावासाठी प्रश्न


## १.० उद्दिष्टे

१) अर्थव्यवस्था ही संकल्पना स्पष्ट करता येईल.

२) जगातील विभिन्न राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांची तुलना करता येईल.

३) भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

४) भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील अडथळे स्पष्ट करता येतील.

५) नैसर्गिक संसाधनाचा अर्थ व महत्त्व स्पष्ट करता येईल.

६) देशातील नैसर्गिक संसाधनांचा युक्ततम वापर सांगता येईल.

## १.१ प्रस्तावना

प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था वेगवेगळी असते. अर्थव्यवस्थेत त्या देशाची लोकसंख्या, नैसर्गिक

संसाधने, शेती, उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्र, उत्पन्न, रोजगार, गरिबी, शासन व्यवस्था, दळणवळण, पायाभूत सुविधा यांसारख्या अनेक घटकांचा समावेश होतो. प्रत्येक देशात अर्थव्यवस्थेचा विकास करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१. अर्थव्यवस्थेची व्याख्या :

**प्रा. ग्रेगरी ग्रॉसमन :**

''देशातील व्यक्ती, कुटूंबे, उद्योगसंस्था, व्यवसाय संस्था यांच्या मार्फत उत्पादन, विभाजन, विनिमय व उपयोग या आर्थिक क्रिया पार पाडल्या जातात. देशातील विविध घटक व संस्थांना वळण लावण्यासाठी ज्या यंत्रणेचाा वापर केला जातो. तिला अर्थव्यवस्था म्हणतात.''

**प्रा. लाऊकस :**

''मानवी गरजा भागवितांना उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करण्यासाठी केलेले समग्र आर्थिक व्यवहार म्हणजे अर्थव्यवस्था होय.''

वरील व्याख्यांवरून स्पष्ट होते की, अर्थव्यवस्थेत आर्थिक घटकांबरोबरच सामाजिक घटकांचा, शासनव्यवस्थेचा, नैसर्गिक संसाधनांचा अभ्यास केला जातो.

### १.२.२ अर्थव्यवस्थांचे वर्गीकरण (Classification of Word's Economy)

जागतिक बँक (World Bank) प्रतिवर्षी प्रत्येक देशातील दरडोई उत्पन्नावरून जगातील अर्थव्यवस्थांची तीन विभागात विभागणी करते. सन २०११ मध्ये जागतिक बँकेने अर्थव्यवस्थांची विभागणी खालीलप्रमाणे केली होती.

| अर्थव्यवस्थेचा प्रकार | दरडोई उत्पन्न (US $) |
|---|---|
| कमी उत्पन्न अर्थव्यवस्था | १०२५ किंवा त्यापेक्षा कमी |
| मध्यम उत्पन्न अर्थव्यवस्था | १०२६ ते १२४७५ |
| उच्च उत्पन्न अर्थव्यवस्था | १२४७६ पेक्षा जास्त |

सर्वसाधारण अर्थव्यवस्थेची विभागणी अल्प विकसित अर्थव्यवस्था, विकसनशील अर्थव्यवस्था व विकसित अर्थव्यवस्था या तीन प्रकारात केली जाते. ज्या देशात गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता उत्पादनाचे जुने तंत्र, दरडोई उत्पन्न कमी, आर्थिक विषमता, प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण जास्त, शिक्षण, आरोग्य यांसारख्या पायाभूत सुविधांचा अभाव अशा अर्थव्यवस्थेला अल्पविकसित अर्थव्यवस्था म्हणतात. ज्या देशात विकास, प्रगती सुरू असते अशा अर्थव्यवस्थेला विकसनशील अर्थव्यवस्था म्हणतात. तर अल्पविकसित अर्थव्यवस्थेच्या विरुद्ध परिस्थिती विकसित अर्थव्यवस्थेत असते.

### १.२.३ विकसनशील अर्थव्यवस्थेची मूलभूत वैशिष्ट्ये (Basic Features - As a developing Economy)

विकसनशील अर्थव्यवस्था ही अल्पविकसित अर्थव्यवस्था व विकसित अर्थव्यवस्था या दोन्हींमधील अवस्था असते. या अर्थव्यवस्थेत उद्योग, सेवा, कृषी, पायाभूत सुविधा यांचा विकास होत असतो. तसेच गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता, आर्थिक विषमता कमी झालेली असते. वरील सर्व वैशिष्ट्ये भारतीय अर्थव्यवस्थेत दिसून येतात. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला विकसनशील अर्थव्यवस्था समजले जाते. विकसनशील अर्थव्यवस्थेची खालील वैशिष्ट्ये दिसून येतात.

**१) दरडोई उत्पन्न कमी** (Low Per-Capital Income)

दरडोई उत्पन्न म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न होय. देशातील एकूण उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न प्राप्त होते. विकसनशील राष्ट्राचा विकास पूर्णपणे झालेला नसल्यामुळे त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न कमी असते. उत्पन्नाची साधने व रोजगाराच्या संधी कमी उपलब्ध असतात. परिणामी दरडोई उत्पन्नही कमी असते. जागतिक बँकेच्या अहवालानुसार सन २०११ मध्ये भारतातील दरडोई उत्पन्न १४८८.५१ (डॉलर) होते. तर अमेरिका, जपान, जर्मनी या देशांचे दरडोई उत्पन्न अनुक्रमे ४८७११२ , ४५९०३ व ४४०६० डॉलर होते. यावरून स्पष्ट होते की विकसनशील अर्थव्यवस्थेचे दरडोई उत्पन्न कमी असते.

**२) राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचे वर्चस्व**
(Prime Importance for Primary Sector)

अर्थव्यवस्थेची प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक क्षेत्र असतात. प्राथमिक क्षेत्रात नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून असणाऱ्या कृषी, पशुपालन, मासेमारी, जंगल, खाणकाम या उद्योगांचा समावेश होतो. परंतु यात कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असते. द्वितीयक क्षेत्रात उद्योगधंदे व बांधकाम तर तृतीयक क्षेत्रात व्यापार, वाहतूक, दळणवळण, साठवणूक, बँकिंग, विमा व इतर सेवांचा समावेश होतो. विकसनशील अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्राचे म्हणजेच कृषी क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नात व रोजगार निर्मितीत प्रमुख स्थान असते. भारतात स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा ६०% पेक्षा जास्त होता. नंतर तो कमी झाला आहे. सन २०१२-१३ मध्ये हा वाटा १५ टक्क्यांपेक्षा कमी झाला असला तरी देशातील एकूण रोजगारांपैकी ५२ टक्क्यांपेक्षा अधिक रोजगार कृषी क्षेत्रात होतो. त्यामुळे कृषीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजले जाते.

**३) लोकसंख्या वाढीचा वेग जास्त -**

विकसनशील अर्थव्यवस्थेत जननदराच्या तुलनेत मृत्युदर जास्त, लोकसंख्या नियंत्रणामुळे दुर्लक्ष, गरिबी, अज्ञान, वाईट प्रथा व चालीरीती या सर्वांचा परिणाम देशातील लोकसंख्येत वेगाने वाढ होते. सन १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. सन २०११ च्या जनगणनेनुसार ती १२१.०२ कोटी झाली आहे. विकसनशील देशाच्या तुलनेत विकसित देशात लोकसंख्या वाढीचा दर कमी असतो.

### ४) बेरोजगारी व दारिद्र्याचे प्रमाण जास्त –

बेरोजगारी व दारिद्र्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. देशात मोसमी पावसावर शेतीचे अस्तित्व, उद्योगांचा कमी विकास, नौकऱ्यांची उपलब्धता कमी, भांडवलप्रधान (मोठ–मोठ्या यंत्रांचा) तंत्राचा वापर व लोकसंख्या वाढीचा वेग जास्त या सर्वांमुळे बेरोजगारीचा दर जास्त असतो. त्यामुळे छुपी (प्रामुख्याने शेती क्षेत्रात), ग्रामीण, शहरी, सुशिक्षितांच्या बेरोजगारीचे अस्तित्व जास्त असते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात घट होते. दारिद्र्यात वाढ होते.

### ५) भांडवलाची कमतरता (Lack of Capital)

आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी भांडवलाची मुबलक उपलब्धता आवश्यक असते. देशात दरडोई उत्पन्न कमी असल्यामुळे बचत कमी होते. परिणामी भांडवल निर्मितीही कमी होते. बँका व वित्तीय संस्थांची कमतरता, योग्य तारणाचा अभाव यामुळे शेती, उद्योग व सेवा क्षेत्रासाठी योग्य वेळी, पुरेशा प्रमाणात व कमी व्याजदरात भांडवल उपलब्ध होत नाही व उत्पादनात वाढ, आधुनिक तंत्राचा वापर करणे शक्य होत नाही.

### ६) मानवी भांडवलाचा निकृष्ट दर्जा (Poor quality of human Capital)

देशाच्या प्रगतीसाठी मानवी भांडवल अत्यंत महत्त्वाचे असते. भारतात निरक्षरता, अज्ञान, वाईट प्रथा व परंपरा, दैववादाचा प्रभाव, आरोग्यविषयक सुविधांचा अभाव, प्रशिक्षणाचा अभाव या सर्व कारणांमुळे मानवी भांडवल कमी दर्जाचे आहे. मानवी भांडवलावर कामगारांची कार्यक्षमता अवलंबून असते.

### ७) आर्थिक विषमता (Inequality of Incomes)

देशात संपत्ती, उत्पन्न व उत्पादन घटकांचे विभाजन विषम स्वरूपात झाले आहे. ग्रामीण व शहरी भागातही आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते. आर्थिक विषमता म्हणजे मर्यादित (श्रीमंत) व्यक्तीकडे खूप जास्त संपत्ती असणे व लोकसंख्येने जास्त असलेल्या (गरीब) वर्गाकडे संपत्ती कमी असणे होय. देशात ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात आर्थिक विषमतेचे प्रमाण जास्त आहे.

### ८) नैसर्गिक संसाधनांचा कमी वापर
(Under Utilization of Natural Resources)

नैसर्गिक संसाधने म्हणजे निसर्गतः मानवाला मिळालेली विनामूल्य देणगी होय. या नैसर्गिक संसाधनात भूमी, पाणी, खनिजे, वने, सूर्यप्रकाश, वायू, सागरी किनारा, मानवी श्रम व पशु धन या सर्वांचा समावेश होतो. विकसनशील देशात भांडवलाची कमतरता, तांत्रिक ज्ञानाचा अभाव, मागासलेपणा, संशोधनाचा अभाव यामुळे या नैसर्गिक संसाधनांचा युक्ततम वापर होत नाही.

### ९) तंत्रज्ञानाचा निकृष्ट दर्जा (Low Level of Technology)

देशातील उत्पादन पारंपरिक पद्धतीने घेतले जाते. भांडवलाची कमतरता, यंत्रसामुग्रीचा

अभाव, संशोधनाकडे दुर्लक्ष, पारंपरिक दृष्टिकोन या सर्व कारणांमुळे उत्पादन व उत्पादकता कमी होते. तसेच उत्पादन निकृष्ठ दर्जाचे होते. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यापासून उद्योग व सेवा क्षेत्रातील तंत्रज्ञानात बदल होत आहेत. परंतु कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानात आजही खूप मोठे बदल करणे आवश्यक आहे.

**१०) परंपरावादी सामाजिक रचना** (Traditional Social Structure)

देशात वाईट प्रथा, चालीरीती, अंधश्रद्धा, निरक्षरता दैववादी दृष्टिकोन यांचे प्रमाण जास्त असल्यामुळे अर्थव्यवस्थेवर त्याचा वाईट परिणाम होतो. तसेच प्रामुख्याने गरीब वर्गात सण, उत्सव, विवाह, धार्मिक क्रिया या अनुत्पादक घटकांवर एकूण उत्पन्नातील खूप मोठा वाटा खर्च केला जातो. त्यामुळे त्यांच्या दारिद्र्यात वाढ होते.

**११) लोकसंख्या विषयक वैशिष्ट्ये** (Demegraphic Characteristics)

विकसनशील राष्ट्रात लोकसंख्येची घनता जास्त, स्त्री-पुरुष विषमता, ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त, बालमृत्युचे प्रमाण जास्त, सरासरी आयुर्मान कमी यासारखी लोकसंख्येची वैशिष्ट्ये दिसून येतात. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात लोकसंख्येची घनता ३८२ प्रति चौ. किमी होती. स्त्री-पुरुष प्रमाण ९४०:१००० होते, एकूण लोकसंख्येपैकी ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ६८.८४ टक्के, बालमृत्युचे प्रमाण प्रति १००० बालकामागे ४४, सरासरी आयुर्मान ६६.१ वर्ष होते.

वरील विवेचनावरून स्पष्ट होते की, भारतीय अर्थव्यवस्थेत विकसनशील अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये दिसून येतात. देशात उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. परंतु वाढती लोकसंख्या, भांडवलाचा अभाव, सिंचनाकडे दुर्लक्ष यामुळे कृषीक्षेत्रातील विकास दरात खूप भिन्नता आहे. तसेच गरिबी व बेरोजगारीची समस्या गंभीर होत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात वेगवेगळ्या धोरणांद्वारे विकास, प्रगती करण्याचा यशस्वी प्रयत्न होत आहे.

## १.२.४ नैसर्गिक संसाधने (Natural Resources)

नैसर्गिक संसाधनास नैसर्गिक साधनसामग्री असेही म्हणतात. नैसर्गिक संसाधने म्हणजे जे घटक मानवास निसर्गतः विनामूल्य मिळाले आहेत. यात जमीन, हवा, पाणी, डोंगर, नद्या, सागरी किनारा, वने खनिज संपत्ती, सूर्यप्रकाश, पाऊस, पशुधन, मानवी श्रम यांसारख्या घटकांचा समावेश होतो. प्रत्येक देशातील, राज्यातील, विभागातील, प्रदेशातील, क्षेत्रातील नैसर्गिक संसाधने वेगवेगळी असतात. काही ठिकाणी ती मुबलक प्रमाणात तर काही ठिकाणी ती अतिशय मर्यादित स्वरूपात असतात.

## १.२.५. नैसर्गिक संसाधने आणि आर्थिक विकास
(Natural Resources and Economic development)

नैसर्गिक संसाधनांवरच देशाचा विकास अवलंबून असतो. ज्या देशात नैसर्गिक संसाधने जास्त असतात त्यांचा विकास जलद गतीने होतो. कारण त्यांच्याकडे उत्पादनाची साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध होतात. नैसर्गिक संसाधने व आर्थिक विकास याबाबत अर्थतज्ज्ञांमध्ये दोन गट आहेत. ऑर्थर लुईस, रिचर्ड गिल या अर्थतज्ज्ञांच्या मते नैसर्गिक

संसाधनांवरच आर्थिक विकास अवलंबून असतो, तर हॅराड, फ्रिशर या तज्ज्ञांच्या मते नैसर्गिक संसाधनांशिवाय अन्य घटकांवर आर्थिक विकास अवलंबून असतो. कारण भारत, चीन या देशांकडे प्रचंड नैसर्गिक संसाधने असूनही त्यांचा पूर्णतः विकास झालेला नाही. तर जपान, इस्त्राईल, इंग्लड या देशांकडे नैसर्गिक संसाधने नसतानाही त्यांचा विकास झालेला आहे.

नैसर्गिक संसाधने व आर्थिक विकास याबाबत अर्थतज्ज्ञांत मतभिन्नता असली तरी नैसर्गिक संसाधनांचे अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण नैसर्गिक संसाधने ही राष्ट्राला मिळालेली विनामूल्य देणगी असते. उदा. देशात सुपीक जमीन, हवामान, पाण्याची उपलब्धता चांगल्या प्रकारची असल्यास शेतीच्या उत्पादनात व उत्पादकतेत वाढ होते. परिणामी अन्नधान्याची गरज पूर्ण होतेच. त्याच बरोबर कृषीक्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या साखर उद्योग, कापड उद्योग, तेल गिरण्या, खते बी-बियाणे, किटकनाशके, औषधे, कृषी अवजारे यांसारख्या घटकांचे उत्पादन घेणाऱ्या कृषीपूरक उद्योगांचा विकास होतो. तसेच नैसर्गिक संसाधनामुळे अल्प भांडवलात रोजगार निर्मिती होते. इराण, इराक, सिरिया, सौदी अरेबिया यांसारख्या अरब राष्ट्रांकडे कृषीसाठी प्रतिकूल परिस्थिती आहे. परंतु तेथे खनिजतेलाचे साठे मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न जास्त आहे.

थोडक्यात भारत,चीन या देशांकडे नैसर्गिक संसाधने विपुल प्रमाणात आहेत. परंतु लोकसंख्येतील वाढीमुळे प्रतिव्यक्ती कमी उत्पादन घटकांची उपलब्धता, अप्रगत तंत्रज्ञान, भांडवलाची कमतरता, संशोधनाचा अभाव, नैसर्गिक संसाधनांचा युक्ततम वापर न होणे यांसारख्या समस्यांमुळे आर्थिक विकासाला अडथळा निर्माण होत आहे. भारतात सूर्यप्रकाश, सुपीक जमीन, हवामान, समुद्र किनारा, औषधी वनस्पती, पशुधन, मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. परंतु त्यांचा योग्य वापर होत नसल्यामुळे आर्थिक विकास कमी गतीने होत आहे.

### १.२.६ भूमी संसाधन व भूमी उपयोगाची रचना (Land Resources and Utilization Pattern)

नैसर्गिक संसाधनात भूमीला विशेष महत्त्व आहे. कारण अन्नधान्य, घरे, तलाव, उद्योग, रस्ते, लोहमार्गाची उभारणी, चारा व वृक्ष लागवडीसाठी भूमीचीच आवश्यकता असते. देशात सुपीक जमीन जास्त असल्यास शेतीतील उत्पादकता जास्त असते. वन संपत्तीमुळे पशुपालन, औषधी वनस्पतींची उपलब्धता मोठ्या प्रमाणात होते. त्याचबरोबर पर्यावरणाचा समतोल साधला जातो.

भारत देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चौ. कि.मी. असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारताचा जगात सातवा क्रमांक आहे. लागवडीखालील क्षेत्रात भारताचा सातवा क्रमांक आहे. लागवडीयोग्य क्षेत्र १८,६४,००,००० हेक्टर आहे. देशातील एकूण क्षेत्रफळापैकी याचे प्रमाण ७७% आहे. देशातील मात्र एकूण लागवडी खालील क्षेत्राच्या ४६ टक्केच क्षेत्राचा लागवडीसाठी उपयोग होतो. देशातील लोकसंख्येत वाढ, उद्योगांचा विकास, रस्ते व तलाव निर्मिती यांसारख्या कारणांमुळे लागवडी खालील क्षेत्रात घट होत आहे. भारतात भूमीच्या गुणधर्मांबाबत खूप भिन्नता आढळते. उत्तरेकडील राज्य पर्वतीय क्षेत्रात असल्यामुळे

त्याठिकाणी लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र, जमिनीची सुपीकता कमी आहे. राजस्थान व गुजरात राज्यांचा काही भाग वाळवंटी स्वरूपाचा आहे. तर मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र या राज्यांमध्ये सुपीक जमिनीचे प्रमाण जास्त आहे.

### १.२.७ जमिनीच्या उपयोगाची रचना (Land Utilisation Pattern)

एकूण भौगोलिक क्षेत्राचे वेगवेगळ्या प्रकारात विभाजन केले जाते. यात लागवडीखालील क्षेत्र, दुसोटा क्षेत्र, वनाखालील क्षेत्र, ओसाड व मशागतीस अयोग्य जमीन, कायमची कुरणे आणि चराऊ कुरणे इत्यादी क्षेत्रे महत्त्वाची असतात. लागवडीखालील क्षेत्राच्या प्रमाणावर संबंधीत प्रदेशाचा विकास अवलंबून असतो. आणि मशागत योग्य पडिक जमिनीवरून त्या प्रदेशाच्या लागवडीखालील क्षेत्रात संभाव्य वाढ दिसून येते. पर्यावरण संतुलनासाठी एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३% वनाच्छादित क्षेत्र असणे आवश्यक असते. भारतातील एकूण जमिनीचा वापर खालीलप्रमाणे केला जातो.

**भारतातील जमीन उपयोगाची रचना १९५०–५१ ते २००५–१० (दक्षलक्ष हेक्टर)**

| संबंधीत बाब | १९५०–५१ | १९६०–६१ | १९७०–७१ | १९८०–८१ | १९९०–९१ | १९९९–२००० | २००९–१० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण उपयोगी जमीन | २८४.३२ (१००.००) | २९८.४६ (१००.००) | ३०३.७६ (१००.००) | ३०४.१५ (१००.००) | ३०४.८६ (१००.००) | ३०६.५४ (१००.००) | ३०५.६१ (१००.००) |
| जगले/वने | ४०.४८ (१४.२४) | ५४.०५ (१८.११) | ६३.९१ (२१.०४) | ६७.४७ (२२.१८) | ६७.८० (२२.२४) | ६९.०२ (२२.५२) | ७०.०४ (२२.९२) |
| लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | ४७.५२ (१६.७१) | ५०.७५ (१७.००) | ४४.६४ (१४.७०) | ३९.६२ (१३.०३) | ४०.४८ (१३.२८) | ४२.४० (१३.८३) | ४२.९५ (१४.०६) |
| कायमस्वरूपी गुरे चारण्या–साठीची जमीन | ६.६८ (२.३५) | १३.९७ (४.६८) | १३.२६ (४.३७) | ११.९७ (३.९४) | ११.४० (३.७४) | ११.०४ (३.६०) | १०.१५ (३.३२) |
| झाडे, रोपवाटीकाखाली असलेली जमीन | १९.३८ (६.८२) | ४.४६ (१.४९) | ४.३० (१.४२) | ३.६० (१.१८) | ३.८२ (१.२५) | ३.६१ (१.१८) | ३.३५ (१.१०) |
| निरुपयोगी/टाकाऊ जमीन | २२.९४ (८.०७) | १९.२१ (६.४४) | १७.५० (५.७६) | १६.७४ (५.५०) | १५.०० (४.९२) | १३.८२ (४.५१) | १८.८६ (४.२१) |
| निव्वळ लागवडीखालील जमीन | ११८.७५ (४१.७७) | १३३.२० (४४.६३) | १४०.२७ (४६.१८) | १४०.०० (४६.०३) | १४३.०० (४६.९१) | १४१.२३ (४६.०७) | १४०.०२ (४५.८२) |
| दुसोटा/एकापेक्षा जास्त पिकांच्या लागवडीखालील जमीन | १३.१४ (४.६२) | १९.५७ (६.५६) | २५.५२ (८.४०) | ३२.६३ (१०.७३) | ४२.७४ (१४.०२) | ४८.५१ (१५.८३) | ५२.१८ (१७.०७) |
| एकूण लागवडीखालील जमीन | १३१.८९ (४६.३९) | १५२.७७ (५१.१९) | १६५.७९ (५४.५८) | १७२.६३ (५६.७६) | १८५.७४ (६०.९३) | १८९.७४ (६१.९०) | १९२.२० (६२.८९) |

**टीप – कंसातील अंक शेकडा प्रमाण दर्शवितात.**

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की देशातील जमीन उपयोगाच्या रचनेत सातत्याने बदल होत आहेत. १९५०-५१ मध्ये वनक्षेत्र फक्त १४.२४ टक्के होते. यात सातत्याने वाढ होऊन २००९-१० मध्ये हे २२.९२ टक्के झाले. लागवडीसाठी उपलब्ध नसलेल्या जमिनीचे प्रमाण १५टक्क्यांपेक्षा कमी राहिले आहे. कायमस्वरूपी गुरे चरण्यासाठीच्या जमिनीत घट झाली आहे. १९६०-६१ मध्ये या जमिनीचे प्रमाण ४.६८ टक्के होते. २००९-१० मध्ये हे प्रमाण ३.३२ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे. तसेच झाडे, रोपवाटिकांखाली असलेली जमीन व निरुपयोगी जमिनीत घट झाली आहे. लोकसंख्या वाढ, सिंचनात वाढ, वृक्षतोड या कारणांमुळे निव्वळ लागवडीखालील जमीन, एकापेक्षा जास्त पिकांखालील जमीन व एकूण लागवडीखालील जमिनीत वाढ झाली आहे. १९५०-५१ मध्ये निव्वळ लागवडी खालील जमीन ११८.७५ (४१.७७ टक्के) दशलक्ष हेक्टर होती तर २००९-१० मध्ये या जमिनीचे क्षेत्र १४०.०२ दसलक्ष हेक्टर (४५.८२ टक्के) दशलक्ष हेक्टर पर्यंत वाढले होते. एकापेक्षा जास्त पिकांच्या लागवडीखालील जमिनीत खूप वेगाने वाढ झाली असून या जमिनीचे प्रमाण ४.६२ टक्क्यांवरून १७.०७ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. त्यामुळे एकूण लागवडीखालील जमिनीत वाढ झाली आहे. १९५०-५१ मध्ये याचे प्रमाण ४६.३९ टक्के होते तर २००९-१० मध्ये हे ६२.८९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.

वरील बदल देशातील जमीन उपयोगाच्या रचनेत झाले असले तरी देशाच्या विकासासाठी आजही वनांखालील क्षेत्रात, एकापेक्षा जास्त पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रात व एकूण लागवडीखालील क्षेत्रात वाढ होणे आवश्यक आहे. कारण त्यामुळेच पर्यावरणाचा समतोल साधला जाईल व देशातील अन्नधान्य व चाऱ्यांची गरज पूर्ण होऊ शकेल.

## १.२.६ जमीन उपयोगाच्या समस्या आणि उपाययोजना

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की भारतात जमिनीचा वापर अनेक घटकांसाठी होतो. परंतु भूमीचा पुरवठा हा मर्यादित असतो. परंतु मागणी मात्र सातत्याने वाढते. त्यामुळे भूमीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु या भूमीच्या वापराबाबत काही समस्या निर्माण झालेल्या आहेत.

१) लोकसंख्येचा दृष्टीने भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. जगातील १७ टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या भारतात वास्तव्य करते. परंतु जगातील एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी मात्र २.४ टक्के क्षेत्र भारताकडे आहे. त्यामुळे प्रतीव्यक्ती जमिनीची उपलब्धता कमी आहे.

२) भारताच्या भौगोलिक क्षेत्रापैकी काही क्षेत्र आजही पाकिस्तान व चीन या देशांकडे आहे.

३) पर्यावरण संतुलनासाठी ३३ टक्के क्षेत्र वनांखाली असणे आवश्यक आहे. परंतु भारतात हे प्रमाण २२ टक्केच आहे. त्यात वाढ करणे महत्त्वाचे आहे.

४) देशात लागवडीयोग्य जमिनीचा वापर खूप मोठ्या प्रमाणात होतो. परंतु या लागवडी योग्य जमिनीत वारा, पाऊस, गुरांची चराई यांसारख्या कारणांमुळे धूप होत आहे.

५) एकाच पिकाचे सातत्याने उत्पादन, रासायनिक खतांचा अती वापर व सातत्याने पाणी दिल्यामुळे जमिनीच्या सुपीकतेत घट होत आहे.

६) उद्योग उभारणी, गावांचा विस्तार, तलाव निर्मिती यामुळे सुपीक जमिनीत सातत्याने घट होत आहे.

७) जमीन ही संपत्ती असल्याने त्यात सातत्याने विभागणी होत आहे. त्यामुळे त्या लहान जमिनीत शेती करणे, शेतीचे आधुनिकीकरण करणे, व्यापारी पीके घेणे यंत्रांचा वापर करणे शक्य होत नाही.

८) शेतीत पारंपरिक पद्धतीचा वापर, सुधारित खते, बी-बियांणे, किटकनाशकांचा अभाव, जमिनीच्या गुणधर्माचा विचार न करता उत्पादन घेणे यांसारख्या कारणांमुळे उत्पादकता कमी आहे.

**उपाय योजना**

देशातील जमिनीच्या वापराबाबत वरील समस्या आहेत. या समस्या सोडवण्यासाठी खालील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१) रस्ते, लोहमार्ग, नदी-नाले, यांच्या बाजूला, बांधावर, डोंगरावर, वृक्षांची लागवड करावी.

२) शहर, उद्योग उभारणीसाठी सुपीक जमिनीचा वापर करू नये.

३) जमिनीच्या गुणधर्मानुसार पिकांची लागवड करावी व आवश्यकतेनुसारच खते व पाण्याचा वापर करावा.

४) जमिनीचे विभाजन टाळावे.

५) रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय, कंपोस्ट खतांचा वापर करावा.

६) सामूहिक शेतीद्वारे उत्पादनात व उत्पादकतेत वाढ करावी.

७) देशातील शेतीला उपयुक्त असणाऱ्या कृषी अवजारांचा विकास करावा.

८) सिंचन क्षेत्रात वाढ करून जमिनीची उत्पादकता, अनेक पिकांची लागवड व जमिनीच्या उत्पादनात वाढ करावी.

### १.२.७ जलसंसाधन व सरकारी धोरणे

Water - Extend of water resources, Govt. Policy on water resources water management.

मानवाबरोबरच सर्व जीवसृष्टीसाठी पाणी जीवन आहे. मानवाला पिण्यासाठी, स्वच्छतेसाठी, घरकामासाठी, पशूंना, उद्योगांना, शेती, विजनिर्मिती यांसारख्या अनेक घटकांना पाणी आवश्यक असते. त्यामुळेच प्राचीन काळापासून मानवी संस्कृतींचा विकास नदी तीरावर झालेला आहे. पृथ्वीच्या एकूण क्षेत्रफळापैकी सुमारे ७१% क्षेत्र पाण्याने व्यापलेले आहे. परंतु हे पाणी क्षारयुक्त असल्यामुळे त्याचा उपयोग फक्त ढगनिर्मिती, जल वहातूक व मासेमारी या मर्यादित कारणांसाठीच होतो. पृथ्वीवरील एकूण १.४१ अब्ज घन किलोमीटर पाण्याच्या साठ्यापैकी ९८ टक्के पाणी क्षारयुक्त आहे. शिल्लक राहिलेल्या २ टक्के पाण्यापैकी ८७ टक्के पाणी कायमस्वरूपी बर्फात असल्यामुळे मानवाच्या उपयोगासाठी येत नाही. जगातील सर्वच राष्ट्रांत पाण्याच्या मागणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे कारण पाणी सांगितले जाते. यावरून पाण्याचे महत्त्व स्पष्ट होते.

भारतातील पाण्याच्या उपलब्धतेविषयी आजपर्यंतही अचूक आकडेवारी उपलब्ध झालेली नाही. १९७२ च्या दुसऱ्या सिंचन आयोगानुसार देशात वापरायोग्य भूगर्भात व शूपृष्ठावर ८७०० कोटी क्युबिक मीटर पाणी आहे. देशातील सर्व नद्यांच्या प्रवाहात १६४५ हजार दशलक्ष क्युबिक मीटर पाणी वाहते. त्यातील १/३ पाण्याचे बाष्पीभवन होते. देशात पर्जन्यामुळे ८२५ हजार दशलक्ष क्युबिक मीटर पाणी भूगर्भात झिरपते. यातील ४५५ हजार दशलक्ष क्युबीक मीटर पाणी जमिनीच्या वरच्या स्तरात असते. त्याचा वापर वनस्पती, सिंचन व इतर कारणांसाठी होते. इतर पाणी खालच्या स्तरात गेल्यामुळे त्याचा वापर करणे शक्य होत नाही. वर्तमान स्थितीत देशात पाण्याद्वारे १,४६,७०१ मेगावॅट जल विद्युत उत्पादन करण्याची क्षमता आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र २३ टक्के क्षमतेचाच वापर केला जातो.

देशात दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असल्यामुळे प्रतिव्यक्ती सरासरी पाण्याची उपलब्धता सन २००१ मध्ये सुमारे १८२० घन मीटर होती. २०२५ मध्ये ही १३५० घन मीटर पर्यंत कमी होण्याचा अंदाज आहे. सन २००० मध्ये राष्ट्रीय समेकित जल संसाधन विकास आयोगाद्वारे विविध घटकांना भविष्यातील पाण्याच्या आवश्यकतेबाबत खालील मत मांडले होते.

**विभिन्न क्षेत्रांसाठी पाण्याची आवश्यकता.**

| **क्षेत्र** | **पाण्याची मागणी (बिलियन क्युबिक मीटर)** | | |
|---|---|---|---|
| | **२०१०** | **२०२५** | **२०५०** |
| सिंचन | ५५७ | ६११ | ८०७ |
| पिण्याचे पाणी | ४३ | ६२ | १०१ |
| उद्योग | ३७ | ६७ | ८१ |
| वीजनिर्मिती | १९ | ३३ | ७० |
| इतर | ५४ | ७० | १११ |
| एकूण | ७१० | ८४३ | ११८० |

Source - Eleventh Plan 2007-12, Vol. III P.46

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की दिवसेंदिवस पाण्याच्या मागणीत सर्वच क्षेत्रांत वाढ होणार आहे. त्यामुळे पाण्याची साठवण, बचत व युक्ततम वापर करणे काळाची गरज आहे.

### **१.२.७.१ राष्ट्रीय जलधोरण** (National Water Policy)

जलसंसाधनाच्या सुनियोजित विकासासाठी १९८३ मध्ये राष्ट्रीय जल संसाधन परिषदेची स्थापना केली. या परिषदेने ऑगस्ट १९८६ मध्ये राष्ट्रीय जलधोरण तयार केले. यामध्ये भविष्यातील जल प्रकल्प, त्यांच्यासाठी भांडवल व त्यांची देखरेख, भूगर्भातील जल, पाण्याच्या मागणीची प्राथमिकता निश्चित करणे, पाणी संरक्षण, पूर नियंत्रण, जलसंबंधी प्रशिक्षण विज्ञान व आधुनिक प्रयोग या सर्व घटकांचा समावेश केला होता. संशोधित राष्ट्रीय जल धोरणाचा स्वीकार सन २००२ मध्ये केला. यानुसार राज्य सरकारांना

जल धोरणे तयार करण्यास परवानगी दिली.

देशात राष्ट्रीय जल धोरण लागू केल्यानंतर त्याच्या प्रगतीचे अवलोकन व राष्ट्रीय जल संसाधन परिषदेला प्रगतीचा अहवाल देण्यासाठी सप्टेंबर १९९० मध्ये जल संसाधन मंत्रालयाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय जल बोर्डाची स्थापना करण्यात आली. केंद्रीय कृषी, ग्रामीण विकास, शहरी विकास, भूतल परिवहन, पर्यावरण, वन, नियोजन आणि विज्ञान व औद्योगिक मंत्रालयाचे सचिव, केंद्रिय जल आयोगाचे अध्यक्ष, सर्व घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, आयोगाचे सदस्य आहेत. तसेच केंद्रीय जल आयोगाचे सदस्य या बोर्डाचे सदस्य सचिव आहेत.

**उपाययोजना**

१) देशात जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत पाऊस पडतो. या पडणाऱ्या पावसाचे पाणी अडवून ते जास्तीत जास्त मुरवण्याचा / झिरपण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२) उपयुक्ततेनुसार लहान, मध्यम व मोठ्या प्रकल्पांची निर्मिती करणे.

३) डोंगर क्षेत्रातील जमिनीचा वापर तलाव निर्मितीसाठी केल्यास सुपीक जमिनीच्या क्षेत्रात घट होणार नाही.

४) गावपातळीवर लहान-लहान बंधाऱ्यांची निर्मिती करावी.

५) ऊस, केळी यांसारख्या पिकांच्या पाण्यासाठी ठिबक सिंचनाची सक्ती करावी.

६) कारखान्यातून व शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करावा.

७) सर्व सामान्य नागरिकांना पाण्याचे महत्त्व, युक्ततम वापर पटवून देणे.

## १.२.८ वनसंपत्ती - स्वरूप, वनक्षेत्र कमी झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या (Forest, Nature, Problem of deforestation)

प्राचीन काळापासून वृक्षांना महत्त्वाचे स्थान आहे. यामुळेच संत तुकाराम त्यांच्या बद्दल म्हणतात. **''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे''** पर्यावरणाचा समतोल, औषधी वनस्पतींची उपलब्धता. रोजगार, पशुपालन यांसारख्या अनेक घटकांसाठी वनस्पती महत्त्वाची असते. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३% क्षेत्र वनाखाली असणे आवश्यक असते. या वनसंपत्तीचे महत्त्व खालील घटकांद्वारे स्पष्ट होते.

### १.२.८.१ वनसंपत्तीचे महत्त्व

१) पर्यावरणाचा समतोल राखला जातो.

२) बांधकाम, इंधनासाठी लाकूड उपलब्ध होते.

३) पशूंना चारा निर्मिती होते.

४) फर्निचर, कागद उद्योगासाठी लागणारा कच्चामाल प्राप्त होतो.

५) फळे, फुले औषधी वनस्पती प्राप्त होतात.

६) डिंक, चंदन, काथ, प्राण्यांची कातडी प्राप्त होते.

७) शुद्ध हवा, शीतल छाया, जमिनीतील ओलावा व जमिनीची धूप थांबण्यास, पूर, वेगाचा वारा, थंडीची लाट नियंत्रणास मदत होते.

८) पाऊस पडण्यास मदत होते.

९) पशुपालनासाठी मदत होते.

१०) कार्बनडॉय ऑक्साईडचे प्रमाण कमी होऊन ऑक्सिजनचा पुरवठा होतो.

११) हिंस्त्रप्राणी मानवी वस्त्यांवर आक्रमण करत नाहीत.

१२) पर्यटनाला चालना मिळते.

१३) रोजगार निर्मिती होते.

१४) पशु, पक्षी, वनस्पतींचे संवर्धन होते.

### **१.२.८.२ भारतातील वनांचे स्वरूप** (Nature of Indian Forest)

भारतातील वनक्षेत्रात खूप भिन्नता आढळते. ११वा वनस्थितीचा अहवाल २००९ मध्ये तयार करण्यात आला. हा अहवाल तयार करण्यासाठी उपग्रहाची मदत घेतली होती. या अहवालानुसार देशात एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २३.८४ टक्के क्षेत्र वनाच्छादित असून हे क्षेत्र ६९.०९ लक्ष हेक्टर आहे. राज्याराज्यात वनक्षेत्राच्या प्रमाणात खूप भिन्नता आहे. राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी हिमाचल प्रदेशात ८० टक्के, उत्तराखंड ४६ टक्के, छत्तीसगट ४१ टक्के, आसाम ३५ टक्के, झारखंड २९ टक्के, मध्यप्रदेश २५ टक्के, बिहार ७ टक्के, उत्तरप्रदेश ६ टक्के तर महाराष्ट्र,गुजरात व राजस्थानात ५ टक्क्यांपेक्षा कमी क्षेत्र वनांखाली आहे.

देशातील वनांचे तीन विभागात वर्गीकरण केले जाते.

१) राखीव वने (Reserved Forest) यांचे प्रमाण ५६ टक्के आहे.

२) संरक्षित वने (Protected Forest) यांचे प्रमाण २७ टक्के आहे.

३) इतर वने (Unclassified forest) एकूण वनामध्ये यांचे प्रमाण १७ टक्के आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी देशात वनरक्षणाकडे लक्ष दिले नाही. प्रामुख्याने ग्रामीण भागात इंधन (जळण) म्हणून लाकडाचा वापर होत असल्याने वनक्षेत्रात खूप घट झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वनरक्षणासाठी शासनाकडून वेळोवेळी प्रयत्न केले आहेत. पर्यावरणाचा समतोल राखणे व वनाखालील क्षेत्र किमान ३३% करण्यासाठी केंद्रसरकारने १९५२ मध्ये वनविषयक धोरण जाहीर केले. पंचवार्षिक योजनांमध्ये वनक्षेत्र वाढविण्यावर विशेष लक्ष दिले. १९८० मध्ये वनांचे रक्षण करण्यासाठी वन संरक्षण कायदा मंजूर केला. राष्ट्रीय कृषी आयोगाच्या शिफारशी नुसार १९८०-८१ मध्ये सामाजिक वनीकरणाची सुरूवात केली. १९८८ मध्ये वनांचे सरंक्षण, संधारण व विकास ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वन धोरण जाहीर केले या सर्व प्रयत्नांचे यश म्हणजे वनक्षेत्रात वाढ होत नसली तरी वृक्षतोडीचे प्रमाण

कमी झाले आहे. अनेक सामाजिक संघटनांनी जनजागृती व वृक्षलागवड केल्याने वनक्षेत्रात वाढ होत आहे.

### १.२.८.३ वनक्षेत्र कमी झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या (Problem of Deforestation)

प्राचीन काळापासून मानवाने बेसुमार वृक्षतोड केली आहे. सुरूवातीच्या काळात तो फळे, कंदमुळे, प्राण्यांचे मांस यांच्या साह्याने अन्नाची गरज पूर्ण करत होता. नंतर त्याने वृक्षतोड करून विशिष्ट ठिकाणी शेतजमीन निर्माण करून त्याची भटकंती थांबविली. मानवाच्या प्रगतीबरोबर इंधन, बांधकाम, फर्निचर, यांच्या निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली. शहरांचा विकास, रस्ते, लोहमार्ग, तलाव, उद्योग उभारणी यामुळेही वनक्षेत्रात घट झाली. त्यामुळे खालील समस्या निर्माण झाल्या आहेत.

**१) पर्यावरणाचा असमतोल**

वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. त्याचा विपरित परिणाम ऋतूचक्रावर झाला आहे. त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. त्याच्या लहरीपणात वाढ झाली आहे. थंडीचे प्रमाण कमी झाले आहे. उन्हाळ्यातील उष्णतेत वाढ झाली आहे. दिवसाचे तापमान व रात्रीचे तापमान यात खूप विषमता निर्माण होत आहे. परिणामी अनेक पिकांच्या उत्पादकतेत घट झाली आहे. विशेषतः पंजाब व हरियाणा राज्यातील गहू व तांदूळ उत्पादकतेत घट झाली आहे.

**२) नैसर्गिक संकटात वाढ –**

वनांचे क्षेत्र कमी झाल्यामुळे दुष्काळ, महापूर, चक्रीवादळे, भूस्खलन, थंडीची लाट, हिमवर्षाव, ढगफुटी, यांसारख्या नैसर्गिक संकटांत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

**३) जमिनीची धूप व सुपीकतेत घट –**

झाडांचे प्रमाण कमी झाल्याने झाडांच्या सावलीचे, पाला-पाचोळ्याचे आच्छादन कमी झाल्यामुळे, वारा व पाण्याच्या जलद वहनामुळे जमिनीची धूप वाढत आहेत व जमिनीच्या उत्पादकतेत घट होत आहे.

**४) कार्बनडाय ऑक्साईड व कार्बनडाय मोनाक्सॉइड यांसारख्या विषारी वायूत वाढन :**

कारखाने, वाहन व इंधनाच्या ज्वलनातून निर्माण होणाऱ्या धुरामध्ये कार्बनडाय ऑक्साईड, मोनाक्सॉइड यासारखे विषारी वायू असतात. वृक्ष या वायूंचे शोषण करून ऑक्सिजन पुरवतात. परंतु वृक्षांची संख्या कमी झाल्यामुळे विषारी वायूत वाढ झाली आहे. त्यामुळे नवनवीन आजारांची निर्मिती होत आहे. तसेच मानसिक स्वास्थ्य बिघडत आहे.

**५) प्राण्यांच्या संख्येत घट व हिंस्त्र प्राण्यांचा मानवी वस्तीवर हल्ला –**

वनांचे क्षेत्र कमी झाल्यामुळे प्राणी, पशू, पक्षांची संख्या दिवसेंदिवस कमी होत

आहे. तसेच वाघ, सिंह, चित्ता, बिबट्या यांसारखे हिंस्त्र प्राणी मानवी वस्त्यांवर हल्ला करत आहेत व इतर शाकाहारी प्राणी शेतीतील उत्पादनांचे नुकसान करत आहेत.

### १.२.८.४ वनक्षेत्र विकासासाठी उपाययोजना –

देशात वनांखालील क्षेत्रात सातत्याने घट होत आहे. शाश्वत विकासासाठी वृक्षतोड थांबविण्याबरोबरच नवीन वृक्षांची लागवड करणे आवश्यक आहे.

१) शक्य असेल तेथे वृक्ष लागवड व संगोपन करणे.

२) डोंगराळ प्रदेशात जमिनीचा वापर लागवडीसाठी होत नसल्यामुळे तेथे वृक्षलागवड करणे शक्य आहे.

३) रस्ते, लोहमार्गांच्या मोकळ्या जागी, शेतातील बांध, नदी –नाल्यांचा काठी वृक्षलागवड करावी.

४) इंधन (जळण) म्हणून वाळलेल्या वृक्षांचा, शेतीतील टाकाऊ घटक, गोबर गॅस, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, नैसर्गिक वायूंचा वापर करावा.

५) बांधकाम व फर्निचरसाठी लाकडाऐवजी लोखंड किंवा प्लास्टिकचा वापर करावा.

६) वन्य प्राण्यांसाठी विशेष वनांची निर्मिती करावी.

७) सामाजिक वनीकरणाचे महत्त्व पटवून वृक्ष लागवड व संवर्धनात सर्वांचा सहभाग घ्यावा.

वरील उपाययोजना केल्यास देशात वनांखालील क्षेत्रात वाढ होईल.

## १.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

अ) चूक की बरोबर सकारण सांगा.

१) भारत देशाची अर्थव्यवस्था विकसित आहे.

२) भारतात नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर होत नाही.

३) देशात जंगलांचे प्रमाण कमी होत आहे.

४) देशाच्या विकासात पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

५) भारतातील दरडोई उत्पन्न जास्त आहे.

६) लोकसंख्या वाढ आर्थिक विकासाला अडथळा होत आहे.

७) जंगलतोडीचा परिणाम पर्यावरण असंतुलनावर होत आहे.

## १.४ सारांश

अर्थव्यवस्थेत आर्थिक घटकांबरोबरच नैसर्गिक संसाधने, शेती, उद्योग, व्यापार, उत्पन्न, उत्पादन, रोजगार, दारिद्र्य, आरोग्य, सरकारी धोरणे यांसारख्या अनेक बाबींचा अभ्यास केला जातो. जगातील अर्थव्यवस्थांचे विभाजन अविकसित अर्थव्यवस्था, विकसनशील अर्थव्यवस्था व विकसित अर्थव्यवस्था या तीन विभागात केले जाते. भारत देशाची अर्थव्यवस्था विकसनशील आहे म्हणजेच ती विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. दरडोई उत्पन्न कमी, प्राथमिक क्षेत्राचे वर्चस्व, लोकसंख्येत जलद वाढ, बेरोजगारी, दारिद्र्य, आर्थिक विषमता, भांडवलाची कमतरता, पायाभूत सुविधांचा अभाव, जुनाट तंत्रज्ञान यासारखी वैशिष्ट्ये भारतीय अर्थव्यवस्थेत दिसून येतात.

देशाच्या आर्थिक विकासात नैसर्गिक संसाधनांना अनन्यसाधारण महत्त्व असते. भारतात जमीन, पाणी, सूर्यप्रकाश, हवामान, वने, खनिजे, मनुष्यबळ, पशुधन, यांसारखी नैसर्गिक संसाधने खूप मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. परंतु त्यांचा युक्तत्तम वापर होत नाही. देशात लोकसंख्या वाढीचा वेग खूप जास्त असल्यामुळे बेरोजगारी, दारिद्र्य, कुपोषण, महागाई यांसारख्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. तसेच सूर्यप्रकाश, समुद्र किनारा, सागरी लाटा, लाटा यांसारख्या नैसर्गिक संसाधनावर संशोधन होत नसल्यामुळे त्यांचा युक्ततम वापर होत नाही. देशात सुपीक जमिनीच्या क्षेत्रात व उत्पादकतेत सातत्याने घट होत आहे. वनांचे क्षेत्रही कमी होत आहे व पाण्यासंबंधी योग्य धोरणे न राबविल्यामुळे दुष्काळ, पूर या समस्यांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. देशाच्या विकासासाठी लोकसंख्या नियंत्रण, नवीन संशोधन, वनक्षेत्रात वाढ, शैक्षणिक, आरोग्य सुविधांचा विकास, सूक्ष्म जल सिंचन यांसारख्या घटकांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. तरच भारत महासत्ता बनेल.

## १.५ पारिभाषिक शब्द

वर्गीकरण - Classification

संसाधन - Resources

## १.६ संदर्भ सूची

१) मिश्र, जगदीश नारायण (२०११) भारतीय अर्थव्यवस्था, इलाहाबाद, किताब महल.

२) देसाई, श्री. मु. व भालेराव, निर्मल (२०११) भारतीय अर्थव्यवस्था, पुणे, निराली प्रकाशन.

३) चव्हाण, एन.एल. (२००९). भारतीय अर्थव्यवस्था, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स.

४) सोळुंके आर. एस. व ककडे, व्ही.बी. (२००३) भारतीय अर्थव्यवस्था, पुणे, श्री विद्या प्रकाशन.

५) प्रतियोगिता दर्पण, अतिरिक्तांक, भारतीय अर्थव्यवस्था (२०१३), आगरा, प्रतियोगिता दर्पण.

६) Economic Survey – २०१२–१३

७) Govt. of India, Ministry of Agriculture, Department of Agriculture and Cooperation State of Indian Agriculture 2012-13, New Delhi

## १.७ सरावासाठी प्रश्न

**अ) दीघोत्तरी उत्तरे लिहा.**

१) अर्थव्यवस्थेची व्याख्या सांगून विकसनशील अर्थव्यवस्था व विकसित अर्थव्यवस्थेतील फरक स्पष्ट करा.

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

२) भारतीय अर्थव्यवस्थेची मूलभूत वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

३) नैसर्गिक संसाधने म्हणजे काय? आर्थिक विकासात नैसर्गिक संसाधनाचे महत्त्व स्पष्ट करा.

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

४) भारतात नैसर्गिक संसाधनांचा पर्याप्त वापर होत नाही. स्पष्ट करा.

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

५) देशातील जमीन, वन व जल संसाधनांची समस्या व उपाययोजना स्पष्ट करा.

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

**ब) क्षेत्रीय कार्य :**

१) आपल्या परिसरातील नैसर्गिक संसाधनाचा शोध घेऊन त्यांच्या विकासासाठी उपाययोजना सुचवा.

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

# घटक : २

# मानवी संसाधन आणि आर्थिक विकास

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ मानवी संसाधनाचा अर्थ

लोकसंख्या : एक मानवी संसाधन

२.२.२ मानवी विकास निर्देशांक

२.२.३ लोकसंख्येचा आकार

२.२.४ जननदर, मृत्युदर व लोकसंख्येतील शुद्ध वाढ

२.२.५ लोकसंख्येचे संख्यात्मक वर्गीकरण

२.२.६ ग्रामीण व शहरी लोकसंख्या

२.७.७ साक्षरतेचे प्रमाण

२.७.८ सरासरी आयुर्मान

२.७.९ एड्स निर्मूलन

२.७.१0भारतातील आरोग्य विषयक कार्यक्रम

२.३ स्वयं अध्ययन प्रश्न

२.४ सारांश

२.५ पारिभाषिक शब्द

२.६ संदर्भ सूची


## २.0 उद्दिष्टे

१) मानवी संसाधन संकल्पना स्पष्ट करता येईल.

२) आर्थिक विकासात मानवी संसाधनाचे महत्त्व सांगता येईल.

३) मानव विकास निर्देशांक संकल्पना स्पष्ट करता येईल.

४) भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे सांगता येतील.

५) लोकसंख्या वाढ आर्थिक विकासाला बाधक ठरते याचे विवेचन करता येईल.

६) लोकसंख्येचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण स्पष्ट करता येईल.

## २.१ प्रस्तावना

प्रत्येक देशाचा आर्थिक विकास नैसर्गिक संसाधनावर अवलंबून असतो. नैसर्गिक संसाधनात जमीन, पाणी, डोंगर, नद्या, वने, खनिज संपत्ती, हवामान या निसर्गाकडून मिळालेल्या विनामूल्य (मोफत) घटकांबरोबरच लोकसंख्या म्हणजे मनुष्यबळाचा समावेश केला जातो. कारण लोकसंख्येतूनच कामगार, शेतकरी, अधिकारी, व्यवस्थापक तसेच उद्योजकांचा पुरवठा होतो. ज्या देशाची लोकसंख्या सशक्त, कार्यक्षम, उद्योगी, उपक्रमशील, साहसी, विविध कलागुण संपन्न, जिज्ञासू असल्यास त्या देशांचा विकास जलद गतीने होतो. जपान राष्ट्र दुसऱ्या महायुध्दानंतर उद्‌ध्वस्त / बेचिराख/ नेस्तनाबूत झाले होते. परंतु तेथे नैसर्गिक संसाधने नसतानाही नागरिकांच्या इच्छाशक्ती व कार्यक्षमतेमुळे ते जगातील एक प्रमुख राष्ट्र झाले आहे. त्याचप्रमाणे मानवी संसाधनाच्या बळावर इंग्लड, चीन, इस्त्राईल या राष्ट्रांनी प्रगती केली आहे. त्यामुळे मानवी संसाधनाला आर्थिक विकासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य, राहणीमान, तंत्रज्ञान यासारखे अनेक घटक मानव संसाधनात वाढ करण्यासाठी मदत करतात. भारताच्या विकासात मानव संसाधनाचे महत्त्व याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## २.२ विषय-विवेचन

### २.२.१ मानवी संसाधनाचा अर्थ (Meaning of Human Resources)

अ‍ॅडम स्मिथ यांच्या मते मानवी संसाधन हे असे साधन आहे की ज्याद्वारे मानवासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तू व सेवांची निर्मिती करता येते. तर कार्ल मार्क्स यांनी मानवी श्रम हा एकमेव उत्पादनाचा घटक सांगितला आहे.

''कोणत्याही वस्तू अथवा सेवेचे उत्पादन घेण्यासाठी जे मानवी श्रम, कौशल्य, बुद्धिमत्ता, संघटन या घटकांचा वापर केला जातो, त्यालाच मानवी संसाधन म्हणतात.''

सामान्यतः मानवी संसाधनात १५ ते ६० वयोगटातील लोकसंख्येचा समावेश केला जातो. कारण ० ते १४ वयोगटातील लोकसंख्या बाल्यगट तर ६० वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या गटाला वयस्कर किंवा वयोवृद्ध गट समजले जाते. बाल्यगट व वयस्करगट उत्पादन प्रक्रियेत भाग घेत नाहीत.

**लोकसंख्या : एक मानवी संसाधन** (Population as Human Resources)

मानवी संसाधन म्हणजे देशातील तरुण किंवा कर्ती लोकसंख्या होय. ज्याद्वारे देशातील उत्पादनात, तंत्रज्ञानात, कौशल्यात, उत्पादन पद्धतीत, नवनिर्मितीत सातत्याने वाढ होते. उत्पादनातील श्रम व संयोजक हे दोन घटक मानवी संसाधनावर अवलंबून असतात. देशातील नैसर्गिक संसाधनांचा पूर्णपणे व युक्ततम वापर देशातील मानवी संसाधनावर अवलंबून असतो. देशात लोकसंख्या जास्त असल्यास मानव संसाधनही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. परंतु मानव संसाधनात वाढ करण्यासाठी देशात शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पाणी पुरवठा, पायाभूत सुविधांचा विकास होणे आवश्यक असते.

देशातील लोकसंख्येचा प्रतिकूल व अनुकूल परिणाम आर्थिक विकासावर होतो.

जर नैसर्गिक संसाधनांच्या तुलनेत लोकसंख्या कमी असेल तर त्या संसाधनांचा युक्ततम वापर होत नाही. तसेच नैसर्गिक संसाधनांच्या तुलनेत लोकसंख्या जास्त असेल तर प्रतिव्यक्ती उत्पादनाचे घटक, संपत्ती, उत्पन्न कमी प्राप्त होते व देशात गरिबी, बेरोजगारी, उपासमार, कुपोषण यांसारख्या समस्या निर्माण होतात. भारतातही नैसर्गिक संसाधनांच्या तुलनेत लोकसंख्येत वेगाने वाढ झाली आहे. जगातील एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी भारताकडे मात्र २.४ टक्के भूक्षेत्र आहे. परंतु २०११ च्या जनगणनेनुसार जगातील एकूण लोकसंख्येपैकी भारतात वास्तव्य करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण १७.५ टक्के आहे. त्यामुळे देशात नैसर्गिक संसाधनांचा तुटवडा निर्माण होतो.

### २.२.२ मानव विकास निर्देशांक (Human development Index - HDI)

जागतिक स्तरावर विभिन्न देशातील मानवी विकासाचा अभ्यास करून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) प्रतिवर्षी प्रत्येक देशाचा मानव विकास निर्देशांक निश्चित करते. हा मानव विकास निर्देशांक संबंधित देशातील शिक्षण, आरोग्य व उत्पन्न या तीन घटकांच्या आधारे निश्चित करण्यात येतो. मानव विकास निर्देशांक हा ० ते १ च्या दरम्यान असतो. या निर्देशांकाद्वारे जगातील राष्ट्रांची विभागणी चार विभागात केली जाते.

१) अति उच्च मानव विकास – या गटातील देशांचा मानव विकास निर्देशांक ०.७९७ ते १ या दरम्यान असतो.

२) उच्च मानव विकास – ०.७११ ते ०.७९६ या दरम्यान मानव विकास निर्देशांक असणाऱ्या राष्ट्रांचा समावेश या गटात होतो.

३) मध्यम मानव विकास – मानव विकास निर्देशांक ०.५३६ ते ०.७१० या दरम्यान असणाऱ्या राष्ट्रांचा या गटात समावेश होतो.

४) कमी मानव विकास – ज्या राष्ट्रांचा मानव विकास निर्देशांक ०.५३५ पर्यंत आहे अशा राष्ट्रांचा यात समावेश होतो.

**जगातील विशिष्ट देशांचा मानव विकास निर्देशांक**

| अ.क्र. | देशाचे नाव | मानव विकास निर्देशांक (मूल्य) | मानव विकास निर्देशांक (क्रमांक) | मानव विकास निर्देशांक गट |
|---|---|---|---|---|
| ०१ | नॉर्वे | ०.९५५ | १ | अति उच्च मानव विकास |
| ०२ | ऑस्ट्रेलिया | ०.९३८ | २ | |
| ०३ | अमेरिका | ०.९३७ | ३ | |
| ०४ | जपान | ०.९१२ | १० | |
| ०५ | ब्रिटन | ०.८७५ | २६ | |
| ०६ | रशिया | ०.७८८ | ५५ | उच्च मानव विकास |
| ०७ | ब्राझील | ०.७३० | ८५ | |
| ०८ | श्रीलंका | ०.७१५ | ८७ | |
| ०९ | चीन | ०.६९९ | १०१ | मध्यम मानव विकास |
| १० | इस्त्राईल | ०.६६२ | ११२ | |
| ११ | दक्षिण आफ्रिका | ०.६२९ | १२१ | |
| १२ | भारत | ०.५५४ | १३६ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | बांग्लादेश | ०.५१५ | १४६ | कमी मानव विकास |
| १४ | पाकिस्तान | ०.५१५ | १४६ | |
| १५ | नेपाळ | ०.४६३ | १५७ | |
| १६ | अफगाणिस्तान | ०.३७४ | १७५ | |
| १७ | नाइजर | ०.३०४ | १८६ | कमी मानव विकास |
| १८ | कांगो गणराज्ये | ०.३०४ | १८६ | |

**स्रोत** UNDP **मानव विकास अहवाल २०१३ :**

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की विकसित राष्ट्रांत मानव विकास निर्देशांक जास्त असतो. कारण तेथे सरकारकडून शिक्षण, आरोग्य, रोजगारांवर, पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो.

भारतात राज्यनिहाय मानव विकास निर्देशांकात खूप भिन्नता आहे. २००७-०८ मध्ये विविध राज्यांचा मानव विकास निर्देशांक खालीलप्रमाणे होता.

भारतातील प्रमुख राज्यांचा मानव विकास निर्देशांक

| **अ.क्र.** | **राज्याचे नाव** | **मानव विकास निर्देशांक (मुल्य)** | **मानव विकास निर्देशांक (क्रमांक)** |
|---|---|---|---|
| ०१ | केरळ | ०.७९० | १ |
| ०२ | दिल्ली | ०.७५० | २ |
| ०३ | हिमाचल प्रदेश | ०.६५२ | ३ |
| ०४ | गोवा | ०.६१७ | ४ |
| ०५ | पंजाब | ०.६०५ | ५ |
| ०६ | महाराष्ट्र | ०.५७२ | ७ |
| ०७ | जम्मू-कश्मीर | ०.५२९ | १० |
| ०८ | गुजरात | ०.५२७ | ११ |
| ०९ | बिहार | ०.३६७ | २१ |
| १० | ओडिसा | ०.३६२ | २२ |
| ११ | छत्तीसगड | ०.३५८ | २३ |

प्रत्येक राज्यातील नैसर्गिक संसाधने, सरकारची धोरणे या कारणांमुळे मानव विकास निर्देशांकात भिन्नता दिसून येते.

## २.२.३ लोकसंख्येचा आकार (Size of Population)

लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा चीननंतर दुसरा क्रमांक आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०२ कोटी आहे. आर्थिक विकासात लोकसंख्येला अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशातील मर्यादित आणि कार्यक्षम लोकसंख्येमुळे उत्पादन आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन देशातील जनतेचा राहणीमानाचा दर्जा उंचावतो. ज्या देशाची लोकसंख्या वेगाने वाढते त्या देशात आर्थिक विषमता, गरीबी, बेरोजगारी, प्रादेशिक

असमतोल, कुपोषण, उपासमार यांसारख्या समस्या निर्माण होतात. भारतातही लोकसंख्या वाढीचा प्रतिकूल परिणाम राष्ट्राच्या विकासावर झालेला दिसून येतो.

**भारतातील लोकसंख्येची वाढ (कोटीमध्ये)**

| जनगणना | एकूण लोकसंख्या | दशकातील लोक संख्येतील वाढ/घट | दशकातील वृद्धी/घट (टक्के) | लोकसंख्येतील वाढीचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १८९१ | २३.६० | --- | --- | लोकसंख्येत खूप कमी गतीने वाढ |
| १९०१ | २३.८४ | + ०.२४ | --- | |
| १९११ | २५.२१ | + १.३७ | +५.७५ | |
| १९२१ | २५.१३ | − ०.०८ | − ०.३१ | |
| १९३१ | २७.९० | + २.७७ | + ११.०० | लोकसंख्येत वेगाने वाढ |
| १९४१ | ३१.८७ | + ३.९७ | + १४.२२ | |
| १९५१ | ३६.११ | + ४.२४ | + १३.३१ | |
| १९६१ | ४३.९२ | + ७.८१ | + २१.६४ | |
| १९७१ | ५४.८२ | + १०.९० | + २४.८० | लोकसंख्येत प्रचंड वाढ |
| १९८१ | ६८.३३ | + १३.५१ | + २४.६६ | |
| १९९१ | ८४.६४ | + १६.३० | + २४.८७ | |
| २००१ | १०२.८७ | + १८.२३ | + २१.५४ | लोकसंख्या वाढीचा वेग कमी |
| २०११ | १२१.०२ | + १८.१५ | + १७.६४ | |

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की १८९१ मध्ये भारताची लोकसंख्या २३.६० कोटी होती. १९२१ हे वर्ष वगळता इतर सर्व वर्षांमध्ये लोकसंख्येत वाढ झालेली आहे. परंतु सुरूवातीच्या काळात जननदर व मृत्युदर जवळपास सारखाच असल्यामुळे लोकसंख्येतील वाढ कमी होती. नंतर मात्र आरोग्य विषयक सुविधा, शिक्षण, आरोग्यविषयक जनजागृती यामुळे जननदराच्या तुलनेत मृत्युदर वेगाने कमी झाल्यामुळे लोकसंख्येत वेगाने वाढ झाली. १९९१ नंतर लोकसंख्या नियंत्रक धोरणांमुळे लोकसंख्या वाढीचा वेग अल्प प्रमाणात कमी झाला आहे.

### २.२.४ जननदर, मृत्युदर व लोकसंख्येतील शुद्ध वाढ
(Factors Affecting Birth Rate, Death Rate and Net Growth Rate)

जननदर, मृत्युदर व लोकसंख्येतील शुद्धवाढीवर देशातील लोकसंख्येत बदल होतो. जननदराला जन्मदर असेही म्हणतात. जननदर व मृत्युदरावर देशातील लोकसंख्येत बदल होतो. जननदर व मृत्युदर सारखेच असल्यास लोकसंख्येत वाढ होत नाही. परंतु जननदराच्या तुलनेत मृत्युदर कमी असल्यास लोकसंख्येत वाढ होते. विकसित देशात जननदर व मृत्युदर सारखेच असल्याने लोकसंख्येत कमी वेगाने वाढ होते. परंतु विकसनशील राष्ट्रात मृत्युदरापेक्षा जननदर जास्त असल्या कारणाने लोकसंख्येत वेगाने वाढ होते.

जननदर – एका वर्षात प्रतिहजार लोकसंख्येमागे जन्म घेणाऱ्या बालकांची संख्या म्हणजे जननदर होय.

एका वर्षात जन्माला आलेल्या बालकांची संख्या

जननदर = ---------------------------------- ब १०००

त्या वर्षातील एकूण लोकसंख्या

मृत्युदर - एका वर्षात प्रति हजार लोकसंख्येमागे मृत्यु पावणाऱ्या व्यक्तीची संख्या म्हणजे मृत्युदर.

एका वर्षात मृत्यु पावणाऱ्या व्यक्तींची संख्या

मृत्युदर = -------------------------------- ु १०००

त्या वर्षातील एकूण लोकसंख्या

लोकसंख्येत शुद्ध वाढ - एका वर्षातील जनन दरातून मृत्युदर वजा केल्यास लोकसंख्येतील शुद्ध वाढ प्राप्त होते.

लोकसंख्येतील शुद्ध वाढ = जननदर - मृत्युदर

भारतातील जननदर व मृत्युदर (प्रति १००० लोकसंख्येमागे)

| वर्ष | जननदर | मृत्युदर | वाढ / घट |
|---|---|---|---|
| १९११ | ४९.२ | ४२.६ | + ६.६ |
| १९२१ | ४८.१ | ४७.२ | + ०.९ |
| १९३१ | ४६.४ | ३६.६ | + ९.८ |
| १९४१ | ४५.२ | ३१.२ | + १४.० |
| १९५१ | ३९.९ | २७.४ | + १२.५ |
| १९६१ | ४०.९ | २२.३ | + १८.१ |
| १९७१ | ४१.१ | १८.९ | + २२.२ |
| १९८१ | ३३.३ | १२.५ | + २०.८ |
| १९९१ | २९.५ | ९.८ | + १९.७ |
| २००१ | २६.१ | ८.७ | + १७.४ |
| २०११ | २१.८ | ७.१ | + १४.७ |

जननदर, मृत्युदर व लोकसंख्येतील वाढ वरील तक्त्यात दर्शविली आहे. १९३१ पर्यंत जननदर व मृत्युदरात जास्त फरक नसल्यामुळे लोकसंख्येतील वाढ कमी आहे. १९४१ ते १९७१ या कालावधीत शासनाच्या योजना, आरोग्यविषयक सुविधा, आरोग्य विषयक जनजागृती, शिक्षण यामुळे मृत्युदरात वेगाने घट झाली. परंतु जननदरात कमी घट झाल्याने लोकसंख्या वेगाने वाढली आहे. १९८१ नंतर जननदरातही घट होत असल्यामुळे लोकसंख्येतील वाढ कमी होत आहे.

### २.२.४.१ भारतातील जननदर जास्त असल्याची कारणे

(Causes of the High Birth Rate in India)

१९११ मध्ये भारतातील जननदर ४९.२ होता तर २०११ पर्यंत हा २१.८ पर्यंत कमी झाला आहे. परंतु विकसित देशांच्या तुलनेत हा जननदर खूप जास्त आहे. त्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

## १) कृषी अर्थव्यवस्था –

देशात आजही ६० टक्क्यांपेक्षा अधिक रोजगार कृषी क्षेत्रातून पुरविला जातो. शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजले जाते. शेती ही पारंपरिक पद्धतीने केली जाते. त्यासाठी मानवी श्रमाचा वापर खूप जास्त होतो. कुटुंबात जास्त व्यक्ती असतील तर जास्त कामगार उपलब्ध होतात. त्यामुळे कामगारांना नगदी स्वरूपात पैसा देणे आवश्यक नसते. परिणामी कुटुंबात जास्त बालकांना जन्म दिला जातो.

## २) विवाहाची सार्वजनिकता –

विवाह हा एक संस्कार असून देशातील सर्वच धर्मात याला महत्त्वाचे स्थान आहे. ज्या व्यक्तींचा विवाह झालेला नाही, अशा व्यक्तीला धार्मिक कार्यात, समाजात दुय्यम स्थान दिले जाते. देशात अविवाहितांचे प्रमाण जास्त असल्यास जननदर कमी असतो.

## ३) संयुक्त कुटुंब पद्धती –

ग्रामीण भागात जननदर जास्त असल्याचे महत्त्वाचे कारण संयुक्त कुटुंब पद्धती आहे. संयुक्त कुटुंब पद्धतीत मुलांच्या पालन–पोषणाची, शिक्षणाची जबाबदारी आई–वडिलांवर न पडता कुटुंबातील मोठ्यांवर येते. परंतु विभक्त कुटुंब पद्धतीत आई–वडीलांवरच मुलांच्या पालन–पोषणाची जबाबदारी येते या कारणांमुळे विभक्त कुटुंबात जननदर कमी राहतो. विकसित राष्ट्रात तसेच शहरी भागात विभक्त कुटुंब पद्धती असल्यामुळे त्या ठिकाणी जननदर कमी असतो.

## ४) निरक्षरता व वाईट चालीरीती –

देशात आजही निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे कुटुंब नियोजनाला अल्प प्रतिसाद मिळतो. अंधश्रद्धा, वाईट चालीरीती यांना लोक बळी पडतात. तसेच कुटुंबात मुलाला प्रथम स्थान, मुल म्हणजे देवाघरचे फूल, ‘चोच देनेवाला दानाभी देता है।’ यांसारख्या कारणांमुळे कुटुंबातील बालकांची संख्या वाढते.

## ५) बाल विवाह –

शासनाने (कायद्याने) स्त्री–पुरुष या दोघांच्या विवाहाचे किमान वय निश्चित केले आहे. पुरुषांचे विवाहाचे वेळी वय किमान २१ वर्ष व स्त्रियांचे किमान १८ वर्ष निश्चित केले आहे. यापेक्षा कमी वय असणाऱ्या विवाहास बालविवाह म्हणतात. देशात बालविवाहाचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे नवदाम्पत्यास प्रजननासाठी जास्त कालावधी मिळतो. यामुळे जननदर जास्त राहतो.

## ६) हवामान –

जननदरावर हवामानाचाही परिणाम होतो. भारताचे भौगोलिक स्थान उष्ण कटिबंधीय प्रदेशात आहे. त्यामुळे येथील मुले–मुली लवकर वयात येतात. त्यांची प्रजनन क्षमताही जास्त असते. येथील हवामान प्रजननासाठी अतिशय अनुकूल असल्या कारणांमुळे जननदर जास्त असतो.

### ७) दारिद्र्य –

देशात दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे त्यामुळे ज्या कुटुंबात मुलांची संख्या जास्त तेथे कमविणारे जास्त त्यामुळे उत्पन्न जास्त असा चुकीचा समज निर्माण झालेला आहे. गरीब कुटुंबातील बालकांना आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे बालमृत्युंचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे जास्त बालकांना जन्म दिला जातो.

### ८) सरकारी धोरणांचा अभाव –

सरकारने लोकसंख्या नियंत्रणावर सुरूवातीच्या काळात दुर्लक्ष केले. १९७५ नंतर काही प्रमाणात कायदे केले. पण त्या कायद्यांची योग्य अंमलबजावणी झाली नाही. सर्वात जास्त लोकसंख्या असणाऱ्या चीन देशात १९७१ पासून लोकसंख्या नियंत्रणाच्या कायद्यांची कडक अंमलबजावणी केल्यामुळे तेथील जननदर खूप कमी झाला आहे.

### ९) कुटुंब नियोजन साधनांना अल्प प्रतिसाद –

देशात लोकसंख्या नियंत्रणासाठी सरकारने नसबंदी, गर्भनिरोध, कॉपर–टी, गर्भ निरोधक गोळ्या, दोन आपत्य असणाऱ्यांना सवलती/बढती यांसारख्या साधनांद्वारे, जननदर कमी करण्याचा प्रयत्न केला. पण या साधनांना जनतेकडून कमी प्रतिसाद मिळाल्याने देशातील जननदर जास्त आहे.

### १०) करमणुकीच्या साधनांचा अभाव –

देशात नवविवाहित जोडप्यांना करमणुकीची साधने उपलब्ध नसतात. त्यामुळे त्यांच्यात शारीरिक संबंध जास्त होतात. परिणामी जननदर जास्त राहतो. विकसित देशात करमणुकीची साधने जास्त असल्यामुमे तेथील जननदर कमी रहातो.

वरील सर्व घटकांचा एकत्रित परिणाम जननदरावर होतो. अलीकडील काळात सरकारने राबविलेली विविध धोरणे, शिक्षणाचा प्रसार यामुळे जननदरात घट झाली आहे. परंतु आजही मृत्युदरापेक्षा जननदर जास्त असल्यामुळे लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे.

### २.२.४.२ मृत्युदर घटण्याची कारणे –

मृत्युदर हा देशातील नैसर्गिक आपत्ती, आरोग्य सुविधा, राहणीमान, दरडोई उत्पन्न, देशातील सामाजिक राजकीय परिस्थिती या घटकांवर अवलंबून असतो. देशातील मृत्युदरात घट होण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

### १) युद्धसमाप्ती –

पूर्वीच्या काळी वेगवेगळ्या राज्याराज्यात, राष्ट्रा–राष्ट्रात युध्दाचे प्रमाण खूप जास्त होते. यात सैनिकांचा वापर होत असे. त्यामुळे युद्धात सैनिकांचा मृत्यु होत असल्यामुळे मृत्युदर जास्त असे. अलीकडील काळात युद्ध समाप्ती झाल्यामुळे युध्दात मरणाऱ्यांचे प्रमाण खूप कमी झाले आहे.

### २) दुष्काळ निवारण –

सरकारच्या विविध धोरणांमुळे ओल्या व कोरड्या दुष्काळात नागरिकांना अन्न,

पाणी, निवारा, आरोग्य सरकारकडून उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे दुष्काळांची तीव्रता कमी झाली आहे. त्यामुळे मृत्युदरातही घट झाली आहे.

**३) नैसर्गिक व वाहतूक सुविधांचा विस्तार –**

देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठमोठे दवाखाने, हॉस्पिटल्स, आरोग्य केंद्रे, डॉक्टर, नर्स, रुग्णवाहिका यांचा विस्तार झाल्यामुळे आजारी व्यक्तीला योग्य उपचार दिले जातात. तसेच वाहतूकीच्या साधनांमुळे वैद्यकीय सुविधांची तात्काळ उपलब्धता करता येते.

**४) साथीच्या रोगांचे उच्चाटण –**

प्लेग, देवी, कॅलरा, पटकी, हिवताप, हत्तीरोग यांसारख्या साथीच्या रोगांचे विविध औषधांच्या सहाय्याने उच्चाटन केले आहे. तसेच विविध रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपचारात्मक लसीकरण केले जाते. त्यामुळे आजाराचे व मृत्युदराचे प्रमाण कमी झाले आहे.

**५) धान्य व उत्पादनात वाढ –**

शेतीचे आधुनिकीकरण, उत्पादकतेत वाढ, रासायनिक खतांचा वापर, सुधारित बी–बियाणे, कीटकनाशकांचा वापर, सिंचनाचा विकास या सर्वांचा परिणाम देशातील शेती उत्पादनात वाढ झाली आहे. तसेच आवश्यक प्रसंगी देशात अन्नधान्याची आयात केली जाते. परिणामी भूकबळी, उपासमार यांचे प्रमाण संपुष्टात आले आहे.

**६) बालमृत्यु व मातृमृत्युदरात घट –**

पूर्वीच्या काळी बालमृत्यु व प्रसूतीच्या वेळी माता मृत्युंचे प्रमाण जास्त होते. नंतर मात्र देशात आरोग्यविषयक सुविधांचा विस्तार झाल्याने प्रसूतीच्या वेळी मातां मृत्युंचे प्रमाण कमी झाले आहे. योग्य पोषण आहार, औषधोपचार यांची जनजागृती झाल्यामुळे बालमृत्युचे प्रमाण कमी झाले आहे.

**७) शुध्द पाण्याचा पुरवठा –**

पाणी मानवाच्या शरीरासाठी अन्नापेक्षाही जास्त आवश्यक आहे. ग्रामीण भागात अशुद्ध पाण्यामुळे विविध रोगांना बळी पडून मृत्यु पावणाऱ्यांचे प्रमाण जास्त होते. परंतु नंतर शासनाने ग्रामीण तसेच शहरी भागात स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला. तसेच दुष्काळाच्या प्रसंगी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. महापुराच्या वेळी शुद्ध पिण्याच्या पाण्याचा वापर केला जातो.

वरील सर्व एकत्रितरीत्या परिणाम म्हणजे भारताच्या मृत्युदरात घट झाली आहे. १९११ मध्ये मृत्युदर ४२.६ होता. २०११ मध्ये तो १४.७ पर्यंत कमी झाला आहे.

### २.२.५ लोकसंख्येचे संख्यात्मक वर्गीकरण

(Quantitative Population Analysis)

कोणत्याही देशात लोकसंख्येला अनन्यसाधारण महत्त्व असते. इस्त्राईल, जपान, इंग्लड, चीन या देशांचा विकास तेथील कार्यक्षम लोकसंख्येमुळे झाला आहे. लोकसंख्येच्या

अभ्यासात लिंग गुणोत्तर, सरासरी आयुर्मान, लोकसंख्येची घनता, व्यवसायानुसार लोकसंख्येची विभागणी, ग्रामीण व शहरी लोकसंख्या या घटकांचा अभ्यास महत्त्वाचा असतो.

### २.२.५.१ स्त्री-पुरुष प्रमाण (Sex Compositon)

प्रत्येक देशात साधारणतः पुरुष व स्त्रियांची संख्या जवळपास समान असते. त्यामुळे राष्ट्राच्या विकासात स्त्रियांचाही महत्त्वाचा सहभाग असतो. एक हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या म्हणजे स्त्री-पुरुष प्रमाण होय. समाजातील स्त्रियांचा दर्जा, स्थान, कुटुंबपद्धती यासर्व घटकांचा परिणाम स्त्री-पुरुष प्रमाणावर होतो. भारतात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे, पुरुषप्रधान कुटुंब पद्धती आहे, स्त्रियांच्या आरोग्याकडे, शिक्षणाकडे दुर्लक्ष दिले जाते. हुंडाबळी, अत्याचार, कुपोषण, प्रसूतीच्या वेळी मातांचा मृत्यु, भृणहत्या यामुळे स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. विकसित देशात स्त्री व पुरुषांचे प्रमाण सारखेच असते.

**भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण**

| वर्ष | प्रति हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|
| १९०१ | ९७२ |
| १९११ | ९६४ |
| १९२१ | ९५५ |
| १९३१ | ९५० |
| १९४१ | ९४५ |
| १९५१ | ९४६ |
| १९६१ | ९४१ |
| १७७१ | ९३० |
| १९८१ | ९३४ |
| १९९१ | ९२७ |
| २००१ | ९३३ |
| २०११ | ९४० |

वरील तक्तावरून स्पष्ट होते की देशात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या संख्येत सातत्याने घट झाली आहे. १९०१ मध्ये १००० पुरुषांमागे स्त्रियांची संख्या ९७२ होती. त्यानंतर सातत्याने त्यात घट झाली. १९९१ मध्ये हेच प्रमाण सर्वात कमी होऊन ९२७ झाले होते. नंतर स्त्री-भृणहत्या, मुलींच्या शिक्षण, आरोग्यासाठी वेगवेगळ्या योजना, प्रसूतीच्या वेळी योग्य दक्षता, बालविवाह प्रतिबंध, हुंडाबंदी, स्त्री अत्याचारावर कडक शिक्षा यांसारख्या उपाययोजनांमुळे स्त्रियांच्या संख्येत अल्पप्रमाणात वाढ होत आहे.

भारतात राज्याराज्याचा विचार केल्यास २०११ च्या जनगणनेनुसार केरळ राज्यात स्त्रियांचे प्रमाण १००० पुरुषांमागे १९८४ होते. त्यानंतर तामिळनाडू व आंध्रप्रदेश राज्यात अनुक्रमे ९९५ व ९९२ होते. सर्वात कमी स्त्री-पुरुष गुणोत्तर चंदिगढमध्ये १००० पुरुषांमागे ८१८ होते. त्यानंतर हरियाणा व आंदमान-निकोबार मध्ये हे क्रमशः ८७७ व ८७८ होते. महाराष्ट्रात प्रतिहजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या ९२५ आहे.

### २.२.५.२ लोकसंख्येची वयानुसार रचना (Age Cmposition)

लोकसंख्येच्या वयानुसार रचनेवर श्रमशक्ती अवलंबून असते. कारण १५ ते ६० वयोगटातील लोकसंख्येवर श्रमशक्ती अवलंबून असते. कारण या गटातील व्यक्तीकडून देशातील उत्पादनात वाढ होते. या गटाला कर्ती लोकसंख्या किंवा तरुण गट म्हणतात. या गटावर बाल्य व वयोवृद्ध गट अवलंबून असतात. तर ० ते १४ वयोगटातील लोकसंख्या बाल्यगट व ६० पेक्षा जास्त वय असणाऱ्या वयोगटाला वयोवृद्ध किंवा ज्येष्ठ नागरिक म्हणतात.

**लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी (शेकडा प्रमाण)**

| वर्ष | १४ वर्षाखालील लोकसंख्या | १५ ते ६० वयोगटातील लोकसंख्या | ६० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १९११ | ३८.८ | ६०.२ | १.१ |
| १९३१ | ३८.३ | ६०.२ | १.५ |
| १९६१ | ४१.० | ५३.३ | ५.७ |
| १९७१ | ४१.४ | ५३.४ | ५.२ |
| १९८१ | ३९.७ | ५४.१ | ६.२ |
| १९९१ | ३६.५ | ५७.१ | ६.४ |
| २००१ | ३५.५ | ५८.२ | ६.३ |
| २०१० | ३०.९ | ६१.६ | ७.५ |

सन १९११ ते १९७१ पर्यंत लोकसंख्येत वेगाने वाढ झाल्यामुळे बाल्यगटाचे प्रमाण वाढलेले आहे. परंतु १९७१ नंतर बाल्यगटाच्या प्रमाणात घट होत आहे. सन १९७१ मध्ये बाल्यगटाचे प्रमाण सर्वाधिक ४१.४ टक्के होते. २०१० मध्ये हे ३०.१ टक्के झाले आहे. यामुळे देशात खूप मोठे मनुष्यबळ उपलब्ध आहे. परंतु त्यांच्यात बेकारीचे प्रमाण जास्त आहे. देशात एकूण लोकसंख्येत ६० वर्षापेक्षा अधिक वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण सर्वात कमी आहे. परंतु नंतरच्या काळत यात वेगाने वाढ होत आहे.

### २.६.३ लोकसंख्येची घनता (Density of population)

लोकसंख्येची घनता ही देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ व लोकसंख्येवर अवलंबून असते. भौगोलिक क्षेत्रफळ जास्त व लोकसंख्या कमी असल्यास लोकसंख्येची घनता कमी तर भौगोलिक क्षेत्र कमी व लोकसंख्या जास्त असल्यास लोकसंख्यची घनता जास्त असते. लोकसंख्येची घनता कमी असल्यास जास्त उत्पादनाचे घटक प्राप्त होतो. याउलट लोकसंख्येची घनता जास्त असल्यास कमी उत्पादनाचे घटक प्राप्त होतात. कारण जास्त लोकसंख्येत ते विभागले जातात.

''प्रति चौरस कि.मी. क्षेत्रात वास्तव्य करणारी लोकसंख्या म्हणजे लोकसंख्येची घनता होय.''

देशातील एकूण लोकसंख्या

सूत्र = लोकसंख्येची घनता = ----------------

देशातील एकूण क्षेत्रफळ

**भारतातील लोकसंख्येची घनता**

| वर्ष | १९२१ | १९५१ | १९८१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|
| घनता | ८१ | ११७ | २०८ | ३२४ | ३८२ |

भारताचे भौगोलिक क्षेत्र स्थीर आहे. याउलट पाकिस्तान बांग्लादेशांच्या निर्मितीमुळे भौगोलिक क्षेत्रात घट झाली आहे. परंतु लोकसंख्येत वेगाने वाढ झाल्यामुळे लोकसंख्येची घनता जलद गतीने वाढली आहे. १९२१ मध्ये प्रति चौरस कि.मी क्षेत्रात राहणारी लोकसंख्या ८१ होती तर २०११ मध्ये ही ३८२ झाली आहे. भारतात राज्या राज्यांचा विचार केल्यास लोकसंख्येच्या घनतेत खूप भिन्नता दिसून येते २०११ च्या जनगणनेनुसार दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाची घनता सर्वाधिक ११,२९७ प्रति चौरस कि.मी. आहे. त्यानंतर बिहार व केरळ राज्यातील लोकसंख्येची घनता अनुक्रमे ११०२ व ८५९ प्रति. चौ. कि.मी. आहे. सर्वात कमी लोकसंख्येची घनता अरुणाचल प्रदेशाची प्रति चौ. कि.मी. १७ आहे. त्यानंतर मिझोरम व अंदमान निकोबारची घनता क्रमशः ४६ व ५२ प्रति चौ. कि.मी. आहे. महाराष्ट्रातील लोकसंख्येची घनता प्रति चौ. कि.मी. ३६५ आहे.

लोकसंख्येची घनता उद्योगांचा विकास, भूमीचे स्वरूप, हवामान, धार्मिक व ऐतिहासिक स्थळे, पाण्याची उपलब्धता, जीवनाची हमी, पायाभूत सुविधांचा विकास यांसारख्या घटकांवर अवलंबून असते.

### २.२.५.३ व्यवसायानुसार लोकसंख्येची विभागणी (Occupation Distribution)

व्यवसायाच्या स्वरूपानुसार व्यक्तीला उत्पन्न प्राप्त होते. देशातील व्यवसायांचे प्राथमिक क्षेत्र, द्वितीय क्षेत्र व तृतीयक क्षेत्र या तीन विभागात विभाजन केले जाते. प्राथमिक क्षेत्राला 'कृषी क्षेत्र'ही म्हणतात. यामध्ये कृषी, शेतमजुरी, पशुपालन, मासेमारी, जंगल व्यवसाय, खाणकाम या व्यवसायांचा समावेश होतो. थोडक्यात पूर्णपणे नैसर्गिक संसाधनांवर आधारलेल्या व्यवसायांचा समावेश या क्षेत्रात होतो. द्वितीय क्षेत्रास औद्योगिक क्षेत्र असेही म्हणतात. यामध्ये उद्योगधंदे व बांधकामाचा समावेश होतो. साधारणतः प्राथमिक क्षेत्रातील उत्पादन (कापूस, ऊस, तेल बिया इत्यादी) याठिकाणी कच्चा माल म्हणून वापरले जाते. तृतीय क्षेत्र सेवा क्षेत्र या नावाने ओळखले जाते. डोळ्यांनी न दिसणाऱ्या परंतु त्यांच्यामुळे मानवाच्या कल्याणात, समाधानात वाढ होणाऱ्या व्यापार, वाहतूक, दळणवळण, साठवणूक, बँकिंग, विमा यांसारख्या सेवांचा समावेश यात होतो.

देशाच्या सुरूवातीच्या अवस्थेत प्राथमिक क्षेत्रावर जास्त लोकसंख्या कार्यरत असते. परंतु देशाच्या विकासाबरोबर या लोकसंख्येचे प्रमाण कमी होऊन द्वितीय व तृतीय क्षेत्रावर लोकसंख्येचे अवलंबित्व वाढते. विकसित देशात प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ५ टक्क्यांपेक्षाही कमी असते.

**भारतातील व्यवसायानुसार लोकसंख्येची विभागणी (शेकडा प्रमाण)**

| व्यवसाय | १९५१ | १९८१ | २००८-०९ |
|---|---|---|---|
| अ) प्राथमिक क्षेत्र | ७२.७ | ६९.३ | ५०.० |
| १) कृषी | ५०.० | ४१.६ | - ३.० |
| २) शेतमजुरी | १९.७ | २४.९ | - ३.० |
| ३) इतर | ३.० | २.८ | - ३.० |
| ब) द्वितीयक क्षेत्र | १०.० | १२.९ | २१.९ |
| १) उद्योगधंदे | ९.० | ११.३ | १५.४ |
| २) बांधकाम | १.० | १.६ | ६.५ |
| क) तृतीय क्षेत्र | १७.३ | १७.८ | २८.१ |
| १) व्यापार | ५.३ | ६.३ | १४.२ |
| २) वाहतूक, दळणवळण, साठवणूक | १.५ | २.७ | ६.५ |
| ३) इतर सेवा (शिक्षक, डॉक्टर, अभियंते, नोकरदार, बँकसेवा इ.) | १०.५ | ८.८ | ७.४ |
| क) एकूण | १०० | १०० | १०० |

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की एकूण रोजगार निर्मितीत प्राथमिक क्षेत्राचे विशेषतः कृषीचे खूप महत्त्व आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहा दशकानंतरही प्राथमिक क्षेत्राचे महत्त्व कमी झालेले नाही. भारतात औद्योगिकीकरणाचा अभाव, भांडवल व तंत्रज्ञानाची कमतरता, उत्पादनाचे जुनाट तंत्र यासर्व कारणांचा परिणाम एकूण लोकसंख्येपैकी खूप जास्त लोकसंख्या आजही प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे गरिबीचे प्रमाण जास्त आहे. कारण प्राथमिक क्षेत्रात मिळणारे उत्पन्न खूप कमी असते.

## २.२.५ ग्रामीण व शहरी लोकसंख्या –

ग्रामीण भागातील राहणीमान निकृष्ट दर्जाचे असते. याठिकाणी रस्ते, वीज, पाणी, वाहतूकीची साधने, मनोरंजन, बँका, वित्तीय कंपन्या, शिक्षण, आरोग्य यांसारख्या पायाभूत सुविधांचा विकास झालेला नसतो. याउलट शहरी भागात पायाभूत सुविधांचा विकास झालेला असतो. देशाच्या विकासाबरोबर ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण कमी होते. शहरी भागात उत्पादनाचे घटक गतिशील असतात. रोजगाराच्या संधी जास्त उपलब्ध होतात. त्यामुळे शहरी लोकसंख्या देशाच्या विकासासाठी अनुकूल ठरते.

**भारतातील ग्रामीण व शहरी लोकसंख्या (शेकडा प्रमाण)**

| वर्ष | ग्रामीण लोकसंख्या | शहरी लोकसंख्या |
|---|---|---|
| १९०१ | ८८.८ | ११.२ |
| १९५१ | ८२.७ | १७.३ |
| १९८१ | ७४.३ | २५.७ |
| २००१ | ७२.७ | २७.८ |
| २०११ | ६९.० | ३१.० |

देशात शेती क्षेत्राचे वर्चस्व खूप जास्त असल्यामुळे आजही ६९ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. विकसित देशात ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण कमी असते. भारतात शहरी लोकसंख्येचे प्रमाण मात्र ३१ टक्के असूनही आज महानगरांमध्ये झोपडपट्टी, गालिच्छ वस्त्या, पायाभूत सुविधांचा अभाव यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. देशात राज्याराज्यात ग्रामीण लोकसंख्येच्या बाबतीत भिन्नता आहे.

## लोकसंख्येचे गुणात्मक विश्लेषण
## (Qulitative Population Analysis)

लोकसंख्येच्या संख्यात्मक विश्लेषणापेक्षा गुणात्मक विश्लेषणाला महत्त्वाचे स्थान असते. लोकसंख्येच्या गुणात्मक विश्लेषणात साक्षरता, सरासरी आयुर्मान, आरोग्यविषयक सुविधांचा समावेश होतो. देशातील लोकसंख्येत गुणात्मक वैशिष्ट्ये असल्यास त्यांची कार्यक्षमता, उत्पादकता जास्त राहते. जपान, चीन या देशांच्या विकासात गुणात्मक लोकसंख्येने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

## २.२.७ साक्षरतेचे प्रमाण (Literacy Rate)

लिखाण व वाचन कौशल्य प्राप्त असणाऱ्या व्यक्तींस साक्षर समजले जाते. निरक्षरांमध्ये अंधश्रद्धा, वाईट चालीरीती अनिष्ट परंपरा, आरोग्य व शिक्षणाकडे दुर्लक्ष कार्यक्षमतेत कमतरता यांसारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे साक्षरतेला खूप महत्त्व आहे.

**भारतातील साक्षरतेचे प्रमाण (शेकडा प्रमाण)**

| वर्ष | पुरुष | | | महिला | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण |
| १९५१ | १९.०२ | ४५.६० | २७.१६ | ४.८७ | २२.३३ | ८.८६ | १२.१० | ३४.५९ | १८.३३ |
| १९८१ | ४९.६० | ७६.७० | ५६.३८ | २१.७० | ५६.३० | २९.७६ | ३६.०० | ६७.२० | ४३.५७ |
| २००१ | ७४.४० | ८६.७० | ७५.८५ | ४६.७० | ७३.७० | ५४.१६ | ५९.४० | ८०.३० | ६५.३८ |
| २०११ | ७८.५७ | ८९.६७ | ८२.१४ | ५८.७५ | ७९.९२ | ६५.४६ | ६८.९० | ८५.०० | ७४.०४ |

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की स्वातंत्र्यप्राप्ती नंतर सरकारने केलेल्या शैक्षणिक सुविधा, शिक्षणाची सार्वजनिकता व शैक्षणिक संस्थांच्या विस्तारामुळे साक्षरतेत वाढ झाली आहे. परंतु शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात व पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार आजही ग्रामीण भागात ३१ टक्के व महिलांमध्ये ३४ टक्के निरक्षरतेचे प्रमाण आहे. ग्रामीण भागातील महिलांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक ४१ टक्के आहे. राज्याराज्यात साक्षरतेबाबत भिन्नता आढळून येते. पुरुषांमध्ये सर्वाधिक साक्षरता लक्षद्वीप मध्ये ९६.११ टक्के व केरळमध्ये ९६.०२ टक्के आहे. महिलांमध्ये सर्वाधिक साक्षरता ९१.९८ टक्के आहे. तर पुरुष व महिलांमध्ये सर्वात कमी साक्षरता बिहार राज्यात अनुक्रमे ७३.३९ टक्के व ५३.३३ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यात पुरुष व स्त्रियांची साक्षरता क्रमशः ८९.९२ टक्के व ७५.४८ टक्के आहे.

## २.२.८ सरासरी आयुर्मान (Life Expectancy)

देशात जन्म घेणारी व्यक्ती साधारणतः किती वर्ष जिवंत राहते यावर सरासरी आयुर्मान अवलंबून असते. मृत्युसमयी असणारे वय कमी असल्यास आयुर्मान कमी होते व मृत्युसमयी असणारे वय जास्त असल्यास आयुर्मान जास्त असते.

$$\text{सरासरी आयुर्मान} = \frac{\text{देशातील मृत्यु पावणाऱ्या व्यक्तींच्या वयाची बेरीज}}{\text{मृत्यु पावणाऱ्या व्यक्तींची संख्या}}$$

भारतातील आयुर्मान (वर्ष)

| वर्ष | १९५१ | १९८१ | २०११ |
|---|---|---|---|
| पुरुष | ३७.२ | ५४.१ | ६४.६० |
| महिला | ३६.२ | ५४.७ | ६७.०८ |

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात आरोग्यविषयक सुविधा, दवाखाने, डॉक्टर, रुग्णवाहिका यांच्या संख्येत वाढ झाली तसेच नागरिकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. दुष्काळ निवारण, साथींच्या रोगांचे उच्चाटन, लसीकरण, नवजात शिशू व गरोदर मातांकडे विशेष लक्ष, अन्नधान्याचा पुरवठा यामुळे मृत्युदर कमी होऊन आयुर्मानात वाढ झाली आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांची प्रतिकारशक्ती जास्त असल्यामुळे महिलांचे आयुर्मान पुरुषांपेक्षा जास्त आहे. परंतु विकसित देशांचा विचार केल्यास भारतातील आर्युमानात खूप वाढ होणे आवश्यक आहे.

## २.२.७ एड्स निर्मुलन (AIDS Awarencess)

मानवाच्या जीवनशैलीत बदल झाल्यामुळे अनेक नवनवीन घातक रोग निर्माण झाले आहेत. यातील एक प्रमुख रोग म्हणजे एड्स होय. एड्स हा आजार जगातील सर्वच राष्ट्रांत आढळून येतो. या रोगाचा पहिला रुग्ण १९८० मध्ये अमेरिकेत सापडला. शरीरतज्ज्ञांच्या मते या रोगाचा विषाणू माकडाद्वारे मानवाच्या शरीरात प्रसारीत झाला. AIDS म्हणजे Acquired Immune Deficiency Sydrome ज्यामुळे मानवाच्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती नष्ट होते.

एड्सचा विषाणू ꣸खत (Human Immune Virus) हा मानवाच्या शरीरात प्रवेश करतो. त्यामुळे मानवाची रोगप्रतिकारक शक्ती किंवा पांढऱ्या पेशी कमी होतात. व ती आजारी रहाते. या ꣸खत बाधित व्यक्तीला अनेक आजारांची लागण होते. सामान्यतः ꣸खत चे विषाणू एड्समध्ये रूपांतर होण्यासाठी ८ ते १० वर्षाचा कालावधी लागतो. व्यक्तीच्या प्रतिकारशक्तीवर हे वय कमी जास्त होऊ शकते.

विकसित देशांपेक्षा विकसनशील देशात जनजागृतीचा अभाव, आरोग्य विषयक सुविधांचा अभाव असल्यामुळे एड्सचा प्रसार वेगाने होत आहे. जगातील एकूण एड्सबाधित रुग्णांपैकी ९०% एड्सबाधित रुग्ण विकसनशील राष्ट्रात आहेत. सर्वात अधिक बाधित रुग्ण दक्षिण आफ्रिका देशात ५६,००,००० असून त्यानंतर नायजेरिया व भारत देशात अनुक्रमे ३३,००,००० व २४,००,००० रुग्ण आहेत.

एड्स प्रसाराचे मार्ग :

१) अनैतिक शारीरिक संबंध,

२) एड्स बाधित व्यक्तीच्या रक्ताद्वारे,

३) एड्स बाधित व्यक्तीला वापरलल्या इंजेक्शन सूईद्वारे,

४) एड्स बाधित आईकडून होणाऱ्या आपत्यास / बालकास,

वरील चार कारणांद्वारे एड्स होत असला तरी याचे सर्वात मुख्य कारण अनैतिक शारीरिक संबंध हेच आहे. भारतात एड्सचा पहिला रुग्ण महाराष्ट्रात १९८६ मध्ये सापडला. त्यानंतर देशात १९९२ पासून जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या आर्थिक साहाय्याने प्रचार करण्यासाठी व प्रसार रोखण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एड्स नियंत्रण कार्यक्रम तयार केला. २००५ मध्ये देशात एड्स बाधितांची संख्या ५२ लाख होती.

भारतात एड्सचे सर्वाधिक रुग्ण कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर या राज्यांत आहेत. २०११ पर्यंत देशात एड्समुळे ६०,००० लोकांचा मृत्यु झाला असून यापैकी ५७ टक्के रुग्ण १५ ते ५० वयोगटातील आहेत.

### २.२.१० भारतातील आरोग्य विषयक कार्यक्रम

### (Health Programmes in India)

जगातील प्रत्येक देशाने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली आहे. त्यामुळे जनतेच्या कल्याणासाठी, विकासासाठी, आरोग्यासाठी वेगवेगळ्या घटकांवर खर्च केला जातो. देशातील आरोग्यविषयक सुविधांवर लोकांचे आयुर्मान, कार्यक्षमता अवलंबून असते. भारतातही नागरिकांच्या आरोग्यासाठी सरकारकडून विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम राबविले जातात. त्यामुळे प्लेग, देवी, कॉलरा, मलेरिया, कुष्ठरोग, पोलिओ, गलगंड यांसारख्या अनेक रोगांवर उपचार झाल्याने नागरिकांच्या आयुर्मानात, आरोग्यात कार्यक्षमतेत वाढ झाली आहे.

**भारतातील आरोग्यविषयक सुविधा (संख्या)**

| **संबंधित बाब** | **१९५१** | **१९८१** | **२००५-०६** |
|---|---|---|---|
| प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र | ७२५ | ५७३५३ | १७१५६७ |
| दवाखाने व इस्पितळे | ९२०९ | २३५५५ | ३२५१५६ |
| रुग्ण सेविका | १८०५४ | १४३८८७ | १४८१२७० |
| डॉक्टर | ६१८०० | २६८७०० | ६६०८०१ |

वरील तक्त्यावरून स्पष्ट हाते की देशात आरोग्य विषयक सुविधांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आरोग्यविषयक सुविधांचा अनुकूल परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर झाला आहे. १९५१ मध्ये महिला व पुरुषांचे आयुर्मान क्रमशः ३७.२ वर्ष व ३६.२ वर्ष होते. तर २०११ मध्ये हे ६४.६० वर्ष (पुरुष) व ६७.०८ (महिला) वर्षपर्यंत वाढले आहे. देशातील अनेक रोगांचे उच्चाटन झाले आहे. देशातील क्षयरोग, कुष्ठरोग यांचे प्रमाण खूप कमी झाले आहे. देशातील नागरिकांच्या आरोग्यासाठी २००५ मध्ये राष्ट्रीय आरोग्य

मिशन स्थापन करण्यात आले. यानुसार आरोग्य सुविधांचा अभाव असणाऱ्या १८ राज्यांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र-उपकेंद्र, रुग्णालय, रुग्णसेविका यांच्या उपलब्धतेबरोबरच नागरिकांना सकस आहार, राहणीमानाचा दर्जा उंचविण्याचे उद्दिष्ट निश्चित केले होते. २०१३ च्या अर्थसंकल्पात या मिशनसाठी २१,२३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

शासनाकडून आरोग्यासाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. त्यावर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. परंतु देशात लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असल्यामुळे या वाढत्या लोकसंख्येला या सुविधा अपुऱ्या पडतात. तसेच सुविधा किंवा कार्यक्रमांची योग्य अंमलबजावणी न झाल्यामुळे प्रत्यक्ष आवश्यकता असणाऱ्या व्यक्तींना त्याचा लाभ होत नाही.

## २.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

अ) टीपा लिहा :

१) मानवी संसाधन म्हणजे काय?

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

२) मानव विकास निर्देशांक

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

३) जननदर व मृत्युदर

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

४) स्त्री-पुरुष प्रमाण

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

५) लोकसंख्येची घनता

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

ब) दीर्घोत्तरी प्रश्न :

१) भारताचा मानव विकास निर्देशांक कमी आहे स्पष्ट करा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

२) भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे लिहा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

३) लोकसंख्येचे गुणात्मक विश्लेषण स्पष्ट करा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

## २.४ सारांश

राष्ट्राच्या आर्थिक विकासात नैसर्गिक संसाधनांना अनन्यसाधारण महत्त्व असते. भारतात नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता खूप जास्त आहे. या नैसर्गिक संसाधनातील एक महत्त्वाचा घटक मानवी संसाधन म्हणजेच देशातील लोकसंख्या हा असतो. भारत लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर असल्याने येथे मानवी संसाधन मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. जपान, चीन, इंग्लड या देशांनी मानवी संसाधनावरच देशाचा विकास साध्य केला आहे. कोणतेही उत्पादन घेण्यास, कार्य करण्यास मानवाची लोकसंख्येतील १५ ते ६० वयोगटातील लोकसंख्या कार्यकारी लोकसंख्या असते. त्या गटातील लोकसंख्येलाच मानव संसाधन म्हणतात. मानवी संसाधनात शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, पायाभूत सुविधांचा विकास यांच्या साह्याने वाढ करता येते. देशातील नैसर्गिक संसाधनांच्या तुलनेत मानवी संसाधन जास्त असेल तर देशात दारिद्र्य, बेरोजगारी, उपासमार, कुपोषण, आर्थिक विषमता या समस्या निर्माण होतात. याउलट मानवी संसाधनापेक्षा नैसर्गिक संसाधने जास्त असल्यास प्रतिव्यक्ती उत्पादनाची साधने, संपत्ती जास्त उपलब्ध होते व उत्पन्नात, उत्पादकतेत वाढ होते.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम प्रतिवर्षी प्रत्येक देशाचा शिक्षण आरोग्य व उत्पन्नाच्या अधारे मानव विकास निर्देशांक निश्चित करते. मानव विकास निर्देशांक ० ते १ या दरम्यान असतो. मानवविकास निर्देशांकानुसार जगातील राष्ट्रांची विभागणी चार विभागात केली जाते. २०१३ मध्ये भारताचा मानव विकास निर्देशांक ०.५५४ असून तो क्रमवारीत १३६ व्या स्थानी होता. भारतात केरळ राज्याचा मानव विकास निर्देशांक सर्वात अधिक ०.७९० आहे तर महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक ०.५७२ असून तो ७व्या स्थानी आहे.

भारतात १८९१ मध्ये २३.६० कोटी लोकसंख्या वास्तव्य करत होती. २०११ मध्ये ही १२१.०२ कोटी झाली आहे. लोकसंख्येत खूप वेगाने वाढ झाल्याने दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक विषमता, कुपोषण, या समस्या निर्माण झालेल्या आहेत. देशात लोकसंख्या वाढीचे मुख्य कारण म्हणजे मृत्युदरापेक्षा जननदर जास्त राहिला आहे. देशात शेती हा प्रमुख व्यवसाय, विवाहाची सार्वत्रिकता, संयुक्त कुटुंब पद्धती, निरक्षरता व वाईट चालीरीती, बालविवाह, उष्ण हवामान, दारिद्र्य, सरकारी धोरणांचा अभाव, करमणुकीच्या साधनांचा अभाव या कारणांमुळे जननदर जास्त राहिला आहे. त्या तुलनेत युद्ध समाप्ती, दुष्काळ निवारण वैद्यकिय व वाहतूक सुविधांचा विस्तार, साथीच्या रोगाचे उच्चाटन, बालमृत्यु व मातामृत्युमध्ये घट, शुद्ध पाण्याचा पुरवठा या कारणांमुळे मृत्युदरात खूप घट झाली आहे.

देशातील लोकसंख्येची वैशिष्ट्ये पाहिल्यास यात स्पष्ट होते की पुरुषांपेक्षा महिलांचे प्रमाण कमी आहे. २०११ मध्ये प्रति हजार पुरुषांमागे महिलांची संख्या ९४० होती. एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या १५ ते ६० वयोगटातील कर्ती लोकसंख्या आहे. प्रति चौरस कि.मी. क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ३८२ आहे. परंतु देशांतर्गत यात खूप भिन्नता दिसून येते. आजही देशातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक रोजगार प्राथमिक क्षेत्रावर यात प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजले जाते. देशातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६९ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागात वास्तव्य करते. साक्षरतेचा विचार केल्यास ग्रामीण व शहरी तसेच पुरुष व महिलांच्या साक्षरतेत खूप भिन्नता आहे. ग्रामीण भागातील ४१ टक्के महिला आजही निरक्षर आहेत. सरकारने आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध केल्यामुळे सरासरी आयुर्मानात वेगाने वाढ झाली आहे. पुरुषांचे सरासरी आयुर्मान ६४.६० वर्ष व महिलांचे सरासरी आयुर्मान ६७.०८ वर्ष आहे. एड्स या जागतिक रोगाचा प्रसार देशात खूप वेगाने होत आहे. २०११ पर्यंत या रोगामुळे ६०,००० लोकांचा मृत्यु झाला आहे. देशातील नागरिकांच्या आरोग्यासाठी सरकारने सातत्याने उपायोजना केल्या आहेत. त्याचा अनुकूल परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर, राहणीमानावर, कार्यक्षमतेवर होत आहे.

## २.६ **संदर्भ सूची** (Bibligraphy)


१) मिश्र, जगदीश नारायण (२०११), भारतीय अर्थव्यवस्था, इलाहाबाद, किताब महाल.

२) देसाई व भालेराव (२०११) भारतीय अर्थव्यवस्था, पुणे, निराली प्रकाशन

३) चव्हाण, एन.एल.(२००९) भारतीय अर्थव्यवस्था, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स.

४) प्रतियोगिता दर्पण, अतिरिक्तांक, भारतीय अर्थव्यवस्था (२०१३), आगरा, प्रतियोगिता दर्पण.

५) Govt. of India, Economic Survey - २०१२-१३

६) केंद्र सरकार, अर्थसंकल्प २०१३ नवी दिल्ली.

# घटक : ३

# दारिद्र्य व बेरोजगारी

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.१.१ दारिद्र्य

३.१.२ संकल्पना

३.१.३ कारणे

३.१.४ दारिद्र्याचे मोजमाप – ग्रामीण व शहरी

३.१.५ बेकारी

३.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द

३.६ संदर्भ सूची


## ३.० घटकांची उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांना दारिद्र्य व बेकारी या मूलभूत संकल्पना समजण्यास मदत होईल.

२) भारतातील दारिद्र्याची कारणे समजण्यास उपयोग होईल.

३) भारतातील दारिद्र्य व बेकारी कमी करण्यासाठी अमलात आणल्या गेलेल्या उपाययोजनांची माहिती मिळेल.

४) भारतातील राष्ट्रीय रोजगार हमी कार्यक्रमाची माहिती व ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल.

५) उदारीकरणाचा रोजगारावर कोणता परिणाम झाला याबाबत विद्यार्थ्यांना माहिती मिळण्यास मदत होईल.

६) बेकारी कमी करण्यासाठी बचत गटांची भूमिका समजण्यास मदत होईल.

## ३.१ प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो, भारतीय अर्थव्यवस्था एक विकसनशील अर्थव्यवस्था आहे. भारतात दारिद्र्य व बेरोजगारी या दोन गंभीर समस्या आहेत. आर्थिक मागासलेपणामुळे

उत्पन्न कमी आहेच शिवाय मिळणाऱ्या उत्पन्नाचे वाटप  विषम झालेले दिसून येते. त्यामुळे काही लोकांच्या हाती जास्त उत्पन्न तर काही लोकांच्या हाती कमी उत्पन्न असल्याचे आढळते. मित्रांनो, खरे तर भारतात मूठभर श्रीमंत आहेत. म्हणजे संख्येने थोड्या असणाऱ्या लोकांकडे उत्पन्नाचा मोठा हिस्सा केंद्रित झाला आहे, तर संख्येने जास्त असलेल्या लोकांकडे उत्पन्नाचा वाटा कमी आहे. ह्याचाच परिणाम म्हणून भारतात दारिद्र्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

दारिद्र्याबरोबरच भारतात दुसरी गंभीर समस्या भेडसावते ती म्हणजे बेरोजगारी. काम करण्याची इच्छा, कुवत असूनही अनेक लोकांना काम मिळत नाही. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला आहे. या दोन्ही समस्या सोडविण्यासाठी शासकीय पातळीवरून अनेक कार्यक्रम, योजना राबविल्या जात आहेत. विद्यार्थी मित्रांनो आपणाला दारिद्र्य व बेरोजगारी या संकल्पनाची माहिती व्हावी, तसेच दारिद्र्य व बेकारी निर्मूलनासाठी भारतात कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत यासंबंधी ज्ञान व्हावे, यासाठी प्रस्तुत प्रकरणात प्रयत्न करण्यात आला आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ दारिद्र्य

अविकसित अर्थव्यवस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यापैकी एक गंभीर समस्या म्हणजे दारिद्र्य. अविकसित देशात दरडोई उत्पन्न कमी असते. उत्पन्न कमी असल्यामुळे लोकांची बचतीची कुवत कमी असते. बचत कमी म्हणून भांडवल गुंतवणूक कमी असते. भांडवल गुंतवणूक कमी म्हणून रोजगारनिर्मिती कमी होते. रोजगार निर्मिती कमी. म्हणून उत्पन्न कमी. त्यामुळे पुन्हा दारिद्र्य. अशा दारिद्र्याच्या दुष्टचक्राला अविकसित व विकसनशील अर्थव्यवस्थांना सामोरे जावे लागते. पण विद्यार्थी मित्रांनो, दारिद्र्याचा नेमका अर्थ माहित करून घेणे आवश्यक आहे.

### ३.२.२ दारिद्र्य दारिद्र्याची संकल्पना

दारिद्र्याची निश्चित व्याख्या करणे अवघड आहे. कारण कालखंडानुसार व देशानुसार या संकल्पनेचा अर्थ बदलतो.

ज्यावेळी समाजातील एका गटाला अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या मूलभूत गरजा मिळविणे कठीण होते किंवा त्या मिळणे अशक्य असते, त्यावेळी तो गट दारिद्र्यावस्थेत आहे असे म्हटले जाते. दरडोई उत्पन्न , दरडोई खर्च व राहणीमान हे दारिद्र्याचे निर्देशंक घटक समजले जातात.

ज्या अवस्थेत समाजातील काही घटकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य यांसारख्या जीवनावश्यक वस्तू मिळणे अशक्य असते अशी अवस्था म्हणजे दारिद्र्य होय.

नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, 'एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.' किंवा 'सुस्थितीपासून पूर्णपणे वंचित असणे म्हणजे दारिद्र्य होय.'

विविध तज्ज्ञांनी केलेल्या दारिद्र्याच्या व्याख्यांमध्ये किमान निर्वाह पातळी हा आधार मानला आहे. निर्वाह पातळीचा सापेक्ष किंवा निरपेक्ष दृष्टिकोनातून विचार केला जातो. म्हणून दारिद्र्य या संकल्पनेचा विचार करताना सापेक्ष दारिद्र्य व निरपेक्ष दारिद्र्य या संकल्पना विचारात घ्याव्या लागतात.

### सापेक्ष दारिद्र्य (Relative Poverty)

वस्तुतः दारिद्र्य ही सापेक्ष संकल्पना आहे. राष्ट्रीय उत्पन्नाची लोकांमध्ये वाटणी कशाप्रकारे झाली आहे यावर समाजातील सामाजिक कल्याण बऱ्याच प्रमाणात अवलंबून असते.

जेव्हा दोन व्यक्ती किंवा दोन समूह किंवा दोन वस्तू किंवा दोन देश यांची तुलना करावयाची असते तेव्हा सापेक्ष या शब्दाचा प्रयोग केला जातो. एकाच देशातील उच्च उत्पन्न आणि न्यूनउत्पन्न असणाऱ्या लोकांच्या उत्पन्नाची आणि उपभोगाची तुलना केली जाते तेव्हा सापेक्ष दारिद्र्य या संकल्पनेचा वापर केला जातो.

उच्चतम उत्पन्न गटातील लोकसंख्येशी तुलना करता सर्वात खालच्या उत्पन्न गटातील लोक दारिद्र्यात आहेत असे मानले जाते तेव्हा त्यास सापेक्ष दारिद्र्य म्हणतात.

सापेक्ष दारिद्र्य ही संकल्पना तुलनेवर आधारलेली असते. इतरांच्या तुलनेत दरिद्री असा दारिद्र्याचा अर्थ लावता येतो. सर्वांचे उत्पन्न सारखे राहिले तर सापेक्ष दारिद्र्याचा प्रश्नच उद्भवला नसता. पण प्रत्येक देशात उत्पन्न वाटपात विषमता असते. काही लोकांना सरासरीपेक्षा जास्त उत्पन्न मिळते म्हणजेच इतरांना सरासरीपेक्षा कमी उत्पन्न मिळते. सरासरी पेक्षा ज्यांना फार कमी उत्पन्न मिळते त्यांना रूढ व्यवहारात सहभागी होता येत नाही. त्यांना सर्वसाधारण जीवनमान मिळत नाही. अशा लोकांना दरिद्री म्हणावे. सापेक्ष दारिद्र्याची संकल्पना उत्पन्नाच्या विषम वाटणीशी संबंधित आहे. सर्वच देशांत सापेक्ष दारिद्र्य आढळते. विषमता जितकी कमी तितके सापेक्ष दारिद्र्य कमी आढळते.

### निरपेक्ष दारिद्र्य (Absolute Poverty)

ज्यावेळी दारिद्र्याची मोजणी करण्यासाठी कुठल्यातरी निरपेक्ष मानकाचा वापर केला जातो तेव्हा त्याल निरपेक्ष दारिद्र्य म्हणतात.

ज्या व्यक्तीस आपल्या प्राप्त उत्पन्नातून किमान गरजा भागविणेही शक्य नसते त्यास निरपेक्ष दरिद्री मानले जाते.

निरपेक्ष दारिद्र्याचा संबंध किमान निर्वाह पातळीशी जोडला जातो. निरपेक्ष याचा अर्थ इतरांशी तुलना न करता असा होय. जीवनमान जगण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला अन्नधान्य, डाळी, तेल, दूध, भाजीपाला, कपडे इत्यादी वस्तूंची आवश्यकता असते. व्यक्तीला दररोज, साप्ताहिक किंवा मासिक जे उत्पन्न मिळते त्यातून वरील वस्तू खरेदी करणेही शक्य नसेल तर त्या व्यक्तीस दरिद्री मानण्यात येते. व्यक्तीला आपल्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी काही किमान उत्पन्न मिळणे गरजेचे असते. जर व्यक्तीचे उत्पन्न या पातळीपेक्षाही कमी असेल तर ती व्यक्ती निरपेक्ष दृष्टीने दरिद्री समजली जाते.

दारिद्र्याचे मोजमाप करताना किमान मूलभूत गरजा किंवा किमान राहणीमानाची पातळी म्हणजेच दारिद्र्यरेषा निश्चित करावी लागते. दारिद्र्यरेषेच्या खाली उत्पन्न असलेल्या व्यक्तीस निरपेक्ष दृष्टीने गरीब मानले जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर जीवनमान जगण्याचा संबंध आहारातून मिळणाऱ्या उष्मांकाशी (Calories) जोडला जातो. आहार तज्ज्ञांच्या मते देशातील हवामानाच्या भिन्नतेनुसार वेगवेगळ्या देशात किमान उष्मांकाची पातळी वेगवेगळी असते. उदा. भारतीय उष्ण हवामानात एका व्यक्तीस जीवनमान जगण्यसाठी दररोज किमान २२५० उष्मांकाची गरज असते. त्यानुसार ज्या व्यक्तीला आपल्या मिळणाऱ्या उत्पन्नातून दररोज २२५० उष्मांक मिळवून देईल एवढे खाद्यान्न खरेदी करणेही शक्य नसते. त्यास दरिद्री मानले जाते.

निरपेक्ष दारिद्र्य, किमान उपभोग खर्च किंवा किमान दरडोई उत्पन्न यांच्या संदर्भात निश्चित केलेल्या दारिद्र्यरेषेच्या आधारे मोजले जाते. दारिद्र्यरेषेच्या खाली असलेले लोक गरीब मानले जातात. भारतात दारिद्र्य मोजण्यासाठी निरपेक्ष दारिद्र्य विचारात घेतात.

**आंतरराष्ट्रीय पातळीवरील दारिद्र्य रेषा** (International Poverty Line)

## जागतिक बँक अहवाल २००३

'जागतिक बँकेच्या अहवालानुसार १९९८ मध्ये विकसनशील देशांमध्ये किमान उष्मांक मिळविण्यासाठी दरडोई दरवर्षी ३७० अमेरिकन डॉलर्सची गरज असते. म्हणजेच ज्यांचे दरडोई उत्पन्न ३७० डॉलर किंवा त्यापेक्षा कमी आहे, ती व्यक्ती दारिद्र्य रेषेवरील जीवनमान जगते तर ज्यांचे दरडोई उत्पन्न २७५ डॉलर आहे, ते अति दारिद्र्य रेषेखालील जीवन जगतात. यानुसार विकसनशील देशातील एकूण लोकसंख्येपैकी दोन तृतीयांश लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील जीवन जगतात. यापैकी १८% लोक अति दारिद्र्य रेषेखालील जीवन जगतात.'

## मानव विकास अहवाल २००२ :

'मानव विकास अहवालानुसार विकसित देशात जे लोक आपल्या मुलांना शिक्षणासाठी शाळेत पाठवू शकत नाहीत. ज्यांच्याकडे स्वतःच्या मालकीचे घर नाही, टि.व्ही नाही, कार नाही, इतर चैनीच्या वस्तू नाहीत ते दरिद्री होय.'

**भारतातील दारिद्र्य रेषा :**

भारतात दारिद्र्याने प्रमाण कसे मोजले जाते हे खूप महत्त्वाचे आहे. नियोजन आयोगाने यासाठी एक अभ्यासगट (Task Force on minimum Needs and Effective consumption Method) स्थापन केला होता.

१९७२-७३ मध्ये या अभ्यासगटाने 'दारिद्र्य रेषा' व्याख्या पुढीलप्रमाणे केली - ग्रामीण भागात दरडोई २४०० कॅलरी इतकी पोषणमूल्ये ज्याला मिळत नाही किंवा शहरी भागात दरडोई २१०० कॅलरी इतकी पोषणमूल्ये ज्याला मिळत नाहीत तो गरीब म्हणजे दारिद्र्यरेषेखालील, (BPL) यापेक्षा जास्त पोषणमूल्य मिळू शकतात ते दारिद्र्यरेषेवरील (APL) होय.

### ३.२.३ भारतातील दारिद्र्याची कारणे (Causes of poverty in India)

भारतात मोठ्या प्रमाणात दारिद्र्य आहे. ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातही दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली असली तरी अजूनही जवळपास एक चतुर्थांश लोकसंख्या दारिद्र्यात जीवन जगत आहे. भारतातील दारिद्र्यास अनेक कारणे जबाबदार आहेत. ही कारणे पुढीलप्रमाणे –

**१) आर्थिक विकासाचा मंद वेग**

भारतात आर्थिक विकासाचा वेग कमी असल्यामुळे दारिद्र्य असल्याचे दिसून येते. १९५१–८१ या कालखंडात भारतातील वृद्धीदर सरासरीने फक्त ३.५% होता. १९८१ ते १९९१ या काळात तो ५% पर्यंत वाढला १९९१ नंतर आर्थिक सुधारणा काळात वृद्धीदर ५.५% ते ६% पर्यंत वाढला. पण सध्या आर्थिक वृद्धीदर पुन्हा कमी झालेला दिसून येतो. लोकसंख्या वाढीच्या वेगाच्या मानाने आर्थिक वृद्धीदर कमी असल्याने भारतात दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे.

**२) आर्थिक विषमता**

साधन संपत्तीच्या मालकी हक्कामुळे भारतात राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन खूपच असमान झाले आहे. १९९१–९२ च्या रिझर्व्ह बँकेच्या पाहणीनुसार भारतातील २०% अतिगरीब लोकांना राष्ट्रीय उत्पन्नाचा फक्त ८% हिस्सा मिळतो तर १०% श्रीमंत लोकांना राष्ट्रीय उत्पन्नाचा ३०% वाटा मिळतो. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात आर्थिक विषमता हेच दारिद्र्याचे मूळ कारण आहे. भारतात काही थोडे लोक श्रीमंत आहेत, तर फार मोठी लोकसंख्या दारिद्र्यात आहे.

**३) दरडोई उत्पन्न कमी**

भारताचे दरडोई उत्पन्न कमी असल्यामुळे दारिद्र्य आढळते. विकसित देशांच्या तुलनेत भारतातील दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे. जागतिक विकास अहवाल २००४ नुसार २००२ मध्ये विनिमयदराच्या आधारे भारताचे दरडोई उत्पन्न ४८० डॉलर होते तर अमेरिका, जपान या प्रगत देशांचे दरडोई उत्पन्न अनुक्रमे ३५,०६० डॉलर व ३३,५५० डॉलर होते. देशातील दरडोई उत्पन्न कमी असल्याने दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे.

**४) लोकसंख्यावाढीचा उच्च दर**

भारतातील लोकसंख्या वाढीचा उच्च दर देशातील दारिद्र्यास कारणीभूत ठरलेला आहे. देशात लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर कमी आहे. १९५१ ते १९८१ या काळात प्रतिवर्षी २.१५% दराने लोकसंख्येत वाढ झाली. १९९१–२००१ या काळात १.९३% दराने वाढ झाली. लोकसंख्येच्या वृद्धीदरात अलीकडील काळात काही प्रमाणात घट झाली असली तरी वृध्दीदर अजूनही जास्त आहे. अर्थव्यवस्थेच्या वृद्धीदरापेक्षा लोकसंख्येचा वृद्धीदर जास्त असल्याने दरडोई उत्पन्न कमी राहते. त्यामुळे दरडोई उपभोग खर्चही कमी राहून दारिद्र्य मोठ्या प्रमाणात आहे. भारतात राष्ट्रीय उत्पन्नात ज्या वेगाने वाढ झाली त्या वेगाने दरडोई उत्पन्नात वाढ न होण्याचे लोकसंख्या वाढ हे कारण आहे.

### ५) जीवनावश्यक वस्तूंची अल्प उपलब्धता

जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता देशात कमी असली म्हणजे राहणीमानाचा दर्जा निकृष्ट होतो. १९८१ मध्ये अन्नधान्याची दरडोई उपलब्धता ४१७.३ ग्रॅम तर डाळींची उपलब्धता ३७.५ ग्रॅम होती. २००१ मध्ये अन्नधान्याची उपलब्धता ३९०.६ ग्रॅम तर डाळींची उपलब्धता २६.४ ग्रॅम झाली. याचा अर्थ गेल्या दोन दशकात ही उपलब्धता कमी झाली. त्यामुळे राहणीमानाचा दर्जा उंचावण्याची शक्यता कमी होते. परिणामी दारिद्र्याचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते.

### ६) चलनवाढ

सातत्याने वाढणाऱ्या किंमती हेही दारिद्र्याचे एक कारण आहे. जेव्हा किंमतीत वाढ होते. तेव्हा पैशाची खरेदी शक्ती कमी होते आणि समाजातील कनिष्ठ, मध्यम आणि गरीबवर्गाच्या वास्तव उत्पन्नात पुन्हा घट होते. लोकांच्या राहणीमानाचा दर्जा खालावतो. चलनवाढीमुळे देशातील गरीब लोकांच्या संख्येत वाढ झालेली आहे.

### ७) तंत्रज्ञानाची अल्प पातळी

विकसित देशातील तंत्रज्ञानाच्या तुलनेत भारतातील तंत्रज्ञानाची प्रगती मर्यादित आहे. कारखानदारी व कृषी क्षेत्रात अप्रगत तंत्रज्ञानामुळे उत्पादन वेगाने वाढत नाही. त्यामुळे उत्पन्न वाढीचा वेग कमी राहतो. मागास तंत्रज्ञानामुळे श्रमिकांचीही उत्पादकता कमी आढळते. त्यामुळे त्यांना कमी उत्पन्न मिळते. म्हणून देशात दारिद्र्य जास्त आहे.

### ८) बेकारी

भारतात बेकारीची समस्या गंभीर आहे. लोकसंख्या वाढीच्या तुलनेने रोजगार निर्मितीच्या वाढीचे प्रमाण कमी आहे. उद्योग, व्यापार क्षेत्रातही रोजगाराच्या संधीचे प्रमाण कमी आहे. परिणामी बेकारीचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते. बेकारीमुळे दारिद्र्यातही भर पडलेली दिसून येते.

### ९) शेतजमिनीच्या वाटपात विषमता

भारतातील शेतजमिनीचे असमान वाटप ही दारिद्र्यास कारणीभूत आहे. भारतात ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. मात्र जमिनीच्या वाटपात विषमता आहे. काही मूठभर श्रीमंतांकडे मोठ्या प्रमाणात जमिनीची मालकी आहे. तर बुहसंख्य शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेतीतून मिळणारे उत्पन्न कमी असते. त्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे.

### १०) शेतीची अल्प उत्पादकता

भारतातील शेतीची उत्पादकता विकसित देशांच्या तुलनेत अतिशय कमी आहे. भांडवलाचा अभाव, जुने उत्पादन तंत्र, शेतकऱ्यांची निरक्षरता, जलसिंचन सुविधांचा अभाव इत्यादीमुळे भारतातील शेतीची उत्पादकता अतिशय कमी आहे. शेतीची उत्पादकता कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना मिळणारे उत्पन्न कमी आहे. त्यामुळे भारतात मोठ्या प्रमाणात दारिद्र्य असल्याचे आढळते.

### ११) शिक्षणाचे कमी प्रमाण

भारतात २००१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण ६५.३८% होते तर २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण ७४.०४% पर्यंत वाढले म्हणजे अजूनही २६+% लोकसंख्या निरक्षर आहे. निरक्षर लोकांना साक्षर लोकांपेक्षा कमी वेतन मिळते. त्यामुळे त्यांच्यात दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसते.

### १२) दारिद्र्याचे दुष्टचक्र

दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेल्या अर्थव्यवस्थेतील दारिद्र्याचे कारण त्या देशाच्या गरिबीत सापडते. भारतात मोठ्या प्रमाणात दारिद्र्य असल्याने लोकांची बचत करण्याची क्षमता कमी दिसते. बचत कमी असल्याने भांडवल संचय व गुंतवणूक कमी आहे. त्यामुळे रोजगार, उत्पादन कमी राहून दारिद्र्य वाढलेले दिसते.

### १३) हरितक्रांतीच्या परिणाम

देशात हरितक्रांती झाली मात्र त्यातून गरीब व श्रीमंत या वर्गाच्या उत्पन्नातील तफावत वाढली. हरितक्रांतीमुळे देशात झालेल्या विकासाचा फायदा तळागाळातील लोकांना मिळाला नाही. श्रीमंत शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणावर जमिनी व भांडवल असल्याने त्यांना प्रगती करता आली. अल्पभूधारक व ज्यांच्याकडे कोरडवाहू जमीन आहे त्यांना याचा फायदा मिळाला नाही. त्यामुळे दारिद्र्य असल्याचे दिसून येते.

### १४) दारिद्र्य निर्मूलनाच्या योजनांचा प्रभाव कमी

देशात दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी व दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारमार्फत अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. गेल्या दोन-तीन दशकांत सरकारने एकात्मिक ग्रामीण विकास योजना, जवाहर रोजगार योजना, रोजगार हमी योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम वगैरे कार्यक्रमांद्वारा ग्रामीण भागात रोजगार निर्माण करून दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रयत्न केले आहेत. मात्र या योजनांचा लाभ खऱ्या गरजू लोकांना मिळालेला दिसत नाही. त्यामुळे दारिद्र्य टिकून आहे.

### १५) सामाजिक कारणे

आर्थिक कारणांबरोबरच सामाजिक कारणांमुळेही भारतातील दारिद्र्य टिकून आहे. भारतात सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक रुढी व परंपरांमुळे लोक दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकतात. जन्म आणि मृत्युचे सामाजिक उत्तरदायित्व, वाढदिवस, लग्न समारंभ,सण, उत्सव यांसारख्या कारणांवर लोक अनावश्यक व अवास्तव खर्च करतात. बऱ्याचदा खोट्या प्रतिष्ठेसाठी अमाप खर्च करतात. हा खर्च करण्यासाठी प्रसंगी कर्ज घेतात. ग्रामीण भागात लोक सावकारी कर्ज घेतात. हे कर्ज फेडण्यासाठी नवीन कर्ज काढतात. त्यामुळे कर्जाचे ओझे वाढते, परिणामी लोकांना दारिद्र्यात रहावे लागते.

## ३.२.४ भारतातील ग्रामीण व शहरी दारिद्र्याचे मोजमाप

भारतातील दारिद्र्याचे प्रमाण मोजण्यासाठी अनेक अर्थतज्ज्ञांनी, संस्थांनी, जागतिक बँकेने, योजना आयोगाने प्रयत्न केले. दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी प्रत्येकाने वेगवेगळी पद्धत वापरली. दारिद्र्यासंबंधीचे काही महत्त्वपूर्ण अंदाज पुढीलप्रमाणे -

## १) श्री. पी.डी. ओझा

सरासरी, उष्मांकाचा आधार घेऊन श्री. ओझा यांनी दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या मोजली आहे. दररोज दरडोई २२५० उष्मांक देणारा आहार मिळाला पाहिजे व त्यासाठी १९६०-६१ च्या किंमतीनुसार ग्रामीण भागात ८.११ रुपये व शहरी भागात १५.१८ रु. खर्च झाले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. या आधारानुसार १९६०-६१ मध्ये देशातील ४४% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली होती. त्यात ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण ५१.८% होते. १९६७-६८ मध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण ७०% पर्यंत वाढले.

## २) दांडेकर आणि रथ

श्री. दांडेकर व श्री. रथ यांच्या मते मनुष्याला दररोज २२५० उष्मांक देईल एवढा किमान आहार मिळाला पाहिजे. त्यासाठी १९६०-६१ च्या किंमतीनुसार ग्रामीण लोकांना दरडोई दरवर्षी १८० रुपये तर शहरी लोकांना २७० रुपये मिळाले पाहिजेत. त्यांच्या अंदाजानुसार १९६८-६९ मध्ये ग्रामीण भागातील ४०% व शहरी भागातील ५०% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होती. दारिद्र्य रेषेखालील देशातील एकूण लोकसंख्येचे प्रमाण ४१% एवढे होते.

## ३) मिन्हास

श्री. मिन्हास यांनी राष्ट्रीय नमुना पाहणीच्या आधारावर (NSS) अंदाज केला आहे. त्यासाठी दरडोई वार्षिक उपभोग खर्च २४० रुपये मान्य केला होता. त्यांच्या अंदाजानुसार देशात १९६७.६८ मध्ये ५०.६% लोकसंख्या दारिद्र्यात होती. मात्र १९५६-५७ मध्ये हे प्रमाण ६५% होते. म्हणजेच १९५६-५७ ते १९६७-६८ या काळात दारिद्र्यात घट झाली आहे.

## ४) डॉ. वर्धन

डॉ. पी.के. वर्धन यांनी १९७३ मध्ये भारतातील दारिद्र्याचा अभ्यास केला. त्यांच्या मते किमान उष्मांक मिळविण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना दरडोई दरमहा १५ रु. खर्च करावा लागतो, तर शहरी भागातील लोकांना १८ रु. खर्च करावा लागतो. (१९६०-६१ च्या किंमतीनुसार) वर्धन यांच्या मते १९६८-६९ मध्ये ग्रामीण भागात ५५% तर शहरी भागात ४१% लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते.

## ५) डॉ. मोन्टेकसिंग अहलुवालिया

अहलुवालिया यांनी १९६०-६१ च्या किंमतीनुसार दरडोई मासिक खर्चाची पातळी ग्रामीण भागासाठी १५ रुपये तर शहरी भागासाठी २० रुपये मान्य केली. त्यांनी केलेल्या अंदाजानुसार १९५६-५७ मध्येच ५४.१%, १९६५-६६ मध्ये ५३.९% व १९७३-७४ मध्ये ४६.१% लोकसंख्या दारिद्र्यात होती.

## ६) सातवा वित्त आयोग (१९७८)

सातव्या विज आयोगाने दारिद्र्यरेषेची अधिक समावेशक कल्पना मांडून दारिद्र्याचा अंदाज केला. या आयोगाच्या अंदाजानुसार १९७०-७१ मध्ये ५२% लोकसंख्या दारिद्र्यात होती.

### ७) जागतिक बँक

नियोजन आयोगाने स्वीकारलेल्या पद्धतीने १९८९ मध्ये जागतिक बँकेने भारतातील दारिद्र्याचा अंदाज केला. १९७० – १९८८ या काळातील दारिद्र्याचे मोजमाप या बँकेने केले. त्यांनी केलेल्या अंदाजानुसार दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण १९७०–१९८८ या काळात ५२.४% वरून ३९.६% पर्यंत कमी झालेले दिसते. याच काळात ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण ४५.५% वरून ३६.६% पर्यंत कमी झाले होते.

### ८) नियोजन मंडळाच्या तज्ज्ञ समितीचा अहवाल (१९९३)

योजना आयोगाने सप्टेंबर १९८९ मध्ये प्रा. डी.टी. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखाली दारिद्र्याचे अंदाज करण्यासाठी एक तज्ज्ञ समिती नियुक्त केली. समितीने आपला अहवाल जुलै १९९३ मध्ये सादर केला. या समितीकडे दारिद्र्यरेषा ठरविण्याच्या कसोट्या ठरविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. समितीने योजना आयोगाचे अंदाज चुकीचे ठरवून नवीन वैकल्पिक कसोटी वापरली. लकडावाला कसोटीनुसार शहरी भागात दारिद्र्याचे अंदाज करण्यासाठी औद्योगिक कामगारांच्या उपभोक्ता मूल्य निर्देशांकाचा वापर केला, तर ग्रामीण भागात शेतमजुरांच्या उपभोक्ता मूल्य निर्देशांकाचा वापर केला. या कसोटीनुसार १९७३–७४ च्या किंमतीनुसार ग्रामीण भागात दरडोई दरमहा ४९.०९ रु आणि शहरी भागात ५६.६४ रु. ही दारिद्र्य रेषा ठरविली. लकडावाला समितीने दारिद्र्यरेषेत आधार रेषा मानण्याची शिफारस केली. समितीच्या अंदाजानुसार १९९३–९४ मध्ये भारतात दारिद्र्याचे प्रमाण ३२% होते.

### ९) भारत विकास अहवाल २००२

भारत विकास अहवाल (२००२) मध्ये १९७३–७४ ते १९९९–२००० या काळात देशातील दारिद्र्याच्या प्रमाणात कशाप्रकारे बदल झाला याची माहिती दिली आहे.

खालील तक्त्यात ही माहिती दिली आहे.

**दारिद्र्याचे प्रमाण (तक्ता क्र. ३.१)**

| वर्ष | ग्रामीण | शहरी | एकूण |
|---|---|---|---|
| १९७३–७४ | ५६.४ | ४९.० | ५४.९ |
| १९७७–७८ | ५३.१ | ४५.२ | ५१.३ |
| १९८३ | ४५.७ | ४०.८ | ४४.५ |
| १९८७–८८ | ३९.१ | ३८.२ | ३८.९ |
| १९९३–९४ | ३७.३ | ३२.४ | ३६.० |
| १९९९–२००० | २७.१ | २३.६ | २६.१ |

**स्त्रोत** : Indian Development Report 2002 Oxford University Press New Delhi, P-74.

वरील आकडेवारीवरून असे लक्षात येते की देशातील दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली आहे. मात्र शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण जास्त असलेले दिसते.

### १०) २००४–०५ मधील गणना

योजना आयोगाच्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (NSSO) ६१ व्या फेरीने २००४–०५ या वर्षातील दारिद्र्याचे जे अंदाज केले त्याची माहिती योजना आयोगाने मार्च २००७ मध्ये सादर केली. NSSO च्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागात जी व्यक्ती ३५६.३० रु पेक्षा जास्त व शहरी भागातील व्यक्ती महिन्याभरात ५३८.६० रुपयापेक्षा जास्त खर्च करत असेल, ती व्यक्ती दारिद्र्यरेषेवरील (APL), तर एवढा खर्च करू न शकणारे दारिद्र्यरेषे खालील (BPL) असा निकष वापरला गेला. या सर्वेक्षणात दोन प्रकारच्या प्रश्नावलींचा वापर करण्यात आला. पहिली प्रश्नावली ३० दिवसाच्या समान स्मरण कालावधी (Uniform Recall Period-URP) उपभोग खर्चावर आधारित तर दुसरी प्रश्नावली ३६५ दिवसांच्या संदर्भातील संमिश्र स्मरण कालावधी (Mixed Recall Period-MRP) उपभोग खर्चावर आधारित होती. णठझ नुसार भारतात गरिबीचे प्रमाण २७.५% होते. ग्रामीण भागात हे प्रमाण २८.३% तर शहरी भागात हे प्रमाण २५.७% होते. चठझ नुसार भारतात गरिबीचे प्रमाण २१.८% होते. ग्रामीण भागात हे प्रमाण २१.८% तर शहरी भागात हे प्रमाण २१.७% होते.

### ११) २००९–१० मधील गणना

NSSO ने २००९–१० मध्ये आपल्या ६६ व्या फेरीत दारिद्र्याचे सर्वेक्षण केले हेते. २००४–०५ मध्ये दरडोई प्रतिमाह उपभोग खर्च विचारात घेतला गेला होता. २००९–१० मधील सर्वेक्षणासाठी तेंडुलकर गटाने सांगितलेली खर्चाची नवीन पातळी वापरली.

**सर्वेक्षणाच्या पद्धती**

| | **२००४–०५ मधील निकष** | **२००९–१० मधील निकष** | |
|---|---|---|---|
| | जुना निकष | तेंडुलकर निकष | |
| | **दरडोई प्रतिमाह उपभोग खर्च** | **दरडोई प्रतिमाह उत्पन्न** | **प्रतिदिन खर्च** |
| ग्रामीण | ३५६.३० रुपये | ६७२.८० रुपये | २८ रुपये |
| शहरी | ५३८.६० रुपये | ८५९.६० रुपये | |

२००४–०५ मध्ये BPL लोकसंख्या (URP Zwgma) २७.५% होती. तेंडुलकर गटाची नवीन पद्धत वापरली तर २००४–०५ ची BPL लोकसंख्या ३७.२% होती. तसेच ही इझङ लोकसंख्या २००९–१० मध्ये २९.८% होती.

वरील सर्वेक्षणाशिवाय इतर नवीन समित्यांचीही स्थापना करण्यात आली. ऑगस्ट २००८ मध्ये एन.सी.सक्सेना अभ्यासगट स्थापन केला गेला. नोव्हेंबर २००९ मध्ये सुरेश तेंडुलकर समिती स्थापन केली गेली. फेब्रुवारी २०११ मध्ये एस.आर. हशीम समिती स्थापन केली. दारिद्र्याच्या सर्वेक्षणाबाबत एकवाक्यता झालेली नसल्याचे दिसून येते.

### दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

भारतात नियोजनकाळात दारिद्र्य कमी करण्यासाठी शेती, उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासावर भर देण्यात आला. २१ व्या शतकात महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहणाऱ्या

भारतात आजही २५% ते ३०% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे. हे दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना, कार्यक्रम पुढीलप्रमाणे -

दारिद्र्यनिर्मूलनासाठी भारतात १९७० पासून विशेष कार्यक्रम राबविण्यात आले.

**१) लहान शेतकरी विकास एजन्सी :**

(Small Farmers Development Agency-SFDA)

अखिल भारतीय ग्रामीण पत परीक्षण समिती (१९६९) ने केलेल्या शिफारशीनुसार लहान शेतकरी विकास एजन्सी सुरू करण्यात आली. चौथ्या योजनेच्या काळात सुरू झालेली ही संस्था १९७१ पासून देशातील १८१८ गटांमध्ये कार्यरत झाली होती.

**कार्ये**

१) पात्र लहान शेतकरी ओळखणे.

२) लहान शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या सेवा व विविध आदानांच्या पुरवठ्याची व्यवस्था करणे.

३) जलसिंचनाची व्यवस्था करणे.

४) सहकारी बँकांकडून कर्ज मिळविण्याच्या बाबतीत शेतकऱ्यांना मदत करणे.

५) अल्पभूधारकांना सुधारित बी-बियाणे, खते व इतर आदाने मिळवून देण्याची व्यवस्था करणे.

६) लहान शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी साठवण, वाहतूक प्रक्रिया व विपणन सुविधा मिळविण्याबाबत मदत करणे.

७) प्रशिक्षण व कच्चा मालाचा पुरवठा, पतपुरवठा यांसारख्या सेवा पुरविणे.

८) गरिबांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी योग्य प्रकारची योजना तयार करणे.

SFDA ने लहान शेतकऱ्यांना स्वस्त पतसुविधा, लहान व सीमांत शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यास मदत केली आहे. सहकारी संस्थांनी लहान शेतकऱ्यांना पतपुरवठा करावा, यासाठी प्रेरणा दिली आहे. १९७९-८० मध्ये सहकारी संस्थांमार्फत २७.७६ कोटी रुपये व व्यापारी बँकांमार्फत ६.०३ कोटी रुपये लाभधारकांना उपलब्ध करून देण्यात आले. आता डऋअऊ ही एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाचा एक भाग आहे.

**२) सीमांत शेतकरी आणि शेतमजूर विकास एजन्सी**

(Marginal Farmers Agricultural Labour Agency - MFAL)

अखिल भारतीय ग्रामीण पत परीक्षण समितीच्या शिफारशीनुसार लहान शेतकरी विकास एजन्सी बरोबरच सीमांत शेतकरी आणि शेतमजूर विकास एजन्सी सुरू करण्यात आली या कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे उद्यान शेती, पशुपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी हाती घेऊन लहान धारणक्षेत्रांचा अधिक उत्पादक वापर करण्याच्या बाबत सीमांत शेतकऱ्यांना

मदत करणे हे आहे. शेतकऱ्यांच्या वित्तपुरवठ्यात सुधारणा, सुधारित आदाने याद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. तसेच त्यांना रोजगार संधी द्वारे मदत करण्यात आली.

**कार्ये**

१) पात्र सीमांत शेतकरी व शेतमजूर ओळखणे

२) शेतकरी व शेतमजुरांच्या समस्यांचा शोध घेणे

३) ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन देणे

४) सहभागी शेतकऱ्यांना रोजगार पुरविण्यासाठी आर्थिक कार्यक्रम तयार करणे.

५) ग्रामीण भागात विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशी संस्थात्मक, वित्तीय आणि प्रशासकीय व्यवस्था करणे

६) वस्तूंची उत्पादनप्रक्रिया, साठवण व विपणन यासाठी सामान्य सुविधा विकसित करणे.

७) कार्यक्रमाचे वेळोवेळी मूल्यमापन करणे.

ही एजन्सी प्रत्यक्षपणे कोणतेही आर्थिक कार्यक्रम राबवित नाही तर इतर संस्था व विशेषत: सहकारी संस्थांना त्याच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत मदत करते.

**३) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम**

(Integrated Rural Development Programme IRDP)

सहाव्या पंचवार्षिक योजनेत २ ऑक्टोबर १९८० मध्ये खठउझ हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. यात ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत समाजाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादन करणे, पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे, उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्रीचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करणे इत्यादीचा समावेश होतो.

IRDP **ची उद्दीष्टे –**

१) ग्रामीण भागात रोजगारात वाढ करणे

२) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना लाभ मिळवून देणे.

३) दारिद्र्याचे निर्मूलन करणे

४) मागासलेल्या भागाचा विकास करणे

५) नैसर्गिक साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करणे.

६) विकासासाठी विविध योजनांमध्ये समन्वय साधणे.

हा कार्यक्रम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत राबविण्यात येत होता. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३५००रु आहे व जे दारिद्र्य रेषेखाली आहेत, त्यांना या योजनेची

संधी उपलब्ध करून देण्यात आली. नंतर सातव्या योजनेत लाभार्थींची उत्पन्न मर्यादा ४८००रु झाली. आठव्या योजनेत लाभार्थींची उत्पन्न मर्यादा ६४००रु. पर्यंत वाढविण्यात आली. लाभार्थींना ५०% अनुदानावर अनेक व्यवसायासाठी आर्थिक मदत दिली जात होती. यात अनुसूचित जातीच्या विकासावर जास्त भर देण्यात आला.

१९८० ते २००० या काळात या योजनेत ३२५९९ कोटी रु. गुंतवणूक झाली आणि ५४४.७ लाख कुटुंबांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ झाला. एप्रिल १९९९ मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम बंद करण्यात आला आणि या कार्यक्रमाचे सुवर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजनेत विलीनीकरण करण्यात आले.

### ४) दुष्काळपिडित क्षेत्र कार्यक्रम
### (Drought - Prone Area Programme DPAP)

हा कार्यक्रम १९७३ मध्ये सुरू करण्यात आला. भूमी, पाणी, पशुधन व मानवी साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करणे आणि दुष्काळाच्या परिणामाची तीव्रता कमी करणे, यादृष्टीने ही योजना सुर करण्यात आली. जल साधनसामग्रीचे व्यवस्थापन, योग्य पीक रचनेद्वारे मृदसंधारणासाठी उपाययोजना, जंगल साधनसामग्रीत वाढ, पशुधन विकास आणि दुग्धव्यवसाय विकास सुधारित बियाणे व खतांचा वापर, अल्प कालावधीत येणाऱ्या पिकांची लागवड पूरक व्यवसायांचा विकास इत्यादी प्रमुख घटक असलेल्या या कार्यक्रमाची १९८५-८६ पासून १३ राज्यांच्या ९१ जिल्ह्यांतील ६१५ गटांमध्ये अंमलबजावणी करण्यात आली. सुमारे ७ ते ७.५ कोटी लोकांना या कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत जलसिंचन सुविधात वाढ करण्यात आली. केंद्र व राज्य यांच्याकडून समान प्रमाणात खर्च करण्यात आला. सहाव्या योजनेत या कार्यक्रमासाठीझी ३७७.४१ कोटी रु. खर्च करण्यात आले. १९९१-९२ मध्ये या कार्यक्रमासाठी ९३४.९ कोटी रु. खर्च करण्यात आले. तसेच २००६-०७ मध्ये ३१ जानेवारी २००७ पर्यंत १५.३८ लाख रु. चे ३,०७६ नवीन प्रकल्प मंजूर करण्यात आले.

### ५) किमान गरजा कार्यक्रम (Minimum Needs Programme - MNP)

गरिबी हटाव आणि न्यायासह वृध्दी साध्य करण्याच्या दृष्टीने पाचव्या योजनेच्या काळात किमान गरजा कार्यक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमात दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या उपभोग पातळीत सुधारणा करणे आणि ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागातील कामगारांची कार्यक्षमता वाढविणे, यासाठी सार्वजनिक संस्थांमार्फत मोफत व अर्थसाहाय्य सेवा पुरविण्यावर भर देण्यात आला. प्राथमिक शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, विद्युतीकरण, भूमीहीन श्रमिकांना गृहनिर्माण सुविधा हे या कार्यक्रमातील मूलभूत घटक होते. या कार्यक्रमासाठी पाचव्या योजनाकाळात २६०७ कोटी रु. खर्च करण्याचे लक्ष्य होते. मात्र प्रत्यक्षात १०३८ कोटी रु. खर्च करण्यात आले. जलसिंचन सुविधांत वाढ, सर्व खेड्यात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, झोपडपट्टीतील परिस्थितीत सुधारणा, कुटुंब नियोजनास प्रोत्साहन, वीजनिर्मिती, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार या उद्दिष्टांना अनुसरून इतर बाबींवर हा खर्च करण्यात आला.

**६) वीस कलमी आर्थिक कार्यक्रम** (Twenty Point Ecomomic Programme)

१९७५ मध्ये पहिला वीस कलमी आर्थिक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. तर दुसरा वीस कलमी कार्यक्रम १९८२ मध्ये जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमाची आखणी १९८२ मध्ये ग्रामीण लोकांच्या राहणीमानाच्या स्थितीत सुधारणा करण्याच्या हेतूने करण्यात आली होती. त्यामुळे गरिबांच्या स्थितीत सुधारणा करण्याशी संबंधित लक्ष्ये वीस कलमी कार्यक्रमात समविष्ट करण्यात आली. आणीबाणीच्या काळात म्हणजेच १ जुलै १९७५ मध्ये जाहीर केलेल्या वीस कलमी कार्यक्रमापेक्षा नवीन असा कार्यक्रम १४ जानेवारी १९८२ मध्ये जाहीर करण्यात आला. या वीस कलमी कार्यक्रमाची २० ऑगस्ट १९८६ रोजी पुनर्रचना करण्यात आली. यामागे दारिद्रय निर्मूलन व पूर्ण रोजगार साध्य करणे हे ध्येय होते. पुनर्रचित कार्यक्रमात दारिद्र्य निर्मूलन उत्पादकता वाढ, उत्पन्नातील विषमता कमी करणे, सामाजिक व आर्थिक असमानता कमी करणे, जीवनमानाचा दर्जा सुधारणे यावर भर देण्यात आला.

**७) निर्जन प्रदेश विकास कार्यक्रम** (Desert Development Programme - DDP)

राष्ट्रीय कृषी आयोगाच्या शिफारशीनुसार १९७७ मध्ये निर्जन प्रदेश / ओसाड प्रदेश/ वाळवंट विकासासाठी निर्जन प्रदेश विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमात राजस्थान, गुजरात, हरियाणा, जम्मू आणि काश्मीर व हिमाचल प्रदेश यातील ओसाड प्रदेशांचा समावेश करण्यात आला.

हा कार्यक्रम सुरू झाल्यापासून म्हणजे १९७७-७८ पासून मार्च १९९३ पर्यंत ४४७ कोटी रु. आणि सातव्या योजनेच्या काळात १९४.०७ कोटी रु. या कार्यक्रमावर खर्च करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत जमीन विकास, जल साधनसामग्री विकास, जंगल तयार करणे या गोष्टी करण्यात आल्या. २००६-०७ मध्ये ३१ जानेवारी २००७ पर्यंत ११.३५ लाख रुपयांच्या २२७० नवीन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.

**८) खेडे विकास कार्यक्रम** (Village Development Programme VDP)

राष्ट्रीय कृषी आयोगाच्या शिफारशीवरून पाचव्या पंचवार्षिक योजनेत संपूर्ण खेडे विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमात ग्रामीण क्षेत्रात उत्पादक क्षमता वाढविणे आणि विकासाच्या लाभाचे समान वाटप करून कल्याण व भरभराट साधणे यावर मुख्य भर देण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत जमीनधारणेचे एकत्रीकरण, संपूर्ण जमीन विकास योजना, जलसिंचन सुविधेत वाढ, योग्य पीक पद्धतीचा स्वीकार वगैरेंवर भर देण्यात आला.

खेडे विकास कार्यक्रमात शेती क्षेत्राबरोबर बिगर शेती क्षेत्रावरही भर देण्यात आला. यामागे संपूर्ण खेड्याला विकासाचा लाभ मिळावा हा हेतू होता. या कार्यक्रमात ग्रामीण लोकांच्या उत्पन्नातील विषमता कमी करणे आणि रोजगार संधीत वाढ करणे यावरही भर देण्यात आला. सुरूवातीला ही योजना बिहार, ओरिसा, तामिळनाडू आणि उत्तरप्रदेश या चार राज्यांत सुरू करण्यात आली होती. नंतर देशाच्या इतर भागात विस्तार करण्यात आला.

**९) ग्रामीण भागातील स्त्री व बाल विकासासाठीचा कार्यक्रम –**

जिल्ह्यात उत्पन्न मिळवून देणाऱ्या अर्थप्रक्रियेद्वारे मोठ्या प्रमाणात ग्रामीण महिलांची

सुधारणा करणे हे ग्रामीण भागातील स्त्री व बाल विकासासाठीच्या कार्यक्रमाचे ध्येय होते. अल्प साक्षरता दर आणि उच्च बालमृत्युदर या आधारावर या कार्यक्रमासाठी जिल्हयांची निवड करण्यात आली. उत्पन्न मिळवून देणाऱ्या अर्थप्रक्रियेसाठी १५-२० स्त्रियांचे गट तयार करण्याचे ठरविण्यात आले. प्रत्येक गटास १५,००० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. राज्याच्या बाबतीत केंद्र, राज्य सरकार आणि युनिसेफ यांच्याकडून समान प्रमाणात ही रक्कम दिली जाते. मात्र, केंद्रशासित प्रदेशांच्या बाबतीत प्रति गटामागे १०,००० रु. केंद्र सरकार देते व उर्वरित रक्कम युनिसेफ देते.

१९८७-८८ मध्ये ८२,२६५ सदस्य संख्या असलेले ४,९५९ गट स्थापन झाले. १९९३-९४ मध्ये १,०१,००३ सदस्य असलेले ४०४९ गट स्थापन करण्यात आले. १९९३-९४ मध्ये ३५२ जिल्ह्यांत या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

### १०) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना

ग्राम पातळीवर सातत्यपूर्ण मानवी विकास साध्य करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी २००२-०३ मध्ये सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशात प्रधानमंत्री ग्रामोदय योजना सुरू करण्यात आली. या योजनेमार्फत काही प्राधान्य क्षेत्रावर भर देण्याच्या दृष्टीने निवडक मूलभूत किमान सेवांसाठी राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना आर्थिक केंद्रिय साहाय्याची वाटणी केली जाते. सुरूवातीस प्राथमिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण, ग्रामीण निवारा, पिण्याचे पाणी, पोषण या पाच घटकांचा या योजनेत विचार करण्यात आला. २००१-०२ पासून ग्रामीण विद्युतीकरण या घटकाचा समावेश करण्यात आला. २००२-०३ व २००३-०४ या दोन्ही वर्षांसाठी या योजनेसाठी २८०० कोटी रुपयांचे अधिक केंद्रीय साहाय्य वाटप करण्यात आले.

### ११) इंदिरा आवास योजना

ग्रामीण भागातील गरीब लोकांची घरबांधणीची गरज भागविण्यासाठी मे १९८५ मध्ये जवाहर रोजगार योजनेची एक उपयोजना म्हणून इंदिरा आवास योजना सुरू करण्यात आली. १ जानेवारी १९९६ पासून एक स्वतंत्र योजना म्हणून तिची अंमलबजावणी करण्यात आली. अनुसूचित जाती व जमातीचे सदस्य व श्रमिक यांना मोफत घरे पुरविणे हे या योजनेचे प्रमुख ध्येय होते. ही योजना इतरही गरीब वर्गातील लोकांसाठी लागू करण्यात आली.

या योजनेखालील लाभधारकांची निवड ग्रामसभा करते. बांधकाम तंत्र, साहित्य आणि रचना यांची निवड पूर्णपणे लाभधारकांच्या पसंतीने केली जाते. नवीन घर बांधण्यासाठी सपाट क्षेत्रात २०,००० रु व डोंगराळ क्षेत्रात २२,००० रु. प्रति एकक या दराने साहाय्य दिले जाते. डिसेंबर २००६ पर्यंत एकूण २९,२४६.२७ कोटी रु. या योजनेसाठी खर्च करण्यात आले असून १५३ लाख घरे बांधण्यात आली किंवा दुरुस्त करण्यात आली.

### १२) पत सह अर्थसाहाय्य योजना (Credit Cum Subsidy Scheme)

ग्रामीण गृहनिर्माणासाठी १ एप्रिल १९९९ रोजी ही योजना सुरू करण्यात आली. ही योजना ३२,००० रु. पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबासाठी सुरू करण्यात आली.

या योजनेसाठी कमाल ४०,००० रु. चे कर्ज दिले जाते. अर्थसाहाय्य मात्र १०,००० रु. पर्यंत मर्यादित असते. केंद्र व राज्ये ७५:२५ या प्रमाणात अर्थसाहाय्याचा वाटा उचलतात. व्यापारी बँका, गृहनिर्माण वित्तसंस्था यांच्याकडून कर्जाचे वाटप केले जाते. १ जून २००४ पर्यंत ११३.९६ लाख घरे बांधण्यात आली.

### १३) समग्र आवास योजना

ही योजना १ एप्रिल १९९९ रोजी सुरू करण्यात आली. निवारा, स्वच्छता आणि पिण्याचे पाणी यांची एकत्रित तरतूद करण्याचा दृष्टीने ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेचे मूलभूत उद्दिष्ट ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे हे आहे. पहिल्या अवस्थेत या योजनेची २४ राज्ये व एका केंद्रशासित प्रदेशातील २५ जिल्ह्यांच्या एका गटात अंमलबजावणी करण्यात आली. १९९९-२००० मध्ये या योजनेखाली २.६७ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

### १४) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना

(PMGSY- Pradhan Mantri Gram Sodak Yojana)

डिसेंबर २००० मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. दहाव्या योजनेच्या समाप्तीपर्यंत जेथे रस्ते नाहीत अशा ५०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागात रस्त्याची सुविधा पुरविण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांत ही योजना राबविली जात आहे. या कार्यक्रमासाठी ६०,००० कोटी रुपये खर्च येईल असा सुरूवातीचा अंदाज होता. मात्र आता यासाठी १,३०,००० कोटी रू. खर्च येईल असा अंदाज आहे.

राष्ट्रीय ग्रामीण रस्ते विकास एजन्सी ही या कार्यक्रमाच्या व्यवहार व व्यवस्थापनाच्या बाबतीत मदत करते. आशियाई विकास बँकेने पहिल्या हप्त्यात मध्यप्रदेश व छत्तीसगडमधील रस्ते विकासासाठी ४०० दशलक्ष डॉलरचे कर्ज मंजूर केले. डिसेंबर २००६ पर्यंत १८,२८१ कोटी रु. या योजनेसाठी खर्च करण्यात आले असून १,०७,५६९ किलोमीटर लांबीची रस्त्याची कामे पूर्ण करण्यात आली.

### १५) अंत्योदय अन्न योजना

ही योजना डिसेंबर २००० मध्ये सुरू करण्यात आली. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबापैकी अतिगरीब अशा १ कोटी कुटुंबांचा या योजनेत समावेश केलेला आहे. या योजनेखाली प्रत्येक पात्र कुटुंबास गहू २ रु. किलो व तांदूळ ३ रू. किलो या दराने २५ किलो अन्नधान्य पुरविण्याचे ठरले. एप्रिल २००२ मध्ये हे परिमाण २५ किलो ग्रॅम वरुन ३५ किलोग्रॅमपर्यंत वाढविण्यात आले. जून २००३ मध्ये दारिद्र्यरेषेखालील आणखी ५० लाख कुटुंबांचा समावेश करून या योजनेचा विस्तार करण्यात आला.

### १६) भारत निर्माण योजना

ग्रामीण भागाच्या विकासासाठी भारत सरकारने भारत निर्माण योजना सुरू केली. या योजनेची घोषणा पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी मे २००५ मध्ये केली. पाटबंधारे, रस्ते,

घरे, पाणी, वीज व दूरध्वनी अशा सहा ग्रामीण गाभा क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्याची हमी या योजने देण्यात आली आहे. या योजनेवर चार वर्षात १ लाख ७४ हजार कोटी रु. करण्यात येणार आहेत. या योजनेमार्फत १ कोटी हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्यात येणार आहे. ग्रामीण भागात रस्त्यांची सुविधा वाढविण्यासाठी एक हजाराहून जास्त लोकवस्ती असलेली गावे रस्त्यांना जोडली जाणार आहेत. या योजनेअंतर्गत ६० लाख घरे बांधण्यात येणार आहेत. तसेच नवीन वस्त्यांना पिण्याचे पाणी पुरविण्यात येणार आहे. ज्या गावात दूरध्वनीची सोय नाही अशा ६६,८२२ गावांना ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनेसाठी २००५-०६ मध्ये १२,१६० कोटी रु. खर्चाची तरतूद करण्यात आली होती. २००६-०७ मध्ये यात १८,६९६ कोटी रु. पर्यंत वाढ करण्यात आली.

भारत सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी वरीलप्रमाणे अनेक योजना अमलात आणल्या. तसेच बेकारी दूर करण्याच्या हेतूने काही योजना भारतात राबविल्या . बेकारी व दारिद्र्य निर्मूलन अशा दुहेरी हेतूने अनेक कार्यक्रम अमलात आणले असले तरी दारिद्र्याची समस्या पूर्णपणे सुटलेली नाही. म्हणून या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

### **३.२.५ बेकारी / बेरोजगारी** (Unemployment)

भारतात दारिद्र्याबरोबर बेकारीचीही समस्या गंभीर आहे. अर्थात देश विकसित असो किंवा अविकसित प्रत्येक देशात बेकारी आढळते. विकसित देशात ४% ते ६% बेकारी आढळते. अनेक अर्थतज्ज्ञांनी बेकारी संदर्भात अभ्यास केला. प्रो. फिलीप्स यांच्या मते देशात बेकारी कमी करावयाची असेल तर महागाईला तोंड द्यावे लागेल. याउलट महागाई कमी करण्याचा प्रयत्न केला तर बेकारी वाढेल. त्यामुळे बेकारी ही प्रत्येक देशाची समस्या असते असे म्हणावे लागेल.

#### **३.२.५.१ बेकारीची संकल्पना**

प्रचलित वेतन दरावर कामगार शारीरिक किंवा बौद्धिक श्रम करण्यास तयार असतात. परंतु कामाच्या संधी मिळत नाही किंवा रोजगार मिळवण्यात असमर्थ ठरतात. अशा कामगारांना बेरोजगार असे संबोधले जाते.

प्रचलित वेतनदरावर काम करण्याची इच्छा आहे, काम करण्याची पात्रताही आहे तरीही काम उपलब्ध न होणे म्हणजे बेकारी होय.

एखाद्या व्यक्तीने एखाद्या क्षेत्रात कार्य करण्यासाठी लागणारे शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले आहे, कौशल्य प्राप्त आहे, कोणतेही शारीरिक, बौद्धिक श्रम करण्याची तयारी आहे, प्रचलित वेतनदरावर काम करण्याची तयारी आहे पण त्याला काम उपलब्ध होत नाही. अशा व्यक्तीला बेरोजगार मानले जाते.

बेरोजगारीची संकल्पना कर्त्या लोकसंख्येपुरतीच मर्यादित आहे. कर्त्या लोकसंख्येत १५ ते ५९ वर्ष वयोगटातील लोकसंख्येचा समावेश होतो. ० ते १४ वर्ष वयोगट व ६० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्यांचा या संकल्पनेशी संबंध येत नाही.

#### **३.२.५.२ बेकारीचे प्रकार** (Type of Unemployement)

**१) अनैच्छिक बेकारी –**

काही लोक स्वेच्छेने बेकार राहतात त्यांची बेकारी ऐच्छिक असते. समाजात काही

सुखवस्तू असतात. आर्थिक संपन्नतेमुळे रोजगार संधी मिळूनही काम करण्यास तयार नसतात. तसेच काही गरीब असूनही काम करण्याऐवजी दुसऱ्यावर अवलंबून असतात. अशा लोकांचा बेरोजगारात समावेश होतो. पण अशा बेरोजगारीला ऐच्छिक बेरोजगारी म्हणतात. याउलट ज्या लोकांची प्रचलित वेतनदरावर काम करण्याची तयारी असते परंतु त्यांना रोजगार मिळत नाही अशा बेरोजगारीला अनैच्छिक बेरोजगारी म्हणतात.

### २) **संघर्षजन्य बेरोजगारी** (Frictional Unemployment)

उत्पादन तंत्रात होणारे जलद बदल संघर्षजन्य बेरोजगारी निर्माण करतात. अर्थव्यवस्थेच्या गतिमानतेमुळे ही बेरोजगारी उद्‌भवते. उत्पादनात नवीन यंत्र आणि तंत्राचा वापर केला जातो. तेव्हा परंपरागत कौशल्य असलेले कामगार बेरोजगार होतात. नवे उद्योग उदयाला येतात आणि जुने उद्योग अस्ताला जातात. अशा वेळी खालावणाऱ्या उद्योगातून नव्या उद्योगाकडे कामगार आकृष्ट होतात. दरम्यान  नव्याने कौशल्य आत्मसात करणे अथवा नव्या नोकऱ्या शोधणे या संधीकाळात काहीशी बेरोजगारी राहते. ही बेरोजगारी तात्पुरती असते. कामगारांनी नवीन प्रशिक्षण घेतले, औद्योगिक संघर्ष मिटले, यंत्र बिघाड दुरुस्त झाला की ही बेरोजगारी दूर होते.

### ३) **संरचनात्मक बेरोजगारी** (Structural Unemployment)

अर्थव्यवस्थेच्या रचनेतील बदलामुळे जी बेरोजगारी उद्‌भवते तिला संरचनात्मक बेरोजगारी म्हणतात. लोकांच्या उत्पन्नात वाढ होते, आवडीनिवडी बदलतात. अशा वेळी उपभोक्त्यांच्या आवडीनिवडीनुसार उत्पादन करावे लागते. याउलट ज्या वस्तू नापसंत केल्या जातात, त्यांचे उत्पादन बंद करावे लागते, त्यामुळे काही लोकांना बेरोजगार व्हावे लागते. तसेच व्यापारचक्रीय चढउतारामुळेही बेरोजगार निर्माण होऊ शकतात. या बेरोजगारीला संरचनात्मक बेरोजगारी म्हणतात. भारतात श्रमाचा पुरवठा जास्त तर श्रमाची मागणी कमी आहे. त्यामुळे संरचनात्मक बेकारी उद्‌भवते.

### ४) **अर्ध बेकारी/ अल्प रोजगार** (Under Employment)

व्यक्तीला पूर्णवेळ रोजगार मिळत नाही किंवा व्यक्तीच्या उत्पादन क्षमतेचा पूर्णपणे वापर केला जात नाही. तेव्हा त्यास अर्ध बेकार किंवा न्यून बेकार किंवा अल्प रोजगार म्हणतात. ग्रामीण भागातील शेतमजुरांची बाराही महिने काम करण्याची तयारी असते परंतु त्यांना वर्षातील काही महिनेच काम मिळते. ग्रामीण भागात ४ ते ६ महिने काम मिळते व उर्वरित काळ बेकार रहावे लागते. अशा बेरोजगारीला अर्ध किंवा न्यून बेरोजगारी म्हणतात.

### ५) **छुपी बेकारी** (Disguised Unemployment)

या बेरोजगारीला वेषांतरित/प्रच्छन्न/अदृश्य/सुप्त बेकारी असेही म्हणतात. शेती क्षेत्रात आवश्यकतेपेक्षा जास्त श्रमिक काम करित असल्याने तेथे अशी बेकारी आढळते. असे अतिरिक्त श्रमिक काम करताना दिसतात पण त्यांना कामावरून काढून टाकले. तर उत्पादनावर परिणाम होत नाही. अशा श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते. भारतात कृषी क्षेत्रात अशा प्रकारची बेरोजगारी आढळते.

### ६) **खुली बेरोजगारी** (Open Unemployment)

काम मागणाऱ्या श्रमिकांना थोडेफारही काम मिळत नसेल, त्यांना पूर्णवेळ रिकामे राहावे लागत असेल तर अशा बेरोजगारीस खुली बेरोजगारी म्हणतात. भारतातील ग्रामीण भागातील तरुण वर्ग काम मिळविण्यासाठी शहराकडे येतो पण त्याला शहरात रोजगार मिळत नाही किंवा बराच वेळ रोजगार मिळविण्यासाठी वाट पाहावी लागते. त्यांना बेरोजगार राहावे लागते.यात प्रामुख्याने सुशिक्षित व अर्धशिक्षित श्रमिकांचा समावेश होतो.

### ७) **सुशिक्षितांची बेरोजगारी** (Educated Unemployment)

विशिष्ट उद्योग किंवा व्यवसायासाठी लागणारे किमान शिक्षण व प्रशिक्षण घेऊनही जर पात्रतेनुसार रोजगार मिळत नसेल तर अशा बेरोजगारांना सुशिक्षित बेरोजगार म्हणतात. भारतात सुशिक्षित बेरोजगारांचा मोठा प्रश्न आहे. ह्या बेरोजगारीत वाढ झालेली दिसून येते. पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांचाही सुशिक्षित बेरोजगारीत अधिक समावेश आहे.

### ८) **हंगामी बेरोजगारी** (Seasonal Unemployment)

हंगामी बेरोजगारी हा अपुऱ्या रोजगारीचाच एक प्रकार आहे. विशिष्ट हंगामात लोकांना पुरेसे काम मिळते पण नंतर काही काळ बेकार राहावे लागते, असे या बेकारीचे स्वरूप असते. शेतीत या प्रकारची बेकारी प्रामुख्याने आढळते. पेरणी, कापणी, मळणी अशा हंगामात भरपूर काम असते. पण हंगाम संपला की काम संपते तेव्हा लोकांना बेकार राहावे लागते. कृषी मालावर आधारित उद्योगात ही अशा प्रकारची बेकारी आढळते.

### ९) **शहरी बेरोजगारी** (Urban Unemployment)

शहरी भागात काही खुली बेरोजगारी आढळून येते. यात प्रामुख्याने औद्योगिक बेरोजगारी आणि सुशिक्षित बेरोजागारीचा समावेश होतो. औद्योगिक क्षेत्रात संप, टाळेबंदी, सक्तीची कामगार कपात, उद्योगसंस्था बंद पडणे, आधुनिकीकरण, उद्योगसंस्थेचे स्थलांतरण इत्यादी कारणांमुळे बेरोजगारी निर्माण होते.

### १०) **ग्रामीण बेकारी** (Rural Unemployment)

भारतात ग्रामीण भागात शेती क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण बेकारी म्हणजे सामान्यपणे कृषी बेरोजगारी असेही म्हणतात. ग्रामीण बेरोजगारीत छुपी बेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, अर्ध बेरोजगारी यांचा समावेश होतो.

## ३.२.५.३ भारतातील बेरोजगारीची कारणे (Cause of Unemployment in India)

भारतातील बेरोजगारीस अनेक कारणे जबाबदार आहेत. ती पुढीलप्रमाणे -

### १) दारिद्र्य -

भारतात दारिद्र्य व बेरोजगारी या दोन्ही समस्या तीव्र स्वरूपाच्या आहेत. अनेक व्यक्ती गरीब असण्याचे कारण बेकारी हे आहे. पण त्याचबरोबर व्यक्तीचे दारिद्र्यही बेकारीस

कारणीभूत आहे. व्यक्ती गरीब असल्यामळे त्यांच्याकडे साधनसामग्रीची कमतरता असते. त्यामुळे त्यांना फायदेशीर रोजगार मिळविता येत नाही. गरीबीमुळे शिक्षण व प्रशिक्षणावर खर्च करणे शक्य होत नाही. व्यवसाय सुरू करण्यात अडचण येते, नोकरी मिळविण्यासाठी पैसा खर्च करावा लागतो. गरीब लोकांना तो खर्च करता येत नाही. त्यामुळे त्यांना बेकार राहावे लागते.

**२) लोकसंख्येतील अतिरिक्त वाढ –**

भारतात लोकसंख्या अतिरिक्त आहे. लोकसंख्येचा विस्फोट झाल्याचा अनुभव येत आहे. लोकसंख्या वाढल्यामुळे श्रमदलात मोठ्या प्रमाणात वाढ झाली मात्र वाढलेल्या श्रमदलास सामावून घेता येईल एवढ्या प्रमाणात रोजगारसंधी देशात निर्माण न झाल्याने बेकारीचे प्रमाण जास्त आहे.

**३) अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा कमी वेग –**

अर्थव्यवस्थेतील रोजगार संधी या आर्थिक वृद्धीशी संबंधित असतात. आर्थिक वृध्दीचा दर जास्त असेल तर मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग व सेवाक्षेत्रात रोजगार निर्माण होतो. भारतात नियोजन काळात अपेक्षित वेगाने आर्थिक वृद्धी घडून न आल्याने पुरेशा रोजगार संधी निर्माण झाल्या नाहीत. ६० च्या दशकात आर्थिक वृध्दीवर दरवर्षी सरासरी ३.५% होता. १९८० नंतर हा दर वाढला. पुन्हा कालांतराने हा दर कमी झाला. एका बाजूला अतिरिक्त लोकसंख्या व दुसऱ्या बाजूला आर्थिक वृध्दीचा अल्प वेग यामुळे देशात बेकारी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली.

**४) मागसलेली शेती –**

भारतात मोठ्या प्रमाणावरील बेकारीचे व अर्धबेकारीचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय शेतीचे स्वरूप हे आहे. भारतात ६५% पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. मात्र शेती प्रगत नाही. शेतीत परंपरागत तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. भारतात दरडोई शेतीची उपलब्धता कमी आहे. शेतीत आवश्यकतेपेक्षा जास्त लोकसंख्या आहे. शेतकरी गरीब असल्याने ते आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतीत वापर करू शकत नाहीत. भारतीय शेतीचे स्वरूप हंगामी आहे. तसेच दारिद्र्यामुळे कुकुटपालन, दुग्धव्यवसाय, मधमाशापालन, मासेमारी, अन्नप्रक्रिया अशा इतर पूरक किंवा पर्यायी स्वरूपाच्या रोजगारसंधी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणावर बेकार आहेत.

**५) औद्योगिकीकरणाचा अल्प वेग –**

नियोजन काळात देशात औद्योगिकीकरणाचा वेग वाढविण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले. पायाभूत उद्योगांची सार्वजनिक क्षेत्रात उभारणी, पायाभूत सुविधाची उपलब्धता, औद्यागिक धोरणात योग्य बदल, खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्याच्या वाढीस प्रोत्साहन याद्वारे देशात औद्योगिकीकरणाचा वेग वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रयत्नांना काही प्रमाणात यश येऊन देशात औद्योगिक प्रगती झाली, मात्र शेती क्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्येला सामावून घेता येईल. एवढ्या प्रमाणात रोजगार संधी

औद्योगिक क्षेत्रात निर्माण झाल्या नाहीत. तसेच देशात सर्वत्र सारखा व समतोल औद्योगिक विकास झालेला नाही. त्यामुळे औद्योगिक प्रगती कमी असलेल्या भागात लोकांना शेती क्षेत्रावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे देशात बेकारीचे प्रमाण मोठे आहे.

### ६) उद्योगातील अतिरिक्त क्षमतेचे अस्तित्व

उद्योगातील उत्पादन क्षमतेचा पूर्णपणे वापर केला जात नाही. त्यामुळे देशात बेकारी आहे. खंडीत वीजपुरवठा, कच्चा मालची कमतरता, औद्योगिक अशांतता, वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी इत्यादीमुळे उद्योगांना उत्पादनाची क्षमता पूर्णपणे वापरता येत नाही. त्यामुळे उद्योगांना पुरेशा प्रमाणात श्रमिकांना सामावून घेता येत नाही.

### ७) भांडवल प्रधान तंत्रावरील भर

भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्रावर भर दिला. मात्र दुसऱ्या योजनेपासून औद्योगिक क्षेत्रावर भर देण्यास सुरूवात झाली. औद्योगिक विकास प्रामुख्याने भांडवलप्रधान उत्पादन तंत्राच्या स्विकारावर आधारलेला आहे. भांडवलप्रधान तंत्रामुळे रोजगारसंधी पुरेशा प्रमाणात निर्माण होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे बेकारीची समस्या निर्माण झाली.

### ८) सदोष शिक्षण व्यवस्था

भारतातील सुशिक्षितांची बेकारी वाढण्यास भारतातील सदोष शिक्षण पद्धती जबाबदार आहे. अर्थव्यवस्थेतील मनुष्यबळाच्या गरजा विचारात घेऊन शिक्षण पद्धती विकसित करण्यात आली नाही. त्यामुळे कारकुनी किंवा तत्सम नोकरी करू इच्छिणाऱ्या बेकारांची संख्या वाढत गेली. व्यवसायिक स्वरूपाच्या शिक्षणावर भर न दिला गेल्याने स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्यांचे प्रमाण कमी राहिल अलीकडे व्यवस्थापन, अभियांत्रिकी, वैद्यकिय, माहिती व तंत्रज्ञान इत्यादी व्यावसायिक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. परंतु या शिक्षणात नियोजनाचा अभाव आहे. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. पण तेवढ्या रोजगार संधी निर्माण न झाल्याने व्यावसायिक शिक्षण घेतलेले विद्यार्थी ही मोठ्या प्रमाणावर बेरोजगार आहेत.

### ९) सरकारचे औद्योगिक धोरण

परवाना धोरण, आयात-निर्यात विषयक धोरण, मक्तेदारी नियंत्रण कायदे, करविषयक धोरण, परकीय चलन व्यवहार नियमन कायदे इत्यादीमुळे औद्योगिक धोरणात ताठरता आली. तर दुसरीकडे भाववाढीच्या परिस्थितीमुळे उत्पादन घटकांच्या किंमती वाढत गेल्या. त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ झाली. नफ्यांचे प्रमाण कमी झाले. परिणामी उद्योजक नवीन गुंतवणूक करण्यास धाडस करत नाहीत. परिणामी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होण्यास अडचणी येतात.

### १०) राष्ट्रीय रोजगार धोरणाचा अभाव

भारतात नियोजनकाळात औद्योगिक व कृषी विकासातून आर्थिक विकास होईल

आणि आपोआप रोजगारात वाढ होईल अशी नियोजन कर्त्यांची अपेक्षा होती मात्र बेरोजगारांच्या संख्येत वाढ झाल्याने श्री. बी. भगवती यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली. समितीने आपला अहवाल १९७३ मध्ये सादर केला. तेव्हापासून रोजगार निर्मिती करणाऱ्या अनेक योजना सुरू केल्या. मात्र मनुष्यबळ नियोजनाचा विचार करण्यात आला नाही. रोजगार वाढीसाठी जाणीवपूर्वक धोरण आखून त्याची योग्य पद्धतीने अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न न झाल्याने देशात बेकारी व अर्धबेकारीचे प्रमाण वाढत गेले.

### ३.२.५.४ भारतातील बेकारी कमी करण्यासाठी अमलात आणलेल्या उपाय योजना

(Measure Underta ken to Remove the Unemployment in India)

भारतात ग्रामीण आणि शहरी भागातील बेकारी अशी ठळक दोन भिन्न स्वरूपाची बेकारी आढळून येते. ग्रामीण भागात हंगामी, छुपी, न्यून बेकारी आढळून येणे तर शहरी भागात संघर्षजन्य, रचनात्मक, सुशिक्षितांची बेकारी प्रामुख्याने आढळून येते. नियोजन काळात सरकारने दारिद्र्य निर्मूलन व बेरोजगारी कमी करण्यासाठी अनेक योजना सुरू केला त्या योजना पुढीलप्रमाणे -

### १) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम

(National Rural Employment Programme - NREP)

ऑक्टोबर १९८० मध्ये हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. १९७७-७८ मध्ये कामाच्या बदल्यात अन्नधान्य कार्यक्रम सुरू करण्यात आला होता. या कार्यक्रमात सुधारणा करून त्याचे नाव छठएझ असे ठेवण्यात आले. केंद्राने प्रायोजित केलेला कार्यक्रम असे स्वरूप असलेल्या या कार्यक्रमासाठी केंद्र व राज्य सरकर या दोहोंच्या सहकार्याने समान प्रमाणात खर्च केला जात होता. जादा लाभदायक रोजगारसंधी निर्माण करणे, टिकाऊ समाज मालमत्ता निर्माण करणे आणि ग्रामीण क्षेत्रातील राहणीमानाच्या दर्जात सुधारणा करणे ही या कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे होती. या कार्यक्रमामार्फत दरवर्षी सरासरीने ३००० ते ४००० लाख मानव दिवस अतिरिक्त रोजगार निर्माण करण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले होते. ही योजना १९८९ मध्ये बंद करून तिचे जवाहर रोजगार योजनेमध्ये विलीनीकरण करण्यात आले.

### २) ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी कार्यक्रम

(Rural Landless Employment Guarantee Programme- RLEGP)

हा कार्यक्रम १५ ऑगस्ट १९८३ रोजी सुरू करण्यात आला. ग्रामीण भागात व विशेषतः ग्रामीण भूमिहीन मजुरांसाठी जादा रोजगार निर्मिती करण्यसाठी हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली होती -

१) ग्रामीण भूमिहीनांसाठी रोजगारसंधीत वाढ करणे.

२) ग्रामीण अर्थव्यवस्थेत भक्कम पायाभूत सुविधांसाठी टिकाऊ मालमत्ता निर्माण करणे.

३) ग्रामीण भागातील राहणीमानाच्या दर्जात सुधारणा करणे.

१९८९ मध्ये ही योजना बंद करून तिचे जवाहर रोजगार योजनेत विलीनीकरण करण्यात आले.

### ३) प्रधानमंत्री रोजगार योजना

(Prime Minister's Rozgar Yojana PMRY)

ही योजना २ ऑक्टोबर १९९३ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेचे उद्दिष्ट सुशिक्षित बेकार युवकांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हे आहे. या योजनेखाली २० लाख युनिट सुरू झाले असून ३०.४ लाख नवीन रोजगारसंधी निर्माण झाल्या आहेत. १ एप्रिल १९९४ पासून संपूर्ण देशातील ग्रामीण व शहरी भागात ही योजना लागू करण्यात आली. वैयक्तिक पातळीवर १ लाख रुपये भांडवलाचा उद्योग प्रोत्साहीत करणे १८ ते ३५ वर्ष वयोगटडातील सुशिक्षित बेरोजगारास उद्योग उभारणीस मदत करणे, मागास महिलांना प्राधान्य देणे, वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यासाठी जामीनदारांची गरज नसणे, प्रशिक्षण देणे, ज्या तरुणांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ४०,००० रुपयांपेक्षा जास्त नसेल त्यालाच या योजनेचा लाभ घेता येतो इत्यादी या योजनेची वैशिष्ट्ये आहेत.

### ४) ग्रामीण रोजगार निर्मिती कार्यक्रम

(Rural Employment Generation Programme - REGP)

ग्रामीण भागात व लहान गावात स्वयंरोजगार संधी निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम १९९५ मध्ये सुरू करण्यात आला. हा कार्यक्रम खादी आणि ग्रामोद्योग आयोगाकडून राबविला जातो. या कार्यक्रमाखाली या आयोगाकडून मिळालेले काही साहाय्य व बँकेचे कर्ज याद्वारे उद्योजक ग्रामोद्योगाची उभारणी करू शकतात. हा कार्यक्रम सुरु झाल्यापासून ३१ मार्च २००४ पर्यंत १,८६,२५२ प्रकल्पास वित्तपुरवठा करण्यात आला असून २२.७५ लाख रोजगारसंधी निर्माण करण्यात आल्या आहेत.

### ५) स्वयंरोजगार हेतूने ग्रामीण युवक प्रशिक्षण कार्यक्रम

(Scheme of Training of Rural Youth for self Employment)

१५ ऑगस्ट १९७९ मध्ये केंद्र सरकारने ट्रायसेम कार्यक्रम सुरू केला. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश १८ ते ३५ वर्ष वयोगटातील ग्रामीण तरुणांना व्यवसायासंबंधी यांत्रिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे आणि प्रशिक्षित युवकांनी कृषी, औद्योगिक आणि व्यापार क्षेत्रात स्वयंरोजगाराच्या हेतूने उद्योग किंवा व्यवसाय सुरू करावा हा होता. प्रशिक्षण घेतलेल्या युवकांना एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत आर्थिक साहाय्य दिले जात होते. सातव्या योजनेच्या काळात १० लाख युवकांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यापैकी ४.६४ लाख युवकांना स्वयंरोजगार प्राप्त झाला आणि १.३१ लाख लोकांना नोकऱ्या मिळाल्या.

एप्रिल १९९९ मध्ये ट्रायसेम ही योजना सुवर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजनेत समाविष्ट करण्यात आली.

### ६) जवाहर रोजगार योजना (Jawahar Rozgar Yojana JRY)

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि ग्रामीण भूमीहीन कमी कार्यक्रम या दोहोंचे एकत्रिकरण

करून एप्रिल १९८९ मध्ये जवाहर रोजगार योजना सुरू करण्यात आली. ही योजना ग्रामपातळीवर पोहोचविण्याचा उद्देश होता.

**उद्दिष्टे**

१) ग्रामीण भागातील बेरोजगार आणि अल्परोजगारांना लाभकारी रोजगार पुरविणे.

२) ग्रामीण पायाभूत संरचना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणे व स्थायी स्वरूपाचा रोजगार निर्माण करणे.

३) सामुदायिक मालमत्तेची निर्मीती करणे

४) मजुरीचे दर वाढविण्यावर भर देणे

५) ग्रामीण भागातील जीवनमानात सुधारणा करणे

६) पुरक रोजगार निर्माण करणे.

७) ग्रामीण भागातील अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना प्रत्यक्ष व सतत लाभ मिळवून देणे.

ही योजना केंद्र आणि राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने चालविली जात होती. योजना खर्चापैकी ८०% केंद्राने आणि २०% राज्यांनी खर्च करावयाचा होता. या योजनेचे प्रशासन जिल्हा परिषद आणि ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत केले जात होते. प्रत्यक्ष कार्यवाही ग्रामपंचायतीमार्फत केली जात होती.

१९८९-९० ते १९९८-९९ या काळात योजनेसाठी केंद्र व राज्य सरकारने ३६८.३२ कोटी रु. निधी उपलब्ध करून दिला. त्यापैकी २८८९२.७१ काटी रु. निधी वापरण्यात आला. याच काळात ७३६४२.१९ लाख मानव दिवस रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट होते. या उद्दिष्टांपैकी ९७.६४% उद्दिष्ट गाठले गेले.

**७) जवाहर ग्राम समृद्धी योजना** (Jawahar Gram Samridhi Yojana - JGSY)

१९९९ मध्ये जवाहर रोजगार योजना बंद करून तिचे विलीनीकरण जवाहर ग्राम समृद्ध योजनेत करण्यात आले. ही योजना एप्रिल १९९९ पासून कार्यान्वित झाली.

**उद्दिष्टे**

१) मागणीवर आधारित ग्रामीण पायाभूत सुविधांची निर्मिती करणे.

२) ग्रामीण भागातील गरीबांना अधिकाधिक रोजगार संधी मिळवून देणे.

३) ग्रामीण भागातील बेरोजगारांना पूरक रोजगार निर्माण करणे.

या योजनेत अनुसूचित जाती जमातीच्या विकासावर विशेष भर देण्यात आला. योजनेच्या एकूण खर्चापैकी २२.५% खर्च यांच्या विकासासाठी करावयाचा असतो. योजनेसाठी केंद्राने ७५% व राज्यांनी २५% खर्च करण्याचे ठरले. या कार्यक्रमाची अंमलबजावणी ग्रामपंचायतीमार्फत केली जाते आणि कार्यक्रमावर जिल्हा ग्रामीण विकास

यंत्रणेचे नियंत्रण असते.

या योजनेमार्फत अनेक प्रकारची कामे करण्याचे ठरविण्यात आले. उदा. अनुसूचिती जाती-जमातीच्या वस्त्यामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करणे, सुवर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेसाठी पायाभूत संरचना निर्माण करणे, शिक्षण, आरोग्य, रस्ते यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणे इत्यादी तसेच अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना मिळालेला जमिनीचा विकास करणे, सामाजिक वनीकरण करणे, फळझाडांची लागवड करणे, विहिर खोदणे, कुपनलिका तयार करून देणे, मत्स्य संवर्धनासाठी तळ्यांची निर्मिती करण्याचेही ठरविण्यात आले.

तक्ता क्र. ३.२ योजनेची प्रगती

| वर्ष | शिल्लक निधी | तरतूद | वितरित निधी | एकूण उपलब्ध निधी | खर्च | उपलब्धपैकी खर्च % |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९९-२००० | ५५२.७१ | २२०५.५८ | २२४३.१६ | २७९५.८८ | २०३५.२७ | ७२.८० |
| २०००-२००१ | ६२४.२६ | २१९२.९६ | १०७९.४१ | १७०३.६७ | ७११.३५ | ४७.७५ |

**स्तोत्र : ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, वार्षिक अहवाल, २००१-०२ पृष्ठ क्र. १२**

१९९९-२००० पेक्षा २०००-२००१ या वर्षासाठी निधी तरतूद कमी केलेली आढळते. उपलब्ध निधीपैकी १९९९-२००० मध्ये ७२.८०% खर्च झाला तर २०००-२००१ मध्ये ४१.७५% निधी खर्च झाला.

या योजनेअंतर्गत १९९९-२००० मध्ये २६८३.०८ लाख मानव दिवस रोजगार निर्मिती झाली तर २०००-२००१ मध्ये ८८५.१२ लाख मानव दिवस रोजगार निर्मिती झाली.

ही योजना सप्टेंबर २००१ मध्ये बंद करण्यात आले तिचे संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेत विलीनीकरण करण्यात आले.

## ८) रोजगार आश्वासन योजना (Employment Assurance Scheme)

भारतात महाराष्ट्र राज्याच्या रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर २ ऑक्टोबर १९९३ मध्ये २३ राज्यातील २६१ जिल्ह्यातील १७७८ पंचायत समिती गटांमध्ये रोजगार आश्वासन योजना सुरू करण्यात आली. १९९७-९८ मध्ये या योजनेचा ५४४८ पंचायत समिती गटामध्ये विस्तार करण्यात आला. १ एप्रिल १९९९ मध्ये या योजनेचे पुनर्गठन करण्यात आले.

### उद्दिष्टे

१) रोजगार माध्यमातून ग्रामीण दारिद्र्य दूर करणे

२) हंगामी बेरोजगारी दूर करण्यासाठी ग्रामीण भागात मजुरांना ते ज्या भागात राहतात त्या भागातच वर्षातून किमान १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देणे.

३) टिकाऊ सामुदायिक, सामाजिक आणि आर्थिक मालमत्ता निर्माण करून भविष्यात आणखी जास्त रोजगार संधी निर्माण करणे.

ह्या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील १८ ते ६० वर्ष वयोगटातील स्त्री पुरुषांना गरजेनुसार रोजगार उपलब्ध करून दिला जातो. एका कुटुंबातील जास्तीत जास्त २ लोकांना रोजगार पुरविला जातो.

या योजनेवर १९९३ ते २००१ पर्यंत १४३८४ कोटी रु. खर्च करण्यात आले. या योजनेत एका व्यक्तीला एका वर्षात १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन होते. पण प्रत्यक्षात खूप कमी दिवस रोजगार उपलब्ध झाला.

**९) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना**

(Sampoorna Grameen Rozgar Yojana- SGRY)

जवाहर ग्राम समृद्धी योजना आणि रोजगार आश्वासन योजना या चालू असलेल्या योजना एकत्रित करून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना २५ सप्टेंबर २००१ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेचे उद्दिष्ट अतिरिक्त वेतन रोजगार निर्माण करण्याबरोबरच अन्न सुरक्षा, ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास हे आहे. ही योजना ज्यांना वेतन रोजगाराची गरज आहे आणि जे अंगमेहनतीचे व अकुशल काम करू इच्छितात अशा खेड्यातील गरीबांसाठी आहे. पंचायत राज संस्थांमार्फत या योजनेची अंमलबजावणी केली जाते.

या योजनेत स्त्रिया अनुसचित जाती, जमाती आणि धोकादायक व्यवसायातून बाहेर काढलेल्या मुलांच्या पालकांवर विशेष भर देण्यात आला आहे. या योजनेवरील वार्षिक खर्च १०,००० कोटी रुपये असून यात ५००० कोटी रुपयाचे अन्नधान्य समाविष्ट आहे. या योजनेद्वारे प्रत्येक वर्षी १०० कोटी श्रमदिन एवढा वेतन रोजगार पुरविण्याचा विचार केलेला आहे.

ही योजना केंद्राने प्रायोजित केलेली असून, केंद्र व राज्य यांच्याकडून ७५.२५ या प्रमाणात योजनेवरील खर्च केला जातो. केंद्रशासित प्रदेशांच्या बाबतीत १००% खर्च केंद्र सरकार करते.

२००५-०६ या वर्षात ५,४९७.४३ कोटी रुपये रोख रकमेचा भाग म्हणून आणि ३७.३० लाख टन अन्नधान्य राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आले. राज्ये केंद्रशासित प्रदेशांनी दिलेल्या अहवालानुसार ८२.१८ कोटी श्रमदिन एवढा रोजगार निर्माण करण्यात आला.

**१०) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना**

(Swarnjayanti Gram Swarozar Yojana)

ग्रामीण भागातील गरिबांच्या स्वयंरोजगारासाठीचा एकात्मिक कार्यक्रम म्हणून स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना १ एप्रिल १९९९ मध्ये सुरू करण्यात आली. ग्रामीण भागात राहाणाऱ्या गरीब लोकांसाठी स्व-रोजगार निर्माण करणारी ही एक व्यापक योजना आहे. या योजनेत पूर्वी चालू असलेल्या एकात्मिक ग्रामीण विकास योजना (IRDP), स्वरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण कार्यक्रम (TRYSEM), ग्रामक्षेत्र महिला आणि बालविकास कार्यक्रम (DIJCRA) , दशलक्ष विहीर योजना (MWS), गंगा

कल्याण योजना (GKY) या सर्व योजना बंद करून त्यांचे विलीनीकरण करण्यात आले. ग्रामीण भागातील समाजाला पूर्णतः स्वयंपूर्ण करणे, ग्रामीण लोकांना स्वावलंबी करण्यासाठी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लघु उद्योगांची स्थापना करून गरीबांसाठी पर्याप्त उत्पन्नातील व्यवस्था करण्यावर भर दिला आहे. या योजनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे ग्रामीण लोकांना या योजनेतून स्वयंरोजगारी करणे, दारिद्र्य निर्मूलनासाठी सामुहिक प्रयत्न करणे,बँकाकडून मिळणाऱ्या कर्जाच्या सुविधांचा भांडवली करणासाठीझी वापर करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. या योजनेसाठी केंद्राकडून ७५% व राज्याकडून २५% निधी उपलब्ध करून दिला जातो.

या योजनेमार्फत स्वयंरोजगारासाठी पोषक वातावरण निर्माण केले जाते. गरीबांन संघटीत करण्यासाठी स्वयंसहाय्यता गटाची निर्मीती केली जाते. गटातील लोक एकमेकांना सहाय्य करून दारिद्र्य रेषेच्यावर येण्याचा प्रयत्न करतात.

### ११) स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना

(Swarna Jayanti Shahari Rozgar Yojana-SJSRY)

ही योजना डिसेंबर १९९७ मध्ये सुरू करण्यात आली. नेहरु रोजगार योजना, शहरी मूलभूत सेवा कार्यक्रम योजनांचे एकत्रिकरण करून स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना चालू करण्यात आली. लघुद्योग स्थापन करून स्वयंरोजगारासाठी तरुणांना प्रेरित करणे, बेरोजगार व अल्प रोजगार तरुणांना वेतन रोजगार संधी उपलब्ध करून देणे, सुशिक्षित गरिब तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. या योजनेत तरुणांना प्रकल्प खर्चाच्या १५% रक्कम अनुदान म्हणून दिली जाते. या योजनेत शहरी भागातील गरीब, महिलांचे आर्थिक सामर्थ्य वाढविण्यासाठी महिला व बालविकास कार्यक्रम चालू करण्यात आला. या कार्यक्रमात १० शहरी गरीब महिला सामुहिक पातळीवर उपक्रम सुरू करू शकतात. यात महिलांना ५० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्याची तरतूद आहे.

## ३.२.५.५ राष्ट्रीय रोजगार हमी कार्यक्रम/ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

(National employme, Guarantee Programme)

भारतात ज्या गतीने लोकसंख्येत वाढ होत आहे आणि त्यातून श्रमशक्ती आणि कार्यकारी श्रमशक्तीत ज्या गतीने वाढ होत आहे, त्या गतीने रोजगार संधीत वाढ न झाल्याने बेरोजगारीची संख्या आणि प्रमाण वाढत आहे. बेरोजगारीतून दारिद्र्य व उपासमार जन्माला येते. ग्रामीण बेरोजगारी व उपासमार व गरीबी यातून सुटका व्हावी या हेतुने पंतप्रधान मा. डॉ. मनमोहनसिंग यांनी २ फेब्रुवारी २००६ रोजी या योजनेचा शुभारंभ केला. डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारने सप्टेंबर २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा संमत केला. या कायद्यानुसार रोजगाराचा मूलभुत हक्क मान्य करण्यात आला. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सर्व प्रथम आंध्रप्रदेशातील अनन्तपूर जिल्ह्यात सुरू करण्यात आली. पहिल्या चरणात २००६-०७ मध्ये ही योजना देशातील २७ राज्यातील २०० निवडक जिल्ह्यात सुरू करण्यात आली. यापैकी १५० जिल्ह्यात कामाचया बदल्यात धान्य (Food for work) ही योजना चालू होती. कामाच्या बदल्यात धान्य योजना व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना या दोन्ही योजनांचे विलीनीकरण राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत करण्यात आले.

निवडक २०० जिल्ह्यात बिहार मधील सर्वाधिक २३ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. मात्र गोव्यातील एक ही जिल्हा समाविष्ट करण्यात आला नाही.

२००७-०८ मध्ये योजनेचे दुसरे चरण सुरू झाले. यात योजनेचा आणखी ३० जिल्ह्यांमध्ये विस्तार करण्यात आला. आज देशातील ३३० जिल्ह्यांमध्ये ही योजना सुरू आहे. २००८-०९ पर्यंत ही योजना संपूर्ण देशात लागू करण्यात येईल अशी घोषणा मा. पंतप्रधान यांनी सप्टेंबर २००७ मध्ये केली होती. प्रत्यक्षात १ एप्रिल २००८ मध्ये ही योजना संपूर्ण देशात लागू करण्यात आली.

**योजनेची वैशिष्ट्ये**

१) ग्रामीण भागातील गरजू कुटुंबातील किमान एका सदस्याला वर्षातून कमीत कमी १०० दिवस रोजगार मिळणार अशी हमी देण्यात आली.

२) ग्रामीण शेतमजुरांना जी किमान मजुरी म्हणजे ६० रु प्रति दिवस ठरवून देण्यात आली तेवढी मजुरी योजनेच्या कामावर काम करणाऱ्या मजुरास मिळणार. २०११-१२ मध्ये हा मजुरी दर १२० रु. पर्यंत वाढविण्यात आला आहे.

३) योजनेतील उद्दिष्टानुसार किमान ३३% महिलांना रोजगार मिळेल.

४) मजुरान नोंदणी केल्यानंतर जास्तीत जास्त १५ दिवसाच्या आत रोजगार मिळणार, जर रोजगार मिळाला नाही तर मजुराला बेरोजगारी भत्ता देण्यात येईल.

५) योजनेअंतर्गत जल संधारण, दुष्काळग्रस्त भागाचा विकास, भूविकास, पुर नियंत्रण, रस्ते इत्यादी विकासात्मक कामे हाती घेऊन उत्पादक सामाजिक व सामुहिक मालमत्तेची निर्मिती करण्यात येणार आहे.

६) भारतातील रोजगार निर्मिती इतर योजनांपेक्षा ही योजना वेगळी आहे कारण या योजनेत रोजगाराची हमी कायद्यानुसार देण्यात आली आहे.

केंद्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (National Employement Guarantee Act- NREGA (नरेगा) चे नाव अधिनियम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act - MNREGA (मनरेगा) असे नवीन नाव बदलले आहे. या नामकरणाची घोषणा २ ऑक्टोबर २००९ या महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी करण्यात आली. डिसेंबर २००९ मध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहांनी या विधेयकास मान्यता दिली. त्यामुळे नरेगा ऐवजी मनरेगा (NREGA-MNREGA) असा योजनेच्या नावात बदल करण्यात आला.

मनरेगा अंतर्गत १९ जानेवारी २०१२ पर्यंत ३.८० कोटी कुटुंबांना रोजगार प्राप्त झाला. १२२.३७ कोटी श्रमदिवस रोजगार निर्मिती झाली. त्यापैकी ६०.४५ कोटी महिलांना रोजगार प्राप्त झाला. ही योजना सर्व राज्यांमध्ये प्रभावी करण्याचा सरकारचा उद्देश आहे. राज्य रोजगार हमी कोश निर्माण करण्याचे सरकारने ठरविले आहे. २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात ३३००० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील टीका –

भारतात २००५ मध्ये राष्ट्रीय रोजगार हमी कायदा संमत करण्यात आला. त्यामुळे काम मागणाऱ्यांना रोजगाराची कायद्यानुसार हमी मिळाली आहे. रोजगार हमी योजना फेब्रुवारी २००६ पासून सुरू झाली. या योजनेवर पुढील टीका करण्यात आली –

१) योजनेत काम मिळविण्यासाठी अनेक अटी असल्याने योजनेची उपयुक्तता कमी होईल.

२) योजना लागू करण्याचा खर्च प्रचंड असल्याने त्याचा अर्थव्यवस्थेवर अतिरिक्त भार पडेल.

३) योजनेच्या अंमलबजावणीसाठी पूर्ण वेळ कार्यक्रम अधिकाऱ्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. पण प्रत्यक्षात अशी नेमणूक अनेक राज्या करण्यात आली नाही.

४) या योजनेअंतर्गत मजुरांना रोजगार पत्र प्राप्त करण्यासाठी सरपंच व सरकारी अधिकाऱ्यांना लाच द्यावी लागते. योजनेद्वारे जी कामे हाती घेतली जातात त्यात वापरले जाणारे साहित्य कमी दर्जाचे असल्याने कामाचा दर्जा निकृष्ट आहे. लाभार्थींची खोटी हजेरी लावून पैसा मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

या योजनेवर वरील टिका केल्या जात असली तरी दारिद्र्य व बेरोजगारी दुर करण्यासाठी केंद्र सरकारची ही चांगली योजना आहे. त्यातून ग्रामीण विकासाला चालना मिळेल, फक्त योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

### ३.२.५.६ उदारीकरणाचा रोजगारावरील परिणाम
### (Impact of Liberalisation on Employment)

भारताने १९९१ पासून नवे आर्थिक धोरण स्वीकारले. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या आर्थिक सुधारणा कार्यक्रमांतर्गत अनेक धोरणे व योजना भारतात राबविल्या जात आहेत. उदारीकरणाचा स्वीकार केल्यानंतर देशातील सरकारी खर्चात घट केली जाते, अर्थव्यवस्थेचा व्यापार व विदेशी गुंतवणूक खुली केली जाते, बाजाराचे विनियंत्रण केले जाते, किंमतीवरील नियंत्रण कमी केले जाते. अशा या बदलाचा अर्थव्यवस्थेवर वेगवेगळा परिणाम होतो.

उदारीकरणाच्या धोरणामुळे देशाचा विकास झाला की नाही यावर वेगवेगळे मत प्रवाह आहेत. फायद्यापेक्ष तोटाच अधिक झाला असा दावा करणारा समाजात मोठा वर्ग आहे. उदारीकरणाच्या धोरणातून खाजगीकरण विविध क्षेत्रामध्ये झपाट्याने झाले. रस्ते, वीज, पायाभूत सुविधा क्षेत्रामध्ये खाजगीकरणाला जास्तीत जास्त वाव देण्यावर सरकारचाही भर राहिला. अर्थात प्रत्येक गोष्टीचे फायदे तोटे असतातच तसेच उदारीकरणाच्या बाबतीत झाले. उदारीकरणाचा सामान्य जनतेला कमी आणि ठेकेदारांनाच जास्त फायदा झाला असल्याचे दिसून येते.

उदारीकरणाचा भारतातील रोजगारावर काय परिणाम झाला हे आपणास अभ्यासावयाचे आहे. विद्यार्थी मित्रांनो आर्थिक वृद्धीत वाढ होणे याचाच अर्थ रोजगार पातळीत वाढ होत जाणे होय. भारताच्या बाबतीत १९९० पूर्वी व १९९० नंतरच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते कारण १९९० पूर्वी भारतीय अर्थव्यवस्था नियंत्रणामध्ये होती तर १९९० नंतर हळूहळू नियंत्रणमुक्त होत गेली. अर्थव्यवस्थेत कृषीक्षेत्र,

उद्योगक्षेत्र, सेवा क्षेत्र यांच्या रोजगारात होणारे बदल तसेच सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्रातील रोजगारात होणारे बदल आपल्याला माहित करून घ्यावयाचे आहेत.

१९८३ ते ९३ या कालखंडात शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात रोजगार अनुक्रमे ५०.५%, १९.३% व ३०.२% असा बदल झाला. १९९० ते २००० या कालखंडात हा बदल २३.६%,५०.४% व ७३.२% असा झालेला दिसून येतो. शेती क्षेत्रातील रोजगार कमी झाला तर उद्योग व सेवा क्षेत्रातील रोजगारात वाढ झाल्याचे दिसून येते.

स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाढ आणि रोजगाराचा जवळचा संबंध असतो. जेव्हा अर्थव्यवस्थेतील गुंतवणूकीत वाढ होते. तेव्हा उत्पादनान वाढ करण्यासाठी घटकाच्या मागणीत वाढ होते. त्यातून रोजगर निर्मितीत वाढ होते. देशात जसजशी रोजगारनिर्मिती वाढत जाते तसतसे बेरोजगारीचे प्रमाण कमी होते. बेरोजगारी व अर्ध बेरोजगारी कमी झाली की दारिद्र्याचे प्रमाणही कमी होऊ लागते.

भारतात १९८३ मध्ये संघटीत आणि असंघटीत अशा दोन्ही क्षेत्रात ३०२६ लाख लोकांना रोजगार मिळाला होता. १९९०-९१ मध्ये ही संख्या ३५६७.६ लाखापर्यंत वाढली म्हणजे १९८३ ते १९९०-९१ या काळात रोजगार संख्येत ५४१.६ लाखांनी वाढ झाली. या कालावधीत दरवर्षी सरासरीने २.३९% नी वाढ झाली. या कालावधीत श्रमशक्तीत ज्या दराने वाढ झाली त्या दराने रोजगारात वाढ झाल्याने बेरोजगारी नगण्य होती.

१९९७-९८ मध्ये ३८२८.५ लाख लोकांना रोजगार मिळाला म्हणजे १९९०-९१ मध्ये प्राप्त झालेल्या रोजगारापेक्षा २६०.९ लाखांनी वाढ झाली. १९९०-९१ ते १९९७-९८ या काळात रोजगारात फक्त १% नी वाढ झाली. याचा अर्थ असा की आर्थिक सुधारणा काळातील रोजगार वाढीच्या दरापेक्षा आर्थिक सुधारणा पूर्व काळातील रोजगार वाढीचा दर जास्त होता. आर्थिक सुधारणा काळात रोजगारात पुरेशी वाढ न झाल्याने दारिद्र्याचे प्रमाण कमी होण्याचा वेग मंदावला.

भारतात आर्थिक सुधारणांचा सर्वात जास्त लाभ संघटीत क्षेत्राला पोहचत आहेत. संघटीत क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र या दोहोंचा समावेश होतो. १९८३ ते १९९४ या काळात सार्वजनिक क्षेत्रातील संघटीत क्षेत्रात दरवर्षी सरासरीने १.५३% या दराने रोजगारात वाढ झाली तर खाजगी क्षेत्रात ०.४४% नी वाढ झाली. या काळात संघटीत क्षेत्रात १.२०% या दराने रोजगारात वाढ झाली. १९९४ ते २००४ या आर्थिक सुधारणा काळात सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार वाढीचा दर नकारात्मक झाला (-०.८०%) मात्र खाजगी क्षेत्रातील दरात ०.४४% वरून ६.६१% पर्यंत वढ झाली. २००४-०५ ते २००९-१० या कालखंडात ०.४९% एवढी कामगारांच्या पुरवठ्यात वृद्धी झाली. तर ०.८२% प्रत्यक्षात रोजगार वृद्धीत वाढ झाली. सार्वजनिक क्षेत्रात अपेक्षेप्रमाणे वृद्धी न होता घटच झाली. खाजगी क्षेत्राने मात्र रोजगार वृद्धीत भरीव कामगिरी केले. ३.५८% एवढी अधिक रोजगार वृद्धी नोंदविली गेली.

१९९४ ते २००४ या काळात जो आर्थिक विकास झाला त्याला रोजगार विहीन विकास (गेल श्रर्शीी ॡींह) म्हटले जात आहे. १९९९-२००० मध्ये बेरोजगारी वाढीचा दर ७.३% होता तो २००४-०५ मध्ये ८.३% पर्यंत वाढला.

आर्थिक सुधारणा काळात कामगारांचा संपाचा अधिकार कमी झाला त्यामुळे वाया जाणारे श्रम दिवसाचे प्रमाण कमी झाले.

| श्रम | संपामुळे वाया जाणारे श्रमदिवस (लाखात) |
|---|---|
| १९८१-९० | २१६.४ लाख |
| १९९९-२००० | ९१.६ लाख |
| २००१-२००६ | ३९.६ लाख |

कामगारांच्या संपाचा अधिकार कमी झाला असला तरी मालकांना मात्र आर्थिक सुधारणा काळात स्वायत्तता प्राप्त झाली त्यामुमे मालकांचे टाळेबंदी करण्याचे प्रमाण वाढून वाया जाणारे श्रमादिवसाचे प्रमाण वाढणे

| वर्ष | टाळेबंदीमुळे वाया जाणारे श्रमदिवस |
|---|---|
| १९८१-९० | ४६.२% |
| १९९१-२००० | ६०.२% |
| २००१-०६ | ७४.५% |

मालकांनी केलेल्या टाळेबंदीमुळे वाया गेलेल्या श्रमदिवसांचे प्रमाण वाढलेले दिसून येते. तसेच आर्थिक सुधारणा काळात मालकवर्गाकडून सक्तीची सुट्टी, कारखाना बंद करणे, उद्योगाचे इतर उद्योगात विलीनीकरण, अभिग्रहण (Takeover) इत्यादीमुळे मोठ्या प्रमाणावर कामगार कपान करण्यात आली, वेतन दरात कपात करण्यात आली, कामगारांना स्वेच्छानिवृत्ती देण्यात आली. तसेच श्रमिकांना करार पद्धतीचा (Contract System) रोजगार मिळू लागला, या पद्धतीत रोजगाराची हमी नसते, सेवा सातत्याची हमी नसते, कामाचे तास जास्त असते, मजुरी दर कमी असतो. कामगारांना कोणतीही सामाजिक व आर्थिक सुरक्षितता नसते. अशा प्रकारे उदारीकरणाच्या धोरणामुमे रोजगारावर प्रतिकुल परिणामच जास्त झालेला दिसून येतो.

## ३.२.५.७ स्वयं सहाय्यता बचत गटांची भूमिका (Role of Self Help Groups)

भारत सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी व बेकारी दूर करण्यासाठी अनेक योजना कार्यान्वीत केल्या तरीही बेकारी व दारिद्र्य हटले नाही. लोकांची बँकेची कर्जे फिटली नाहीत. बहुसंख्य लोकांचे जीवनमान सुधारले नाही. म्हणून लोकांनी, लोकांसाटी व लोकांसमवेत काम करण्याची गरज निर्माण झाली होती याच दरम्यान गावातील स्त्रीयांना अडीअडचणी पैसा मिळावा व त्यांचे प्रश्न सुटावेत यासाठी महिला एकत्र येऊ लागल्या. त्यांच्यातील सचोटी व सातत्य पाहून स्वयंसहाय्यता बचत गटाच्या अभियानाला एका दृष्टीकोनातून दारिद्र्य निर्मूलनाचा प्रभावी कार्यक्रम म्हणून दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमात स्वयंसहाय्यता बचत गट ही संकल्पना आज चांगलीच नावारूपाला आली आहे. सामान्यपणे दोन दशकापासून स्वयंसहाय्यता बचत गट अस्तित्वात आले आहेत. बचत गटांमुळे दारिद्र्य निर्मूलनास मदत होते हे आज सर्वमान्य झाले आहे. त्यामुळे स्वयंसहाय्य बचत गट ही आज एक चळवळ बनली आहे.

दारिद्र्य निर्मूलनासाठी व रोजगार वाढीसाठी शासकीय नियोजनात वित्तपुरवठ्याला प्राधान्य दिले जाते यादृष्टीने भारत शासनाने, अनेक धोरणात्मक उपाय केले. १९६९ मध्ये १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. १९८० मध्ये ६ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. राष्ट्रीयी करणातून ग्रामीण भागात अग्रक्रम क्षेत्राला कर्ज पुरवठा करण्याचे धोरण स्वीकारले. १९८२ मध्ये नाबार्डची स्थापना करण्यात आली. १९७५ मध्ये क्षेत्रिय ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. मात्र बँकांचा हा रचनात्मक बदल गरीबांच्या गरजा भागविणारा ठरला नाही. म्हणून सुक्ष्मवित्त पुरवठा (Micro Finance) हा दारिद्र्य निर्मूलनाचा प्रभावी मार्ग स्वीकारण्यात आला. ग्रामीण वित्तपुरवठ्याचा प्रभावी मार्ग स्वीकारण्यात आला. ग्रामीण वित्तपुरवठ्याचा नवा मंत्र म्हणून सुक्ष्मवित पुरवठ्याला महत्त्व प्राप्त झाले.

बचत गट या संकल्पनेस स्वयंसहाय्यता समूह, महिला बचतगट, शेजार गट Self Help Group (SHG) या नावाने ही ओळखले जाते.

सर्वार्थाने साधर्म्य असणाऱ्या सभासदांनी स्वेच्छेने एकत्र येऊन सर्वांगीण उन्नतीसाठी बनविलेला व चालविलेला समूह म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट होय. व चालविलेला समूह म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट होय.

एकाच वाडी वस्तीतील, एकाच सामाजिक आर्थिक स्तरावरील समविचारी समान गरजा असणाऱ्या १० ते २० महिलांनी स्वेच्छेने एकत्रित येऊन स्वतःच्या उन्नतीकरीता ठराविक बचतीच्या माध्यमातून एकमेकांचे प्रश्न सोडविण्यासाठी केलेल सामूहिक प्रयत्न म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट होय.

भारतात १९९२ मध्ये नाबार्डने ५०० स्वयं सहाय्यता बचत गटांना बँकेशी जोडण्याचा पथदर्शक प्रकल्प सुरू केला. रिझर्व्ह बँकेने बचत गटांना बँकेशी संलग्न करण्यास मान्यता दिली. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अंदाजपत्रकात बचत गटांवर भर दिला. भारतात गुजरातमधील सेवा, कर्नाटकातील माथराडा, महाराष्ट्रत चैतन्य या संस्था बचतगट चळवळीत महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फतही बचत गट चळवळ विकसित होत आहे. बांगला देशात डॉ. महम्मद युनूस यांनी १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात ही योजना सुरू करून लक्षावधी नागरिकांच्या जीवनात अमूलाग्र परिवर्तन घडवलं या कार्याबद्दल त्यांना २००६ मध्ये शांतता नोबेल पारितोषिकांन सन्मानित करण्यात आलं.

बचत गट योजनेत कमी उत्पन्न गटातील महिला लहान प्रमाणावरील बचती गोळा करतात व गटातील सदस्यांच्या आर्थिक गरजा सोडविण्यास कर्ज रुपाने मदत करतात. भारतात बँकांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. मात्र या बँका कर्ज देताना तारणाचा स्वीकार करतात. गरीबांना तारण देणे शक्य नसते. त्यामुळे त्यांना बँकांकडून कर्ज मिळू शकत नाही. यावर रामबाण उपाय म्हणून स्वयंसहाय्यता बचत गट ही योजना आहे.

**स्वयंसहाय्यता बचत गटाचे फायदे –**

१) ग्रामीण भागातील लोकांना बचतीची सवय लागते.

२) महिलांचे आर्थिक, सामाजिक व मानसिक सबलीकरण होते.

३) स्वयंसहाय्यता गटामुळे महिलांचा कौटुंबिक दर्जा उंचावतो.

४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सावकारी कर्जातून मुक्तता मिळते.

५) बचत गटाद्वारे दुर्बल घटकांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यातील उद्योजकता वाढण्यास मदत होते.

६) ग्रामीण लोकांना त्यांच्या आर्थिक अडचणीच्या काळात कर्ज मिळते.

७) कर्जदार बचत गटाच्या माध्यमातून घेतलेल्या कर्जाची वेळेवर व्याजासह कर्जफेड करतात त्यामुळे बँकाच्या कर्जाची वेळेवर वसूली होते.

८) ग्रामीण भागातील लोकांना बँकींग व्यवहाराची माहिती मिळते.

९) लोकांचा ग्रामविकासातील सहभाग वाढण्यास मदत होते.

१०) बचत गटामार्फत लहान प्रमाणावरील व्यवसाय करणे शक्य होते. त्यामुमे स्वयंरोजगारी व रोजगारी वाढते.

११) बचत गटांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध होते. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढते, व राहणीमान उंचावण्यास मदत होते.

१२) महिलांचा आत्मविश्वास व निर्णय क्षमता वाढून त्या स्वावलंबी होत आहेत.

भारतात २००८-०९ पर्यंत ६२,६२,३८१ बँक संलग्नीत महिला बचत गट स्थापन झाले. या बचत गटांनी प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी बँका यांच्या सहकार्याने बचत गट चळवळ यशस्वी होत आहे.

## ३.३ स्वयंअध्ययन प्रश्न

**अ) दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१) दारिद्र्य या संकल्पनेची व्याख्या लिहा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) सापेक्ष दारिद्र्य म्हणजे काय.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) निरपेक्ष दारिद्र्य या संकल्पनेचा अर्थ लिहा.

..........................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

४) बेरोजगारी म्हणजे काय?

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

५) प्रच्छन्न बेकारीचा अर्थ लिहा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

६) घर्षणजन्य बेकारीचा अर्थ लिहा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

७) संरचनात्मक बेकारीचा अर्थ लिहा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

८) स्वयंसहाय्यता बचत गट म्हणजे काय?

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

९) राष्ट्रीय रोजगार हमी कार्यक्रमाची दोन वैशिष्ट्ये लिहा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

**ब) टिपा लिहा.**

१) दारिद्र्याच्या संकल्पना

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) भारतातील दारिद्र्याचा अंदाज

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) नरेगा/मनरेगा/राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४) उदारीकरणाचा रोजगारावरील परिणाम

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५) स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका/ महत्त्व.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**क) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) भारतातील दारिद्र्याची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) भारतातील दारिद्र्य निर्मूलनासाठी शासनाने कोणत्या योजना राबविल्या? स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) बेकारी म्हणजे काय? बेकारीचे विविध प्रकार विशद करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४) भारतातील बेरोजगारीची कारणे स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५) भारतातील बेरोजगारी कमी करण्यासाठी कोणकोणत्या उपाययाजना करण्यात आल्या? स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## ३.४ सारांश

### दारिद्र्य - अर्थ

ज्या अवस्थेत समाजातील काही घटकांना अन्न, वस्त्र, निवारा शिक्षण व आरोग्य यांसारख्या जीवनावश्यक वस्तू मिळणे अशक्य असते अशी अवस्था म्हणजे दारिद्र्य होय? दारिद्र्याच्या संकल्पना

### १) सापेक्ष दारिद्र्य

उच्चतम उत्पन्न गटातील लोकसंख्येची तुलना करता सर्वात खालच्या उत्पन्न गटातील लोक दारिद्र्यात आहेत असे मानले जाते तेव्हा त्यास सापेक्ष दारिद्र्य म्हणतात.

### २) निरपेक्ष दारिद्र्य

ज्या व्यक्तीस आपल्या प्राप्त उत्पन्नातून किमान गरजा भागविणे ही शक्य नसते त्यास निरपेक्ष दारिद्र्य म्हणतात. भारतातील दारिद्र्याची कारणे -

१) आर्थिक विकासाचा मंद वेग

२) आर्थिक विषमता

३) दरडोई उत्पन्न कमी

४) लोकसंख्या वाढीचा उच्च दर
५) जीवनवश्यक वस्तूंची अल्प उपलब्धता
६) चलनवाढ
७) तंत्रज्ञानाची अल्प पातळी
८) बेकारी
९) शेतजमिनीच्या वाटपात विषमता
१०) शेतीची अल्प उत्पादकता
११) शिक्षणाचे कमी प्रमाण
१२) दारिद्र्याचे दुष्टचक्र
१३) हरितक्रांतीचा परिणाम
१४) दारिद्र्य निर्मूलनाच्या योजनांचा प्रभाव कमी
१५) सामाजिक कारणे

ग्रामीण व शहरी दारिद्र्याचे अंदाज -

| | | |
|---|---|---|
| १) श्री. पी. डी. ओझा (१९६७-६८) | ग्रामीण दारिद्र्य | ५१.६% |
| २) दांडेकर आणि रथ (१९६९-७०) | एकूण दारिद्र्य | ४१% |
| ३) श्री. मिन्हास १९६७-६८ | एकूण दारिद्र्य | ५०.६% |
| ४) डॉ. पी. के. वर्धन १९७३ | दारिद्र्य | ४१% |
| ५) अहलुवालीया समिती (१९७७-७८) | ग्रामीण दारिद्र्य | ४६.१% |
| ६) सातवा वित्त आयोग (१९७८) | दारिद्र्य | ५२% |
| ७) जागतिक बँक (१९८९) | दारिद्र्य | ३६.६% |
| ८) नियोजन मंडळ तज्ज्ञ समिती (१९९३) | दारिद्र्य | ३२.००% |
| ९) भारत विकास अहवाल (२००२) | | २६.१% |
| १०) २००४-०५ गणना (तेंडुलकर निकष) | | ३७.२% |
| ११) २००९-१० गणना (तेंडुलकर निकष) | | २९.४% |

**दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम**

१) लहान शेतकरी विकास एजन्सी (SFDA)
२) सीमांत शेतकरी व शेतमजूरी विकास एजन्सी (MFAL)
३) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP)
४) दुष्काळपीडित क्षेत्र कार्यक्रम (DPAP)
५) किमान गरजा कार्यक्रम (MNP)
६) वीस कलमी आर्थिक कार्यक्रम
७) निर्जन प्रदेश विकास कार्यक्रम (DDP)

८) खेडे विकास कार्यक्रम (VDP)

९) ग्रामीण भागातील स्त्री व बाल विकासासाठीचा कार्यक्रम

१०) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना

११) इंदिरा आवास योजना

१२) पत सह अर्थसाहाय्य योजना

१३) समग्र आवास योजना

१४) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (PMGSY)

१५) अंत्योदय अन्न योजना

१६) भारत निर्माण योजना

**बेरोजगारी** (Unemployment)

व्याख्या – प्रचलित वेतन दरावर कामगार किंवा बौद्धिक श्रम करण्यास तयार असतात. परंतु कामाच्या संधी मिळत नाहीत किंवा रोजगार मिळण्यात असमर्थ ठरतात अशा कामगारांना बेरोजगार संबोधले जाते.

**बेकारीचे प्रकार**

१) अनैच्छिक बेकारी

२) संघर्षजन्य बेकारी

३) संरचनात्मक बेकारी

४) अर्थ बेकारी

५) छुपी बेकारी

६) खुली बेकारी

७) सुशिक्षितांची बेकारी

८) हंगामी बेकारी

९) शहरी बेकारी

१०) ग्रामीण बेकारी

**भारतातील बेरोजगारीची कारणे**

१) दारिद्र्य

२) अतिरिक्त लोकसंख्या

३) अर्थव्यवस्थेचा वृद्धीचा कमी वेग

४) मागासलेली शेती

५) औद्योगिकीकरणाचा अल्पवेग

६) उद्योगातील अतिरिक्त क्षमतेचे अस्तित्व

७) भांडवलप्रधान तंत्रावरील भर

८) सदोष शिक्षण व्यवस्था

९) सरकारचे औद्योगिक धोरण

१०) राष्ट्रीय रोजगार धोरणाचा अभाव.

**भारतातील बेकारी कमी करण्यसाठी अमलात आणलेल्या उपाय योजना –**

१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP)

२) ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी कार्यक्रम (RLEGP)

३) प्रधानमंत्री रोजगार योजना (PMRY)

४) ग्रामीण रोजगार निर्मिती कार्यक्रम (REGP)

५) स्वयंरोजगार हेतूने ग्रामीण युवक प्रशिक्षण कार्यक्रम (TRYSEM)

६) जवाहर रोजगार योजना (JRY)

७) जवाहर ग्राम समृद्धी योजना (JGSY)

८) रोजगार आश्वासन योजन (EAS)

९) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (SGRY)

१०) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY)

११) स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (SJSRY)

**राष्ट्रीय रोजगार हमी कार्यक्रम**

(National Employment Guarantee Programme)

७ सप्टेंबर २००५ रोजी NREGA कायदा संमत

२ फेब्रुवारी २००६ पासून योजना सुरू

२ ऑक्टोबर २००९ रोजी योजनेला म. गांधीजींचे नाव देण्यात आले. (मनरेगा)

**वैशिष्ट्ये**

१) वर्षभरात १०० दिवसाचा रोजगार दिला जातो.

२) नोंदणी करणाऱ्यास एक जॉब कार्ड दिले जाते.

३) १५ दिवसाच्या आत व ५ कि.मी. अंतराच्या आत काम दिले जाते.

४) सुरूवातीला २०० जिल्ह्यात योजना सुरू.

५) १ एप्रिल २००८ पासून देशभरात योजना लागू.

**उदारीकरणाचा रोजगारावरील परिणाम**

१) शेतीक्षेत्रातील रोजगार कमी झाला.

२) उद्योग व सेवा क्षेत्रातील रोजगार वाढला.

३) सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार कमी झाला.

४) खाजगी क्षेत्रातील रोजगार वाढला.

५) आर्थिक सुधारणा काळातील रोजगार वाढीच्या दरापेक्षा आर्थिक सुधारणापूर्व काळातील रोजगार वाढीचा दर जास्त होता.

६) उदारीकरणाच्या काळात कामगारांना संपाचा अधिकार कमी झाला.

७) मालकांकडून टाळेबंदी, सक्तीची सुटी, कारखाना बंद करणे, वेतन कपात, कमी वेतन, करार पद्धत इत्यादी चा वापर केल्यामुळे कामगारांवर प्रतिकूल परिणाम सांगा.

**स्वयंसहाय्यता बचत गटांची भूमिका**

१) दारिद्र्य निर्मूलनास मदत

२) रोजगार वाढीस मदत

३) स्वयंरोजगारीत वाढ

४) बँक व्यवहाराचे ज्ञान वाढल्यास मदत

५) महिला सक्षमीकरण

## ३.५ पारिभाषिक शब्त

अतिरिक्त - Addotional

उदारिकरण - Liberalization

## ३.६ संदर्भ


१) भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. डॉ. राजेंद्र अ. रसाळ, डीलर्शीी झीलिश्रळलरींळेप पुणे २०१०.

२) भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. एन. एल. चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, २००९

३) Indian Economy - Ruddar Datt, K.P.M. sundharam s. chand and Company Ltd.. Near Delhi, २०१०.

४) भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. देसाई, डॉ. सौ. भालेराव, निराली प्रकाशन पुणे, १९९९

५) स्पर्धा परीक्षा संपूर्ण अर्थशास्त्र - डॉ. किरण देसले, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, ऑगस्ट २०१२

६) भारतीय अर्थव्यवस्था आणि नियोजन - प्रा. अपेक्षा जाधव, निराली प्रकाशन, पुणे, जुलै २०१२

७) अर्थसंवाद - ऑक्टोबर १ डिसेबर २०११

८) भारताची अर्थरचना - डॉ. मुकुंद महाजन, निराली प्रकाशन, पुणे, जुलै १९९८

# घटक : ४

# पायाभूत संरचना

**अनुक्रमणिका**


४.0 उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ पायाभूत संरचना–अर्थ

४.२.२ पायाभूत संरचनेचे महत्व

४.२.३ ऊर्जा व ऊर्जेचे महत्व

४.२.४ वाहतूक व वाहतूकिचे महत्व

४.२.५ दळण वळण संदेशवहन

४.४ सारांश

४.३ स्वयंअध्ययासाठी प्रश्न

४.५ पारिभाषिक शब्द

४.६ सदर्भ सुची


## ४.0 उद्दिष्टये

१) विद्यार्थ्यांना भारतातील पायाभूत संरचनेचे स्वरूप समजून घेण्यास मदत होईल.

२) भारतातील ऊर्जा या घटकांचे महत्त्व व उर्जासंकट याबाबत माहिती मिळण्यास मदत होईल.

३) भारतात वाहतुकीचे कोणते प्रकार अस्तित्वात आहेत याबाबत विद्यार्थ्यांना ज्ञान होईल.

४) आधुनिक काळात दळणवळणाचे कोणते प्रकार भारतात उपलब्ध आहेत यासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती मिळेल.

## ४.१ प्रस्तावना

अर्थव्यवस्थेचा विकास होण्यासाठी शेती, उद्योग, व्यापार या क्षेत्रांचा विकास होणे आवश्यक असते. अर्थात या सर्व क्षेत्रांचा विकास अर्थव्यवस्थेतील वाहतूक, दळणवळण यांचा समावेश असलेल्या पायाभूत संरचनेवर अवलंबून असतो. पायाभूत संरचनेमुळे राष्ट्र उभारणीचा पाया घातला जातो. ग्रामीण भागात वाहतूक - दळणवळण यांसारख्या सुविधांचा अभाव आढळतो. त्यामुळे तेथील विकासाचा वेग मंद असतो. अशा क्षेत्रात वाहतूक व दळणवळणाची साधने उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होईल. ग्रामीण भागाबरोबर देशाच्या विकासाला हातभार लावला जाईल.

भारतासारख्या विकसनशील देशात पायाभूत सुविधांची कमतरता आहे. नियोजन काळात भारत सरकारने पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केलेली आहे. विद्यार्थी मित्रांनो भारताच्या आर्थिक विकासात पायाभूत संरचनेचे महत्त्व काय, पायाभूत संरचनेचे प्रकार कोणते, या संबंधीच्या समस्या कोणत्या याचा अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ पायाभूत संरचना – अर्थ

एखाद्या देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकासासाठी जे मूलभूत घटक जबाबदार असतात त्यांचा समावेश पायाभूत सुविधांमध्ये केला जातो. पायाभूत सुविधांमार्फत विकासाची प्रक्रिया प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गतिमान केली जात असते.

उत्पादन प्रक्रियांना अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि संस्थात्मक घटकांना पायाभूत संरचना असे म्हणतात.

शेती व उद्योग क्षेत्रातील उत्पादनासाठी ऊर्जा, पतपुरवठा, वाहतूक सेवा, दळणवळण, विपणन सुविधा, बँक व विमा सुविधा अशा अनेक बाबींची आवश्यकता असते. या सर्व सुविधा आणि सेवा यांना एकत्रितपणे पायाभूत सुविधा असे म्हणतात.

पायाभूत संरचनेत पुढील घटकांचा समावेश होतो –

१) कोळसा, वीज, तेल व इतर अपारंपरिक ऊर्जा

२) लोहमार्ग, रस्ते, हवाई मार्ग, जल मार्ग ही वाहतूक यंत्रणा

३) टपाल, तार, दूरध्वनी इत्यादी दळणवळण यंत्रणा

४) बँका, विमा इत्यादी वित्तसंस्था

५) आरोग्य व शिक्षण सेवा

६) विज्ञान व तंत्रज्ञान इत्यादी

विद्यार्थी मित्रांनो, आपल्याला या प्रकरणात पुढील पायाभूत सुविधांचा अभ्यास करावयाचा आहे.

१) ऊर्जा – पारंपरिक, अपारंपरिक

२) वाहतूक – रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, हवाई वाहतूक, जल वाहतूक

३) दळणवळण –

### ४.२.२ पायाभूत संरचनेचे अर्थिक विकासातील महत्त्व

### १) औद्योगिक विकासात महत्त्व

औद्योगिक विकास हा पायाभूत सुविधांच्या विकासावर अवलंबून असतो. भांडवली वस्तू निर्माण करणाऱ्या उद्योगांना जर लोह, पोलाद व इतर धातूंचा पुरवठा पुरेसा झाला तर

त्यांच्या उत्पादकतेत वाढ होते. या बरोबर वीज, वाहतूक, दळणवळण साधने, वित्तपुरवठा पुरेसा झाला तर उत्पादकतेत आणखी वाढ होते. या सर्व सुविधा एकाच ठिकाणी पुरविण्याचे ठिकाण म्हणजे औद्येगिक वसाहती होय. यांचा विकास झाला तर विकासाचा वेग वाढतो.

### २) भांडवली साठ्यात वाढ

पायाभूत सुविधा म्हणजे समाजाच्या भांडवल साठ्याचा एक घटक होय. अर्थव्यवस्थेतील पायाभूत सुविधांकत वाढ झाल्यामुळे भांडवली साठ्यात वाढ होते. त्यातून आर्थिक विकासाला प्रेरणा मिळते.

### ३) नवप्रवर्तनासाठी योग्य परिस्थिती

पायाभूत सुविधांचा विकास ही एक प्रकारची गुंतवणूक असून, त्यामुळे नवप्रवर्तनासाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण होते. त्यातून नवीन कल्पनांची उत्क्रांती, उत्पादन घटकांचे नवीन संयोग, नवी उत्पादन पद्धती अशा गोष्टींना प्रेरणा मिळून वस्तूंचे उत्पादन वाढते. नवनवीन वस्तूंचे उत्पादन केले जाते. त्यातून आर्थिक विकासाच्या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण होते.

### ४) उत्पादन वाढीला गती

पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेमुळे देशातील वेगवेगळ्या आर्थिक क्षेत्रातील उत्पादन वाढीला गती मिळते. वाहतूक सुविधात वाढ झाल्यामुळे उत्पादन कार्यासाठी आवश्यक असलेल्या कच्च्या मालाची वाहूतक शक्य होते. त्यामुळे उद्योगांना पुरेशा प्रमाणात व वेळेवर कच्चा माल उपलब्ध होऊन उत्पादन वाढीला गती मिळते.

### ५) बाजाराचा विस्तार

वाहतूक व दळणवळण व्यवस्थेत सुधारणा झाल्यामुळे बाजाराचा विस्तार होण्यास मदत होते. उत्पादकाला अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचता येते. त्यामुळे वस्तूंच्या मागणीत वाढ होते. बाजारातील मागणी, पुरवठा, किंमती या बाबत जलद माहिती मिळाल्यास बाजार कक्षा विस्तारतात. विदेशी बाजारपेठ काबीज करण्यासाठी जलवाहतूक व हवाई वाहतूक ही साधने महत्त्वाची ठरतात. बाजाराचा विस्तार झाल्यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होते.

### ६) कृषी विकासाला मदत

भारताच्या वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी कृषी उत्पादनात वाढ करणे आवश्यक असते. भारतीय शेती मान्सूनवर अवलंबून आहे. शिवाय शेतजमीनित परंपरागत तंत्र वापरले जाते. त्यामुळे शेतजमिनीची उत्पादकता कमी आहे. ही उत्पादकता वाढविण्यासाठी जलसिंचन महत्त्वपूर्ण ठरते. जल सिंचनाबरोबर सुधारित बियाण्यांचा पुरवठाही महत्त्वपूर्ण ठरतो. तसेच रासायनिक खते, किटकनाशकांचीही गरज असते. हरितक्रांतीसाठी भारत सरकारने सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे कृषी उत्पादनात वाढ झाली. तसेच साठवणूक गृहे, वाहतूक व्यवस्था, वित्तपुरवठा, बाजार

व्यवस्था या पायाभूत सुविधांचाही कृषी विकासावर अनुकूल परिणाम होतो.

**७) मानवी संसाधनांचा दर्जा उंचावण्यास मदत**

शिक्षण, आरोग्य, पिण्याचे शुद्ध पाणी, सार्वजनिक स्वच्छता, निवारा यांचा मानवी संसाधनामध्ये पायाभूत सेवा म्हणून वापर केला जातो. शिक्षण व प्रशिक्षण सुविधांच्या विकासामुळे कुशल श्रमशक्तीचा पुरवठा वाढण्यास मदत होते. आरोग्य विषयक सुविधांमुळे सरासरी आयुर्मान वाढते व कार्यक्षमता टिकून राहते. म्हणजेच मानवी संसाधनांचा दर्जा उंचावण्यास मदत होते. परिणामी आर्थिक विकासाला मदत होते.

**८) उत्पादन घटकांची गतिशीलता वाढण्यास मदत**

वाहतूक व दळणवळण साधनांची उपलब्धता असेल तर कच्चामाल, यंत्रसामग्री, श्रमिक या घटकांच्या गतिशीलतेत वाढ होण्यास मदत होते. उत्पादन घटक गतिशील असले तर त्यांचा पुरेपूर वापर होऊ शकतो. परिणामी आर्थिक विकासाला मदत होते.

**९) राजकीय दृष्ट्या महत्त्व**

भारतासारख्या विशाल देशात राज्यकारभार सुरळीतपणे करता यावा यादृष्टीने वाहतूक व दळणवळणाची साधने महत्त्वाची भूमिका पार पाडतात. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इ-गव्हर्निंगची कामे सुलभ होतात. त्यामुळे कामांची गतिशीलता वाढते.

**१०) राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्व**

वाहतूक व दळणवळण साधनांमुळे भारतातील विविध धर्म, जाती, पंथ यातील दुरावा कमी करण्यास मदत होते. माहितीच्या प्रसारणातून आचार आणि विचारांचे आदान-प्रदान वाढते, शिक्षणाच्या प्रसाराच्या माध्यमातून वैचारिक देवाण-घेवाण वाढते. समाजातील कटुता दूर होते. परिणामी राष्ट्रीय एकात्मता वृद्धींग होण्यास मदत होते.

अशा प्रकारे पायाभूत सुविधा आर्थिक विकास प्रक्रियेला गती देण्याबाबत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. अल्पविकसित देशात पायाभूत सुविधांची उपलब्धता मर्यादित असते. त्यामुळे अशा देशात विकासाचा वेग मंद आढळतो. म्हणून अल्पविकसित देशांनी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याची गरज असते.

## ४.२.३ ऊर्जा (Energy)

देशाच्या सर्वांगीण आणि आर्थिक विकासासाठी अत्यावश्यक बाब म्हणजे ऊर्जा होय. ऊर्जा ज्यापासून मिळते त्यास ऊर्स्त्रोत म्हणतात. आर्थिक वृद्धीचे प्रमाण, दरडोई उत्पन्न आणि दरडोई ऊर्जेचा वापर यांच्या प्रत्यक्ष संबंध आहे. सर्व प्रकारच्या उत्पादक आर्थिक व्यवहारांसाठी उर्जा अत्यावश्यक असल्याने आर्थिक विकास जसजसा होत जातो तसतशी ऊॅची मागणी वाढत जाते.

आर्थिक विकासाला वेग देण्याचे कार्य यंत्रामुळे होते. यांत्रिकीकरणाचे अनेक फायदे आहेत परंतु यंत्र चालविण्यासाठी उर्जा आवश्यक असते. म्हणून उर्जेचा वापर व आर्थिक विकास यांत साहचर्य आढळते.

निवडक देशातील ऊर्जेचा वापर आणि दरडोई उत्पन्न

| देश | दरडोई उत्पन्न डॉलर्समध्ये २००८ | ऊर्जेचा दरडोई वापर तेलाच्या समकक्ष कि.ग्रॅ. २००७ |
|---|---|---|
| अमेरिका | ४६,७९० | ७७६६ |
| जपान | ३५१९० | ४०१९ |
| इंग्लंड | ३६२४० | ३४०४ |
| चीन | ६०१० | १४८४ |
| भारत | २९३० | ५२९ |

संदर्भ - इंडियन इकॉनॉमी - दत्त आणि सुंदरम ६५ वी आवृत्ती

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, भारताचे दरडोई उत्पन्न व दरडोई ऊर्जेचा वापर प्रगत देशांच्या तुलनेत कमी आहे. अमेरिकेच्या फक्त ६.८% तर जपानच्या वापराच्या तुलनेत १३% आहे.

**ऊर्जेचे महत्त्व** (Importance of Energy)

आर्थिक विकास आणि राहणीमानाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी ऊर्जा हा महत्त्वाचा घटक आहे. ऊर्जेची उपलब्धता पुरेशा प्रमाणात नसेल तर आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळा येतो. देशातील प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्राच्या दृष्टीने ऊर्जा महत्त्वाची आहे. अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकसात ऊर्जेचे महत्त्व पुढीलप्रमाणे -

**१) उत्पादन प्रक्रियेत उपयोग**

शेती व उद्योग प्रक्रियेत कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करण्यासाठी कोणत्या ना कोणत्या उर्जेची आवश्यकता असते. कारखान्यात यंत्र चालविण्यासाठी विविध शक्तीसाधनांचा वापर केला जातो. कोळसा, खनिजतेल, वीज, नैसर्गिक वायू इत्यादीच्या साहाय्याने यंत्रे चालविली जातात. त्यामुळे उत्पादन प्रक्रियेत ऊर्जा हे साधन महत्त्वपूर्ण ठरते.

**२) उत्पादकतेत वाढ**

ऊर्जेच्या वापरामुळे उत्पादन घटकांच्या कार्यक्षमतेत वाढ होते. आधुनिक काळात श्रमप्रधान तंत्रापेक्षा भांडवलप्रधान तंत्राला प्राधान्य दिले जाते. भांडवल प्रधान तंत्रात यंत्रांचा अधिक वापर केला जातो. यंत्रांसाठी ऊर्जा आवश्यक असते. त्यामुळे कृषी व उद्योगक्षेत्रातील उत्पादकता वाढण्यास मदत होते.

**३) औद्योगिकीकरणाचा वेग वाढतो**

देशात ऊर्जेची उपलब्धता विपुल प्रमाणात असेल तर उत्पादन प्रक्रिया अखंड चालू राहू शकते. ऊर्जेमुळे औद्योगिकीकरणाला गती मिळते. उत्पादन प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या यंत्रांसाठी ऊर्जा हे साधन आवश्यक असते. यंत्र ऊर्जेवर चालतात त्यामुळे उद्योगांची कार्यक्षमता वाढून औद्योगिकीकरणाचा वेग वाढण्यास मदत होते.

### ४) वाहतूक व्यवस्थेत सुधारणा

रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, जल वाहतूक व हवाई वाहतूकींच्या साधनांना ऊर्जेचा आवश्यकता असते. ऊर्जेमुळे वाहतूक व्यवस्था कार्यक्षम होते. वाहतुकीमुळे अर्थव्यवस्थेला गतिमानता प्राप्त होते. कच्च्या व पक्क्या मालाची वाहतूक शक्य होते. त्यामुळे बाजाराचा विस्तार होऊन आर्थिक व्यवहारात वाढ होते.

### ५) घरगुती वापरामुळे राहणीमानात सुधारणा

ऊर्जा साधनांची उपलब्धता हा राहणीमानावर प्रभाव पाडणारा महत्त्वाचा घटक आहे. उच्च दरडोई उत्पन्न असलेल्या देशात ऊर्जेचा उपभोगही उच्च पातळीवर असलेला दिसून येतो. विजेवर चालणारे दिवे, स्वयंपाकासाठी गॅस अशी ऊर्जासाधने आज मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. मिक्सर, टीव्ही, फ्रिज, मायक्रोओव्हन, कुलर, धुलाई यंत्रे इत्यादी उपकरणे विजेवर चालतात. या उपकरणांचा कुटुंबामध्ये वापर केला जातो. त्यामुळे राहणीमानात सुधारणा झालेली दिसून येते.

### ६) ग्रामीण भागाच्या विकासाला मदत

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत ऊर्जा हा घटक महत्त्वाचा असतो. ग्रामीण भागाचा आर्थिक व सामाजिक विकास घडून येण्यासाठी ऊर्जेची उपलब्धता महत्त्वाची ठरते. विद्युतपुरवठा, वाहतुकींची साधने व सुविधा इत्यादीमुळे ग्रामीण भागात औद्योगिकीकरणाला चालना मिळते. परिणामी ग्रामीण भागाच्या विकासाला मदत होते.

### ७) कृषी विकासाला मदत

शेतीची मशागत करण्यासाठी, जलसिंचनासाठी, पिके काढणीसाठी अनेक प्रकारची यंत्रे वापरली जातात. शेतीची मशगत करण्यासाठी ट्रॅक्टरचा वापर केला जातो. विहीर व कूपनलिकेतून पाण्याचा उपसा करण्यासाठी डिझेल व विजेवर चालणारे पंपसेट वापरले जातात. अलीकडील काळात साठवण गृह व शीतगृहांची संख्या वाढत आहे. कृषी क्षेत्रातील ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी ऊर्जेचा वापर केला जातो.

### ८) रोजगारसंधीत वाढ

ऊर्जा साधनांची उपलब्धता रोजगारसंधीत वाढ करण्यास मदत करते. ऊर्जेची उपलब्धता उत्पादन वाढीस मदत करते. वाढत्या उत्पादनासाठी उत्पादन घटकांची मागणी वाढते. त्यामुळे रोजगारातही वाढ होते.

थोडक्यात ऊर्जा हे साधन अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरते.

### ४.२.४ ऊर्जेचे स्त्रोत – (Sources of EUergy)

१८ व्या शतकात औद्योगिक क्रांतीला सुरूवात झाल्यानंतर ऊर्जेचे महत्त्व वाढत गेले. यावेळी कोळसा हे ऊर्जेचे प्रमुख स्त्रोत होते. २० व्या शतकात ऊर्जेचा प्रमुख स्त्रोत पेट्रोलियम बनला. अनेक युद्धे ऊर्जेसाठी लढली गेली. अलीकडील ऊर्जासंकट, तेलाचे

भाव, अणुकरार आणि एकूणच ऊर्जाक्षेत्र संपूर्ण आंतरराष्ट्रीय राजकारण घडवत आहेत.

भारतात कोळसा, तेल, नैसर्गिक वायू, जळाऊ लाकूड अशा अनेक स्त्रोतांपासून ऊर्जा मिळते. ऊर्जेच्या स्त्रोतांचे पुढील तीन गटात वर्गीकरण केले जाते

**१) व्यावसायिक ऊर्जा** (Commercial Energy)

यात खनिज तेल व नैसर्गिक वायू, कोळसा व लिग्नाईट, जलविद्युत, औष्णिक वीज, अणु ऊर्जा, नाफ्ता इत्यादीचा समावेश होतो.

**२) पारंपरिक उर्जा** (Traditional Energy)

यात जळणासाठी वापरले जाणारे लाकूड, लाकडापासून तयार केलेला कोळसा, झाडा झुडपांचे व पिकांचे अवशेष, गायी व म्हशीच्या शेणाच्या गोवऱ्या यांचा समावेश केला जातो. एकूण ऊर्जेपैकी या स्त्रोतातून दरवर्षी १०% ते १५% ऊर्जा निर्माण होते असा अंदाज व्यक्त केला जातो. ग्रामीण भागात स्वयंपाकासाठी इंधन म्हणून या स्त्रोताचा वापर केला जातो.

**३) अपारंपरिक उर्जा** (Non-Traditional Energy)

यात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, समुद्राच्या लाटांपासून तयार केलेली वीज, बायोगॅस, भू-उष्णिय ऊर्जा, लघुजल विद्युत, कचऱ्यापासून प्राप्त ऊर्जा, लाकडी बायोमास इत्यादीचा समावेश होतो.

**ऊर्जा क्षेत्राची प्रगती** (Progress of Energy Sector)

**१) विद्युत शक्ती** (Electrical Power)

व्यावसायिक ऊर्जेचा विद्युत शक्ती हा प्रमुख स्त्रोत आहे. नियोजन काळात वीज उत्पादनासाठी लक्ष्य ठरवून देण्यात आले. ते पूर्णतः गाठण्यासाठी जरी यश आलेले नसले तरी वीज उत्पादनात दरवर्षी सातत्याने वाढ होत आहे.

१९५० - ५१ मध्ये देशात वीज उत्पादनाची स्थापित उत्पादन क्षमता २.३ हजार मेगावॅट होती. त्यात २००७ पर्यंत १५७ हजार मेगावॅटपर्यंत वाढ झाली. यात जलविद्युत क्षमता आणि पवनऊर्जा क्षमता ३४.७ हजार मेगावॅट आहे. औष्णिक ऊर्जा क्षमता ९३.७ हजार मेगावॅट आणि न्यूक्लिअर ऊर्जा क्षमता ३.९ हजार मेगावॅट आहे.

१९५०-५१ मध्ये प्रत्यक्ष वीज निर्मिती ६६ दश अब्ज किलोवॅट इतके झाले आहे. त्यात २००७ पर्यंत ७४४.३ दशअब्ज किलोवॅट पर्यंत वाढ झाली. एकूण उत्पादित विजेपैकी घरगुती कारणासाठी १९५०-५१ मध्ये १२.६% वापर करण्यात आला होता. व्यावसायिक कारणांसाठी ७.५%, औद्योगिक कारणांसाठी ६२.६%, कृषी क्षेत्रासाठी ३.९% व इतर कारणांसाठी ४% वापर करण्यात आला होता.

| ऊर्जा वापर | १९५३-५४ | १९७०-७१ | २००५-०६ |
|---|---|---|---|
| घरगुती वापर | १०% | १२% | १२% |
| शेतीक्षेत्र | १% | ३% | ९% |
| औद्योगिक क्षेत्र | ४०% | ५०% | ४२% |
| वाहतूक | ४४% | २८% | २२% |
| इतर | ५% | ७% | १५% |

संदर्भ - इंडियन इकॉनॉमी : दत्त आणि सुंदरम ६५ वी आवृत्ती

औद्योगिक क्षेत्रासाठी ऊर्जेचा आधिक वापर केला जातो.

## २) पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू (Petroleum and Natural Gas)

वाहतूक साधने आणि औद्योगिक कारणांसाठी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूचा वापर केला जातो. भारतात कच्च्या खनिज तेलाचे उत्पादन भूगर्भातून व भर समुद्रातून केले जाते. त्याचे शुद्धीकरण रिफायनरीत केले जाते. १९५०-५१ मध्ये खनिज तेलाचे उत्पादन फक्त ०.३ दशलक्ष टन झाले होते. त्यात १९८०-८१ मध्ये २५.८ दशलक्ष टनापर्यंत वाढ झाली. डिसेंबर २००७ मध्ये त्यात ११६.१ दशलक्ष टनांपर्यंत वाढ झाली. देशांतर्गत खनिज तेल उत्पादनातील वाढ म्हणजे देशातील खनिजतेल संशोधन कार्याचे यश आहे. भारतात हे कार्य Oil and Natural Gas Corporation मार्फत केले जाते. अलीकडे हे कार्य रिलायन्स मार्फतही केले जात आहे.

भारताची कच्च्या तेलाची देशांतर्गत गरज मोठी आहे. त्यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढत असले तरी ही गरज पूर्ण होत नाही. त्यामुळे कच्च्या खनिज तेलाची मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते. १९६०-६१ मध्ये ६ दशलक्ष टन आयात केली होती. २००७-०८ मध्ये ही आयात ९१.१ दशलक्ष टनांपर्यंत वाढली.

पेट्रोलियम पदार्थांमध्ये रॉकेल, डिझेल, पेट्रोल नाफ्ता यांचा समावेश होतो. याचा देशांतर्गत उपभोग १९८१-८१ मध्ये ३०.९ दशलक्ष टन झाला तर उत्पादन २४.१ दशलक्ष टन इतके झाले होते. मागणी पुरवठ्यातील ही तूट भरून काढण्यासाठी ७.३ दशलक्ष टन पेट्रोलियम पदार्थांची आयात करावी लागली. २००७-०८ या वर्षात देशांतर्गत उपभोग ८६.९ द.ल. टनांपर्यंत वाढला तर उत्पादन १०७.३ दशलक्ष टनांचे झाले. भारतात खनिज तेल शुध्दीकरणाचे काम हिंदुस्थान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम, इंडियन ऑईल आय.बी.पी. या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडून केले जाते. अलीकडील काळात रिलायन्स, आय पी. सी. एल., गुजरात रिफायनरी, मद्रास रिफायनरी, मंगलोर रिफायनरी या खाजगी कंपन्यांमार्फत केले जात आहे.

## नैसर्गिक वायू (Natural Gas)

खनिज उत्खनन आणि तेल शुद्धीकरणातून नैसर्गिक वायू प्राप्त होतो. याचा घरगुती व औद्योगिक कारणांसाठी वापर केला जातो. गेल्या काही वर्षांत नैसर्गिक वायुच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. १९८०-८१ मध्ये नैसर्गिक वायूचे उत्पादन २.३ बिलियन क्युबिक मीटर झाले होते. हे उत्पादन २०००-०१ मध्ये २९.४७३ बिलियन क्युबीक मीटर पर्यंत वाढले. २००२-०३ मध्ये हे उपादन ३१.९२ बिलियन क्युबिक मीटरपर्यंत वाढले.

ONGC च्या शोध आणि संशोधन विभागाच्या अंदाजानुसार भारतात ६४७ बिलियन क्युबिक मीटर इतका नैसर्गिक वायूचा साठा आहे.

## ३) कोळसा आणि लिग्नाईट

व्यावसायिक ऊर्जेचा हा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे. भारतीय भू-वैज्ञानिक सर्वेक्षणानुसार १ जानेवारी २००६ ला देशात १२०० मीटर भू-गर्भाच्या खोलीपर्यंत कोळशाचा साठा २,५३,००० दशलक्ष टन असण्याचा अंदाज आहे. कोळशाच्या खाणी झारखंड, ओरिसा, छत्तीसगड, प. बंगाल, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आहेत.

२००५-०६ च्या काळात भारतात २८२.४२ कोटी टन कोळशाचे उत्पादन करण्यात आले. यात २४१.७२ कोटी टन कोळशाचे उत्पादन कोल इंडिया लि. ने केले तर २४.५४ कोटी सिंगरॅनी कोळसा खाण आणि १६.१७ कोटी टन उद्योगाच्या खाणीतून करण्यात आले. २००० च्या नवीन खाण नियंत्रण धोरणानुसार सर्व प्रकारच्या कोळशाच्या किंमती आणि त्याचे वितरण नियंत्रण मुक्त करण्यात आले आहे. भारतात कोळशाचा ऊर्जा साधन म्हणून सर्वात जास्त वापर औष्णिक वीज निर्माण करण्यासाठी केला जातो. त्यानंतर पोलाद, सिमेंट, खते उद्योगात वापर केला जातो (कोळसा हे पोलाद उत्पादनातील महत्त्वाचे आदान आहे.) जास्त उष्णतामानाची गरज असलेल्या उद्योगात कोळशाऐवजी लिग्नाईटचा वापर केला जातो. १ जानेवारी २००४ ला देशात सुमारे ३६००९ कोटी टन लिग्नाईटचा साठा असावा असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यापैकी ४१५० कोटी टनसाठा तामिळनाडू राज्याच्या कुड्डालोर जिल्ह्यात आहे. तसेच राजस्थान, गुजरात, जम्मू काश्मीर व केरळ राज्यात लिग्नाईटचे साठे आहेत. लिग्नाईटचा वापर वीज निर्मिती करण्यासाठी केला जातो.

सध्या कोळशापासून १,०४,८१६.३८ मेगावॅट (५३.३%) वीजनिर्मिती होते. कोळसानिर्मित वीजनिर्यातीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे.

### ४) उर्जेच्या अपारंपरिक स्त्रोताची प्रगती

अ) सौर ऊर्जा - सूर्याच्या उष्णतेचे रूपांतरण ऊर्जेत केले जाते. याचा वापर स्वयंपाक करणे, पाणी गरम करणे, ग्रामीण विद्युतीकरण करणे इत्यादी कारणांसाठी केला जातो. ३१ मार्च २००६ पर्यंत देशातील १५ लाख चौरस मीटर क्षेत्रामध्ये ही प्रणाली कार्यन्वित करण्यात आली आहे. भारतात सौरऊर्जेचा पुरेपूर वापर केल्यास वार्षिक ५००० ट्रिलीयन kwh (युनिट) वीजनिर्मिती होऊ शकते. ३१ जानेवारी २०१२ अखेर देशात सौरऊर्जेपासून ४८१.४८ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता प्राप्त करण्यात आलेली अहे. देशात गुजरात राज्य सौरऊर्जा निर्मितीत आघाडीवर असून त्याखालोखाल राजस्थान, आंध्रप्रदेश व महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. अलीकडे राजस्थानमधील सौरऊर्जा क्षमतेत वाढ होत असून राजस्थानला सौर हब बनविण्याची योजना आहे. सौरउर्जा विकासासाठी १९ नोव्हेंबर २००९ रोजी जवाहरलाला नेहरू राष्ट्रीय सौर अभियान जाहीर करण्यात येऊन ११ जानेवारी २०१० पासून सुरू करण्यात आले.

### ब) पवन ऊर्जा

भारतात ३१ जानेवारी २०१२ अखेर पवन ऊर्जेची उत्पादन क्षमता १६१७९ मेगावॅट झालेली आहे. पवनउर्जेच्या बाबतीत अमेरिका, (२५१७०), जर्मनी (२३९०३), स्पेन (१६७५४) व चीन (१२२१०) मेगावॅट क्षमता आहे. पवन ऊर्जेच्या संशोधन व तंत्रज्ञानासाठी चेन्नई येथे (उ-थखएढ उभारण्यात आलेले आहे. सध्या देशात २४ प्रमुख पवन उर्जानिर्मिती केंद्रे असून तामिळनाडूत सर्वाधिक केंद्रे आहेत. तामिळनाडू पवनऊर्जानिर्मितीत आघाडीवर असून तेथून ५१% पवनऊर्जानिर्मिती होते.

### क) बायोगॅस

या साधनाचा दुहेरी वापर होतो. एक म्हणजे बायोगॅसचा स्वयंपाक करण्यासाठी वापर होतो व दुसरे म्हणजे यापासून उत्कृष्ट सेंद्रिय खत प्राप्त होते. त्याचा वापर कृषी क्षेत्रात केला जातो. भारतात २००४ पर्यंत ३६.५ लाख बायोगॅस संयंत्र बसविण्यात आले आहेत. बायोगॅस उत्पादनाचे प्रशिक्षण देण्यासाठी भारतात कोइमतूर, उदयपूर व पुसासमस्तीपूर या तीन ठिकाणी प्रशिक्षण केंद्रे उभारण्यात आली आहेत.

### ड) कचऱ्यापासून प्राप्त ऊर्जा

घनकचऱ्यातून ऊर्जेची निर्मिती करण्याचे संयंत्र देशातील अनेक शहरांमध्ये बसविण्यात आले आहे. घनकचऱ्याच्या ज्वलनापासून ऊर्जा तयार करण्याचा देशातला पहिला प्रकल्प पुणे महानगरपालिकेने सुरू केला. दिल्ली शहरात १० मेगावॅट क्षमतेचा सर्वात मोठा घनकचऱ्यापासून वीजनिर्मिती करणारा प्रकल्प उभारला जात आहे. बेंगळूर (कर्नाटक) येथेही ८ मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारला जात आहे. भारतात २००६ पर्यंत कचऱ्यातून ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता ४८ मेगावॅट होती.

### इ) भू–औष्णिक ऊर्जा

भूगर्भातून जे गरम पाण्याचे झरे वाहतात त्यावर विद्युत संयंत्र बसविल्यावर त्यापासून ऊर्जा प्राप्त करता येते. भारतात जवळजवळ ३४० गरम पाण्याचे झरे आहेत. त्यापासून अपांरपरिक ऊर्जा प्राप्त करता येऊ शकते.

### ई) लघु जलविद्युत

भारतात लघु जलविद्युतची शक्यता १५००० मेगावॅट वर्तविण्यात आली आहे. मार्च २००५ पर्यंत १७०५ मेगावॅट क्षमता निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### फ) वुडी बायोमास

भारतात जंगलातून मिळणारे लाकूड, झाडाझुडपांचे अवशेष, ऊसाची खोडे, शेतजमिनीत निर्माण होणारा कचरा यांचा वापर करून वीज निर्मिती करता येणे शक्य आहे. ३१ जानेवारी २०१२ रोजी ११४२ मेगावॅट वीजक्षमता बायोमास ऊर्जाप्रकल्पातून प्राप्त झालेली होती. भारतात बायोमासपासून १९५०० मेगावॅट विजनिर्मिती होऊ शकते.

## ४.२.६ भारतातील ऊर्जा संकट (Energy Crisis in India)

तेराव्या योजनेअखेर भारताला २.५ लाख मेगावॅट वीजेची गरज आहे. ही गरज भागविण्यासाठी सध्याचे वीजनिर्मितीचे प्रकल्प सक्षम नाहीत. तेल उत्पादक अरब राष्ट्रांनी १९७३ मध्ये अचानकपणे खनिज तेलाच्या किंमतीत चार पटींनी वाढ केली. त्यामुळे भारतात खनिज तेलाच्या किंमतीत तेव्हा मोठ्या प्रमाणावर वाढ करावी लागली. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत खनिज तेलाचे संकट निर्माण झाले. १९९० मध्ये आखाती देशांमध्ये कुवेत आणि इराक मध्ये युद्ध सुरू झाले. त्यामुळे खनिज तेलाच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली. या वाढत्या किंमतींच भारताच्या व्यवहारतोलावर आणि परकीय चलन साठ्यावर प्रतिकुल परिणाम झाला.

**भारतात पुढील कारणांमुळे ऊर्जा संकट निर्माण झाले**

**१) खनिज तेलाच्या वाढत्या किंमती**

१९७३ पासून २००८ या काळात खनिज तेलाच्या किंमतीमध्ये सतत वाढ होत गेली. १९७३ मध्ये OPEC (Organisation of Petroleum Exporting Countries) ने सर्वप्रथम किंमती वाढविल्या. १९७३ मध्ये २.१ डॉलर प्रति बॅरल वरून १९८० मध्ये २७.३ डॉलर प्रती बॅरल अशी किंमत वाढ करण्यात आली. २००७-०८ मध्ये ही किंमत १०० डॉलर पेक्षा जास्त प्रती बॅरल पर्यंत वाढली. आंतरराष्ट्रीय पातळीवर खनिज तेलाच्या किंमतीत प्रचंड वाढ झाल्याने देशांतर्गत पातळीवर खनिज तेलाच्या किंमतीत वाढ करावी लागली. खनिज तेलाचा ज्या ज्या उत्पादनात इंधन म्हणून वापर होतो त्या उत्पादनाच्या किंमतीत वाढ होत गेली. म्हणून अर्थव्यवस्थेत भाव वाढीचा वेग वाढला.

**२) खनिज तेलाच्या आयातीवर वाढता खर्च**

भारत खनिज तेलाबाबत आखाती देशांवर अवलंबून आहे. आखाती देशांनी तेलाच्या किंमतीत वाढ केल्याने तेलाच्या आयातीवरील खर्चात वाढ होत आहे. १९६०-६१ मध्ये भारताने फक्त ६९ कोटी रु. किंमतीच्या तेलाची आयात केली होती. ही आयात १९७०-७१ मध्ये १३६ कोटी रु., १९७२-७३ मध्ये ११०० कोटी रु., १९८०-८१ मध्ये ५२६४ कोटी रु., २००६-०७ मध्ये २,५८,५७२ कोटी रु. पर्यंत वाढली. ही किंमत विदेशी चलनात द्यावी लागते. त्यामुळे विदेशी चलनाच्या साठ्यावर त्याचा ताण पडतो.

**३) भारतीय कोळशाचा निकृष्ट दर्जा**

भारतातील कोळसा निकृष्ट दर्जाच्या असल्यामुळे व दळणवळणाच्या सोयींच्या अपुऱ्या विकासामुळे कोळसानिर्मित ऊर्जा महाग होते. औष्णिक ऊर्जा निर्माण करण्यासाठी जवळजवळ ८०% कच्चामाल म्हणून कोळशाचा वापर केला जातो. भारतीय कोळशात ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता कमी आहे. भारतात १ kwh (युनिट) निर्मितीसाठी ०.७ कि.ग्रॅ. कोळसा लागतो तर अमेरिकेत १ज्ञुह निर्मितीसाठी ०.४५ कि.ग्रॅ. एवढाच कोळसा पुरतो. त्यामुळे भारतात पुरेशा प्रमाणात वीज उत्पादित होत नाही. उत्पादन खर्चात वाढ होते. मागणी पुरवठ्यात असमतोल निर्माण होऊन विजेचे दर वाढतात.

**४) आवश्यकतेपेक्षा अधिक वापर**

उत्पादनाची उपकरणे व यंत्रे कालबाह्य, जुनाट झालेली असतील तर अशी यंत्रे चालविण्यासाठी आवश्यकतेपेक्षा अधिक ऊर्जा वापरली जाते. भारतात अनेक उद्योगात जुनाट यंत्रांचा वापर केला जातो. त्यामुळे ऊर्जेच्या प्रमाणापेक्षा अधिक वापर केला जातो. म्हणूनही भारतात ऊर्जासंकट निर्माण झालेले दिसून येते.

**५) उर्जेच्या मागणीत सातत्याने होणारी वाढ**

भारताच्या औद्योगिक व कृषी क्षेत्राकडून ऊर्जेची मागणी सतत वाढत आहे. वाढत्या शहरीकरणातून मॉल संस्कृतीतूनही विजेचा वापर वाढत आहे. मात्र मागणीच्या

तुलनेने ऊर्जा उत्पादन कमी पडते, ऊर्जा पुरवठा कमी पडतो. उद्योग क्षेत्राकडून ऊर्जेची जेवढी मागणी वाढते त्याप्रमाणात औद्योगिक उत्पादन वाढत नाही. ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी ऊर्जा साधनांची आयात करावी लागते. त्यामुळे ऊर्जेचे दर वाढत आहेत.

### ६) स्थापित उत्पादन क्षमतेचा अपुरा वापर

नियोजन काळात जे जलविद्युत प्रकल्प, औष्णिक वीज प्रकल्प उभारण्यात आले त्यांच्या स्थापित उत्पादन क्षमतेचा पर्याप्त वापर झाला नाही. प्रकल्प उभारणीस विलंब झाला. त्यामुळे उत्पादनात पुरेशा प्रमाणात वाढ झाली नाही. याबरोबरच पंचवार्षिक योजना काळात वीज उत्पादनाचे जे इष्टांक ठरविण्यात आले ते पूर्ण झाले नाहीत. त्यामुळेही ऊर्जा संकटात भर पडली.

### ७) वितरणात मोठ्या प्रमाणात अपव्यय

ऊर्जेचा पुरवठा होत असताना किंवा वितरण होत असताना मोठ्या प्रमाणात ऊर्जा वाया जाते. वीजपुरवठ्याबाबत ही समस्या गंभीर स्वरूपाची आहे. यामुळे विजेचा कार्यक्षमपणे वापर होत नाही.

भारताचे राष्ट्रीय उत्पन्न ६ ते ८% वृद्धिदराने वाढते, उद्योगांचा विकास ४ ते ५% वृद्धीदराने होत आहे. परंतु ऊर्जास्त्रोताची वाढ २ ते ३% नी होत आहे. देशातील जलविद्युत प्रकल्पांचा पूर्णपणे वापर झालेला नाही. १.५ लाख मेगावॅट वीजनिर्मिती करू शकेल एवढे जलविद्युत प्रकल्प उभारले जाऊ शकतात आणि एवढे पाणी अडवले जाऊ शकते, तसेच भारतातील अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा विकास अजून पहिल्या टप्प्यातच आहे. या सर्व परिस्थितीवरून भारतात ऊर्जासंकट असल्याचे स्पष्ट होते.

## ४.२.७ ऊर्जा संकटावर उपाययोजना

### १) देशांतर्गत उत्पादनात वाढ

मागणी पुरवठ्यातील असमतोल दूर करण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे ऊर्जा स्त्रोतांची वाढ करणे व ऊर्जा उत्पादनात वाढ करणे हा होय. आज भारताकडे ८२४० कोटी टन कोळशाचा साठा आहे. खनिज तेलाचे साठे ७६.३ कोटी टन असण्याची शक्यता आहे. ४७.७ कोटी टन नैसर्गिक वायूचा साठा आहे. जलविद्युत निर्माण करण्याची क्षमता ७५४०० मेगावॅट आहे. अणुऊर्जा निर्माण करण्यासाठी युरेनियमचा ३४,३०० टन व थोरियमचा ३,७३,००० टन साठा आहे. या सर्व साठ्यांचा पर्याप्त वापर केल्यास ऊर्जा उत्पादनात वाढ होऊन ऊर्जा संकटाची तीव्रता कमी होईल.

### २) कोळसा वापरावर भर देणे

भारताकडे कोळशाचे पुरेसे साठे आहेत, पण कोळशाच्या उत्खननाचे कार्य अपेक्षित वेगाने होत नाही. त्यामुळे ऊर्जा संकटात भर पडते. २०००-२००१ या वर्षात भूमिगत कोळसा उत्खननात ०.१% नी घट झाली. उत्पादनात वाढ झाल्यास कोळशाच्या वापरात वाढ होऊन ऊर्जा निर्मीती अधिक होऊ शकेल.

### ३) जलविद्युत स्त्रोतांचा जास्त वापर करणे

औष्णिक ऊर्जेपेक्षा जलविद्युत निर्माण करण्याचा खर्च जास्त आहे. मात्र औष्णिक ऊर्जा निर्माण करण्यात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. म्हणून जलविद्युत स्त्रोतांचा जास्त वापर करणे योग्य ठरते.

अलीकडील काळात देशातील महानद्यांना जोडण्याच्या कार्यक्रमावर भर दिला जात आहे. ही योजना यशस्वी झाल्यास मोठ्या प्रमाणात जलविद्युत निर्माण होऊ शकेल.

### ४) वीजनिर्मितीत पर्यायी साधनांचा वापर करणे

औष्णिक ऊर्जा निर्माण करण्यासाठी कोळशाचा वापर केला जातो. कोळशा बरोबरच नाफ्ता आणि नैसर्गिक वायूवर चालणाऱ्या प्रकल्पांची उभारणी केल्यास वीज उत्पादनात वाढ होईल. महाराष्ट्रात दाभोळ येथील एन्रॉन प्रकल्पात नाफ्ताचा इंधन म्हणून वापर केला जातो.

### ५) संशोधन व उत्खनन कार्याला गती देणे

१९७३ व १९९० च्या ऊर्जा संकटाची तीव्रता वाढल्याने भारत सरकारने संशोधन कार्याला गती देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बॉम्बेहाय, गुजरात, आसाम या ठिकाणी तेलाचे नवीन साठे उपलब्ध झाले. नव्या आर्थिक धोरणांमुळे खाजगी क्षेत्रामार्फतही संशोधनासाठी प्रयत्न होत आहेत. तेल साठ्यांचा व उर्जा साधनांचा शोध घेण्याच्या कार्याला गती दिली, तेलाचे उत्पादन वाढले तर उर्जा संकटाची तीव्रता कमी होऊ शकेल.

### ६) अपारंपरिक स्त्रोतांच्या विकासावर भर

भारताची ऊर्जेची मागणी फक्त पारंपरिक ऊर्स्त्रोतांकडून पूर्ण केली जाऊ शकत नाही. म्हणून अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा वापर वाढविण्यावर भर दिला पाहिजे. भारताची भौगोलिक परिस्थिती, हवामान इत्यादीचा विचार केल्यास असे लक्षात येते की भारतात बायोगॅस, सौर ऊर्जा, पवनऊर्जा निर्मितीच्या दृष्टीने अनुकूलता आहे. म्हणून शासनाने विविध उपक्रम हाती घ्यावेत की ज्यामुळे अपारंपरिक ऊर्जा मोठ्या प्रमाणात निर्माण होईल व अपारंपरिक ऊर्जेचा अधिक वापर होऊ शकेल.

### ७) ऊर्जा बचतीवर भर देणे

उपलब्ध आकडेवारीनुसार असे स्पष्ट होते की भारतात ऊर्जेचा उपभोग सतत वाढत आहे. तसेच आवश्यकतेपेक्षा जास्त वापर केला जातो. व्यापारी ऊर्जेचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. यावर उपाय म्हणून ऊर्जेची बचत करणे आवश्यक आहे. जुनी यंत्रसामग्री बदलून नवी व आधुनिक यंत्रे वापरली गेली पाहिजेत. कृषीक्षेत्रातही पाण्याचा उपसा करण्यासाठी वापराल्या जाणाऱ्या पंपाचे प्रमाणिकरण केले पाहिजे. इत्यादीमुळे ऊॅची बचत होण्यास मदत होईल.

भारत सरकारने विदेशी गुंतवणूक वाढविण्याचे धोरण ऊर्जा संकटाची तीव्रता कमी करण्यासाठी घोषित केले. अनिवासी भारतीयांनी भारतात विविध राज्यांत wind farms व सौर संयंत्र सुरू केले. विशेषतः आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश, केरळ या राज्यांत सुरू केलेल्या सौर संयंत्रांची (Solur Plant) ४५० मेगावॅट ऊर्जानिर्मितीची क्षमता आहे. भारत सरकारने ऊॅनिर्मितीसाठी अनेक योजना हाती घेतलेल्या असल्या तरीही भारताला ऊर्जेची कमतरता भेडसावते. अजूनही सर्वत्र मोठ्या प्रमाणात भारनियमनाच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे.

## ४.२.८ वाहतूक (Transport)

कोणत्याही अर्थव्यवस्थेत वाहतुकीचे स्थान महत्त्वाचे आहे. देशाच्या आर्थिक

विकासात वाहतूकीची भूमिका भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. शेती, उद्योग, व्यापार, व्यवसाय अशा विविध क्षेत्रांच्या विकासासाठी कार्यक्षम अशा वाहतूक व्यवस्थेची आवश्यकता असते. वाहतुकीद्वारे उत्पादन घटकांची, मालाची, यंत्रांची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण केली जाते. वाहतुकीमुळे श्रम व वस्तू यांना गतिशीलता प्राप्त होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग वाढण्यास मदत होते.

**वाहतुकीचे महत्त्व**

**१) उत्पादनास मदत**

आधुनिक काळात वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जाते. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर कच्चा माल, यंत्रे यांची आवश्यकता असते. वाहतूक व्यवस्थेमुळे ज्या ठिकाणी उत्पादन कार्य चालू आहे तेथपर्यंत कच्चामाल व इतर उत्पादन घटक पोहोचविणे शक्य होते. कार्यक्षम वाहतूक व्यवस्था असेल तर कमी खर्चात कच्चा माल कारखान्यांपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे उत्पादन अखंडपणे चालू राहण्यास मदत होते.

**२) बाजारपेठांचा विस्तार**

वाहतुकीमुळे मालाची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण करणे शक्य होते. वेगवेगळ्या ठिकाणी व दूरपर्यंत माल पाठविता येतो. त्यामुळे बाजाराचा विस्तार होण्यास मदत होते.

**३) नाशवंत मालाच्या उत्पादनास मदत**

नाशवंत वस्तूंच्या दृष्टीने वाहतूक व्यवस्था महत्त्वाची असते. शेती क्षेत्रातून उत्पादित होणाऱ्या नाशवंत मालाला त्वरित बाजारपेठ मिळण्यासाठी कार्यक्षम वाहतूक व्यवस्था उपलब्ध असावी लागते. फळे, भाजीपाला, फुले, दूध अशा विविध प्रकारचा नाशवंत माल कमी वेळेत बाजारपेठेत पोहोचविणे आवश्यक असते. म्हणून वाहतूक व्यवस्थेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

**४) व्यापारवाढीस मदत**

वाहतुकीमुळे वस्तूंची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण करणे शक्य होते. बाजारपेठांचा विस्तार वाहतुकीमुळे होत असल्याने व्यापार वाढीस मदत होते. कार्यक्षम वाहतुकीमुळे देशांतर्गत व्यापाराबरोबरच आंतराष्ट्रीय व्यापाराच्या वाढीला मदत होते.

**५) उत्पादन घटकांना गतिशीलता प्राप्त होते**

वाहतुकीमुळे मनुष्यबळ, यंत्रे, भांडवल अशा विविध प्रकारच्या साधन संपत्तीला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेता येते. वाहतूक व्यवस्थेमुळे श्रम, यंत्रे, कच्चामाल, यंत्राचे सुटे भाग यांना गतिशीलता प्राप्त झाली आहे. त्यामुळे उपलब्ध साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर होण्यास मदत झाली आहे. परिणामी उत्पादकतेत वाढ झाल्याचे दिसून येते.

**६) मागणी व पुरवठा यात समतोल**

अर्थव्यवस्थेतील काही प्रदेशात विशिष्ट वस्तूंचे उत्पादन विपुल प्रमाणात होते तर इतर ठिकाणी त्या वस्तूंचे उत्पादन होत नाही. अशा वेळी वाहतुकीच्या साधनांद्वारे ज्या

ठिकाणी उत्पादन होत नाही तेथे वस्तूंचा पुरवठा करणे शक्य होते. देशाच्या एखाद्या भागात दुष्काळ पडला तर तेथे वस्तूंचा पुरवठा करून तेथील लोकांची मागणी पूर्ण करता येते. थोडक्यात वाहतुकीमुळे मागणी-पुरवठा यात समानता प्रस्थापित होऊ शकते.

### ७) औद्योगिक विकासाला मदत

देशाचा औद्योगिक विकास वेगाने होण्यासाठी जलद व कार्यक्षम वाहतुकीची आवश्यकता असते. उद्योगांची स्थान निश्चिती वाहतुकीच्या उपलब्धतेवरही अवलंबून असते. वाहतुकीची, उद्योगांची उभारणी, विकास व आधुनिकीकरण इत्यादी बाबतीत मदत होते.

### ८) ग्राहकांना वस्तूंची उपलब्धता

ग्राहकांना अनेक प्रकारच्या वस्तूंची गरज असते. या वस्तू ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वाहतूक व्यवस्था महत्त्वाची ठरते. वाहतुकीमुळे देशातील उपभोगाचे प्रमाण वाढण्यास मदत होते. उत्पादनाप्रमाणेच उपभोगही महत्त्वाचा असल्याने उपभोग कार्यास मदत करण्याचे वाहतुकीचे कार्य महत्त्वाचे आहे.

### ९) किंमतपातळीत स्थैर्य

वस्तूंची मागणी व पुरवठा यात होणाऱ्या बदलानुसार किंमतपातळीत बदल होतो. एखाद्या भागात मागणीपेक्षा पुरवठा जास्त झाला तर किंमती कमी होतात. याउलट पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त झाली तर किंमती वाढतात. मात्र वाहतुक व्यवस्थेमुळे सर्वत्र मागणी- पुरवठ्यात समानता प्रस्थापित होऊन किंमत पातळीत समानता व स्थैर्य प्रस्थापित होण्यास मदत होते.

### १०) समतोल आर्थिक विकास

देशाचा आर्थिक विकास हा मोठ्या प्रमाणावर वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून असतो. ग्रामीण भागात विकास कमी असतो मात्र वाहतूक व्यवस्था उपलब्ध झाली तर ग्रामीण भागाचाही विकास होण्यास मदत होते. परिणाम समतोल आर्थिक विकास होऊ शकतो.

## ४.२.९ वाहतुकीचा विकास

अर्थव्यवस्थेचा विकासाचा वेग वाढविण्यासाठी वाहतूक व्यवस्था महत्त्वाची असते म्हणून नियोजन काळात रस्ते वाहतूक, विमान वाहतूक, जलवाहतूक यासर्व प्रकारच्या वाहतुकीचे देशभर जाळे निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाला आहे. सर्व महत्त्वाची शहरे परस्परांना रस्ते वाहतुकीने जोडण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने नियोजन काळात प्रयत्न केला आहे. उदा. पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवे, बंगळुर - कोलकता - दिल्ली- अहमदाबाद- मुंबई हा राष्ट्रीय महामार्ग हे त्याचे उदाहरण आहे. त्यामुळे हजारो लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. ग्रामीण भागसुद्धा परस्परांना जोडले जावेत यासाठी राज्यपातळीवर रस्ते विकास महामंडळ कार्य करते. अशा रस्त्यांच्या जाळ्यामुळे प्रवासी वाहतूक व वस्तूंची वाहतूक सुलभ बनली आहे. त्यामुळे पर्यटन विकासाला सुद्धा चालना मिळाली आहे. दुर्गम भागापर्यंत रस्ते वाहतूक पोहोचल्यामुळे नैसर्गिक आपत्ती प्रसंगी लोकांना औषधे, कपडे, अन्नधान्य अशी मदत पोहोचविता येते.

विमान वाहतुकीत सुद्धा सार्वजनिक कंपन्यांनी (एअर इंडिया व इंडियन एअरलाइन्स) खाजगी क्षेत्रात प्रवेश केला आहे. नवीन बोईंग विमाने खरेदी करणे, विमानतळांचे आधुनिकीकरण करणे, त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जा मिळविणे या दृष्टीने नियोजन काळात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली आहे.

जलवाहतुकींच्या दृष्टीने किनारपट्टीवर नवीन बंदरांचा विकास करणे, जहाजबांधणी प्रकल्प हाती घेणे या बाब नियोजन काळात विचारात घेण्यात आल्या आहेत. नियोजन काळात वाहतूक क्षेत्राचा देशांतर्गत विकास व्हावा या दृष्टीने शासनाने केलेली तरतूद पुढीलप्रमाणे -

**नियोजन काळातील गुंतवणूक - वाहतूक क्षेत्र**

| **योजना** | **गुंतवणूक (कोटी रु.)** | **योजना** | **गुंतवणूक (कोटी रु)** |
|---|---|---|---|
| पहिली योजना | ५२० | सातवी योजना | ४१,००० |
| दुसरी योजना | १३०० | आठवी योजना | १,०५,५७० |
| तिसरी योजना | २१२० | नववी योजना | १,६८,९४० |
| चौथी योजना | ३२४० | दहावी योजना | २५,९९७ |
| पाचवी योजना | ६८७० | अकरावी योजना | ५,७२,४१३ |
| सहावी योजना | १७८६० | | (२००१-०२ च्या किंमतीनुसार) |

संदर्भ - इंडियन इकॉनॉमी - दत्त आणि सुंदरम, ६५ वी आवृत्ती.

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, नियोजन काळात सरकारने वाहतूक क्षेत्राच्या विकासासाठी गुंतवणुकीत सतत वाढ केलेली आहे.

भारतातील वाहतूक क्षेत्राची वाढ

| | १९५०-५१ | १९७०-७१ | २००५-०६ | २००९-१० |
|---|---|---|---|---|
| १) रेल्वे मार्गांची लांबी (000कि.मी.) | ५३,६०० | ५९,००० | ६३,००० | ६४,००० |
| २) रस्ते एकूण लांबी (००० किमी.) | ४०० | ९१५ | २७१३ | ४२३६ |
| माल वाहतूक वाहनांची संख्या (०००) | ८२ | ३४३ | ४७८२ | --- |
| ३) जल वाहतूक - आंतरराष्ट्रीय जल | ०.२ | २.२ | ७.० | ९.७ |
| वाहतूक (दहालक्षटन) बंदरे वाहतूक (द.ल.टन) | १९ | --- | ४२४ | ५६२.७ |
| ४) हवाई वाहतूक प्रवासी संख्या (लाखात) | --- | २६ | ३१८ | ५६९ |

**संदर्भ - इंडियन इकॉनॉमी - दत्त आणि सुंदरम, ६५ वी आवृत्ती**

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, रेल्वेची सामान वाहतुकीच्या बाबतीत ३% वाढ नियोजन काळात झाली असली तरी रेल्वेरुळांची लांबी वाढविण्याची गती मात्र मंद

होती. तर रस्त्यांचे जाळे मात्र वार्षिक ५% दराने वाढले आणि मालवाहतुकीत ७% वाढ होत राहिली. देशातील ७०% खेडी रस्त्यांनी जोडली गेली आहेत. बंदरातील वाहतूक फक्त १.४% नी वाढली तर विमान प्रवासी वाहतुकीत वार्षिक ९% नी वाढ झाली. मुख्य बंदरातील वाहतुकीत १९५१ ते २०११ या काळात ५% वाढ झाली.

### ४.२.१० वाहतुकीच्या समस्या

१) नियोजन काळत अत्यंत मंद गतीने वाहतुकीचा विकास झालेला आढळतो.

२) रस्त्यांची रुंदी कमी आहे. १५% राष्ट्रीयमहामार्ग आणि ७५% राज्य महामार्ग एकमार्गी आहेत.

३) वाहतूक व्यवस्थेत निकृष्ट साहित्याचा वापर केला जातो. तसेच त्यात भ्रष्टाचारही मोठ्या प्रमाणात आहे.

४) वाहतूक व्यवस्था महाग आहे. वाहतूकीचे दर जास्त आहेत.

५) वाहतूक व्यवस्थेची क्षमता कमी आहे.

६) जुनाट व कालबाह्य यंत्रणेचा वापर वाहतूक व्यवस्थेत केला जातो.

७) भारतातील वाहतूक व्यवस्थेची कार्यक्षमता कमी आहे.

### ४.२.११ वाहतुकीचे प्रकार

वाहतुकीचे पुढील चार प्रकार आढळतात.

१) रस्ते वाहतूक ----

२) रेल्वे वाहतूक ----------

३) जल वाहतूक ---------

४) हवाई वाहतूक --------

### रस्ते वाहतूक

भारत हा खंडप्राय देश आहे. सुमारे ७०% लोक ६ लाख खेड्यांत राहतात. अशा देशात मालवाहतूक व प्रवाशांची वाहतूक करण्यासाठी रस्ता वाहतूक अत्यंत सोयीची आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत रस्ता वाहतुकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्याप्रमाणे मानवी शरीरात रक्तवाहिन्यांना महत्त्व आहे. त्याप्रमाणे रस्ते वाहतूक देशात श्रम, माणसे, माल, वस्तू यांना वाहून नेण्यासाठी महत्त्वाची असते.

### आर्थिक विकासात रस्त्यांचे महत्त्व

रस्ते वाहतूक अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असून, अल्प आणि मध्यम अंतरासाठी रस्ता वाहतूक अतिशय उपयुक्त आहे. ही वाहतूक व्यवस्था खेड्यापाड्यात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांना देशाच्या इतर भागाशी जोडून मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने मूलभूत सुविधा पुरविते. रस्ते वाहतुकीचे महत्त्व पुढीलप्रमाणे –

### १) रोजगार निर्मितीला मदत

रस्ते वाहतूक हे रोजगार निर्मिती करणारे महत्त्वाचे क्षेत्र आहे. फार मोठ्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देण्याचे कार्य रस्ता वाहतूक करते. रस्ता तयार करणे, पक्के रस्ते करणे, रस्त्यावरील वाहतूक करणे, रस्त्यांसाठी खडी, डांबर सिमेंट इत्यादीचे उत्पादन करणे अशा अनेक आर्थिक क्रियांमधून रोजगार निर्मिती करण्यास रस्ता वाहतूक मदत करते.

### २) औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला मदत

देशातील उद्योगसंस्थांना आवश्यक असलेला कच्चामाल उद्योगांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि तयार झालेला पक्का माल बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यासाठी रस्ते वाहतूक उपयुक्त ठरते. रस्त्यांचा जसजसा विकास होतो, तसतशी गतिशीलता वाढते. यामुळे उद्योगांना कमी वेळेत कच्चा माल उपलब्ध होतो. तयार झालेला पक्का माल बाजारपेठेपर्यंत कमी वेळेत पोहोचविता येतो. त्यामुळे उत्पादनाचा वेग वाढण्यास मदत होते.

### ३) कमी भांडवल

रेल्वे व हवाई वाहतुकीशी तुलना केल्यास रस्त्यांना कमी भांडवल लागते. देशातील सर्व खेड्यांना जोडणाऱ्या रेल्वे मार्गाची बांधणी करणे अशक्य आहे. भारतासारख्या भांडवलाची टंचाई असलेल्या देशाच्या दृष्टीने रस्ते विकासाचे महत्त्व जास्त आहे.

### ४) शेती विकासाला मदत –

कृषी क्षेत्राच्या विकासात रस्त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. रस्त्यांमुळे कृषी क्षेत्राला आवश्यक असणाऱ्या आदानांची शेतीपर्यंत वाहतूक करता येते. कृषी उत्पादित माल बाजारपेठेपर्यंत / घरापर्यंत / गोदामापर्यंत वाहून नेता येतो. त्यामुळे शेतकऱ्यांचीही कार्यक्षमता वाढते.

### ५) देशाच्या संरक्षण क्षेत्राला मदत

वाहतूक व्यवस्थेमुळे देशाच्या संरक्षण क्षेत्रात मदत होते. अंतर्गत शांतता प्रस्थापित करताना ही रस्ते वाहतूक उपयुक्त ठरते. युद्धकाळात संरक्षण साहित्याची ने आण करणे, सैनिकांची वाहतूक करणे, पोलीस यंत्रणेची वाहतूक करणे इत्यादीसाठी रस्ते जास्त उपयुक्त ठरतात.

### ६) पर्यटन विकासाला मदत

वेगवेगळी पर्यटन स्थळे, थंड हवेची ठिकाणे, धार्मिक स्थळे रस्त्यांच्या माध्यमातून जोडली जातात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्यास मदत होते.

### ७) सरकारी उत्पन्नाचे साधन

रस्ता वाहतुकीमुळे सरकारला विविध मार्गांनी उत्पन्न मिळू शकते. वाहनांवर रोड टॅक्स, टोल टॅक्स आकारूनही सरकारला महसूल मिळतो.

### ८) ग्रामीण विकासात योगदान

रस्तेवाहतूक ग्रामीण विकासाचे प्रभावी साधन आहे. रस्त्यामुळे ग्रामीण भागातही विविध साधनसामग्रीचा वेळेवर पुरवठा करता येतो. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होते.

### ९) कमी अंतरासाठी योग्य साधन

कमी अंतरावर साधनसामग्री पाठविण्यासाठी रस्ता वाहतूक योग्य साधन ठरते. वैयक्तिक सेवा हे रस्ता वाहतुकीचे वैशिष्टये असून ते छोट्या युनिटमुळे शक्य होते. कमी अंतरासाठी मोटार वाहतूक ही रेल्वे वाहतुकीपेक्षा श्रेष्ठ ठरते. सुरक्षित, नियमित, गतिमान व स्वस्त अशी मोटार वाहतूक इतर वाहतुकी पेक्षा फायदेशीर आहे.

## ४.२.१२ रस्त्यांचा विकास (Development of Roads)

भारतात नियोजनकाळात रस्ते विकासासाठी शासनाने अनेक उपक्रम हाती घेतले. रस्ते विकासासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली. पहिल्या योजनेत रस्त्यांची लांबी ५,३२,९१० कि.मी. करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. दुसऱ्या योजनेअखेर ६,५६,७०० कि.मी. लांबीचे रस्ते अस्तित्वात होते. २००८ मध्ये रस्त्यांची लांबी ४२३६.४ लाख कि.मी. पर्यंत वाढली.

२५ डिसेंबर २००० पासून १००% केंद्र पुरस्कृत अशी गावांना रस्त्यांनी जोडण्यासाठीची प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (PMGSY) सुरू करण्यात आली . १९९८ मध्ये राष्ट्रीय महामार्गांचा विकास करण्यासाठी National Highway Development Project NHDP कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. NHFDP प्रमुख राष्ट्रीय महामार्गांशी संबंधित असून झचत्रड्ढध ग्रामीण रस्त्यांशी संबंधित आहे. काही प्रमुख शहरांना राष्ट्रीय महामार्गांशी जोडण्यासाठी तिसरी नवीन योजना प्रधानमंत्री भारत जोडो परियोजना (PMBSP) १४ जानेवारी २००४ पासून सुरू करण्यात आली. २००५-०६ मध्ये भारत निर्माण योजना सुरू करण्यात आली. दहाव्या योजनेत ४२,५७७ कोटी रु. रस्तेबांधणी व देखभालीवर खर्च करण्यात आले. दहाव्या योजनेत वाहतूक क्षेत्रावर एकूण सार्वजनिक खर्चाच्या १६.३% तर अकराव्या योजनेत ५.७% खर्च निर्धारित केला होता.

प्रशासनाच्या सोईसाठी रस्त्यांचे पाच गटात वर्गीकरण केले जाते.

### १) राष्ट्रीय महामार्ग

याद्वारे देशाची आणि राज्यांच्या राजधान्या जोडल्या जातात. याबरोबरच देशातील मोठी शहरे, बंदरे जोडली जातात. उदा. मुंबई-आग्रा महामार्ग

सध्या ७०,९३४ कि.मी. लांबीचे राष्ट्रीय महामार्ग आहेत. एकूण रस्त्यांमधील हे प्रमाण जवळपास २% असले तरी देशातील ४०% वाहतूक या मार्गांवरून होते. राष्ट्रीय महामार्गांचे विकास व देखभालीचे काम परिवहन मंत्रालय, राज्यांचे लोकनिर्माण विभाग, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण तसेच सीमा सुरक्षा संघटना करतात. रुंदीनुसार राष्ट्रीय महामार्गांचे वर्गीकरण सिंगल लेन, डबल लेन, मल्टीलेन असे केले जाते. भारतात एकूण २९९ राष्ट्रीय महामार्ग आहेत.

### २) राज्य महामार्ग

याद्वारे राज्याची राजधानी, जिल्ह्याची ठिकाणे, प्रमुख तालुके व ग्रामीण भागातील प्रमुख बाजारपेठा जोडल्या जातात. काही राज्यमार्ग आंतरराज्यीय असतात. उदा. बऱ्हाणपूर

– अंकलेश्वर राज्यमार्ग. हा राज्य मार्ग मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या तीन राज्यांना जोडतो.

बहुतांश राज्यमार्ग हे राष्ट्रीय महामार्गांना जोडलेले असतात. राज्य महामार्गांची बांधणी विकास व देखभाल सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळ बघतात. भारतात सुमारे १,५४,५२२ कि.मी. लांबीचे राज्य महामार्ग आहेत. सर्वाधिक जास्त लांबीचे राज्य महामार्ग महाराष्ट्रात (३४१०३ कि.मी.) असून त्याखालोखाल कर्नाटक व गुजरात राज्यात आहेत.

## ३) जिल्हा रेल्वे

जिल्ह्यांतील प्रमुख शहरे व तालुक्यांना जोडणारे हे रस्ते असतात. जिल्ह्यातील प्रत्येक खेड्यांपर्यंत रस्ते तयार करून प्रत्येक खेडे जिल्ह्याशी, तालुक्याशी जोडले जातात. देशात सर्व जिल्हा रस्त्यांची लांबी २५,७७,३९६ कि.मी. आहे.

## ४) वर्गीकृत रस्ते

हे रस्ते खेडे किंवा खेड्याच्या समूहांना एकमेकांशी जोडतात. ते जिल्हयातील रस्ते, राज्यमार्ग महामार्ग यांच्याशी जोडले जातात.

## ५) अवर्गीकृत रस्ते

हे रस्ते जास्त करून कच्चे असतात. ते माती, मुरुम, खडीने तयार केलेले असतात. या रस्त्यांना ग्रामीण रस्ते असेही म्हणतात. ग्रामीण रस्त्यांची बांधणी व देखभाल जिल्हा परिषदा महानगरपालिका नगरपालिका, वनविभाग करतात.

**रस्ते विकास**

| | १९५०–५१ | १९८०–८१ | २००५–०६ |
|---|---|---|---|
| १) रस्त्यांची लांबी (हजार किमी) | ४००.०० | १४८५.४ | २७१२.५ |
| २) राष्ट्रीय महामार्ग लांबी (हजार किमी) | १९.८ | ३१.७ | ६६.६ |
| ३) राज्य महामार्ग लांबी (हजार किमी.) | --- | ९४.४ | १३२.४ |
| ४) नोंदणीकृत वाहनांची संख्या (हजार) | | | |
| सर्व वाहने | ३०६.० | ५३९१.० | ८४८९६.० |
| मालवाहक वाहने | ८२.० | ५५४.० | ७८२.० |
| प्रवासी बस | ३४.० | १६२.० | ९३४.० |
| ५) रस्ते वाहतुकीपासून महसूल (कोटी रु.) | | | |
| केंद्र सरकार | ३४.८ | ९३०.० | ४९९९१.० |
| राज्य सरकार | १२.६ | ७५०.४ | २१६८९.१ |

**संदर्भ – आर्थिक सर्वेक्षण २००७–०८**

१९५०–५१ मध्ये रस्त्यांची लांबी ४०,००० कि.मी. होती ती २००५–०६ पर्यंत २७१२.५ लाख कि.मी. पर्यंत वाढली. रस्त्यांच्या लांबीत दरवर्षी सरासरीने १७.७% नी वाढ झाली. यात राष्ट्रीय महामार्गांची लांबी १९.८ हजार किमी. होती ती ६६.६ हजार कि.मी. पर्यंत वाढली. राज्यरस्त्यांची लांबी २००५–०६ मध्ये १३२.४ हजार कि.मी. होती. वाहनांच्या संख्येतही वरील तक्त्यानुसार वाढ झालेली दिसून येते. तसेच रस्त्यांपासून

केंद्रसरकारला मिळणारा महसूल १९५०-५१ ते २००५-०६ या कालखंडात ३४.८ कोटी रू. वरून ४९९९१ कोटी रु. वाढला तर राज्यसरकारला मिळणारा महसूल याच कालखंडात १२.६ कोटी रु. वरुन २१६८९.१ कोटी रु. पर्यंत वाढला.

### ४.२.१३ रस्ते विकासाच्या समस्या

#### १) रस्ते विकासाची मंदगती

भारतात राष्ट्रीय महामार्गांच्या लांबीत दरवर्षी सरासरी ३.७३% नी वाढ झाली तर राज्यमार्गाच्या लांबीत ८.९% नी वाढ झाली. या वाढीचा वेग बरा असला तरी रस्त्यांवरील वाहनांची संख्या ज्या गतीने वाढली त्याच्या तुलनेत रस्त्यांच्या लांबीच्या वाढीचा वेग मंद आहे.

#### २) राष्ट्रीय महामार्गांवर अवास्तव ताण

एकूण रस्त्यांमध्ये महामार्गांचा वाटा कमी आहे. पण एकूण रस्त्यावरील वाहतुकीपैकी सुमारे ४०% वाहतूक राष्ट्रीय महामार्गावरून केली जाते. वाहतूक साधनांच्या संख्येत प्रचंड वेगाने वाढ झाल्याने राष्ट्रीय महामार्गावर अवास्तव ताण वाढत आहे.

#### ३) एक पदरी महामार्ग

आजही देशातील एकूण राष्ट्रीय महामार्गांपैकी १५% महामार्ग एकपदरी आहेत तर राज्य महामार्गांपैकी ७५% महामार्ग एकपदरी आहेत. त्यामुळे वाहतुकीची गती कमी होते, इंधनाचा खप वाढतो आणि वाहतुकीचा सरसरी खर्च वाढतो.

#### ४) कच्चा रस्त्यांच्या समस्या

भारतात १९५०-५१ मध्ये पक्क्या रस्त्यांची लांबी १५७ हजार कि.मी. होती तर कच्च्या रस्त्यांची लांबी २४३ हजार कि.मी. होती. म्हणजे एकूण रस्त्यात कच्च्या रस्त्यांचे प्रमाण ६०.७५% होते, तर पक्क्या रस्त्यांचे प्रमाण ३९.२५% होते. १९९५-९६ मध्ये पक्क्या रस्त्यांचे प्रमाण वाढले. मात्र हा वाढीचा वेग फक्त ०.३२% होता. कच्चा रस्त्यांचे प्रमाण ४५.७०% होते. अशा रस्त्यांवरून वाहतूक करणे खूपच अडचणीचे ठरते.

#### ५) रस्तेवाहतुकीत व्यत्यय

भारतातील बऱ्याचशा रस्त्यांवर आजही पूल नाहीत. रेल्वे क्रॉसिगच्या ठिकाणी उड्डाण पूल नाहीत. रस्ते एकपदरी आहेत. रस्त्यांच्या कडा खराब आहेत. शासकीय आणि राजकीय भ्रष्टाचारामुळे रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची केली जातात. त्यामुळे रस्त्यांमध्ये खड्डे तयार होतात. या सर्व कारणामुळे रस्ते वाहतुकीत अडचणी येतात.

#### ६) रस्त्यांवरील वाढते अपघात

रस्त्यांची कमी रुंदी, रस्त्यातील खड्डे, रस्त्यांच्या खराब कडा, वाहतूक नियमांचे उल्लंघन, वाहनांचा जास्त वेग इत्यादी कारणांमुळे रस्त्यांवरील अपघाताची संख्या वेगाने वाढत आहे.

#### ७) रस्त्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष

रस्त्यांच्या निर्मितीसाठी सरकारला जेवढा खर्च करावा लागतो त्यापेक्षा त्यापासून मिळणारे उत्पन्न खूपच कमी आहे. रस्ते देखभालीच्या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात करावी लागते. हा खर्च तुलनात्मक

दृष्ट्या कमी आहे. त्यामुळे रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले जात नाहीत. परिणामी रस्ता वाहतूक कार्यक्षम होऊ शकत नाही.

### ४.२.१४ रस्ते वाहतूक सुधारणेसाठी उपाय

१) राज्य व केंद्र यात समन्वय असावा.

२) पुरेशा प्रमाणात रस्तेबांधणी करण्याची गरज आहे.

३) रस्त्यांची योग्य देखभाल करण्यात यावी.

४) मोटार वाहतुकीबाबत राज्याराज्यात समन्वय असावा.

५) वाहनांवरील करात कपात करावी.

६) पक्क्या रस्त्यांची बांधणी करण्यात यावी.

भारत सरकारने नियोजन काळात अनेक उपाय हाती घेतले आहेत. तसेच १९९० च्या दशकात रस्ते विकासासाठी अनेक उपाययोजना केल्या. त्या पुढीलप्रमाणे –

१) प्रमुख राष्ट्रीय महामार्गांच्या निर्मितीसाठी जमीन संपादन करण्यासाठी कायदा करण्यात आला. यासाठी नुकसान भरपाई रकमेचाही विचार करण्यात आला.

२) प्रमुख मार्गांच्या विकासात जर जंगले येत असतील तर त्याची तोड करण्यास परवानगी देण्यात आली.

३) रस्ते विकाससंबंधीच्या नियमांमध्ये सरलता आणली.

४) सरकारने चार पदरी रस्त्यांवर रस्ते वापर शुल्क आकारण्याचे निश्चित केले. यातून गोळा होणारा पैसा रस्त्यांच्या विकासावर वापरण्याचे ठरविले आहे.

५) खाजगी–विदेशी गुंतवणूक प्रोत्साहित करण्यासाठी कायद्यामध्ये शिथिलता आणली. रस्ते आणि पूल तयार करण्यासाठी ७४% पर्यंत विदेशी भांडवल गुंतवणुकीस परवानगी दिली.

६) रस्त्यांवरील वाहतूक सेवांमध्ये ५१% पर्यंत भाग भांडवल गुंतवणूक करण्यात परवानगी देण्यात आली.

७) खाजगी भांडवल प्रोत्साहित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग ॲथॉरिटीला भाग भांडवल खरेदी करण्यास परवानगी दिली.

८) रस्त्यांचा विकास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्त संस्था, जागतिक बँक, एशियन विकास बँक, ओव्हरसिज बँक यांच्याकडून दीर्घकालीन कर्जाची उचल केली. या उपायांमुळे भारतात रस्ते वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जात आहे असे स्पष्ट होते.

### ४.२.१५ रेल्वे वाहतूक Railway Transport

प्रवासी व मालवाहतूक यासाठी उपयुक्त असलेली रेल्वे सेवा देशाच्या सर्व भागात नियोजन काळात विस्तारलेली आहे. रेल्वेचे स्वतंत्र मंत्रालय कार्यरत असून स्वतंत्रपणे अंदाजपत्रक सादर केले जाते. प्रशासन खूप मोठे आणि गुंतवणूक खूप मोठ्या प्रमाणात आहे. पॅसेंजर, मेल, एक्सप्रेस असे प्रवासी वाहतुकीसाठी पर्याय आहेत. देशाची सर्व

महत्त्वाची शहरे या सेवेने जोडली आहेत.

मुंबई व ठाणे या दोन ठिकाणांना जोडणारी पहिली रेल्वे १९५३ साली मुंबई ते ठाणे दरम्यान सुरू झाली. त्यानंतर कलकत्त्यात रेल्वे मार्ग सुरू करण्यात आला. इ.स. १९०० दरम्यान भारतात ४०,००० कि.मी. लांबीचे रेल्वेमार्ग तयार होते आणि त्यांची मालकी इंग्रजांकडे होती. भारतीय रेल्वे हा सार्वजनिक क्षेत्रातील, भारत सरकारचा सर्वात मोठा प्रकल्प असून सरकारने यामध्ये जवळपास १०,००० कोटी रु. गुंतविले आहेत.

**रेल्वेचे महत्त्व**

**१) वस्तू वाहून नेण्याची मोठी क्षमता**

रेल्वेद्वारे प्रवाशांची व मालाची वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जाते. रेल्वे वाहतुकीचे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वाचे स्थान आहे. रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वेची क्षमता जास्त असल्यामुळे अर्थव्यवस्थेतील गतिमानता वाढण्यास मदत होते.

**२) जलद गती**

जमिनीवरील वाहतुकीच्या इतर साधनांपेक्षा रेल्वे वाहतुकीचा वेग जास्त आहे. खराब रस्ते व रस्त्यातील अडथळे यामुळे रस्ते वाहतुकीची गती मर्यादित राहते.

**३) वातावरणातील बदलाचा परिणाम नाही**

रस्ते वाहतुकीवर पावसाळ्याचा परिणाम होतो, धुक्यामुळे हवाई वाहतुकीला अडथळ येतो. मात्र त्या तुलनेत रेल्वे वाहतुकीवर हवामान बदलाचा परिणाम कमी असतो. ही वाहतूक नेहमी व्यवस्थित चालते.

**४) वाढत्या फलाचा नियम लागू**

रेल्वे वाहतुकीबाबत वाढत्या फलाचा नियम अनुभवास येतो. जेवढ्या अधिक प्रमाणात वाहतूक केली जाईल तेवढ्या प्रमाणात खर्चात घट होते.

**५) उद्योगांच्या विकासाला मदत**

रेल्वे विकासामुळे औद्योगिकीकरणास मदत होते. औद्योगिक स्थान निश्चिती करताना रेल्वे वाहतुकीचा विचार केला जातो. भारतात मुंबई, अहमदाबाद शहरात कापडगिरण्यांचे स्थानीयीकरण, कोलकाता येथील ताग उद्योग, बिहार मधील कोळसा व लोहपोलाद उद्योग, गुजरातमधील औद्योगिकीकरण इत्यादी रेल्वेवाहतुकीची देणगी आहे. उद्योगांसाठी लागणारा कच्चा माल व उद्योगातून तयार होणारा पक्कामाल यांची वाहतूक करण्यात रेल्वेचा सहभाग मोठा आहे.

**६) घटक गतिशीलतेत वाढ**

यंत्रसामग्री, यंत्राचे सुटे भाग, कामगार एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात वाहून नेल्याने भौगोलिक गतिशीलतेत वाढ होते. त्यामुळे घटकांचा पुरेपूर वापर होऊन आर्थिक विकासास चालना मिळते.

**७) संतुलित विकासाला मदत**

भारतासारख्या खंडप्राय देशाचा संतुलित विकास करण्यास, प्रादेशिक असमतोल दूर

करण्यास, वेगवेगळ्या भागातील घटकांची टंचाई व विपुलता कमी करण्यास रेल्वे वाहतूक महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते.

### ८) राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक

रेल्वेतून सर्व जाती, धर्म, पंथाचे लोक प्रवास करतात. यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण होते. वेगवेगळ्या प्रांतातील संस्कृतीचे आदान-प्रदान वाढते. सलोख्याचे संबंध वाढून सहकार्याची भावना वृद्धिंगत होते.

याशिवाय दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी, माल बंदरांपर्यंत पोहोचविण्यासाठी रेल्वे वाहतूक उपयुक्त ठरते.

## ४.२.१६ रेल्वेचा विकास

आर्थिक विकास वेगाने करण्याच्या हेतूने नियोजन काळात रेल्वेच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले. विविध योजनांमध्ये रेल्वेच्या विकासावरील खर्च आणि विकास पुढीलप्रमाणे आढळतो.

| योजना | योजनाकालीन खर्च (कोटी रू. ) | रेल्वेमार्ग लांबी (किमी.) |
|---|---|---|
| पहिली योजना | ४३२ | ५५०११ |
| दुसरी योजना | १०४३ | ५६२५७ |
| तिसरी योजना | १६८५ | ५८३८८ |
| चौथी योजना | १४२० | ६०२३४ |
| पाचवी योजना | २१५२ | ६०६९३ |
| सहावी योजना | ६५८६ | ६१६०० |
| सातवी योजना | १६५४९ | ६२३६६ |
| आठवी योजना | २७२०२ | ६२७२५ |
| नववी योजना | ४५७२५ | ६३०२८ |
| दहावी योजना (२००२-०७) | ८४००३ | ६३३३२ |

**संदर्भ - आठवी, नववी पंचवार्षिक योजना, आर्थिक सर्वेक्षण**

### भारतीय रेल्वे प्रगतीची प्रमुख वैशिष्ट्ये

१) योजनेच्या सुरूवातील रेल्वे मार्गांची लांबी १९५०-५१ मध्ये ५३५९६ किमी होती ती दहाव्या योजनेच्या शेवटी २००६-०७ मध्ये ६३३३२ किमी पर्यंत वाढली.

२) जगात रेल्वेचे दुसऱ्या क्रमांकाचे आणि आशिया खंडात पहिल्या क्रमांकाचे सर्वात मोठे जाळे भारतात आहे.

३) पहिल्या पंचवार्षिक योजनेत रेल्वे विकासावर ४३२ कोटी रुपये खर्च करण्यात आला. दहाव्या योजनेत हा खर्च ८४००३ कोटी रु. पर्यंत वाढला.

४) आधुनिकीकरणाचा भाग म्हणून भारतात रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. २००९ पर्यंत २८% मार्गांचे विद्युतीकरण झाले.

५) १९५०-५१ मध्ये रेल्वेने १२८४० लाख प्रवाशांची वाहतूक केली होती. ती संस्था २००६-०७ मध्ये ६२,२०० लाखापर्यंत वाढली तर माल वाहतूक ९३० लाख टनांवरून ७५०० लाख टनांपर्यंत वाढली.

६) १९९०-५१ ते २००६-०७ या कालावधीत रेल्वेइंजिनांची संख्या ८२०० वरून ८६६० पर्यंत वाढली, रेल्वे डब्यांची संख्या २,०६,००० वरून २०८००० पर्यंत वाढली.

७) १९५०-५१ मध्ये रेल्वेची प्राप्ती २६३ कोटी रु. प्रचालनांचा खर्च २१५ कोटी रु. निव्वळ प्राप्ती ४८ कोटी रु. मध्ये दिलेला लाभांश ३३ कोटी रु. निव्वळ वाढावा १५ कोटी रु. निर्माण झाला होता.

२००६-०७ म्धये एकूण प्राप्ती ६४७८० कोटी रु, प्रचालन खर्च ५०३३० कोटी रु., निव्वळ प्राप्ती १४४५० कोटी रु., दिलेला लाभांश ४२५० कोटी रु. निव्वळ वाढावा १०,२०० कोटी रु. पर्यंत वाढला.

८) ३१ मार्च २००२ पर्यंत रेल्वेचे व्यवस्थापन करण्यासाठी ९ झोन होते. त्यांचे नंतर विभाजन करून ही संख्या १६ पर्यंत वाढविण्यात आली.

९) रेल्वे अपघात, आतंकवादी कारवायांमध्ये जखमी झालेल्यांना १६,००० ते १,८०,००० रुपयापर्यंत आणि मृत्यु झालेल्यांना २ लाख रु. पर्यंत विमा संरक्षण रेल्वेकडून प्रदान करण्यात येते.

१०) मार्च १९९० मध्ये गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक व केरळ या चार राज्यांना जोडण्यासाठी कोकण रेल्वे प्रकल्प स्थापन करण्यात आला. हा प्रकल्प १९९८ मध्ये पूर्ण झाला. कोकण रेल्वे महामंडळाची नोंदणी २६ जुलै १९९० रोजी कंपनी कायद्याअंतर्गत करण्यात आली. महामंडळातील ५१% भांडवली वाटा भारतीय रेल्वेचा आहे.

११) देशात दिल्ली, मुंबई, कोलकाता, बेंगळूर, चैन्नई, हैद्राबाद, जयपूर येथे मेट्रो रेल्वेची कामे हाती घेण्यात आली. दिल्ली मेट्रो प्रकल्प २४ डिसेंबर २०१२ रोजी पूर्ण झाला. मेट्रो रेल्वेप्रमाणेच मुंबईत मोनोरेल प्रकल्पाचे काम सुरु आहे.

१२) रेल्वेने १७ जुलै २००७ पासून नवीन एकात्मिक रेल्वे पूछताछ प्रणाली सुरू केली आहे. १३९ टोल फ्री टेलिफोन नंबरवर उपभोक्ता रेल्वेची संपूर्ण माहिती विचारू शकतो. ही प्रणाली कॉल सेंटरवर आधारित आहे. यासाठी मुंबई, कोलकत्ता, नोईडा आणि चैन्नाई येथे कॉल सेंटर कार्यरत झाले आहेत.

अशा प्रकारे भारतीय रेल्वेची विशेष प्रगती होत असल्याचे दिसून येते.

## ४.२.१७ रेल्वे वाहतुकीच्या समस्या Problem V of Railway

### १) निर्धारित वेळेत योजना पूर्ण न होणे

१९९८ मध्ये शासनाच्या एका पाहणीनुसार रेल्वेच्या २१४ योजनांपैकी निम्म्या योजना कागदावरच होत्या. उरलेल्या योजनांपैकी निम्म्या योजना तोट्यात होत्या. रेल्वेमार्ग उभारणी, उत्पादन कारखाने उभारणी वेळ खाऊ असल्यामुळे त्या मध्येच अपुऱ्या राहतात. उशीर लागल्यामुळे खर्च वाढत जातो.

### २) भाववाढीची समस्या

रेल्वेच्या क्षेत्रात कोळसा, वीज, लोह पोलाद सिंमेट इत्यादी साधनांचा वापर केला जातो. स्वातंत्र्योत्तर काळात या सर्व साधनांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. परिणामी रेल्वे सेवा निर्माण करण्याचा खर्च प्रचंड प्रमाणावर वाढत आहे. सेवा निर्मिती खर्चात ज्या दराने वाढ होत आहे त्या दराने महसुलात वाढ झाली नाही.

### ३) आधुनिकीकरणासंबंधी समस्या

भारतात रेल्वे वाहतुकीचा दर्जा सुधारण्यासाठी व कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी जुनी व कालबाह्य इंजिने बदलणे, मालडबे बदलणे, तसेच इतर गोष्टीत बदल करून आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. मात्र ती प्रक्रिया खर्चिक असल्याने आधुनिकीकरणाची समस्या बिकट आहे. आतापर्यंत एकूण लोहमार्गांपैकी फक्त ३०% लोहमार्गांचे विद्युतीकरण झाले आहे. मीटर गेजचे ब्रॉडगेजमध्ये पूर्ण परिवर्तन झालेले नाही. डिझेल तसेच वीजआधारित रेल्वे व्यवस्थेतील तंत्रज्ञान जुनेच आहे.

### ४) इंधनाची समस्या

रेल्वेला इंधनाच्या उपलब्धतेची समस्या भेडसावत आहे. वीजपुरवठा मर्यादित असल्याने विद्युतीकरणाचा वेग कमी आहे. तसेच डिझेलच्या तुटवड्यानेही अडचणी निर्माण होतात.

### ५) विनातिकीट प्रवास आणि चोरीची समस्या

रेल्वेत विनातिकीट प्रवास करणारे प्रवासी आणि रेल्वे मालाच्या चोरीची समस्या निरंतर वाढत आहे. याचे कारण रेल्वे प्रशासनातील सुरक्षिततेचा अभाव, रेल्वे निरीक्षकांचा हलगर्जीपणा, आरक्षणातील भ्रष्टाचार इत्यादी होय. रेल्वेच्या माध्यमातून ज्या मालाची वाहतूक केली जाते त्याची मोठ्या प्रमाणावर चोरी वाढत आहे. याचा अप्रत्यक्ष बोजा रेल्वेवर पडतो.

### ६) वाढते अपघात

रेल्वे प्रशासनाचा हलगर्जीपणा, अकार्यक्षमता, सिग्नल व्यवस्थेतील बिघाड, रेल्वे लाईन दुरुस्तीकडील दुर्लक्ष जुनाट पूल इ. कारणांमुळे रेल्वे अपघातात वाढ झाली आहे. यामुळे रेल्वेचे दुहेरी नुकसान होत आहे. एकतर अपघातात प्रचंड प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान होते, दुसरे म्हणजे अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या व जखमींना नुकसान भरपाई द्यावी लागते. अपघातांची शक्यता लक्षात घेऊन रेल्वेने १ ऑगस्ट १९९४ पासून रेल्वे प्रवासी विमा योजना सुरू केली आहे. यात मृत व्यक्तीला २ लाख रुपये आणि जखमींच्या गंभीरतेनुसार १६ हजार ते १,८०,००० पर्यंत नुकसान भरपाई द्यावी लागते.

### ७) रेल्वे प्रशासनावरील वाढता ताण

१९५०-५१ ते २०००-०१ या कालखंडात रेल्वे मार्गाच्या लांबीत फक्त ९४२८ किमी ने वाढ झाली, प्रवासी डब्ब्यांची संख्या ३८४१९ ने वाढली पण प्रवासी वाहतूक ३३०१० लाख ने वाढली तर माल वाहतूक ३८५० लाख टनने वाढली. याचा अर्थ असा

की, रेल्वेच्या विकासाच्या मानाने प्रवासी व माल वाहतूक प्रमाणात जास्त वाढ झाली. परिणामी रेल्वे प्रशासनावरील ताण वाढला आहे. तिकीट विक्री, आरक्षण, तिकीट निरीक्षण यात अडचणी येतात.

### ८) प्रवासी सुविधांचा निकृष्ट दर्जा

रेल्वे स्टेशन वरील पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह, प्रतिक्षालय, साफ सफाई, भोजनालय यांचा दर्जा निकृष्ट आहे. यातील बऱ्याच सेवा खाजगी ठेकेदारांकडून पुरविल्या जातात. यांच्या सेवांचा दर्जा निकृष्ट आहे. रेल्वे प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस प्रचंड वेगाने वाढत आहे. तसतसा या सुविधांवर ताण पडत आहे. आणि सेवा दर्जा खालावत आहे.

### ९) इतर समस्या

रेल्वेविकासासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. मात्र अपुरे भांडवल ही रेल्वेसाठी समस्या आहे. म्हणजे रेल्वे विकासासाठी वित्तीय साधनसामग्रीची कमतरता आहे. भारतात मोठ्या प्रमाणात रेल्वेमार्ग एकेरी आहेत. त्यामुळे रेल्वे प्रवाशांचा वेळ वाया जातो व त्यांना गैरसोयींना तोंड द्यावे लागते. रेल्वेला सार्वजनिक उपयोगिता सेवा पुरविण्याची जबाबदारी स्वीकारावी लागते. बऱ्याचदा खर्चापेक्षा कमी किंमतीत सेवा उपलब्ध करून द्याव्या लागतात. त्यामुळे रेल्वेला मोठा खर्च करावा लागतो.

## ४.२.१८ रेल्वे सुधारणांसाठी उपाय योजना

रेल्वेवाहतुकीत सुधारणा होण्यासाठी पुढील उपाय योजना सुचविता येतील –

१) रेल्वे प्रचालनात तांत्रिक सुधारणा करून सेवा उत्पादन खर्चात घट घडवून आणणे.

२) डिझेल आणि विजेवर चालणाऱ्या इंजिनांची तांत्रिक पद्धती आता जुनी झाली आहे. आता जादा अश्वशक्तीच्या आणि इंधनाचा खप कमी करणाऱ्या इंजिनांचा शोध घेणे आवश्यक आहे.

३) तांत्रिक क्षेत्रात स्वयंपूर्णता प्रस्थापित करणे.

४) रेल्वेत कर्मचाऱ्यांची संख्या अतिरिक्त आहे. ती कमी करणे व रेल्वेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

५) निधी अभावी रेल्वेच्या ज्या विकास योजना स्थगित झालेल्या आहेत त्यासाठी भांडवल बाजारातून, वित्तीय संस्थांकडून भांडवल उभारणी करून योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

६) विना तिकीट प्रवास करणाऱ्यांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.

७) रेल्वे प्रवाशांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करणे.

८) रेल्वेच्या तंत्रज्ञानात सुधारणा करणे व रेल्वे वाहतुकीचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे.

~~भारत शासनाअंतर्गत रेल्वेचे १३ सार्वजनिक प्रकल्प मोडतात. हे सर्व प्रकल्प~~

रेल्वेच्या विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. जसे कोकण रेल्वे महामंडळ लि., उेपींरळपशी लेीीरींळेप`ष खपवळर डींव. (उजछउजठ) इत्यादी. भारतीय रेल्वेचा प्रचंड विस्तार, स्वतंत्र अर्थसंकल्प, स्वतःचे सार्वजनिक प्रकल्प इत्यादी असूनही वाढत्या लोकसंख्येला पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी भांडवलाची गरज आहे. यासाठी शासनाने खाजगी क्षेत्राचा सहभाग मिळविण्याचा निर्णय घेतला आहे.

### ४.२.१९ हवाई वाहतूक Air Transport

भारतासारख्या देशात साधनसामग्रीची दुर्मिळता आहे. अशा देशात हवाई वाहतूकही व्यवस्थापन दृष्ट्या, तांत्रिकदृष्ट्या, प्रशासकीय दृष्ट्या अधिक कौशल्य व कार्यक्षमता निर्माण करणारी आहे. वेळेची बचत करण्याचे, वेगवान आणि नाशवंत वस्तू सुव्यवस्थितपणे सर्वदूर पोहोचविण्याचे ते उत्तम साधन आहे. अलिकडच्या काळात नवीन आर्थिक धोरणामुळे, अर्थव्यवस्थेच्या प्रगतीमुळे देशांतर्गत तसेच विदेशी विमान वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रवासी आणि माल यांच्या हवाई वाहतुकीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

विमान वाहतूक इतर सर्व वाहतुकींपेक्षा जलद असली तरी अत्यंत खर्चिक असल्याने मालवाहतुकीत विमानसुविधांचा कमी वापर होतो. सहसा हलक्या आणि मौल्यवान व प्रामुख्याने प्रवासी वाहतुकीसाठी विमानसेवा वापरली जाते.

भारतात जुलै १९३२ मध्ये टाटा एअरलाईन्स कंपनीने भारतातील पहिल्या विमान वाहतुकीची सुरूवात केली. भारतातील पहिला पायलट परवाना जहांगीर रतनजी दादाभॉय (जेआरडी) टाटा यांना मिळाला. त्यांना भारतीय हवाई वाहतुकीचे जनक म्हणतात. पुढे १९४६ मध्ये या कंपनीचे नाव एअर इंडिया असे ठेवण्यात आले. स्वातंत्र्यानंतर १९४८ मध्ये एअर इंडियात ४९% भाग भांडवल भारत शासनाने गुंतवून तिचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

#### हवाई वाहतुकीचे महत्त्व

#### १) वाहतुकीचे जलद साधन

इतर वाहतूक साधनांशी तुलना करता हवाई वाहतूक हे साधन अतिशय वेगवान आहे. विमानांचा ताशी वेग ६०० ते ७०० मैल असतो. पण हे साधन अवजड वस्तूंच्या वाहतुकीसाठी उपयुक्त नाही. प्रवासी आणि हलक्या वस्तूंच्या वाहतुकीसाठीच याची उपयुक्तता आहे.

#### २) आर्थिक विकासात योगदान

कृषी क्षेत्रातील नाशवंत माल, औद्योगिक क्षेत्रातील वस्तूंची जलद वाहतूक करता येते. हवाई वाहतुकीमुळे देशाच्या विदेश व्यापारात वाढ करता येते. विदेश व्यापारात रस्ते व रेल्वेमार्ग उपयुक्त ठरत नाहीत. जल वाहतुकीचा वेग कमी असतो. म्हणून विदेश व्यापार वाढविण्यासाठी हवाई वाहतूक उपयुक्त ठरते. परिणामी देशाच्या आर्थिक विकासाला मदत होते.

#### ३) भौगोलिक अडचणींपासून मुक्त

रस्ते, रेल्वे व जल वाहतुकीत नद्या, डोंगर, दऱ्या, जंगल, बर्फाळ प्रदेश, वाळवंट, समुद्राची कमी जास्त खोली यासारख्या भौगोलिक अडचणी निर्माण होऊ शकतात. पण

हवाई वाहतूक या सर्व भौगोलिक अडचणीपांसून मुक्त आहे.

### ४) देशाच्या संरक्षणात महत्त्व

विमानाचा ताशी वेग प्रचंड असल्याने शत्रू पक्षावर काही तासांच्या आत हल्ला चढविता येतो. हवाई पाहणीच्या माध्यमातून देशाच्या सीमेवरील शत्रू पक्षाच्या सैन्यांच्या हालचालींचे निरीक्षण करता येते. अत्यंत दुर्गम अशा सीमावर्ती भागात सैन्य व युद्ध सामग्रीची वाहतूक करता येते.

### ५) वेळेची बचत करण्यात महत्त्व

या साधनाच्या जलद गतीमुळे शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आपल्या सेवा वेगवगळया देशांना पुरवून काही तास किंवा दिवसांच्या आत मायदेशी परत येऊ शकतात. त्यांना आपल्या वेळेची बचत करता येते.

### ६) पर्यटन क्षेत्रात महत्त्व

अलीकडील काळात पर्यटन उद्योग हा विदेशी चलन प्राप्त करण्याचा प्रभावी मार्ग ठरत आहे. विदेशी पर्यटक विमान वाहतुकीच्या मार्गाने आपल्या देशात येतात. त्यामुळे पर्यटन स्थळी असलेल्या हॉटेल उद्योगांचा व इतर उद्योगांचा जलद विकास होण्यास मदत होते.

## ४.२.२० हवाई वाहतुकीचा विकास

भारतात नागरी विमान सेवा इंडियन एअर लाईन व एअर इंडिया या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांबरोबरच जेट एअरवेज, सहारा, किंगफिशर, डेक्कन, स्पाईसजेट अशा महत्त्वाच्या खाजगी क्षेत्रातील कंपन्यांमार्फत देशांतर्गत प्रवासी विमानसेवा पुरविली जाते.

नियोजन काळात विमानतळांचे व विमानताफ्यांचे आधुनिकीकरण करणे, सुविधा पुरविणे इत्यादी कारणांसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला. १९५१ ते १९७१ या काळात विमानसेवा विकासासाठी १०७०१ कोटी रुपये खर्च करण्यात आला.
विमान सेवा विकासातील ठळक घटनाक्रम पुढील प्रमाणे –

१) १९५३ – नऊ खाजगी विमान कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण

२) १९६३ – मुंबई येथे एरोनॉटिक्स इंडिया लि. ची स्थापना (कार्य एअर इंजिन आणि विद्युत यंत्र तयार करणे)

३) १९७२ – मुंबई, दिल्ली, कोलकाता चैन्नई या चार आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या व्यवस्थापनासाठी एअर पोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाची स्थापना

४) १९८१ – वायुदूत विमान सेवा सुरू

५) १९८५ – पवनहंस लि. ही खनिज तेल संशोधनासाठी हेलिकॉप्टर सेवा पुरविणारी कंपनी स्थापन – आज तिचे नाव पवनहंस हेलिकॉप्टर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आहे.

६) १९८६ – देशांतर्गत विमान तळांचा विकास करण्यासाठी नॅशनल एअरपोर्ट ॲथॉरिटीची स्थापना

७) १९९५ – इंटरनॅशनल एअरपोर्ट व नॅशनल एअरपोर्ट ॲथॉरिटीचे एकीकरण करून एअर ॲथॉरिटी ऑफ इंडियाची स्थापना.

८) २००० – मुंबई, दिल्ली, कोलकाता, चेन्नाई, तिरुअंनतपूरम आणि बेंगलोर या आंतरराष्ट्रीय विमान तळाबरोबरच, कोच्ची, अहमदाबाद, गोवा, अमृतसर, गोहाट्टी या सहा विमानतळांना आंतरराष्ट्रीय विमानतळांचा दर्जा देण्यात आला.

९) २००४ – सारस या स्वदेशात निर्मित १४ आसनी विमान उड्डाणाचे परीक्षण.

१०) २००५ – जयपूर येथील विमानतळाला देशातील १३ व्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचा दर्जा.

११) २००६ – दिल्ली आणि मुंबई विमानतळांचा खाजगीकरणामार्फत विकास निर्णय

१२) २००७ – एअर इंडिया व इंडियन एअरलाईन्स या दोन सार्वजनिक कंपन्यांचे एकत्रीकरण. एकत्रीकरण केलेल्या कंपनीचे नांव 'कंपनी ऑफ इंडिया लि. (NACIL)

१३) २००७ – एअर सहारा कंपनी जेट एअरवेज कंपनीने १४५० कोटी रुपयांना ताब्यात घेऊन विलीनीकरण केले.

**हवाई वाहतूकीचा विकास**

| | १९९०–९१ | २०००–०१ | २००७–०८ |
|---|---|---|---|
| १) विमान ताफ्यांची एकूण संख्या | | | |
| अ) एअर इंडिया | २४ | २५ | ३८ |
| ब) इंडियन एअर लाईन्स | ५६ | ५२ | ८३ |
| २) प्रवासी संख्या (लाख) | | | |
| अ) एअर इंडिया | २१.६१ | ३५.०० | ५५ |
| ब) इंडियन एअर लाईन्स | ७८.६६ | ५९.३० | १०१.४० |
| ३) प्राप्ती/राजस्व (कोटी रु.) | | | |
| अ) एअर इंडिया | १३८.१० | १५०.१४ | २७६.८१ |
| ब) इंडियन एअरलाईन्स | ६९.९२ | ७७.७३ | १४५.८२ |
| ४) आंतरराष्ट्रीय विमान तळावरील प्रवासी चढ उतार (लाख) | १७७.३३ | ४२०.२५ | ६२६.३५ |
| ५) आंतरराष्ट्रीय विमानतळावरील मालाची चढ उतार (हजार टन) | ३७७.३३ | ८२९.२६ | ७४३.६६ |

संदर्भ – आर्थिक सर्वेक्षण २००७–०८

**वरील तक्त्यावरून काढलेले निष्कर्ष –**

१) १९९०–९१ मध्ये एकूण विमानांची संख्या ८० होती ती २००७–२००८ मध्ये १२१ पर्यंत वाढली २००९ मध्ये १३५ पर्यंत विमान संख्या वाढली.

२) प्रवाशांच्या संख्येत १००.२७ लाखांवरून १५६.४० लाखपर्यंत वाढ झाली.

३) प्रवाशांच्या संख्येत दीड पट वाढ झाली तर विमानांची संख्या फक्त ३१ नेच वाढली.

४) एअर इंडिया व इंडियन एअरलाईच्या महसुलात २०८.०२ कोटी रु. वरून ४२२.६३ कोटी रु. पर्यंत वाढ झाली.

५) आंतरराष्ट्रीय विमान तळावरील प्रवासी व मालाच्या चढ उतारात वाढ झाली.

### ४.२.२१ हवाई वाहतुकीच्या समस्या

#### १) आधुनिकीकरणाची समस्या

वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनांमध्ये देशाच्या विमान तळाच्या विकासावर व विमानांच्या आधुनिकीकरणावर पुरेसा खर्च करूनही आधुनिक सुधारणा आणि तंत्रिक बदल पुरेशा प्रमाणात झाले नाहीत.

#### २) योग्य व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव

कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी पर्याप्त प्रमाणावर निधीची उपलब्धता करून देऊनही हवाई वाहतुकीत कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. आज सार्वजनिक क्षेत्रात पुणे, बंगलोर, अलाहाबाद येथे प्रशिक्षण संस्था आहेत. तर खाजगी क्षेत्रातील दिल्ली आणि पिलानी येथे प्रशिक्षण संस्था आहेत. तरीही कुशल विमान चालकांचा अभाव आहे. याचा हवाई क्षेत्राच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम झाला आहे.

#### ३) विदेशी कंपन्यांशी स्पर्धा

विदेशी कंपन्यांमार्फत ज्या सेवा पुरविल्या जातात त्यापेक्षा भारतीय कंपन्यांच्या सेवा कमी दर्जाच्या असल्याने देशी व विदेशी प्रवासी व पर्यटक विदेशी विमान सेवांना प्राधान्य देतात. शिवाय विदेशी विमान कंपन्या अनेक सवलती देतात. त्यामुळे प्रवासी त्यांच्याकडे आकर्षित होतात.

#### ४) वाढता तोटा

कर्मचाऱ्यांचे वाढते पगार व भत्ते, प्रशासकीय खर्चात होणारी वाढ, विमानात वापरल्या जाणाऱ्या इंधनाच्या वाढत्या किंमती यामुळे सेवा पुरविण्याचा खर्च वाढत आहे. दुसरीकडे आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे प्रवासी व मालवाहतूक भाड्यात वाढ करता येत नाही. परिणामी विमान वाहतूक कंपन्यांना तोटा सहन करावा लागत आहे. २०००-०१ मध्ये विमान वाहतूक कंपन्यांना १५९ कोटी रुपयांचा तोटा आला होता. २००१-०२ मध्ये २५०.६५ कोटी रुपयांपर्यंत तोटा वाढला.

#### ५) इतर समस्या

१) विमानसेवेद्वारे वाहतूक वाढत आहे. मात्र ही वाढती मागणी पुरविण्यात विमाने व विमानतळ सक्षम नाहीत

२) विमान प्रकल्प प्रचंड खर्चीक असल्याने भांडवलाचा प्रश्न निर्माण होतो.

३) कित्येक खाजगी कंपन्या तोटयात आहेत, त्या कामगारांची कपात करत आहेत.

४) कुशल तंत्रज्ञान, मानवी सेवा, तज्ज्ञ पायलट यांची कमतरता आहे.

**विमान वाहतूक सुधारण्यासाठी उपाय योजना**

१) विमान वाहतूक व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याची आवश्यकता आहे.

२) प्रशिक्षित कर्मचारी व तज्ज्ञ पायलट यांची उपलब्धता होण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमात सुधारणा व वाढ करण्याची गरज आहे.

३) प्रवाशांना चांगल्या दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

४) विमान वाहतुकीचे प्रशासन कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

५) विदेशी कंपन्यांबरोबर स्पर्धा करताना भारतीय विमान कंपन्यांची स्पर्धा क्षमता वाढविण्याची गरज आहे.

### ४.२.२२ जलवाहतूक Water Transport

फार पुरातन काळापासून वाहतुकीसाठी जलमार्गाचा सर्व जगात उपयोग केला जात आहे. भारतातही जलवाहतूक फार पुरातन काळापासून चालू आहे. जलवाहतुकीचे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

१) अंतर्गत जलवाहतूक

२) सागरी जलवाहतूक

**१) अंतर्गत /आंतरिक / देशांतर्गत जलवाहतूक**

नद्या, कालवे, खाडी यामधील पाण्यातून होणारी वाहतूक म्हणजे अंतर्गत जलवाहतूक होय. १५० वर्षांपूर्वी रस्त्यांचा आणि रेल्वेचा विकास होण्याआधी अंतर्गत जलवाहतूक बऱ्यापैकी वापरली जात असे. गंगा, ब्रह्मपुत्रा, कृष्णा या नद्यांमधून बरीच जलवाहतूक होत असे.

भारतातील ज्या राज्यांत वाहतुकीला योग्य अशा नद्या आहेत, अशा राज्यांतूनही वाहतूक महत्त्वाची आहे. आसाम, प. बंगाल, बिहार या राज्यांत अशा प्रकारची वाहतूक अतिशय महत्त्वाची आहे. तसेच काही प्रमाणात आंध्र, केरळ, ओरिसा, तामिळनाडू आणि गोवा या राज्यातही जलवाहतुकीचे महत्त्व आहे.

भारतात १४५०० कि.मी. लांबीचे अंतर्गत जलमार्ग आहेत. यात मुख्य नद्यांचा ५२०० कि.मी. आणि कालव्यांचा ४८५ कि.मी. लांबीचे जलमार्ग आहेत. भारतात अंतर्गत जलमार्ग जरी उपलब्ध असले तरी त्यांचा विकास फारसा झालेला नाही. त्यांच्या माध्यमातून खूप कमी वाहतूक केली जाते. आंतरिक जलमार्गातून यांत्रिक बोटीच्या साहाय्याने वाहतूक केली जाते.

१९८६ मध्ये भारत सरकारने भारत देशीय जलमार्ग प्राधिकरण स्थापन केले. या प्राधिकरणामार्फत अंतर्गत जल वाहतुकीचा विकास केला जातो.

नद्यांमध्ये कायमस्वरूपी जलमार्ग विकसित करण्याच्या हेतूने सरकारने १० महत्त्वाच्या जलमार्गांना राष्ट्रीय जलमार्गाचा दर्जा दिला. यात १९८६ मध्ये गंगा नदीतील हल्दिया ते अलाहाबाद मार्ग (१६२० कि.मी.) १९८८ मध्ये ब्रह्मपुत्रा नदीतील धुबरी ते सादिया जलमार्ग (८९१ कि.मी.) १९९३ मध्ये केरळ मधील चंपकारा कालवा (१४ कि.मी.)

केरळमध्ये उद्योग मंडल कालवा (२२ कि.मी.) इत्यादी मार्गांनीराष्ट्रीय जल मार्गांचा दर्जा देण्यात आला.

अंतर्गत जलवाहतुकीत सर्वाधिक वाटा उत्तरप्रदेशचा (१७%) असून प. बंगाल (१६%) आंध्रप्रदेश (१४%) आसाम (१४%) केरळ (११%) राज्यांमधूनही जलवाहतूक केली जाते.

अंतर्गत जलमार्ग विकासासाठी सहाव्या योजनेपर्यंत एकूण १०० कोटी रु खर्च करण्यात आले होते. सातव्या योजनेत १३२ कोटी रु., आठव्या योजनेत ६४ कोटी रु. खर्च करण्यात आले.

### २) सागरी जलवाहतूक / अंतर्देशीय जलवाहतूक

वाहतुकीचा कमी खर्च तसेच वजनी माल वहन करण्याची क्षमता या कारणांमुळे जलवाहतुकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतातील जहाज वाहतूक अजूनही बाल्यावस्थेत आहे. विशेषतः महासागरातील बोटींच्या साहाय्याने करण्यात येणारी वाहतूक विचारात घेतल्यास भारतातील जहाजवाहतूक प्राथमिक अवस्थेत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात या वाहतुकीच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील सागरी जहाज वाहतूक व्यवसायाला पश्चिमेकडील विकसित राष्ट्रांचा व विशेषतः इंग्लंडमधील प्रगत अशा सागरी जहाज वाहतूक व्यवसायाशी स्पर्धा करावी लागली व अशा स्पर्धेत भारतीय सागरी जहाज व्यवसायाचा निभाव लागणे शक्य नव्हते. सन १९४७ मध्ये मध्यवर्ती सरकारने जहाज वाहतूकविषयक धोरण समिती नेमली. या समितीने राष्ट्रीय जहाज वाहतूकविषयक धोरण असावे अशी शिफारस केली.

भारताला ७५१७ कि.मी लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे, युरोप आशिया व ऑस्ट्रेलिया यामधील मध्यवर्ती स्थानामुळे जहाजमार्गांनी जगातील निरनिराळ्या देशांशी आंतरराष्ट्रीय व्यापार करावयास भारताला फार मोठी संधी उपलब्ध आहे.

### जलवाहतुकीचे महत्त्व

१) रस्ते, रेल्वे आणि हवाई वाहतुकीच्या तुलनेत या मार्गाचा वाहतूक खर्च कमी असतो. कारण हे मार्ग नैसर्गिक असतात. त्यांच्या देखरेखीवर खूप कमी खर्च करावा लागतो.

२) रस्ते व रेल्वे वाहतुकीत अपघात किंवा इतर कारणांनी व्यत्यय येऊन मालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. पण या मार्गाने हे नुकसान होण्याची शक्यता कमी असते.

३) जलवाहतुकीत वजनी माल वहन करण्याची क्षमता जास्त असते.

४) आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विकासाचे हे प्रमुख साधन आहे. वेगवेगळ्या देशांमध्ये जलमार्गाने मालाची वाहतूक केली जाते.

५) राष्ट्राच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही या मार्गाचे महत्त्व अनन्यसाधारण असते.

६) दूर अंतरावरील वाहतुकीसाठी जलवाहतूक उपयुक्त ठरते.

### ४.२.२३ जलवाहतुकीचा विकास

#### १) अंतर्गत जलवाहतुकीचा विकास

अंतर्गत जलवाहतुकीसाठी १९६७ मध्ये भारतात केंद्रीय देशांतर्गत जलवाहतूक निगम स्थापन करण्यात आले. त्याचे मुख्यालय कोलकाता येथे आहे. गंगा, हुगळी, ब्रह्मपुत्रा नद्यांमधील वाहतूकीचे काम निगम करते. बांग्लादेश, कोलकत्ता, हल्दीया, पटना या दरम्यान ही वाहतूक चालते.

२७ ऑक्टोबर १९८६ रोजी भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण (IWAI - ........Water Authority of India) स्थापन करण्यात आले. राष्ट्रीय जलमार्गाचा विकास करणे हे या प्राधिकरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्राधिकरणाचे मुख्यालय नोएडा येथे आहे. तसेच पटना, कोलकाता, गुवाहाटी व कोची येथे प्रादेशिक कार्यालये आहेत.

२००४ मध्ये पटना येथे राष्ट्रीय अंतर्देशीय जलपरिवहन संस्था स्थापन करण्यात आली. ही एक प्रशिक्षण देणारी संस्था आहे.

सध्या देशात १४५०० किमी. लांबीचे ९ जलमार्ग आहेत. या जलमार्गातून दरवर्षी साधारणतः ५० मिलीयन टन मालाची वाहतूक केली जाते.

#### २) सागरी जलवाहतुकीचा विकास

ब्रिटिश काळात सागरी जलवाहतुकीत भारतीय कंपन्या जवळजवळ नव्हत्याच. ब्रिटिशांनी या मार्गाचा वापर व्यापारी कारणांसाठी केला होता. स्वातंत्र्योत्तर काळात या मार्गांचा विकास झाला. १९५१ मध्ये जहाजांची वाहतूक क्षमता ३.९ लाख टन होती.

आज भारताच्या ७५१७ कि.मी. लांबीच्या समुद्र किनाऱ्यावर १२ मोठी आणि २०० मध्यम व लहान बंदरे आहेत. मोठ्या बंदरांच्या विकासाची जबाबदारी केंद्र सरकारची आहे, तर लहान व मध्यम बंदर विकासाची जबाबदारी राज्य सरकारची आहे. भारतातील मोठ्या बंदरांमध्ये कांडला, मुंबई, माझगांव, न्यू मंगलोर, कोचीन, जवाहरलाल नेहरू बंदर, न्हावा शेवा (मुंबई) पश्चिम किनाऱ्यावर आहेत तर पूर्व समुद्र किनाऱ्यावर तूतीकोरिन, चैन्नई, विशाखा पट्टणम, पारद्विप, कोलकाता आणि हल्दिया आहेत.

१९५० मध्ये जलवाहतुकीच्या विकासासाठी राष्ट्रीय बंदर बोर्ड स्थापन करण्यात आले. १९५१ मध्ये भारतीय जहाजांची वाहतूक क्षमता फक्त ३.९ लाख टन होती. सागरी जलवाहतुकीचा विकास व्हावा यासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेत १९ कोटी रु. खर्च करण्यात आले. १९५२ मध्ये हिंदुस्थान शिपयार्ड लि. उभारण्यात आली.

१९६१ मध्ये सागरी वाहतुकीच्या विकासासाठी भारत सरकारने सार्वजनिक क्षेत्रात शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या पब्लिक लिमिटेड कंपनीची स्थापना केली. २००८ मध्ये या कंपनीला महारत्नाचा दर्जा देण्यात आला आहे. दुसऱ्या योजनेदरम्यान गुजरातमधील कांडला बंदराचा विकास करण्यात आला. तिसऱ्या योजनेदरम्यान तूतीकोटिन, मंगलोर, पारद्विप तसेच हल्दिया बंदरांचा विकास करण्यात आला. आठव्या योजनेत ३४०० कोटी रु.

सागरी जलवाहतुकीच्या विकासासाठी खर्च करण्यात आले. अकराव्या योजनेत जलवाहतूक उद्योगावर ४३,८७४ कोटी रु. खर्चाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

भारताचे विशाखापट्टण्णम हे सर्वात जास्त रहदारीचे बंदर आहे. भारताच्या परकीय व्यापारांपैकी ९५% व्यापार सागरी जलमार्गाने होतो. अलीकडे २०११ मध्ये तुतीकोरिन बंदराचे नाव बदलून थिरू वी ओ चिदम्बरम असे ठेवण्यात आले आहे. भारतात सध्या ७ केंद्र शासनाची २ राज्य सरकारची व १९ खासगी जहाजबांधणी केंद्रे आहेत.

### ४.२.२८ जल वाहतुकीच्या समस्या

#### १) मर्यादित वहन क्षमता

भारतीय जहाज वाहतूक कंपन्यांची माल वाहून नेण्याची क्षमता मर्यादित आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात जहाज बांधणी, उद्योग फारसा विकसित झाला नाही. आजही आधुनिक जहाजांच्या बाबत आपल्याला विदेशांवर अवलंबून राहावे लागते. विदेशातून जहाज खरेदी करण्यातील प्रमुख अडचण म्हणजे विदेशी चलनाची अडचण होय. नवीन जहाज खरेदीत अडचण येत असल्यामुळे भारतीय निर्यातदार व आयातदारांना आपल्या मालाची वाहतूक नाईलाजास्तव विदेशी कंपन्यांकडून करावी लागते. भाड्यापोटी मोठ्या प्रमाणावर विदेशी चलन खर्च करावे लागते.

#### २) विदेशी वाहतूक कंपन्यांशी स्पर्धा

भारतीय जल वाहतूक कंपन्यांना विदेशी कंपन्यांशी स्पर्धा करावी लागते. विदेशांतून आपण जो माल आयात करतो तेव्हा निर्यातदार देश आपल्यावर शर्ती लादतात की, मालाची वाहतूक आमच्या कंपन्यांकडून करावी. ह्या शर्ती भारताला स्वीकाराव्या लागतात. शिवाय भारतीय वाहतूक कंपन्यांच्या सेवांचा दर्जा कमी प्रतीचा असल्याने विदेशातील आयात निर्यातदार माल वाहतुकीसाठी भारतीय कंपन्यांना प्राधान्य देत नाहीत. भारतीय कंपन्यांची स्पर्धा क्षमता कमी असल्याने त्यांचा विकास कमी झाला आहे.

#### ३) आधुनिकतेचा अभाव

मालाची चढ उतार करण्यासाठी, मालाची साठवणूक करण्यासाठी, आधुनिक साधन सामग्रीचा भारताकडे अभाव आहे. त्यामुळे बंदरांत मालाची चढ उतार करण्यास वेळ लागतो. त्यात बराचसा माल वाया जातो. साठवणूक गृहांच्या मर्यादिततेमुळे माल साठविण्याचा प्रश्न निर्माण होतो. नाशवंत मालाची लवकर वाहतूक होत नसल्याने निर्यातदारांचे मोठे नुकसान होते.

#### ४) आंतरराष्ट्रीय तुलनेत सेवेचा निकृष्ट दर्जा

जगातील इतर बंदरांतील सुविधांशी तुलना करता भारतीय बंदरांतील सेवा निकृष्ट आहेत. याचे कारण जुनाट साधन सामग्री, योग्य प्रशिक्षणाचा अभाव, अपर्याप्त श्रम पद्धती, बंदरात वेळेचा अपव्यय, श्रमिक व साधनांची कमी उत्पादकता इत्यादी आहेत.

### जलवाहतूक सुधारण्यासाठी उपाययोजना

भारताचा विदेश व्यापार जलवाहतुकीच्या माध्यमातून सुमारे ९५% केला जाते. हे महत्त्व लक्षात घेऊन भारतीय बंदर आणि जलवाहतुकीने पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर

१९९०च्या दशकात भर देण्यात आलेला आहे. त्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

१) बंदरांमध्ये आधुनिक सुविधा निर्माण करण्यासाठी देशी व विदेशी खाजगी भांडवल गुंतवणुकीस परवानगी देणे. याचाच एक भाग म्हणून जवाहरलाल नेहरू बंदर, न्हावाशेवा (मुंबई) यांच्या विकासाची जबाबदारी ऑस्ट्रेलियातील पी.अँड ओ कंपनीकडे ३० वर्षांसाठी सोपविली आहे. त्यामुळे या बंदरांची क्षमता दुप्पट होणार आहे.

२) खाजगी क्षेत्रांच्या सहभागाचा भाग म्हणून बंदरे विकासासाठी बंदरे भाडेपट्टा कराराने देणे, बंदरात साठवणूक गृहे व जहाज दुरुस्ती विभाग सुरू करणे, मालाची चढ-उतार करणे इत्यादी बाबत धोरण शिथिल करण्यात आले.

३) भारत सरकारने सिंगापूर बंदर प्राधिकरणाला १३९.१५ कोटी रु. अंतर्गत गुंतवणूक करण्याची परवानगी दिली आहे. या अंतर्गत मारमागाव, कांडला आणि न्यू मंगलोर या बंदरांचा विकास करण्यात येत आहे.

४) विदेशी गुंतवणूकदारांना विकासासाठी ७४% पर्यंत भांडवल गुंतवणुकीस परवानगी दिली आहे.

५) जहाज वाहतूक कंपन्यांना जहाज खरेदी आणि विक्री करण्याची मुक्त परवानगी देण्यात आली.

६) भारतीय जहाज कंपन्यांना त्यांच्या विकासासाठी विदेशातून भांडवल उभारणी करण्यास, विदेशी भांडवल गुंतवणुकीस मुक्त परवानगी देण्यात आलेली आहे.

७) भारतीय समुद्र किनाऱ्यावरून वाहतूक करणाऱ्या भारतीय कंपन्यांना भाड्याचे दर ठरविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

### ४.२.२५ दळणवळण / संदेश वहन (Communication)

दळणवळण म्हणजे संदेशवहन. शब्दरुपी, संवादरुपी दृक्श्राव्यरुपी माहितीचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी विविध उपकरणे व साधनांच्या माध्यमातून वहन करणे होय.

भारतात १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात माहिती आणि तंत्रज्ञान क्रांती घडून आली. २१ व्या शतकाची सुरूवातही माहिती किंवा सदेश वहनाच्या क्षेत्रात जलद वेगाने घडून आली आहे. संदेश वहनाच्या माध्यमातून जग अत्यंत जवळ आले आहे. जगाचे जागतिक खेड्यात रूपांतर झाले आहे. वेगवेगळ्या ठिकाणची माहिती काही क्षणात एका भागातून दुसऱ्या भागात ताबडतोब पाठविता येते.

दळणवळण व्यवस्थेत पुढील साधनांचा समावेश होतो.

१) पोस्ट टपालसेवा

२) दूरसंचार (टेलिफोन, मोबाईल)

३) रेडिओ

४) टीव्ही

५) इंटरनेट

**दळणवळण व्यवस्थेचे महत्त्व**

१) देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर उपलब्ध असलेल्या उत्पादन घटकांची माहिती मिळविण्यास उपयुक्त

२) विविध प्रकारचा कच्चा माल, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान या संबंधीची माहिती मिळविण्यास उपयुक्त.

३) उत्पादित वस्तू व सेवांचा पुरवठा, मागणी, किंमत याविषयी माहिती मिळते.

४) विविध प्रसार माध्यमांद्वारे जाहिराती देऊन बाजारपेठांच्या कक्षा विस्तारता येतात.

५) बाजार माहितीच्या आधारे उत्पादन व वितरणाची व्यूहरचना करण्यास मदत होते.

६) विद्यार्थी, संशोधक यांना उपयुक्त माहिती लवकरात लवकर मिळते.

७) माहितीच्या प्रसारणामुळे बाजारातील अपूर्णता दूर होऊन उपभोक्त्यांचा फायदा होतो.

८) संदेश वहनाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या आहेत.

९) माहिती आणि तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे किमान ह्या क्षेत्रात तरी भारताला महासत्ता बनण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

१०) संरक्षण क्षेत्रात संदेशवहनांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**४.२.२६ संदेशवाहनाचे प्रकार**

**१) पोस्ट / टपाल सेवा**

भारतात १६८८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने कोलकाता येथे कंपनी मेल नावाची पहिली टपालसेवा सुरू केली होती. १७६६ मध्ये भारतात लॉर्ड क्लाईव्हने टपाल व्यवस्थेचा पाया घातला. वॉरन हेस्टिंजच्या काळात १७७४ मध्ये कोलकाता येथे पहिले जनरल पोस्ट ऑफिस उभारले गेले. १७८४ मध्ये चेन्नई व १७९३ मध्ये मुंबई येथे जनरल पोस्ट ऑफिस सुरू करण्यात आले. १८३७ मध्ये तीनही जनरल पोस्ट ऑफिसच्या एकत्रीकरणातून अखिल भारतीय टपालसेवा सुरू झाली. १८८० मध्ये पोस्टाने मनीऑर्डर सेवा सुरू केली. १९९४ पासून उपग्रह आधारित जलद गतीमनी ऑर्डर सेवा व २००८ पासून इलेक्ट्रॉनिक मनी ऑर्डर सेवा सुरू करण्यात आली आहे.

१ ऑगस्ट १९८६ पासून स्पीड पोस्ट सेवा सुरू करण्यात आली. २२ जानेवारी २००१ पासून पोस्टाला म्युच्युअल फंड उभारणीस परवानगी देण्यात आली आहे. बँक म्हणून पोस्ट बचत ठेव, मुदत ठेव, आवर्ती ठेव, मासिक उत्पन्न योजना, किसान विकास पत्र, प्रॉव्हिडंट फंड, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र जेष्ठ नागरिक बचत यांसारख्या सेवा पुरविते. २००४ पासून ई मेलद्वारा संदेश - तार पाठविण्याची ई-पोस्ट सेवा सुरू करण्यात आली आहे.

३१ मार्च २०११ अखेर भारतात १,५४,९७९ पोस्ट ऑफिस कार्यरत होते. यातील

१,३९,१८२ ग्रामीण भागात (८९.८१%) असून उर्वरित १५७९७ शहरी भागात (१०.१९%) आहेत. अकराव्या योजनेत नवीन १७,८७८ पोस्ट ऑफिसचे संगणीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

**२) दूरसंचार (टेलिफोन, मोबाईल)**

भारतात १८५१ मध्ये कोलकत्ता ते डायमंड हार्बर या दरम्यान पहिली टेलिग्राम लाईन सुरू करण्यात आली. १८८२ मध्ये भारतात कोलकाता मध्ये टेलिफोन सेवा सुरू करण्यात आली. १९४३ मध्ये टेलिफोन सेवांचे राष्ट्रीयीकरण केले गेले.

ऑगस्ट १९८४ मध्ये सॅम पित्रोदा यांच्या प्रेरणेने C-DOTC (Centre for Development Of Telematics) ची स्थापना करण्यात आली. दूरसंचार सेवेसाठी संशोधन  व विकास करणारी ही संस्था आहे. सॅम पित्रोदा यांना भारतातील टेलिकॉम क्रांतीचे जनक म्हणतात.

१ एप्रिल १९८६ रोजी चढछछ-(Mahanager Telephone Nigam Ltd.) या सार्वजनिक कंपनीची स्थापना करण्यात आली. १ ऑक्टोबर २००० या दिवशी भारत सरकारच्या टेलिकॉम विभागाचे रूपांतर BSNL (Bharat Sanchar Nigam Ltd.) मध्ये करण्यात आले. मुंबई व दिल्ली सोडून BSNL संपूर्ण देशात टेलिफोनसेवा पुरविते. टेलिकॉम क्षेत्रात परकिय थेट गुंतवणूकीस ७४% मान्यता आहे.

आजच्या काळात टेलिफोन व मोबाईल हे सर्वात जलद संदेशवहनाचे माध्यम आहे.

**३) रेडिओ**

भारतात जून १९२३ मध्ये सर्वप्रथम रेडिओ ऑफ बॉम्बेद्वारे रेडिओ कार्यक्रमाने प्रसारण केले गेले. १९२६ मध्ये Indian Broadcasting Company Ltd. ची स्थापना करण्यात आली. १९२७ मध्ये मुंबई व कोलकाता येथून रेडिओ प्रसारणास सुरूवात करण्यात आली. १ मार्च १९३० रोजी IBC कंपनीचे रुपांतर ISBC-Indian State Broadcasting service मध्ये करण्यात आले. पुढे ८ जून १९३६ रोजी खडइड चे नाव अश्रश्र खपवळर ठरवळे (AIR) असे करण्यात आले. नागरिकांना सुशिक्षित करणे, सूचित करणे व मनोरंजन करणे हे अखठ चे उद्दिष्ट होते. १९५७ पासून अखठ ला आकाशवाणी नावाने ओळखले जाऊ लागले. सध्या भारतात २३३ प्रसारण केंद्रे कार्यरत आहेत.

जगातली पहिली एफएम प्रणाली एडविन हावर्ड यांनी तयार केली म्हणून त्यांना एफएमचा जनक म्हणतात. भारतात एफएमची सुरूवात २३ जुलै १९७७ मध्ये चेन्नईतून करण्यात आली. सध्या भारतात २४८ खाजगी व १९३ आकाशवाणीचे एफएम चॅल्स चालविले जातात. सर्वाधिक एफएम चॅनल्स महाराष्ट्रात (३१ चॅनल) आहेत. १६ डिसेंबर २००४ पासून प्रसार भारतीने डिटीएच (Direct to Home Service) सेवेद्वारा रेडिओ चॅनल प्रसारित करण्यास सुरूवात केली आहे.

**४) टी.व्ही.**

दूरदर्शनचे पहिले प्रसारण १५ सप्टेंबर १९५९ रोजी प्रायोगिक स्तरावर दिल्लीत करण्यात आले. यात अर्ध्या तासाचा एक शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करण्यात आला

होता. आकाशवाणीचा भाग म्हणून टेलिव्हीजन सेवा दिल्ली, मुंबई, कोलकत्ता, चेन्नई येथे सुरू करण्यात आली. १९९१ च्या उदारीकरणानंतर खाजगी कंपन्यांना चॅनल सुरू करण्याची परवानगी देण्यात आली. टी.व्ही. चॅनल्स मध्ये सध्या २६% थेट परकीय गुंतवणूकीस शासकीय मार्गाने परवानगी आहे. तसेच केबल नेटवर्क व डीटीएच सेवांमध्ये शासकीय मार्गाने ४९% थेट परकीय गुंतवणुकीस मान्यता आहे.

### ५) इंटरनेट

माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी जेव्हा एकापेक्षा अधिक संगणक जोडले जातात तेव्हा त्याला नेटवर्क असे म्हणतात. अशा नेटवर्क्सना जोडणारे जाळे म्हणजे इंटर-नेटवर्क म्हणजेच इंटरनेट होय. इंटर-नेटवर्क ही एक संकल्पना आहे. सध्या या संकल्पनेचा व्यावहारिक उपयोग आपण इंटरनेट या नावाने करीत आहोत.

१९७० मध्ये सर्वप्रथम अमेरिकेतील पॅटॅर्गोनने ARPA (Advanced Research Project Agency) नावाचे एक छोटे संदेशवहनाचे जाळे निर्माण केले होते. या संकल्पनेतूनच इंटरनेटचा उगम झाला. १९७३ मध्ये नॉर्वे व इंग्लंड दरम्यान पहिले इंटर-नेटवर्क आंतरराष्ट्रीय स्तरावर वापरले गेले.

१९८९ मध्ये ARPA चे थेीश्रव थश्रळवश थशल नावाचे इंटरनेट जाळे विकसित करण्यात आले ते आजच्या काळातील सर्वात मोठे  जागतिक जाळे आहे.

१९९१ मध्ये अगदी प्राथमिक स्तरावर भारतात इंटरनेटचा वापर सुरू झाला. १५ ऑगस्ट १९९५ पासून व्हीएसएनएसल कंपनीने टेलिफोन लाईनद्वारा इंटरनेट सेवा सर्वांना उपलब्ध करून दिली आणि भारतात इंटरनेटच्या क्रांतीला सुरूवात झाली.

BSNL ने २००५ पासून ब्रॉड बॅण्ड ही जलद इंटरनेट सेवा सुरू केली. भारतात ब्रॉड बॅण्ड जोडणीद्वारा २५६ केबीपीएस मिळते. अमेरिकेत हा वेग ४.६ एमबीपीएस असून दक्षिण कोरियात तो सर्वाधिक ४३ एमबीपीएस आहे. भारत शासनाने २००७ हे वर्ष ब्रॉण्ड बॅण्ड वर्ष म्हणून घोषित केले होते.

अलीकडे २०११ मध्ये नवीन दूरसंचार धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणात भारतातील इंटरनेट ब्रॉड बॅण्डची गती २५६ केबीपीएस वरून ५१२ केबीपीएस इतकी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच इंटनेटचा वापर करून अलीकडे व्हीडिओ कॉन्फरन्स नेटवर्क उभारण्यात आले आहेत. २०११ अखेर भारतात १२.१३ कोटी इंटरनेट ग्राहक होते. यापैकी १.३३ कोटी ग्राहक ब्रॉड बॅण्ड सेवा वापरतात. इंटरनेट वापरात भारताचा तिसरा क्रमांक लागतो.

भारताचा इंटरनेडट कोड .ळप असून भारतात एकूण १८० इंटरनेट सर्व्हीस प्रोव्हायडर आहेत.

### ६) व्हाईस मेल सेवा

या सेवेत व्हाईस संदेश टेलिफोनद्वारा संग्रहित केला जातो आणि तो संदेश पुन्हा प्राप्त केला जातो. ही सेवा अशा उपभोक्त्यांना उपयुक्त असते, ज्यांची कामे फिरस्तीची असतात. स्वतः जवळ टेलिफोन किंवा मोबाईल फोन नाही, या उपभोक्त्यांकडे एक

व्हॉईसमेल नंबर असतो आणि मेल बॉक्स असतो. या नंबरावर मेल बॉक्समध्ये संदेश जमा झाल्यावर तो पाहिजे तेव्हा मिळविता येतो. या सेवेचा फायदा असा की, उपभोक्त्याला पुनः पुन्हा  बोलावण्याची गरज नसते. यामुळे एक्सचेंजचा भार कमी होतो.

**७) पेजिंग सेवा** (Pager Service)

रेडिओ पेजिंग सेवा दूरसंचार यंत्रणेची एक आधुनिक तंत्र सेवा आहे. या सेवेद्वारे पेजर धारकांशी केव्हाही, कोठेही संपर्क साधता येतो. संदेश पाठविणाराने पेजर नंबरवर संदेश पाठविल्यावर तो पेजिंग कंपनीला प्रथम प्राप्त होतो. पेजिंग कंपनी रेडिओ लहरींच्या माध्यमातून संदेश पाठवितात. पेजर धारकाच्या पेजरवर संदेश लिखित स्वरूपात येतो. न्यूमेरिक पेजरमध्ये फक्त संख्यात्मक संदेश येतात. तर अल्फा न्यूमेरिके पेजरमध्ये संख्यात्मक बरोबरच शब्दात्मक संदेश पाठविता येतो.

भारतात ही सेवा सर्वप्रथम कोलकाता शहरात सुरू झाली. आज देशातील जवळ जवळ २७ शहरांमध्ये ही सेवा उपलब्ध आहे.

**८) सॅटेलाईट फोन सेवा** (Satelite Phone Service)

उपग्रहांच्या माध्यमातून जगातील कोणत्याही फोन धारकांशी ताबडतोब संपर्क करता येऊ शकतो. ज्या ठिकाणी दूरसंचार यंत्रणा विकसित झालेली नाही त्या ठिकाणी ही यंत्रणा उपयुक्त ठरते. उदा. पर्वतीय भाग, वाळवंट इत्यादी

**९) इलेक्ट्रॉनिक मेल** (E-mail)

ई-मेल सेवा कॉम्प्युटरवर आधारित Store & Forward संदेश प्रणाली आहे. यात संदेश पाठविणारा आणि संदेश घेणारा एकाच वेळेस हजर राहण्याची गरज नसते. ही सेवा डाटा संचार नेटवर्कच्या माध्यमातून विविध प्रकारच्या पत्राचे संदेशाचे प्रसारण करते. या सेवेत कोणतेही पत्र, जाहिरात इ. टंकलिखित करून कोणत्याही व्यक्तीला त्याच्या पत्त्यावर पाठविता येते. पण यात संदेश पाठविणारा व मिळविणारा नेटवर्कशी जुळलेले असले पाहिजेत. कॉम्प्युटरवलर इमेल पत्ता असतो. त्या पत्त्यावर हा संदेश जमा होतो.

**१०) इलेक्ट्रॉनिक कॉमर्स** (E-commerce)

इ-कॉमर्समध्ये टेलिफोन लाइन, नेटवर्कच्या माध्यमातून उत्पादित वस्तू व सेवांची माहिती मिळविली जाते आणि वस्तू व सेवांची ऑन लाईन खरेदी विक्री केली जाते. उदा. एशियन नेटवर्क, एशियन स्काय शॉपिंग, फ्लिपकार्ड, होमशॉपी, नापतोल यांच्या वरून वस्तूंची खरेदी करता येते. या माध्यमातून कोणत्याही मध्यस्ताशिवाय ठोक किंवा किरकोळ प्रमाणात वस्तूंची खरेदी विक्री करता येते.

**११) कन्व्हर्जन्स** (Convergency)

आज माहिती आणि तंत्रज्ञानाचे विशाल केंद्र, घरातच उभारले गेले आहे. केबल टीव्ही, टेलिफोन, फॅक्स, इंटरनेट, ह्या सर्व सुविधा घरातच उपलब्ध झाल्या आहेत. पण प्रत्येक सेवेची स्वतंत्र केबल असते. यामुळे घरात सर्वत्र केबलचे जाळे विणले जाते. मात्र

अलीकडे वेगवेगळ्या सेवेसाठी वेगवेगळ्या केबलची गरज नाही. यासर्व सुविधा एकाच केबलमधून मिळू शकतात. याला रश्रश्र ळप`पश म्हणजेच कन्व्हर्जन्स म्हणतात. कन्व्हर्जन हेच सूचना आणि तंत्रज्ञान क्रांतीचे अत्यंत प्रगत रूप आहे. भारतात बी.एस.एन.एल. कंपनीमार्फत या सेवा पुरविण्यात येत आहेत.

### ४.२.२७ संदेशवहन क्षेत्राच्या समस्या

१) संदेशवहनाची सर्वात जुनी प्रणाली म्हणजे पोस्ट आणि तारखाते हे होय. हे खाते सामाजिक उत्तरदायित्वाच्या जबाबदारीमुळे सतत तोट्यात चालत आहे.

२) देशाचा विकास ज्या गतीने होत आहे. त्याच गतीने संदेश वहनाचे कार्य वाढत आहे. संदेशवहन व्यवस्थेची मागणी सातत्याने वाढत आहे. त्यामुळे संदेशवहन माध्यमांवर प्रचंड ताण पडतो.

३) ग्रामीण भागात संदेशवहन व्यवस्था पुरेशा प्रमाणात विकसित झालेली नाही.

४) मोबाईल फोन कंपन्यांमध्ये तीव्र गळेकापू स्पर्धा सुरू झाली आहे. १९९१ पासून हे क्षेत्र खाजगी क्षेत्राला खुले करण्यात आले. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना खाजगी क्षेत्रातील कंपन्यांशी तीव्र स्पर्धा करावी लागत आहे.

५) संदेशवहन क्षेत्रात गेल्या दशकात क्रांती घडून आली. त्यामुळे प्रशिक्षित कामगारांची मागणी वाढत आहे. प्रत्यक्षात मात्र प्रशिक्षित कामगारांची टंचाई निर्माण झाल्याने या क्षेत्रासमोर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

### संदेशवहन क्षेत्रातील सुधारणा

सामाजिक व आर्थिक बदल लक्षात घेऊन पोस्ट खात्याने ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन नवीन मूल्यवर्धीत सेवांचा विस्तार करण्यासाठी आधुनिकीकरणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. १९८६ पासून स्पीड पोस्ट सेवा सुरू करण्यात आली आहे. कुरियर सेवाही देशात सुरू करण्यात आली आहे. पोस्टाचे संगणकीकरण केले जात आहे. दूरसंचार क्षेत्र खाजगी क्षेत्राला खुले करण्यात आले. यात विदेशी भांडवलाला ५१% पर्यंत थेट गुंतवणूक करण्यास परवानगी देण्यात आली. देशात सर्वत्र मोबाईल सेवा विस्तारलेली आहे.

ऑगस्ट १९९१ ते ऑगस्ट २००१ या काळात ५३१३४ कोटी रुपयांचे विदेशी गुंतवणूकीचे ७४९ प्रस्ताव दूरसंचार क्षेत्रात आले पण प्रत्यक्षात गुंतवणूक ७०७८ कोटी रुपयांचीच झाली. २००१ मध्ये थेट विदेशी गुंतवणुकीत खूप सुधारणा झाली. सप्टेंबर २००१ च्या काळात ३६०८ कोटी रु. विदेशी गुंतवणूक झाली.

१९९१ ते २००७ पर्यंत दूरसंचार क्षेत्रात २०१७८ कोटी रु. ची थेट विदेशी गुंतवणूक झाली. थेट विदेशी गुंतवणुकीच्या एकूण प्रवाहापैकी दूरसंचार क्षेत्रात ८.१% प्रवाहित झाला आहे. त्यामुळे आज या क्षेत्रात क्रांती निर्माण झाली आहे.

### संदेशवहन क्षेत्राची सुधारणा होण्यासाठी पुढील उपाय सुचविता येतील

कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

२) संदेशवहन क्षेत्राचा प्रसार व प्रगती ग्रामीण भागात वाढावी यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

३) भारतातील प्रचंड लोकसंख्येचा विचार करता पोस्टाची सेवा मोठ्या प्रमाणावर वाढविली पाहिजे. अलीकडे पोस्टाच्या सेवेची कार्यक्षमता कमी कमी होत आहे व त्याबाबत सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे.

## ४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**प्र. १ दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पायाभूत संरचना म्हणजे काय?

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

२) पायाभूत संरचना या संकल्पनेत कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

३) ऊर्जेचे प्रमुख स्त्रोत कोणते.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

४) ऊर्जा साधनांचे महत्त्व सांगा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

५) भारतात वाहतूकीचे कोणते प्रकार अस्तित्वात आहेत?

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

६) जलमार्गाचे प्रकार कोणते?

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

७) रस्त्यांचे विविध प्रकार /वर्गीकरण सांगा.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

८) दळणवळण क्षेत्राचे महत्त्व सांगा.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

**प्र. २ टीपा लिहा.**

१) भारतातील ऊर्जासंकट

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

२) वाहतूक व्यवस्थेचे महत्त्व

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

३) रेल्वे वाहतुकीच्या समस्या

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

४) ऊर्जा साधनांचे महत्त्व

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

५) संदेशवहनाच्या समस्या

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

**प्र.३ दीघोत्तरी प्रश्न.**

१) पायाभूत संरचना म्हणजे काय? भारताच्या आर्थिक विकासात पायाभूत संरचनेचे महत्त्व स्पष्ट करा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

२) भारतातील उर्जा साधनाची उपयुक्तता सांगून उर्जासंकटाची चर्चा करा

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

३) भारतातील वाहतूक व्यवस्थेच्या समस्या व उपाययोजना स्पष्ट करा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

४) भारतातील रेल्वेचे महत्त्व सांगून रेल्वेवाहतुकींच्या प्रगतीचे स्पष्टीकरण करा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

५) संदेशवहनाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

## ४.४ सारांश

### पायाभूत संरचना

**अर्थ –** उत्पादन प्रक्रियांना अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि संख्यात्मक घटकांना पायाभूत संरचना म्हणतात.

शेती व उद्योग क्षेत्रातील उत्पादनासाठी ऊर्जा, पतपुरवठा, वाहतूक सेवा, दळणवळण, विपणन सुविधा, बँक व विमा सुविधा अशा अनेक बाबींची आवश्यकता असते. या सर्व सुविधा आणि सेवा यांना एकत्रितपणे पायाभूत सुविधा असे म्हणतात.

**ऊर्जा**

**४.२.१ ऊर्जेचे महत्त्व**

१) उत्पादन प्रक्रियेत उपयोग

२) उत्पादकतेत वाढ

३) औद्योगिकीकरणाचा वेग वाढतो.

४) वाहतूक व्यवस्थेत सुधारणा

५) राहणीमानात सुधारणा

६) ग्रामीण विकासाला मदत

७) कृषी विकासाला मदत

८) रोजगार संधीत वाढ

**ऊर्जेचे स्त्रोत**

१) पारंपरिक    २) अपारंपरिक

**अ) विद्युत शक्ती**

ब) पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू

क) कोळसा आणि लिग्नाईट

**अपारंपरिक स्त्रोत**

१) सौर ऊर्जा    २) पवन ऊर्जा ३) बायोगॅस ४) कचऱ्यापासून प्राप्त ऊर्जा
५) भू-औष्णिक ऊर्जा    ६) लघुजलविद्युत    ७) कडी बायोमास

**भारतातील ऊर्जासंकट निर्माण होण्याची कारणे**

१) खनिजतेलाच्या वाढत्या किंमती

२) खनिजतेलाच्या आयातीवरील वाढता खर्च

३) भारतीय कोळशाचा निकृष्ट दर्जा

४) आवश्यकतेपेक्षा अधिक वापर

५) ऊर्जेच्या मागणीत सातत्याने होणारी वाढ

६) उत्पादन क्षमतेचा अपुरा वापर

७) वितरणातील अपव्यय

**ऊर्जासंकटावर उपाय**

१) देशांतर्गत उत्पादनात वाढ

२) कोळसा वापरावर भर देणे

३) जलविद्युत स्त्रोतांचा जास्त वापर करणे

४) वीजनिर्मितीत पर्यायी साधनांचा वापर करणे

५) संशोधन व उत्खनन कार्याला गती देणे

६) अपारंपारिक स्त्रोतांच्या विकासावर भर

७) उर्जाबचतीवर भर देणे.

**वाहतूक**

**४.३.१ वाहतुकीचे महत्त्व**

१) उत्पादनास मदत

२) बाजारपेठांचा विस्तार

३) नाशवंत मालाच्या उत्पादनास मदत

४) व्यापारवाढीस मदत

५) उत्पादन घटकांना गतिशीलता

६) मागणी व पुरवठा यात समतोल

७) औद्योगिक विकासाला मदत

८) ग्राहकांना वस्तूंची उपलब्धता

९) किंमतपातळीत स्थैर्य

१०) समतोल आर्थिक विकास

**वाहतुकीचा विकास**

१) योजनाकाळात वाहतूक क्षेत्रातील गुंतवणुकीत वाढ

२) रेल्वेमार्गांची लांबी वाढली.

३) रस्त्यांच्या एकूण लांबीत वाढ

४) मालवाहतूक साधनांच्या संख्येत वाढ

५) आंतरराष्ट्रीय जल वाहतुकीत वाढ

६) हवाई वाहतूक प्रवासी संस्थेत वाढ

**वाहतुकीच्या समस्या**

१) नियोजनकाळांत वाहतूक विकासाचा मंद वेग

२) रस्त्यांची रुंदी कमी

३) वाहतुकीत निकृष्ट साहित्याचा वापर

४) भ्रष्टाचार

५) वाहतुकीचे दर जास्त

६) वाहतूक व्यवस्थेची क्षमता कमी

**वाहतुकीचे प्रकार**

**४.४.१ रस्ते वाहतूक**

**४.४.१.१ महत्त्व**

१) रोजगार निर्मितीला मदत

२) औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला मदत

३) कमी भांडवल

४) शेती विकासाला मदत

५) देशाच्या संरक्षण क्षेत्राला मदत

६) पर्यटन विकासाला मदत

७) सरकारी उत्पन्नाचे साधन

८) ग्रामीण विकासात योगदान

९) कमी अंतरासाठी योग्य साधन

**रस्त्यांचा विकास**

१) गुंतवणुकीत वाढ

२) रस्त्यांच्या लांबीत वाढ

३) राष्ट्रीय महामार्ग लांबीत वाढ

४) राज्य महामार्ग लांबीत वाढ

५) नोंदणीकृत वाहनांच्या संख्येत वाढ

६) मालवाहतूक साधनांत वाढ

**रस्ते विकासाच्या समस्या**

१) रस्ते विकासाची मंद गती

२) राष्ट्रीय महामार्गावर अवास्तव ताण

३) एकपदरी महामार्ग

४) कच्च्या रस्त्यांची समस्या

५) रस्तेवाहतुकीत व्यत्यय

६) वाढते अपघात

७) रस्त्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष

**उपाय**

१) राष्ट्रीय महामार्ग निर्मितीसाठी जमीन संपादन कायदा करण्यात आला.

२) प्रमुख मार्गांच्या विकासासाठी वृक्षतोडीला मान्यता

३) रस्ते विकासासाठी नियमांमध्ये सरलता

४) चार पदरी रस्त्यांवर रस्ते वापर शुल्क

५) खाजगी विदेशी गुंतवणुकीला मान्यता

६) आंतरराष्ट्रीय वित्तसंख्यांकडून कर्ज उभारणी

**रेल्वे वाहतूक**

**रेल्वेचे महत्त्व**

१) वस्तू वाहून नेण्याची मोठी क्षमता

२) जलद गती

३) वातावरणातील बदलाचा परिणाम नाही.

४) वाढत्या फलाचा नियम लागू

५) उद्योगांच्या विकासाला मदत

६) घटक गतिशीलता वाढ

७) संतुलित विकासाला मदत

८) राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक

**रेल्वेचा विकास**

१) योजनाकालीन खर्चात वाढ

२) रेल्वेमार्गाच्या लांबीत वाढ

३) रेल्वेझोन संख्या १६ पर्यंत वाढ

४) रेल्वेकडून अपघात ग्रस्तांना मदत

५) कोकण रेल्वे प्रकल्प.

**रेल्वे वाहतुकीच्या समस्या**

१) निर्धारित वेळेत योजना पूर्ण न होणे

२) भाववाढीची समस्या

३) आधुनिकीकरणासंबंधी समस्या

४) इंधनाची समस्या

५) वाढते अपघात

६) विना तिकीट प्रवास व चोरीची समस्या

७) रेल्वे प्रशासनावरील वाढता ताण

८) प्रवासी सुविधांचा निकृष्ट दर्जा

९) इतर समस्या

**उपाय योजना**

१) रेल्वेप्रचालनात तांत्रिक सुधारणा करणे

२) कमी इंधन लागणाऱ्या इंजिनांचा शोध लावणे

३) तांत्रिक क्षेत्रात स्वयंपूर्णता आणणे

४) अतिरिक्त कर्मचारी कमी करणे.

५) कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.

६) निधी उभारणे

७) रेल्वे प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सुविधांत सुधारणा करणे.

**हवाई वाहतूक**

**हवाई वाहतुकीचे महत्त्व**

१) वाहतूकीचे जलद साधन

२) आर्थिक विकासात योगदान

३) भौगोलिक अडचणींपासून मुक्त

४) देशाच्या संरणात महत्त्व

५) वेळेची बचत

६) पर्यटन क्षेत्रात महत्त्व

**हवाई वाहतुकीचा विकास**

१) विमानांच्या संख्येत वाढ

२) विमान प्रवासी संख्येत वाढ

३) प्राप्तीत वाढ

४) आंतरराष्ट्रीय विमानतळावरील प्रवासी चढउतार वाढ.

५) मालाची चढउतार वाढ.

**हवाई वाहतुकीच्या समस्या**

१) आधुनिकीकरणाची समस्या.

२) योग्य व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव

३) विदेशी कंपन्यांशी स्पर्धा

४) वाढता तोटा

५) विमानसेवेची वाढती मागणी पूर्ण होत नाही.

६) विमान प्रकल्पांचा प्रचंड खर्च.

७) कुशल तंत्रज्ञान, तज्ज्ञपायलट यांची कमतरता.

**उपाययोजना**

१) आधुनिकीकरणाची गरज

२) तज्ज्ञ पायलट व प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध होण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था

३) प्रवासी सेवेच्या दर्जात सुधारणा

४) प्रशासन कार्यक्षम असावे.

**जलवाहतूक**

१) अंतर्गत जलवाहतूक

२) सागरी जलवाहतूक

**जलवाहुतकीचे महत्त्व**

१) खर्च कमी

२) अपघात व इतर व्यत्यय कमी

३) वजनी माल वहन करण्याची क्षमता जास्त

४) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमुख साधन

५) राष्ट्राच्या सुरक्षिततेत महत्त्व

६) दूर अंतरावरील वाहतुकीसाठी उपयुक्त.

**जलवाहतूकीचा विकास**

१) १९६७ केंद्रीय देशांतर्गत जलवाहतूक निगम स्थापन

२) १९८६ अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण स्थापन

३) २००४ राष्ट्रीय अंतर्देशीय जलपरिवहन संस्था स्थापन

४) १९५० राष्ट्रीय बंदर बोर्ड स्थापना.

५) १९६१ शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया कंपनीची स्थापना

**जल वाहतुकीच्या समस्या**

१) मर्यादित वहन क्षमता

२) विदेशी वाहतूक कंपन्यांशी स्पर्धा

३) आधुनिकतेचा अभाव

४) आंतरराष्ट्रीय तुलनेत सेवेचा निकृष्ट दर्जा

**उपाययोजना**

१) विदेशी खाजगी भांडवल गुंतवणुकीस परवानगी

२) खाजगी क्षेत्राला प्रेरणा देणे, नियमात शिथिलीकरण करणे.

३) विदेशी गुंतवणूकदारांना ७४% भांडवल गुंतवणुकीस परवानगी देण्यात आली.

४) भाड्याचे दर वाढविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

**दळणवळण / संदेशवहन**

**महत्त्व**

१) देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील माहिती मिळविण्यास उपयुक्त

२) यंत्रसामग्री, कच्चामाल, तंत्रज्ञान इत्यादीसंबंधी माहिती

३) बाजारपेठ विस्तार

४) उत्पादन व वितरणाची व्यूहरचना करण्यास मदत

५) विद्यार्थी व संशोधकांसाठी उपयुक्त

६) उपभोक्त्यांना उपयुक्त

७) रोजगार संधी

८) संरक्षण क्षेत्रात महत्त्व

**संदेशवहनाचे प्रकार**

१) पोस्ट/टपाल सेवा

२) दूरसंचार (टेलिफोन, मोबाईल)

३) रेडिओ

४) टी व्ही

५) इंटरनेट

६) व्हाईसमेल सेवा

७) पेजिंग सेवा

८) सॅटेलाईट फोन सेवा

९) इलेक्ट्रॉनिक मेल

१०) ई कॉमर्स

११) कन्व्हर्जन्स

**संदेश वहन क्षेत्राच्या समस्या**

१) पोस्ट विभाग तोट्यात
२) संदेशवहन व्यवस्थेवर वाढता ताण
३) विकास कमी
४) मोबाईल कंपन्यांमध्ये तीव्र स्पर्धा
५) प्रशिक्षित कामगारांची टंचाई

**उपाय**

१) कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था
२) ग्रामीण भागात विकास करणे आवश्यक
३) पोस्ट विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्याची गरज

## ४.५ पारिभाषिक शब्द

पायाभूत – Basic, Fundamental

स्त्रोत – Resource

## ४.६ संदर्भ


१) Indian Economy : Datta and Sundharam, S. Chand and Company Ltd., New Delhi.

२) भारतीय अर्थव्यवस्था – प्रा. एन.एल. चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २००१

३) भारतीय अर्थव्यवस्था – प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ, डींललर्शीी झींलश्रळलरींळेप पुणे २०१०

४) भारतीय अर्थव्यवस्था – डॉ. देसाई, डॉ. सौ. भालेराव निराली, प्रकाशन पुणे १९९९

५) स्पर्धा परीक्षा संपूर्ण अर्थशास्त्र – डॉ. किरण देसले, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, ऑगस्ट २०१२

६) भारतीय अर्थव्यवस्था आणि नियोजन – प्रा. अपेक्षा जाधव, निराली प्रकाशन, पुणे, जुलै २०१२

७) भारतीय अर्थरचना – डॉ. मुकुंद महाजन, निराली प्रकाशन पुणे, जुलै १९९८

# घटक – ५

# अर्थशास्त्र शेती

**अनुक्रमणिका**


५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ विषय विवेचन

५.२.१ स्वरूप आणि महत्त्व

५.२.२ अल्प उत्पादकता–कारणे, उपाय

५.२.३ जमीन धारणेवरील कमाल मर्यादा

५.२.४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या–समस्या आणि उपाय

५.२.५ विशेष आर्थिक क्षेत्र

उद्दिष्टे, समस्या आणि उपाय

५.२.६ नवीन कृषी व्यूहरचना

५.२.७ करार शेती

५.२.८ सेंद्रिय शेती

५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

५.४ सारांश

५.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

५.६ संदर्भ सूची

५.७ सरावासाठी प्रश्न


## ५.० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर आपणास

१) भारतीय शेतीचे स्वरुप आणि अर्थव्यवस्थेतील स्थान

२) शेतीच्या उत्पादकेची सकल्पना

३) शेतीच्या उत्पादकता वाढीचे उपाय सांगता येतील.

४) कमाल जमीनधारणा कायद्यातील तरतुदी व कायद्याची कार्यवाही याबाबत माहिती मिळेल.

५) 'शेतकरी आत्महत्या' या प्रश्नाचे गांभीर्य व हा प्रश्न सोडविण्यासाठी कोणते उपाय आवश्यक आहेत याबाबत माहिती मिळेल.

६) विशेष आर्थिक क्षेत्राची उद्दिष्टे, समस्या व उपाय याबाबत आकलन होईल.

७) 'नवीन कृषी धोरण' व या धोरणाचे यश-अपयश याबाबत माहिती मिळेल.

८) करार शेती, तिचे फायदे याबाबत माहिती मिळेल.

९) सेंद्रिय शेतीचे स्वरूप व तिचे फायदे सांगता येतील.

## ५.१ प्रस्तावना

शेती हा एक अत्यंत पुरातन व्यवसाय आहे. शेती व्यवसायानेच मानवाच्या प्रारंभीच्या भटक्या स्वरूपाच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त करून दिले. मानवी जीवनासाठी अत्यावश्यक समजली जाणारी अन्नधान्याची गरज शेती व्यवसायाकडून भागविली जाते. मानवी जीवनातच नव्हे तर देशाच्या अर्थव्यवस्थेच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी शेती व्यवसायाचे स्थान महत्त्वाचे ठरते. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती व्यवसायाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. विकसित अर्थव्यवस्थांमध्ये विकासाच्या प्रारंभीच्या अवस्थेत शेती क्षेत्राने महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. विकासाच्या प्रारंभी अगर अर्थव्यवस्थेच्या विकासाला सुरुवात करत असताना जास्तीत जास्त लोक शेती व्यवसायावर अवलंबून असतात. शेती विकासामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे औद्योगिक वस्तू व इतर सेवांना शेती क्षेत्रातील लोकांकडून मागणी निर्माण होते. तसेच विकासाच्या प्रक्रियेत होणाऱ्या औद्योगिकीकरणासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची गरज शेती क्षेत्राकडून भागविली जाते. देशाची वाढती लोकसंख्या, औद्योगिक क्षेत्रात आणि सेवा क्षेत्रात काम करणारे लोक यांच्याकडून अन्नधान्य आणि इतर कृषी मालाला येणारी मागणी शेती व्यवसायाकडून पूर्ण होत असल्याने शेती व्यवसाय देशाच्या आर्थिक विकासाचा पाया ठरतो.

भारतात शेती व्यवसायाचे स्थान महत्त्वाचे असले तरी शेती व्यवसायाचे स्वरूप प्रगत नाही. आजही बहुतेक शेतकरी निर्वाह पातळीवरच शेती व्यवसाय करतात. त्यामुळे शेतीतून पुरेसा विक्रेय वाढावा निर्माण होऊ शकत नाही. म्हणून शेतीची उत्पादकता वाढविण्याची आवश्यकता आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे.

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी तसेच शेती आणि ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी जमीन सुधारणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने जमिनीच्या मालकीचे पुनर्वाटप करणे व जमिनीच्या कार्यक्षम वापराच्या उद्देशाने जमिनीचे संघटन करणे म्हणजे जमीन सुधारणा होय. जमीन सुधारणेच्या संस्थात्मक व तांत्रिक अशा दोन बाजू आहेत.

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी नियोजन काळात शासनाने जमीन सुधारणा घडवून आणल्या. जमीन संबंधात अनुकूल बदल घडवून आणण्यासाठी या सुधारणा अपेक्षित होत्या. कसणाऱ्यांना जमिनीची मालकी मिळवून देणे, कुळांना जमीन कसण्यास दीर्घकाळ मिळण्याबाबत शाश्वती देणे, जमीन धारणेच्या आकारमानात उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने बदल घडवून आणणे, सामाजिक न्यायाच्या दृष्टीने जमिनीचे फेरवाटप

करणे इ. जमीन सुधारणेच्या संस्थात्मक बाजू असून त्यामुळे भांडवलाचा वापर न करता जमिनीची उत्पादकता वाढविता येते असे मानले जाते. उत्पादकता वाढविण्यासाठी जमीनदारांचे निर्मूलन, कुळहक्क संरक्षण कमाल जमीन धारणा कायदा इ. कायदे ६०च्या दशकात घटक राज्यांनी केले. या कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास शेतीची उत्पादकता वाढू शकते. प्रस्तुत प्रकरणात आपण कमाल जमीनधारणा कायद्याचा अभ्यास करणार आहोत.

शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्याचा दुसरा उपाय तांत्रिक सुधारणा होय. जमीन सुधारणेच्या तांत्रिक घटकात शेतीसाठी कृत्रीम पाणी पुरवठा, रासायनिक खते व सुधारित बियाणांचा वापर, शेतीचे यांत्रिकीकरण, रोग नियंत्रण व पीक संरक्षण इ.चा समावेश होतो. या तांत्रिक सुधारणांचा अवलंब करून शेती पद्धतीत बदल घडवून आणणे म्हणजे नवीन कृषी व्यूहरचना (धोरण) किंवा हरित क्रांती होय. प्रस्तुत प्रकरणात आपण तांत्रिक सुधारणांचा भाग म्हणून नवीन कृषी धोरण (व्यूहरचना) अभ्यासणार आहोत.

भारतात कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी संस्थात्मक की तांत्रिक सुधारणांवर भर द्यावा याबाबत मतभेद असले तरी प्रथम संस्थात्मक जमीन सुधारणांचा अवलंब झाला. त्यानंतर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून तांत्रिक सुधारणांवर भर देण्यात आला. त्याचा परिणाम शेती उत्पादन आणि उत्पादकतेत वाढ निश्चितच झाली. परंतु शेती व्यवसायाचे आणि शेतकऱ्यांचे प्रश्न मात्र सुटले नाही. कारण जमीन सुधारणा कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली नाही. तसेच तांत्रिक सुधारणांमुळे कृषी उत्पादन वाढले असले तरी शेती व्यवसायाच्या भांडवली खर्चात वाढ झाली, तुलनेत शेतमालाच्या किमतीत पुरेशी वाढ न होणे, नैसर्गिक प्रतिकूलता, सरकारचे प्रतिकूल धोरण, पतपुरवठा व इतर पूरक सोयींची अभाव, वाढता कर्जबाजारीपणा यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन सतत बिघडत राहिले. त्याचा परिणाम गेल्या दोन दशकांपासून शेतकरी आत्महत्येचा प्रश्न गंभीर बनला. यावर एक उपाय म्हणून 'करार शेतीची' संकल्पना पुढे आली. दुसऱ्या बाजूला तांत्रिक सुधारणा अमलात आणल्याने शेती उत्पादनासाठी रासायनिक खतांचा, जंतूनाशकांचा, कीटकनाशकांचा आणि इंधन वापरणाऱ्या यंत्रांचा वापर वाढल्याने पर्यावरणाचा तसेच मानवी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला. बिघडलेल्या पर्यावरणात समतोल निर्माण करण्यासाठी 'सेंद्रिय शेतीचे' समर्थन होऊ लागले. नवीन आर्थिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हितसंबंधांवर परिणाम घडवून आणणाऱ्या विशेष आर्थिक क्षेत्राचा कायदाही गेल्या दोन दशकात वादग्रस्त चर्चेचा विषय ठरला. म्हणून या प्रकरणात विशेष आर्थिक क्षेत्र, करार शेती, सेंद्रिय शेती या मुद्यांचाही अभ्यास आपण करणार आहोत.

## ५.२ विषय-विवेचन

### ५.२.१ स्वरूप आणि महत्त्व :

शेतीचे स्वरूप : 'भारत हा शेतीप्रधान देश आहे' किंवा 'शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे' अशा प्रकारची विधाने आपण अनेक वेळा ऐकतो, वाचतो. यातून हेच स्पष्ट होते की, शेती हा आपल्या देशातील एक मुख्य व्यवसाय आहे. शेती केवळ व्यवसायच नव्हे तर ती भारतीयांची जीवनपद्धती आहे. म्हणूनच शेतीला 'काळी

आई' असेही संबोधले जाते. आईची सेवा करणे जसे प्रत्येकाचे कर्तव्य समजले जाते त्याचप्रमाणे कष्ट करून शेती पिकविणे हे शेतकरी बांधव आपले कर्तव्य मानतात. उद्योजक तोट्यात चालणारा उद्योग बंद करतो. कोणताही व्यावसायिक नुकसानीत जाणारा आपला व्यवसाय गुंडाळतो. परंतु वर्षानुवर्षे तोटा सहन करून शेतकरी आपला व्यवसाय पिढ्यान्पिढ्या करत आलेले आहेत. कारण शेतीकडे व्यवसाय नव्हे, जीवनपद्धती म्हणून पाहिले जाते. अशा या शेतीचे नेमके स्वरूप काय आहे ते आपण समजून घेऊ.

### १) अनिश्चितता :

शेती हा प्राथमिक क्षेत्रातील एक प्रमुख व्यवसाय असल्याने शेतीचे व्यवसाय म्हणून यश हे केवळ मानवी प्रयत्नांवर अवलंबून नसून निसर्गाच्या सहकार्यावर अवलंबून असते. शेतीची पूर्व मशागत पिकांची लागवड आंतरमशागत व शेवटी पीक काढणे या सर्व कृषी कामांचा मेळ पर्जन्यमान व हवामान यांच्याशी कसा बसतो यावर शेतीचे यश अवलंबून असते. एवढेच नव्हे तर पीक हाती आल्यानंतर शेतमालाची विक्री होईपर्यंत शेतमालाला योग्य किंमत मिळते की नाही यावरही शेती व्यवसायाचे यश अवलंबून असते. म्हणून शेतीचे एक व्यवसाय म्हणून स्वरूप अनिश्चितच आहे.

### २) हंगामी व्यवसाय :

उद्योग व्यापाराप्रमाणे वर्षभर केला जाणारा हा व्यवसाय नाही. कारण पर्जन्यमान हा शेती व्यवसायाचा अविभाज्य घटक आहे. भारताला मोसमी वाऱ्यांपासून, विशेषत: नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांपासून बहुतांश पाऊस जून ते सप्टेंबर या काळात मिळतो. याच काळात देशभर शेतजमीन प्रत्यक्ष पिकांखाली असते. कृत्रीम पाणी पुरवण्याची सुविधा नसेल तर वर्षातून फक्त एक पीक घेता येते. भारतात जलसिंचनाचे प्रमाण ३७% पेक्षा कमी आहे. केवळ एवढ्याच जमिनीवर वर्षातून दोन किंवा तीन पिके घेणे शक्य होते. उर्वरित ६३% जमीन कोरडवाहू असून पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. कोरडवाहू जमिनीवर पुरेसे पर्जन्य असेल तर जून ते सप्टेंबर या काळात एकच पीक घेतले जाते. उर्वरित साधारणपणे आठ महिन्यांच्या कालावधीत शेतीत कोणतेही पीक घेता येत नाही. म्हणून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुख व्यवसाय असला तरी तो हंगामी स्वरूपाचा आहे.

### ३) जमिनीची मालकी आणि उत्पादन :

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात जमीनदारी, महालवारी आणि रयतवारी या तीन पद्धती जमिनीच्या मालकी संबंधात अस्तित्वात होत्या. जमीनदारी पद्धतीत शेतसारा (शेतीवरील कर) भरण्याची जबाबदारी ज्यांच्यावर ब्रिटीश शासनाने सोपविलेली होती ते एका ठरावीक रकमेत सरकारला कर भरत असत. परंतु शेतकऱ्यांकडून अवाजवी दराने वसूल करत असत. महालवारी पद्धतीत गावातील प्रमुखाने (महाल म्हणजे गाव) गावातील शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करून शासनाकडे भरावा अशी व्यवस्था होती. या पद्धतीतही अवाजवी शेतसारा वसूल केला जात असे. या दोन्ही पद्धतीत जमीनदार आणि गावप्रमुख हे सरकार आणि जमीन कसणारे शेतकरी यांच्यातील मध्यस्थाच्या भूमिकेत शेतकऱ्यांची पिळवणूक करीत असत. रयतवारी पद्धतीत मात्र खासगी जमीन धारणा मान्य होती. शेतकरी स्वत:

आपली जमीन कसत, सरकारकडे सारा स्वत:च भरत असत. यात मध्यस्थ नव्हते. जमीनदारी आणि महालदारी पद्धतीत मध्यस्थ हेच पुढे जमीन मालक झाले. जमीनदार आणि मोठे शेतकरी कुळांना जमीन कसण्यासाठी देऊ लागले. कुळांकडून अवाजवी खंड वसूल केला जात असे. यामुळे प्रतिकूल जमीन संबंध निर्माण झाले. जमिनीचे मालक स्वत: जमीन कसत नसल्याने जमिनीची उत्पादकता न वाढवता खंडाचे दर वाढवून किंवा शेतसाऱ्याची अवास्तव वसुली करून त्यांना आपले उत्पन्न वाढविणे शक्य होते. तर जमीन कसणारे स्वत: जमिनीचे मालक नसल्याने शेतीची उत्पादकता वाढविण्याबाबत त्यांना प्रेरणा नव्हती. म्हणून जमिनीच्या मालकीसंबंधी अयोग्य संबंध निर्माण झाल्याने शेतीच्या उत्पादकतेवर विपरित परिणाम झाला.

### ४) ग्रामीण कर्जबाजारीपणा :

शेती व्यवसायाबाबत कर्जबाजारीपणाची समस्या ही पुरातन आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात कृषी वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था, बँका आणि वित्तसंस्था यांचा विकास झालेला नव्हता. म्हणून शेतीसाठी व उपभोगाच्या कारणासाठी शेतकरी वर्ग प्रामुख्याने कर्जासाठी सावकारांवर अवलंबून होते. स्वातंत्र्योत्तर काळात कृषी पतसंस्था, बँका, वित्तीय संस्था आणि सहकारी बँका यांचा ग्रामीण भागापर्यंत विस्तार झालेला असला तरी या संस्थांचा अपुरेपणा, कर्जाच्या अटी, कर्जासाठी तारण, अनेक जाचक नियम यामुळे शेतकरी, विशेषत: लहान शेतकरी, सीमांत शेतकरी, ग्रामीण कारागीर हे आजही कर्जासाठी सावकारांवर अवलंबून आहेत. सावकारांचे व्याजदर अधिक असतात. व्याजावर व्याज आकारणे, हिशेबात फसवणूक इ. अनेक गैरप्रकारांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होते. बहुधा सावकारांकडून कर्ज घेणारे शेतकरी कर्जाच्या सापळ्यात अडकतात. अनेकदा एक कर्ज फेडण्यासाठी दुसरे कर्ज घ्यावे लागते. यामुळे कर्जबाजारीपणाची समस्या शेतीव्यवसायाच्या प्रगतीला मारक ठरते. आज या समस्येने शेतकरी आत्महत्येच्या रूपाने गंभीर स्वरूप धारण केलेले दिसून येते.

### ५) परंपरागत उत्पादन पद्धतीचा वापर :

स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही बहुसंख्य शेतकरी कृषी उत्पादनासाठी मानवी आणि पशूश्रमाचा वापर करतात. आधुनिक यंत्राऐवजी परंपरागत अवजारांचा वापर करतात. अर्थात लहान धारण क्षेत्र, भांडवलाचा अभाव, अज्ञान, पतपुरवठ्याच्या अपुऱ्या सोयी यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही.

### ६) विविधता आणि सामान्यीकरणाची समस्या :

भारत खंडप्राय देश असून सांस्कृतिक भिन्नतेप्रमाणेच भारतात प्राकृतिक भिन्नता मोठ्या प्रमाणात आहे. जमीन हवामान, पर्जन्यमान, सुपीकता, जमिनीची पीक उपज करण्याची क्षमता, जमिनीत असलेल्या पिकांसाठी पोषक घटकांची उपलब्धता, नद्या, सागरी सान्निध्य, पर्वतीय प्रदेश व बर्फाळ प्रदेश इ. विविधतेमुळे सर्व प्रदेशात पिकांची प्रचंड भिन्नता होती. शेती पद्धतीतील विविधतेमुळे संपूर्ण देशासाठी एकच कार्यक्रम अगर धोरण राबवून यशस्वी करणे कठीण असते. कृषी उत्पादनाबाबत, एखादा प्रयोग एका ठिकाणी

यशस्वी झाला तरी तो अन्य ठिकाणी यशस्वी होणार नाही. म्हणून सामान्यीकरणाचा अभाव हे भारतीय शेतीचे वैशिष्ट्य सांगता येईल.

**शेतीचे महत्त्व :**

जगातले अपवादात्मक काही देश सोडले तर आज विकास पावलेल्या देशांनी आपला विकास कृषीक्षेत्राच्या विकास आणि विस्ताराकडून केलेला आहे. भारतातही आपल्या अर्थव्यवस्थेचे चढ-उतार कृषी व्यवसायाच्या चढ-उतारांशी संबधित आहेत. आर्थिक विकास हा औद्योगिक आणि सेवा क्षेत्रांच्या विकासावर अवलंबून असतो. तर औद्योगिक विकास अंतिमरित्या शेती विकासावरच अवलंबून असतो. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे स्थान किती महत्त्वाचे आहे हे पुढील मुद्यांवरून स्पष्ट करता येईल.

**१) राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा :**

अर्थव्यवस्थेच्या ज्या व्यवसायाचे राष्ट्रीय उत्पन्नात अधिक योगदान असते त्या व्यवसायाचे अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान असते. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी व्यवसायाचा वाटा मोठा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात कृषी व्यवसायाचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ५६% इतका होता. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी व्यवसायाचा वाटा कसा बदलत गेला हे आपल्याला पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

| वर्ष | राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा |
|---|---|
| १९५०-१९५१ | ५६.५% |
| १९७०-१९७१ | ४५.९% |
| १९९०-१९९१ | ३४.०% |
| २०००-२००१ | २४.७% |
| २००५-२००६ | १९.५५% |
| २००६-२००७ | १८.५१% |
| २००७-२००८ | १७.८% |

आधार - रूदर दत्त आणि के. पी. एम. सुंदरम १६वी आवृत्ती, इंडियन इकॉनॉमी एस **चांद** आणि कंपनी लि. नवी दिल्ली. पृ. क्र. ४९२

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९५१ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा ५६% पेक्षा अधिक होता. परंतु औद्योगिकीकरण आणि आर्थिक नियोजनाचा परिणाम म्हणून उद्योग क्षेत्रातील आणि सेवा क्षेत्रातील उत्पादनात वेगाने वाढ झाल्याने शेती क्षेत्राच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २००७-०८ पर्यंत १७.८% पर्यंत घटलेला आहे.

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा घटत असला तरी कृषी क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व कमी होत नाही. कारण २००६-०७ मध्ये अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया या विकसित देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा २ ते ३% इतका होता. तर भारतात शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा तुलनेने बराच जास्त (१८.५१%) इतका होता.

शेतीच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा आजही इतका मोठा असणे म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्त्वाचे स्थान आहे.

### २) रोजगार पुरविणारे क्षेत्र :

भारतात रोजगाराचे प्रमुख साधन म्हणून शेती व्यवसायाकडे पाहिले जाते. विशेषत: शेती व्यवसायात अकुशल मजूर सामावले जात असल्याने रोजगार पुरविणारे क्षेत्र म्हणून शेती क्षेत्राला महत्त्व प्राप्त होते.

शेती आणि शेतीत काम करणारी लोकसंख्या (दशलक्ष)

| अ.क्र. | वर्गवारी | १९५१ | २००१ |
|---|---|---|---|
| १) | एकूण लोकसंख्या | ३६१ | १०२९ |
| २) | एकूण कर्ती लोकसंख्या | १४० | ४०१ |
| ३) | कर्त्या लोकसंख्येपैकी काम करणारी लोकसंख्या | ९८(७०%) | २३५(५९%) |
| ४) | शेतकरी | ७०(५०%) | १२८(३२%) |
| ५) | शेजमजूर | २८(२०%) | १०७ (२७%) |

वरील सारणीवरून असे सूचित होते की, १९५१ मध्ये एकूण कर्त्या लोकसंख्येपैकी (१४० द.ल.) ९८ द.ल. (७०%) लोक शेती व्यवसायात गुंतलेले होते. तर २००१ मध्ये २३५ दशलक्ष लोक शेती व्यवसायात होते. हे प्रमाण ५९% इतके कमी झालेले असले तरी इतर देशांच्या तुलनेत खूपच जास्त आहे. उदा. ऑस्ट्रेलियात हे प्रमाण ४.७%, जपानमध्ये ५.१%, इंग्लंडमध्ये १.७% तर अमेरिकेत २.७% इतकेच आहे. १९५१ ते २००१ या ५० वर्षाच्या काळात कर्त्या लोकसंख्येपैकी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण फारसे घटले नाही. याच काळात शेतकऱ्यांचे प्रमाण ५०% वरून ३२% वर कमी झालेले आहे. परंतु शेतमजुरांचे प्रमाण मात्र २०% वरून २७% पर्यंत वाढलेले आहे. रोजगाराचे साधन कमी झाले तरी शेतमजुरांचे प्रमाण मात्र वाढलेले आहे. यावरून असेही स्पष्ट होते की शेतकऱ्यांचे (जमीन मालकांचे) प्रमाण कमी होऊन शेतमजुरांचे प्रमाण वाढले. शेतकरी असो की शेतमजूर असो शेती हेच रोजगाराचे साधन आहे.

### ३) औद्योगिक विकासात शेतीचे महत्त्व :

उद्योगांसाठी लागणारा कच्चा माल शेतीक्षेत्रातूनच पुरविला जातो. देशातील कापड उद्योग, ताग उद्योग, साखर उद्योग यांसारख्या प्रमुख आणि विशाल उद्योगांना शेतीतूनच कच्चा माल पुरविला जातो. हे उद्योग प्रत्यक्ष शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. याशिवाय अनेक लघुउद्योग, कुटीरउद्योग प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कच्च्या मालासाठी शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. हातमागावरील कापड तयार करणे, फळांवर प्रक्रिया करणे, तेल गिरण्या, तांदुळ गिरण्या, इ. अनेक उद्योग शेतीतून मिळणारा पक्का माल, कच्चा माल म्हणून वापरतात.

### ४) आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्त्व :

कोणत्याही देशाचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढता सहभाग हा आर्थिक विकासाचा

आणि लोकांच्या कल्याणाचा निकष असतो. आपत्तीमुळे देशातील जनता, उद्योग व शेतकरी यांना लागणाऱ्या वस्तू उपलब्ध होतात. त्यामुळे देशातील भाववाढीवर नियंत्रण राहण्यास मदत होते. तसेच निर्यातीमुळे परकीय चलन प्राप्त होऊन विकासाला पूरक वस्तूंची, साधनांची आणि यंत्रांची आयात करता येते. भारत शेतीतून थेट परकीय बाजारपेठेत चहा, ताग, सुती कापड, मसाल्याचे पदार्थ, कापूस, तंबाखू इ.ची निर्यात केली जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात वरील वस्तूंचे भारताच्या निर्यात व्यापारात प्रभुत्व होते. स्वातंत्र्यानंतर निर्यातीला पारंपरिक वस्तूंचे प्रमाण कमी होऊन चहा, कॉफी, कोको, तयार मसाले, फळे व भाजीपाला, फळांचा रस, दूध, जाम, जेली, काजू इ. नवीन वस्तूंचे प्रमाण वाढले आहे. एकूण निर्यातीतला कृषी क्षेत्राचा वाटा १९६०-६१ ते २००७-०८ या काळात ४४.२७% वरून १२.१५%पर्यंत घटला असला तरी निव्वळ निर्यात उत्पन्न वाढलेले आहे. कारण आर्थिक विकास प्रकियेत औद्योगिक निर्माण वस्तूंचा वाटा वाढलेला आहे. आणि निर्यातीतील शेती उत्पादनाचे शेकडा प्रमाण कमी होणे व औद्योगिक निर्माण क्षेत्राचा वाटा वाढणे हे आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते.

### ५) अन्नधान्याची वाढती मागणी पूर्ण करणे :

देशाची लोकसंख्या जसजशी वाढत जाते त्या प्रमाणात अन्नधान्याची मागणी वाढत जाते वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याबाबत वाढणारी मागणी पूर्ण करण्याचा कृषी हा प्रमुख स्रोत आहे. १९८० नंतर भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. यामुळे पूर्वीच्या तुलनेत अन्नधान्याच्या आयातीवरील खर्चात बचत झाली. ही बचत विकासाला आवश्यक असणाऱ्या साधनांची, तंत्रज्ञानाची अगर शेतीची मागणी भागविण्यास उपयुक्त ठरते. अन्नधान्याची मागणी देशातच पूर्ण होत असेल तर देशाचे सार्वभौमत्व टिकण्यास मदत होते.

### ६) भांडवल निर्मिती :

आर्थिक विकासात भांडवल निर्मितीचा दर मोठा असणे महत्त्वाचे मानले जाते. भांडवलाच्या अभावी आर्थिक विकासाची गती मंदावते. कृषी उत्पन्नात वाढ झाली तर सुमारे ६०% लोकांचे उत्पन्न वाढते. (कारण ६०% लोक रोजगारासाठी शेतीवर अवलंबून आहेत.) त्यामुळे बचत वाढून भांडवल निर्मितीच्या दरात वाढ होऊन आर्थिक विकासाला चालना मिळू शकते.

## ५.२.२ अल्प उत्पादकता - कारणे, उपाय

आर्थिक नियोजनात शेतीउद्योगाला अग्रक्रम देण्यात येऊन शेती उत्पादन आणि उत्पादकता वाढीवर लक्ष केंद्रित करण्यात आले. शेती उत्पादकतेचा संबंध शेती उत्पादन आणि शेतजमीन यांच्याशी आहे. शेती उत्पादकता म्हणजे ठरावीक प्रदेशातल्या विशिष्ट क्षेत्रफळाच्या जमिनीत प्रचलित तंत्रपद्धतीने प्राप्त होणारे उत्पादन होय.

उपलब्ध शेतजमिनीवर प्रचलित तंत्रज्ञान अगर घटक (उदा. बी-बियाणे, खते, कीटकनाशके, यंत्रसामग्री व अवजारे श्रमशक्ती इ.) यांचा वापर करून शेतीतून ज्या ज्या पिकांचे उत्पादन घेतले जाते त्यांचे मापन करून शेतीची उत्पादकता मोजता येते.

शेतीची उत्पादकता पुढील दोन प्रकारे मोजता येते.

### १) दर हेक्टरी उत्पादकता

दर हेक्टरी उत्पादकता मोजण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला जातो.

दर हेक्टरी उत्पादकता = शेतीतील उत्पादन (क्विंटल) / क्षेत्रफळ (हेक्टर)

पाच हेक्टर शेतजमिनीतून विविध आदानांचा (श्रमिक, खते, बी-बियाणे, पाणी, कीटकनाशके) प्रमाणशीर वापर करून ५० क्विंटल गव्हाचे उत्पादन मिळाल्यास शेतीची दर हेक्टर उत्पादकता (५०)१० क्विंटल इतकी येईल.

एकूण शेती उत्पादनाला त्या पिकासाठी वापरल्या जाणाऱ्या शेतजमिनीच्या क्षेत्राने भागल्यास शेतजमिनीची दर हेक्टरी उत्पादकता मिळते. अशा पद्धतीने उत्पादकता मोजल्यास त्याला जमीन उत्पादकता (डरपव झ्रीर्वीलींळींळीूं) असे म्हणतात.

### २) दर माणशी प्रति श्रमिक उत्पादकता :

प्रति श्रमिक उत्पादकता मोजण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला जातो.

प्रति श्रमिक उत्पादकता = शेतीतील उत्पादन / शेतात काम करणाऱ्यांची संख्या

उदा. धान्य उत्पादनासाठी २० श्रमिक ठराविक दिवस शेती हंगामात १०० क्विंटल धान्य पिकवतात, तर प्रति श्रमिक ५ क्विंटल इतकी उत्पादकता येते.

एकूण उत्पादनाला श्रमसंख्येने भागल्यास प्रत्येक श्रमिकाची उत्पादकता मोजता येते. अशा पद्धतीने मोजलेल्या कृषी उत्पादकतेला शेतीची श्रमिक उत्पादकता (Labour Productivity) असे म्हणतात.

वरील दोन संकल्पनांपैकी प्रति श्रमिक उत्पादकतेपेक्षा जमीन उत्पादकता अधिक महत्वाची आहे. कारण वाढत्या लोकसंख्येबरोबर अन्नधान्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अन्नधान्य उत्पादनात वाढ करणे आवश्यक ठरते. अन्नधान्याचे अधिक उत्पादन घेण्यासाठी कृषी क्षेत्रात वाढ करणे शक्य नाही. कारण जमिनीचा पुरवठा मर्यादित आहे. त्यात वाढ करणे शक्य नाही. अशा परिस्थितीत उपलब्ध आहे त्याच जमिनीची उत्पादकता वाढविणे आवश्यक ठरते. वाढत्या लोकसंख्येमुळे श्रमशक्तीत वाढ होते. श्रमाचा पुरवठाही वाढतो. त्याचबरोबर श्रमाला पर्याय म्हणून यांत्रिक साधने काही प्रमाणात वापरता येतात. थोडक्यात श्रमिक उत्पादकता वाढली नाही तरी उत्पादनासाठी अधिक श्रमिकांचा वापर करणे किंवा काही प्रमाणात श्रमाला पर्याय म्हणून यंत्रांचा वापर करणे शक्य आहे. परंतु जमिनीचा पुरवठा मर्यादित असल्याने अधिक उत्पादनासाठी जादा जमीन लागवडीखाली आणणे शक्य नाही. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात श्रमिक उत्पादकतेपेक्षा जमीन उत्पादकता अधिक महत्त्वाची ठरते.

### निवडक पिकांच्या संदर्भात भारतीय शेतीची दर हेक्टरी उत्पादकता

| | विवरण | उत्पादनाचे वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | अन्नधान्य | १९५०-५१ | १९६४-६५ | २००९-१० |
| १) | अन्नधान्ये | | | |
| | तांदूळ (क्विंटल) | ७.१० | १०.८० | २१.३० |
| | गहू (क्विंटल) | ६.६० | ९.१० | २८.३० |
| | मुख्य डाळी (क्विंटल) | ४.३० | ५.१० | १४.१८ |
| | कडधान्ये (क्विंटल) | ४.०० | ५.२० | ६.३० |
| २) | बिगर अन्नधान्ये | | | |
| | तेलबिया (क्विंटल) | ५.२० | ५.६० | ९.६० |
| | ऊस (टन) | ३४ | ४७ | ६६ |
| | कापूस (किलो) | ९५ | १२२ | ३९५ |
| | बटाटे (क्विंटल) | ६६ | ८४ | १९० |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, निवडक पिकांच्या बाबतीत भारतीय शेतीची उत्पादकता साधारणपणे २ ते ५ पटींनी वाढलेली आहे. कापूस आणि गहू या पिकांच्या बाबतीत उत्पादकतेत अधिक वाढ झालेली आहे.

भारतात १९६५-६६ नंतर शेती विषयक नवीन धोरण स्वीकारण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून कृषी उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली एवढेच नव्हे तर १९८० नंतर भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता गाठलेली आहे.

**भारतीय शेतीची तुलनात्मक उत्पादकता :**

भारतीय शेतीची नियोजनाच्या काळात विशेषत: ६०च्या दशकात उत्पादकतेत विशेष वाढ झालेली दिसते. परंतु इतर देशांशी तुलना केल्यास भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे असे दिसून येते.

**निवडक पिकांच्या बाबतीत उत्पादकतेची आंतरराष्ट्रीय तुलना – (उत्पादन दर हेक्टरी मेट्रिक टनामध्ये)**

| देश | तांदुळ | गहू | मक्का | कापूस | तेलबिया |
|---|---|---|---|---|---|
| इजिप्त | ९.८ | चीन ४.२५ | यू.एस.ए. ९.१६ | चीन ११.१६ | अर्जेंटिना २.५० |
| जपान | ६.४२ | फ्रान्स ७.५८ | फ्रान्स ७.५६ | यू.एस.ए. ९.५८ | ब्राझील २.४८ |
| भारत | २.९ | भारत २.७१ | भारत १.१८ | भारत २.६४ | भारत ०.८६ |
| यु.एस.ए. | ७.८३ | यु.के. ७.७७ | जर्मनी ९.६९ | उसबेगीस्तान ७.९८ | यु.एस.ए. २.६१ |
| मॅनमार | २.४३ | ऑस्ट्रेलिया १.६४ | फिलीपाईन्स २.१ | पाकिस्तान ७.६० | चीन २.०५ |
| जग | ३.९६ | जग २.८७ | जग ३.३८ | जग ७.३३ | जग १.८६ |

सारणीत दर्शविलेल्या विविध पिकांच्या दर हेक्टरी उत्पादकतेवरून असे दिसून येते की, भारतीय शेतीच्या उत्पादकतेपेक्षा जगाची सरासरी उत्पादकता बरीच जास्त आहे. परंतु गव्हाच्या बाबतीत भारतीय शेतीची उत्पादकता जागतिक सरासरीच्या जवळपास आहे. यु. एस. ए., चीन, यु. के. ब्राझील, फ्रान्स, जर्मनी या प्रगत देशांच्या तुलनेत भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे.

वरील दोन्ही सारणींच्या एकत्रित विचार केल्यास पुढील निष्कर्ष सांगता येतील -

१) १९५०-५१ पासून भारतीय शेतीच्या उत्पादकतेत समाधानकारक वाढ झालेली आहे.

२) जागतिक सरासरीच्या तुलनेत व प्रगत देशातील सरासरी उत्पादकतेच्या तुलनेत भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे.

३) उत्पादकतेबाबत जगाच्या पातळीवर तुलना केल्यास भारतीय शेतीची उत्पादकता आणखी वाढू शकते. तसेच लोकसंखेचे आकारमान आणि वृद्धीदर लक्षात घेता भारतीय शेतीची उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे.

भारतीय शेतीचीच नव्हे तर भारतातील श्रमिकांची उत्पादकता सुद्धा जगातील इतर देशांच्या तुलनेत बरीच कमी आहे.

**भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याची कारणे**

**१) शेतीवरील अतिरिक्त लोकसंख्येचा भार**

भारतात चरितार्थासाठी आणि रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. १९८० पर्यंत जवळजवळ ७०% लोकसंख्या शेतीवरच अवलंबून होती. २००४ मध्ये एकूण कर्त्या लोकसंख्येपैकी ५८% लोक शेती व्यवसायात गुंतलेले होते. परंतु त्यांनी स्थूल राष्ट्रीय उत्पादनात टाकलेली भर फक्त २१% होती. शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण १९५१च्या तुलनेत आजही बरेच मोठे आहे. बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून असल्याने शेती उत्पादनाचा बराच मोठा भाग लोकांच्या पालनपोषणावर खर्च होतो. तसेच काळानुरूप शेतीवर अवलंबून असलेली एकूण लोकसंख्या (निरपेक्षपणे) वाढत असल्याने शेतकरी कुटुंबांची संख्याही वाढत आहे. त्याबरोबर जमिनीचे विभाजन वाढत जाते व शेतजमिनीचे धारणक्षेत्राचे आकारमान घटत जाते. त्यामुळे उत्पादकता घटते.

**२) ग्रामीण भागातील वातावरण**

ग्रामीण समाज अजूनही शेतीकडे एक उत्पादक व्यवसाय म्हणून पाहत नसून उपजीविकेचे साधन म्हणून पाहतो. उपजीविका भागविण्याइतक्या उत्पादनावर तो समाधानी असतो. उत्पादकता वाढीसाठी फारसे प्रयत्न केले जात नाहीत. याचा उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होतो.

**३) पूरक सोयी आणि सुविधांचा अभाव :**

शेती हा एक व्यवसाय असल्याने त्यासाठी केवळ जमीन, पाऊस, बी-बियाणे, रासायनिक खते, जंतुनाशके, कीटकनाशके, विविध यांत्रिक व सुधारित अवजारे यांचीही आवश्यकता असते. त्यासाठी भांडवलाची गरज असते. भांडवलासाठी शेतकरी अजूनही

सावकारांवर अवलंबून असतात. सावकारी कर्जाच्या मदतीने शेतीची उत्पादकता थोडीफार वाढली तरी मोठा व्याजदर, विविध प्रकारची फसवणूक यामुळे उत्पादनाचा बराच मोठा भाग सावकारी कर्जाची परतफेड आणि स्वत:चा चरितार्थ यासाठीच वापरावा लागतो. शेती उत्पादन वाढीसाठी स्वत:चे भांडवल कधीच उपलब्ध होत नाही.

शेतीसाठी भांडवलाप्रमाणे वाहतूक व्यवस्था, साठवण गृहे, पतपुरवठा या सुविधाही आवश्यक आहेत. त्या पुरेशा उपलब्ध नसल्याने आणि विपणन व्यवस्थेत अनेक मध्यस्थ सहभागी होत असल्याने कृषी उत्पादनाचा बराच मोठा भाग व्यापारी, अडते, दलाल इ. मध्यस्थांकडे जातो. म्हणून एका बाजूला ग्राहकांनी चांगली किंमत देऊनही शेतकऱ्यांना योग्य किंमत मिळत नाही. एकंदरीत पूरक सोयी आणि सुविधांच्या अभावामुळे शेती उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होतो.

**४) धारणक्षेत्राचा आकार :**

भारतातील सरासरी धारणक्षेत्राचा आकार कमी आहे. १९६०-६१ मध्ये दोन हेक्टरपेक्षा कमी आकारमानाची धारणक्षेत्रे ५२% होती. तर २०००-०१ मध्ये हे प्रमाण ८२% पर्यंत वाढले. यातील काही धारणक्षेत्रांचा आकार एक हेक्टरपेक्षाही कमी होता. लहान आकारमानाच्या धारणक्षेत्रात जलसिंचन, यांत्रिकीकरण करणे शक्य नसते. आधुनिक आणि महाग साधनांचा वापर करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. म्हणून शेतीचे आधुनिकीकरण होत नसल्याने उत्पादकता वाढत नाही.

**५) जुनाट उत्पादन क्षेत्र :**

भारतीय शेतीत वापरले जाणारे उत्पादन तंत्र जुने आहे. हरित क्रांतीनंतर तसेच अलीकडील काळात शेतीचे आधुनिकीकरण होत असले तरी या आधुनिकीकरणाचे सार्वत्रिकरण मात्र झाले नाही. मर्यादित भागात फारच थोडे शेतकरी विशेषत: मोठे जमीन मालक आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करतात. बहुसंख्य शेतकरी भांडवलाचा अभाव, लहान धारणक्षेत्र किंवा तंत्रज्ञान साक्षरतेचा अभाव यामुळे जुन्याच पद्धतीने शेती करतात. यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे.

**६) जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी :**

शेती व्यवसायासाठी जमिनीबरोबरच अत्यंत आवश्यक घटक म्हणजे जल होय. भारतात अजूनही एकूण लागवडीखालील जमिनीपैकी ६०% पेक्षा अधिक जमीन बेभरवशाच्या निसर्गाच्या पावसावर अवलंबून आहे. जलसिंचनाचे प्रमाण ३७ ते ३८% इतकेच आहे. जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयींमुळे कृषी उत्पादन वाढविता येत नाही. दरवर्षी देशाच्या अनेक भागात अपुऱ्या पावसामुळे जलसिंचन प्रकल्पांचा जलसाठा अपूर्ण राहतो. याशिवाय पिण्यासाठी काही जलसाठा राखून ठेवावा लागतो. यामुळे जलसिंचनाखालील क्षेत्रालाही पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. म्हणून कोरडवाहू जमिनीप्रमाणे सिंचनाखालील जमिनीची उत्पादकतासुद्धा कमीच राहते.

**७) कृषी संशोधन आणि तंत्रज्ञानाचा अपुरा प्रसार आणि वापर :**

स्वातंत्र्योत्तर काळात कृषी संशोधन आणि कृषीविषयक तंत्रज्ञानाच्या विकासासाठी कृषी विद्यापिठे,

कृषी संशोधन केंद्रे यांच्यामार्फत प्रयत्न केले जात आहेत. नवीन संशोधनाबाबतची माहिती शेतकऱ्यांना पुरविल्यास आणि त्या माहितीचा वापर झाल्यास कृषी उत्पादनात वाढ होणे शक्य आहे. परंतु या संशोधनाचा पुरेसा प्रसार होत नसल्यामुळे त्याचा वापर होत नाही. यामुळे कृषी उत्पादकता वाढीचे उद्दिष्ट पूर्ण होत नाही.

### ८) जमीन कसण्याची पद्धती :

उत्पादकतेचा संबंध जमिनीची मालकी आणि जमीन कसण्याशी असतो. जमीन कसणाऱ्याच्या मालकीची असली तर उत्पादकता वाढीसाठी प्रयत्न होणे स्वाभाविक आहे. परंतु भारतात जमीन मालक जमीन कसत नव्हते तर जमीन कसणाऱ्यांकडे जमिनीची मालकी नव्हती. कारण भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात जमीनदारी पद्धतीचे वर्चस्व होते. जमीनदार शेतकऱ्यांकडून अवाजवी खंड वसूल करून त्यांचे शोषण करीत असत. स्वातंत्र्यानंतर कायद्यानुसार जमीनदारी पद्धत रद्द करण्यात आली. परंतु सर्व राज्यात संपूर्णपणे जमीनदारी पद्धतीचे उच्चाटन झाले नाही. तसेच मोठे जमीन मालक आपली संपूर्ण किंवा अंशत: जमीन कसण्यासाठी कुळांना देत असत. कुळांना सुरक्षितता नसल्याने त्यांना शेतीत गुंतवणूक करणे फायद्याचे नव्हते. शासनाने स्वातंत्र्यानंतरच्या काळात उत्पादकता वाढविण्याच्या हेतूने जमीनदारी निर्मूलन, कुळहक्क संरक्षण, कमाल जमीनधारणा कायदा या सारखे जमीन सुधारणा कायदे केले. परंतु त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे जमिनीची उत्पादकता अपेक्षेप्रमाणे वाढू शकली नाही.

### कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी उपाययोजना :

नियोजन काळात भारतीय शेतीची उत्पादकता वाढलेली आहे. परंतु या काळात लोकसंख्याही जवळपास वार्षिक २% दराने वाढलेली आहे. वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करणे, 'अन्नसुरक्षा' ही संकल्पना राबविणे, तसेच शेतीचे व्यापारीकरण करून कृषी मालाच्या निर्यातीत वाढ करून परकीय चलन प्राप्त करणे यासाठी कृषी उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. कृषी उत्पादकता वाढीसाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१) जमीन सुधारणा कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने कृषी उत्पादकतेत वाढ घडवून आणण्यासाठी बिगर भांडवली उपाय म्हणून अनेक जमीनसुधारणा कायदे केले. यात जमीनदारी पद्धतीचे निर्मूलन करणे, कुळांना संरक्षण देऊन त्यांना जमिनीची मालकी मिळवून देणे, कमाल जमीन धारणा कायद्याच्या माध्यमातून जमिनीचे फेरवाटप करणे, जमिनीचे तुकडीकरण थांबविणे व तुकडेजोड करणे इ. उपाय केलेले आहेत. परंतु या उपाययोजनेचे यश अल्पच आहेत. कायद्याच्या अंमलबजावणीस कमकुवत करणाऱ्या तरतुदींमध्ये दुरुस्ती करून कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास 'कसेल त्याची जमीन' या न्यायाने जमीन कसणाऱ्यांना जमिनीची मालकी, कुळांना संरक्षण व भूमिहीनांना जमीन मिळवून दिल्यास शेतीची उत्पादकता वाढण्यास निश्चितच मदत होईल.

### २) जल जमीन व्यवस्थापन :

शेती उत्पादन वाढविण्याबाबत मुख्य मर्यादा म्हणजे जमिनीचा पुरवठा वाढविता येत नाही. अशा परिस्थितीत पडीक जमिनीचा विकास करणे, पाणथळ व दलदलीच्या जमिनीचा

विकास करणे, जमिनीतील क्षारांचे प्रमाण वाढणार नाही याची काळजी घेणे इत्यादी उपाय करून उपलब्ध जमिनीचा योग्य वापर केल्यास उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

जमीन व्यवस्थापनेबरोबरच जलव्यवस्थापनही तेवढेच महत्त्वाचे आहे. भारताची भौगोलिक रचना उत्तरेकडील बारमाही वाहणाऱ्या नद्या, पर्जन्यमान, समुद्राचे सान्निध्य इत्यादी बाबींचा विचार करता शेतीसाठी पुरेसा पाणीपुरवठा करणे बऱ्याच अंशी शक्य आहे. परंतु त्यासाठी जमीन व्यवस्थापनाशी जलव्यवस्थापनाची सांगड घालणे आवश्यक आहे. काही भागात अतिरिक्त पावसामुळे क्षारनिर्मिती होऊन उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होतो. याउलट देशाच्या काही भागात अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे उत्पादनात पुरेशी वाढ होत नाही. यासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन पद्धतींचा पिकांना पाणी देण्यासाठी वापर करून कमी पाण्यावर अधिक अधिक उत्पादन घेणे, 'पाणी अडवा पाणी जिरवा', विहिरींचे पुनर्भरण करणे, नदीजोड प्रकल्प इ. कार्यक्रम राबवून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविता येईल. जलसिंचन सुविधेत वाढ करता येईल. यामुळे कृषी उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

**३) सुधारित बियाणांचा वापर करणे :**

भारतात अद्यापही दुर्गम आदिवासी भागातील शेतकरी विशेषत: लहान शेतकरी गत हंगामातील उत्पादनाची बियाणे म्हणून साठवणूक करतात. ही साठवणूक शास्त्रशुद्ध पद्धतीने केली नसल्यास बियाणाला कीड लागते. असे बियाणे वापरल्यास त्याची उत्पादकता कमीच असते. उत्पादकता वाढविण्यासाठी संकरित व सुधारित बियाणांचाच वापर शेतकऱ्यांनी केला पाहिजे. त्यासाठी अशा बियाणांचा वेळेवर पुरेसा पुरवठाही केला पाहिजे. अनेकदा सुधारित बियाणांच्या टंचाईमुळे कनिष्ठ दर्जाचे बियाणे वापरावे लागते. जमिनीची प्रत, पाण्याची उपलब्धता, हवामान इ. बाबी लक्षात घेऊन नवीन जातीच्या बियाणांच्या संशोधनाची आजही गरज आहे. जेणेकरून उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

**४) रासायनिक खतांचा वापर वाढविणे :**

वर्षानुवर्षे शेतजमिनीतून विशिष्ट प्रकारची पिके घेतल्यामुळे मातीतील पिकांना पोषक असलेले घटक वापरले जाऊन कमी होतात. मुळातच भारतातील बहुतांश जमिनीत नायट्रोजन घटक द्रव्याची कमतरता आहे. त्यामुळेही जमिनीची उत्पादकता कमी राहते. शेतजमिनीतील पोषक द्रव्यांची, घटकांची कमतरता भरून काढण्यासाठी योग्य त्या रासायनिक खतांचा वापर केल्यास शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होईल. भारतात रासायनिक खतांचा वापर एकूण गरजेच्या फक्त १०% केला जातो. हरितक्रांतीनंतर खतांचा वापर वाढत असला तरी प्रगत देशांच्या तुलनेत खूप कमी आहे. १९६०-६१ मध्ये भारतात खतांचा वापर फक्त २९२ हजार टन इतका झाला. २००६-०७ पर्यंत तो २१६५२ हजार टनापर्यंत वाढला. खतांचा वापर वाढलेला दिसत असला तरी जगाच्या तुलनेत भारतात दर हेक्टरी वापर खूपच कमी आहे. उदा. चीनमध्ये दर हेक्टरी वापर २५७.८ कि. ग्रॅ., तर इजिप्तमध्ये ४४७.८ कि.ग्रॅ. तर भारतात फक्त १०४.४ कि.ग्र. इतका होता.

**५) जलसिंचन क्षेत्रात वाढ करणे :**

शेतजमिनीतून वर्षभरात २ ते ३ पिके घेऊन, तसेच खरीप पिकांचे पावसावरील

अवलंबन कमी करून कृषी उत्पादन वाढविण्यासाठी जलसिंचन क्षेत्रात वाढ करणे हा चांगला उपाय आहे. म्हणूनच भारत सरकारने आर्थिक नियोजनात सातत्याने जलसिंचनाकरिता गुंतवणूक खर्चात वाढ केलेली आहे. परंतु आजही जलसिंचनाखालील कृषी क्षेत्राचे प्रमाण ४०% पेक्षा कमीच आहे. जलसिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी व कृषी उत्पादनाबाबत निश्चितता वाढविण्याससाठी धरणे, कालवे, पाझर तलाव, विहिरी, कूपनलिका इ.चा विकास करून ठिबक सिंचन, तुषार सिंचन या आधुनिक पद्धतींचा स्वीकार केलाच पाहिजे.

### ६) पीक संरक्षण :

पिकांवरील विविध प्रकाचे रोग, कीड व त्यावरील उपाय याबाबत प्रचार व प्रसार करून शेतकऱ्यांमधील अज्ञान दूर केले पाहिजे, जेणेकरून जास्तीत जास्त लोक पिकांवरील रोगांचे निर्मूलन व प्रतिबंधक उपाय करण्यास समर्थ होतील. कृषी तज्ज्ञांच्या अंदाजानुसार पिकांवरील रोग, कीटक तसेच उंदीर यांच्यामुळे ५१% पिके नष्ट होतात. असे कृषी तज्ञांच्या अभ्यासावरून दिसून येते. म्हणून वेळोवेळी पिकांना रोगांपासून मुक्त करण्यासाठी सरकारी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

### इतर उपाय :

वरील उपायांव्यतिरिक्त इतर अनेक उपाय करून कृषी उत्पादकता वाढण्यास मदत होऊ शकते. कृषी व्यवसायात मानवी श्रमाबरोबरच यांत्रिक साधनांचा वापर वाढवून शेतीच्या यांत्रिकीकरणास गती देणे, पुरेसा भांडवलपुरवठा होण्यासाठी लहान शेतकऱ्यांसाठी सहकारी पतसंस्था व ग्रामीण बँका, व्यापारी बँका यांच्यामार्फत जास्तीत जास्त कर्जसुविधा वेळेवर उपलब्ध करून दिल्या पाहिजे. तसेच कृषी विद्यापीठे, राज्य व केंद्रीय कृषी संशोधन केंद्रे यांच्याद्वारा सुधारित बियाणे विकसित करणे, पिकांवरील रोगांचा प्रसार कमी करणे यासाठी पुरेसे संशोधन करणे, इत्यादी उपायांनी कृषी उत्पादकतेत वाढ घडवून आणण्यात निश्चित मदत होईल.

## ५.२.३ जमीन धारणेवरील मर्यादेबाबत नवीन दृष्टिकोन :
## (New Approach for ceiling on Land Holding)

भारताच्या ग्रामीण भागात स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजतागायत जमीन हेच निर्वाहाचे प्रमुख साधन राहिलेले आहे. परंतु जमिनीच्या मालकीबाबत मात्र कमालीची विषमता होती. शेतजमिनीची जास्तीत जास्त मालकी मुठभर जमीनदार आणि मोठे शेतकरी यांच्याकडे होती. तर बहुसंख्य अल्पभूधारक व सीमांत शेतकरी यांच्या मालकीच्या जमिनीचे प्रमाण अल्प होते. याशिवाय केवळ शेतीवर जीवन जगणारे शेतमजूर भूमीहीनच होते. अशा परिस्थितीत कृषी क्षेत्रातील उत्पन्न आणि संपत्तीच्या वितरणातील असमानता दूर करण्याच्या हेतूने भारतात एका व्यक्तीकडे जास्तीत जास्त किती जमीन असावी या संदर्भात जमीन धारणेवर मर्यादा घालण्यात आल्या. निर्धारित मर्यादेपेक्षा अतिरिक्त ठरणारी जमीन सरकारने ताब्यात घेऊन ती भूमिहीन शेतमजूर सीमांत आाि लहान शेतकऱ्यांना वाटून देण्यात यावी अशी या कायद्याची मुख्य भूमिका होती.

जमीन धारणेवर कमाल मर्यादा घालण्याची आवश्यकता पुढील कारणांमुळे स्पष्ट होते.

### १) जमीन हेच निर्वाहाचे मुख्य साधन :

ग्रामीण भागात जमीन हेच जीवन निर्वाहाचे प्रमुख साधन आहे. असे असताना बहुसंख्य लोकांकडे फारच लहान आकारमानाच्या जमिनी होत्या, काही लोक तर भूमिहीन होते. अल्पभूधारकांना पुरेसे धारणक्षेत्र मिळवून देणे व भूमिहीनांना चरितार्थ भागविण्यासाठी उत्पन्नाचे साधन म्हणून जमीन देणे यासाठी जमीन धारणेवर कमाल मर्यादा घालणे आवश्यक होते.

### २) शेतजमिनीचा मर्यादित पुरवठा :

भारतात लोकसंख्येच्या तुलनेत उपलब्ध जमिनीचे प्रमाण कमी आहे. कारण वाढत्या लोकसंख्येनुसार जमिनीची मागणी वाढणे स्वाभाविक आहे. परंतु जमिनीचा पुरवठा वाढविणे शक्य नाही. अशा परिस्थितीत मोठ्या जमीन धारकांची अतिरिक्त जमीन काढून घेऊन ती अल्पभूधारक व भूमिहीनांना देणे उचित ठरते. यासाठी जमीन धारणेवर मर्यादा घालणे आवश्यक होते.

### ३) उत्पन्न व संपत्तीबाबत समानता निर्माण करणे :

जमीन ही संपत्ती असून तिचे मुल्य वाढत असते. शिवाय जमीन उत्पादनाचा महत्त्वाचा घटक आहे. म्हणून ज्यांच्याकडे जमिनीची मालकी अधिक त्यांच्याचकडे उत्पन्न आणि संपत्तीचे केंद्रीकरण होते. परंतु अल्पभूधारक आणि भूमिहीनांना उत्पन्न आणि संपत्ती मिळविण्याची संधीच मिळत नाही. ही अन्यायकारक परिस्थिती बदलण्यासाठी जमीनधारणेवर कमाल मर्यादा घालणे आवश्यक होते.

### ४) शेती उत्पादनात वाढ घडवून आणणे :

ज्यांच्याकडे मोठ्या आकारमानाच्या जमिनी त्यांना कृषी उत्पादकता वाढीसाठी प्रयत्न करावेसे वाटत नाही. कारण एक तर स्वत:च्या गरजा भागवून त्यांना अतिरिक्त उत्पादन (मोठ्या आकारमानाच्या जमिनीमुळे) मिळू शकते. किंवा खंडाने कुळांना जमीन कसण्यासाठी दिली असता खंडाचे दर वाढवूनही अधिक उत्पादन मिळविणे शक्य होते. त्यामुळे जमिनीचा कार्यक्षम वापर होत नव्हता. दुसऱ्या बाजूला ज्यांच्याकडे खूप लहान आकारमानाच्या जमिनी होत्या त्यांना लहान जमिनीमुळे उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत मोठ्या जमीन धारकांकडून अतिरिक्त जमीन काढून घेऊन ती अल्पभूधारकांना आणि भूमिहीनांना वाटून दिल्यास शेतजमिनीचा कार्यक्षम वापर होऊन शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होते.

### ५) रोजगार वाढ :

स्वमालकीची जमीन मिळाल्यास उत्पन्नाच्या साधनाबरोबर रोजगाराचाही प्रश्न सोडवण्यास कमाल जमीनधारणा कायद्यामुळे शक्य होते.

वरील मुद्यावरून हेच स्पष्ट होते की जमीन धारणेवर कमाल मर्यादा घालून शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने प्रेरणा देणे, आर्थिक क्षमता प्रस्थापित करणे, सामाजिक

न्याय मिळवून देणे, दुर्मिळ साधनसामुग्रीचा (जमीन) कार्यक्षम वापर करणे इ. हेतू साध्य करणे शक्य आहे.

भारतीय नियोजनमंडळाने कमाल जमीन धारणेची मर्यादा निश्चित करण्यासाठी एका कार्य मंडळाची नियुक्ती केली. या कार्यमंडळाने असे मत व्यक्त केले आहे की, ''शेतजमिनीवर वाढत्या लोकसंख्येचा प्रचंड भार आहे. कृषी व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात लोकसंख्या स्थानांतरणाची शक्यता कमी आहे. आणि वाढत्या रोजगाराबरोबरच शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी शेत जमिनीच्या धारणक्षेत्रावर मर्यादा घालणे अत्यंत आवश्यक आहे.''

सदर कार्यमंडळाच्या भूमिकेचा विचार करून केंद्र शासनाने घटक राज्यांना जमीन धारणेवर कमाल मर्यादा घालणारे कायदे करण्यास सूचित केले. त्यानुसार नियोजन काळात घटक राज्यांनी कमाल जमीन धारणा कायदे पास केलेले आहेत.

**कमाल जमीन धारणा कायद्यातील तरतुदी :**

भारतात १९५९ साली निरनिराळ्या राज्यांमध्ये कुळ कायदा लागू करण्यात आला. याच कायद्यानुसार जमिनीची कमाल मर्यादाही ठरविण्यात आली होती. परंतु शेतजमिनीचा कमाल जमीनधारणा कायदा यानंतर निरनिराळ्या राज्यांमध्ये निरनिराळ्या वर्षी लागू करण्यात आला. महाराष्ट्रात हा कायदा २६ जानेवारी १९६२ पासून लागू करण्यात आला. प्रत्येक राज्यातील तरतुदी भिन्न होत्या. जुन्या कायद्यातील त्रुटी लक्षात घेऊन २६ सप्टेंबर १९७० ला कमाल धारणेबाबत नवीन धोरण जाहीर करण्यात येऊन जुन्या कायद्यात सुधारणा करण्यात आल्या.

या कायद्यानुसार कमाल जमीनधारणा ठरविण्याचा आधार बदलण्यात आला. जुन्या कायद्यानुसार कमाल जमीनधारणा ठरविताना व्यक्ती हा आधार मानला जात असे. याचा अर्थ कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती किती जमीन बाळगू शकेल ती मर्यादा ठरविली गेली. जुन्या कायद्यानुसार मोठ्या प्रमाणावर जमिनीची मालकी मिळविता येत असे. त्यामुळे अतिरिक्त जमिनी फारशा घोषित झाल्या नाहीत.

सन १९७०च्या नवीन धोरणानुसार जमिनीची कमाल मर्यादा ठरविताना कुटुंब हा आधार समजण्यात येत असे. कुटुंबाच्या व्याख्येत पती, पत्नी व मुले यांचाच अंतर्भाव करण्यात आला आहे. ज्या कुटुंबात ५ पेक्षा अधिक मुले आहेत अशा कुटुंबाला जादा मुलांसाठी दर मुलामागे अधिक जमीन देण्याची तरतूद आहे. परंतु कोणत्याही वेळी कुटुंबाला कमाल जमीन धारणेच्या दुपटीपेक्षा जादा जमीन मिळणार नाही अशीही काळजी घेण्यात आली. जुन्या कायद्याच्या तुलनेत नवीन कायद्यातील हे धोरण अधिक उचित ठरते.

जुन्या कायद्यानुसार जमीन धारणेची कमाल मर्यादा बरीच जास्त होती. तसेच कमाल आणि किमान मर्यादेत मोठे अंतर होते. उदा. आंध्र प्रदेशात जमीन धारणेची मर्यादा २७ ते ३२४ एकर, राजस्थानात २२ ते ३३६ एकर, गुजरातमध्ये १९ ते १३२एकर तर महाराष्ट्रात १८ ते ५४ एकर या मर्यादा ठरविण्याचा अधिकार राज्यांनाच देण्यात आला असल्याने राज्याराज्यात कमाल जमीनधारणा भिन्न होत्या.

सुधारित कायद्यातील मार्गदर्शक तत्त्वानुसार जमिनीचा प्रकार, पीक पद्धती, सिंचनाची व्यवस्था, वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेता येण्याची शक्यता इ. बाबी विचारात घेऊन

कमाल मर्यादा ठरविण्यात आल्या.

भिन्न परिस्थितीत जमीन धारणेच्या कमाल मर्यादा पुढीलप्रमाणे ठरविण्यात आल्या.

१) सुपीक जमीन व पाणीपुरवठ्याची सुविधा – १० ते १८ एकर

२) पाणी पुरवठ्याची सुविधा परंतु वर्षातून एकच पीक घेता येत असल्यास – २० ते २७ एकर

३) कोरडवाहू जमीन – ५४ एकर

**कमाल जमीन धारणेवरील मर्यादेस सूट :**

कमाल जमीनधारणा कायद्यानुसार सूट देण्याबाबत वेगवेगळ्या राज्यांमध्ये भिन्न तरतुदी करण्यात आल्या होत्या. काही राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात सूट देण्यात आल्या. उदा. उत्तर प्रदेश, केरळ, म. प्रदेश, महाराष्ट्र, या राज्यांमध्ये देण्यात आलेल्या सूट अनुक्रमे २०, १७, १४, १७ इतक्या होत्या. कायद्यातून वगळण्यात आलेल्या जमिनीत बगीचे, ऊसाची शेते, धार्मिक संस्था व ट्रस्ट, सहकारी शेतीच्या मालकीच्या जमिनी, यांत्रिकीकरण झालेल्या जमिनी इ. प्रकारच्या जमिनींबाबत सूट देण्यात आल्या. काही राज्यांमध्ये अशी सूट मिळालेल्यांची संख्या मोठी असल्याने मर्यादेपेक्षा अतिरिक्त ठरणाऱ्या जमिनीचे प्रमाण अल्प होते. म्हणून नवीन कायद्यात सुटींची संख्या कमी करण्यात आली. उदा. यांत्रिकीकरण झालेली जमीन साखर कारखान्यांची ऊसाची शेती, जुन्या राजेरजवाड्यांच्या जमिनी आणि खाजगी विश्वस्त संस्थांच्या जमिनी इ. जमिनी सुटीतून वगळण्यात आल्या.

**कमाल जमीन धारणा कायद्याची कार्यवाही :**

कमाल जमीन धारणा कायद्याच्या अंमलबजावणीमुळे किती जमिनी अतिरिक्त ठरल्या. त्यापैकी सरकारला किती ताब्यात घेता आल्या, सरकारच्या ताब्यात आलेल्या जमिनींपैकी किती जमिनींचे पूनर्वाटप करण्यात आले अशा प्रकारच्या माहितीचे आणि आकडेवारीचे अवलोकन केल्यास कायद्याची प्रगती किती झाली हे कळू शकते.

**कमाल जमीनधारणा कायद्याच्या अंमलबजावणीबाबत प्रगती**

| | क्षेत्रफळ लाख एकर | ३१-३-१९८० पर्यंत | ३१-३-१९८५ पर्यंत | ३१-३-१९९० पर्यंत | ३१-३-२००४ पर्यंत |
|---|---|---|---|---|---|
| १) | अतिरिक्त घोषित क्षेत्रफळ | ६९.१३ | ७२.०७ | ७२.२३ | ७३.३६ |
| २) | सरकारने ताब्यात घेतलेले क्षेत्र | ४८.५० | ५६.९८ | ६२.१२ | ६४.९७ |
| ३) | वितरित करण्यात आलेले क्षेत्र | ३५.५० | ४२.६४ | ४६.४७ | ५४.०३ |
| ४) | लाभार्थींची संख्या (लाखात) | २४.७३ | ३२.९० | ४३.६० | ५७.४६ |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, मार्च २००४ पर्यंत या कायद्यानुसार ७३.३६ लाख एकर जमीन अतिरिक्त ठरली. त्यापैकी सरकारने ६४.९७ लाख एकर जमीन ताब्यात घेतली. याचा अर्थ अतिरिक्त जमिनीपैकी ८८.५६% जमीन सरकारला ताब्यात घेता आली. या जमिनीपैकी ५४.०३ लाख एकर जमिनीचे (८३.१६%) वितरण करण्यात आले. एकूण

लाभार्थींची संख्या मार्च १९८० पर्यंत फक्त २४.७५ लाख होती. तर मार्च २००४ पर्यंत लाभार्थींची संख्या ५७.४६ लाख इतकी झाली.

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या १९९२-९३च्या आर्थिक अहवालात या कायद्यास मर्यादित  यश मिळण्यास कायद्यातील पळवाटा जबाबदार मानलेल्या आहेत. म्हणून कायद्याच्या अपयशाबाबत पुढील कारणे सांगितली जातात.

१) कायद्यातील त्रुटींचा आधार घेऊन काही जमीन मालकांनी कुटुंबातील सदस्य संख्या पाच पेक्षा जास्त दाखवून कमाल जमीन धारणेच्या मर्यादेपेक्षा दुप्पट जमीन जवळ बाळगण्यास यशस्वी झाले.

२) कुटुंबातील सज्ञान मुलांच्या नावाने वेगळे धारणक्षेत्र बाळगण्यात काही जमीन मालक यशस्वी झाले.

३) एकत्र कुटुंबातील धारणक्षेत्राची मर्यादा वेगळी (जादा) ठरविण्यात आली. त्यामुळे एकत्र कुटुंबातील प्रत्येक हिस्सेदाराकडे वेगळे कमाल धारणक्षेत्र राहिले.

४) चहा, कॉफी, रबर, नारळ इ. बागा आणि धार्मिक व सामाजिक ट्रस्ट इ. बाबत कमाल जमीनधारणा लागू नव्हती. याचा फायदा अनेकांनी घेतला व स्वत:कडे अधिक जमिनी बाळगल्या.

५) जमीन हस्तांतरणाच्या खोट्या नोंदी करून काहींनी बरीचशी जमीन कमाल मर्यादेच्या आत दाखवून स्वत:कडे बाळगली.

६) कायद्यामध्ये ज्या सूट (Exmption) देण्यात आल्या त्यांचा गैरवापर करून अवैध मार्गांनी जमिनीचे विभाजन करण्यात आले.

**कायद्याचे मूल्यमापन :**

साधारणपणे दुसऱ्या आणि तिसऱ्या योजनाकाळात वेगवेगळ्या राज्यांमध्ये कमाल जमीन धारणा कायदे पास करण्यात आले. प्रारंभी प्रत्येक राज्याच्या जमीन धारणेच्या मर्यादा भिन्न होत्या. परंतु १९७२ मध्ये झालेल्या सुधारणानुसार सर्व राज्यांसाठी जमीन धारणेची कमाल मर्यादा समान ठेवण्यात आली. परंतु या कायद्याचा फारसा उपयोग झाला नाही. डॉ. दांडेकर आणि रथ यांच्या अंदाजानुसार कायद्याने ४१८ लाख एकर जमीन अतिरिक्त ठरून त्यापैकी ३९५ लाख एकर जमिनीचे वितरण होईल असे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात २००४ पर्यंत ७३.३६ लाख एकर जमीन एवढीच अतिरिक्त ठरली. त्यापैकी सरकारला ६४.९७ लाख एकर जमीन ताब्यात घेता आली. तर ५७.४६ लाख एकर एवढ्याच जमिनीचे वितरण झाले. यावरून असे दिसते की, कायद्याला अपेक्षित यश मिळालेच नाही.

**५.२.४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या : समस्या आणि उपाय :**

जेव्हा एखादी व्यक्ती स्वत:च निर्णय घेऊन आपल्या जीवनाचा शेवट, करते त्यास आत्महत्या असे मानले जाते. आर्थिक, सामाजिक, राजकीय कारणांमुळे नैराश्य येऊन मनोधैर्य खचल्याने अशा प्रकारचा आत्मघातकी निर्णय घेतला जातो. साधारणपणे गळफास,

विषप्राशन, विहिर किंवा अन्य जलाशयात उडी घेणे, धावत्या रेल्वेखाली स्वत:ला झोकून देणे, पेटवून घेणे इ. मार्गांचा उपयोग करून आत्महत्या केली जाते. कोणत्याही समाजात अगर देशात फार पूर्वीपासूनच अशा प्रकारची लाखात एखादी घटना घडत आलेली आहे. म्हणून आत्महत्या ही समस्या तशी नवीन नाही. परंतु एखादा विशिष्ट वर्ग, विशिष्ट काळात मोठ्या संख्येने आत्महत्या करू लागतो तेव्हा ही समस्या कोणत्याही देशाला अगर समाजाला गांभीर्याने विचार करायला लावणारी आहे.

एकीकडे भारत महासत्ता बनण्याची चर्चा होत असताना दुसऱ्या बाजूला अजूनही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या संख्येने होणे ही भारताच्या आर्थिक विकासाच्या वाटचालीतील शोकांतिका आहे.

भारतात आत्महत्या करणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे. विशेषत: २००१ पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या वाढलेली आहे. १० एप्रिल २००६ रोजी केंद्रीय कृषीमंत्री मा. शरद पवार यांनी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि केरळ या आत्महत्याग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली. या बैठकीत त्या त्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत जी सांख्यिकीय माहिती पुरविली त्या माहितीनुसार २००१ ते २००६ या काळात कर्नाटकात ५९१०, महाराष्ट्रात ९८१, आंध्रप्रदेशात २०३५ आणि केरळमध्ये २०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात आत्महत्या करणाऱ्यांची संख्या यापेक्षाही जास्त होती, अशी माहिती नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोमार्फत पुरविण्यात आली. या माहितीनुसार २००१ ते २००४ या कालावधीत वरील चार राज्यांमधील ३५००० शेतकऱ्यांनी तर संपूर्ण देशात ७०००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. त्यानंतरच्या काळातही आत्महत्यांचे सत्र थांबलेले नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या समस्येबाबत सरकारला गंभीर दखल घ्यावी लागली. महाराष्ट्रातील आत्महत्येची समस्या, कारणे आणि उपाययोजना सुचविण्यासाठी सरकारने 'इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च, मुंबई' या संशोधन संस्थेकडे जबाबदारी सोपविली. तसेच डॉ. नरेंद्र जाधव यांच्या एक सदस्यीय समितीकडेही ही जबाबदारी सोपविण्यात आली. इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च ब्युरोचे श्री. सूरजीत मिश्रा आणि डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अहवालानुसार महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण १९९५ ते २००४ या काळात जवळजवळ ४ पटींनी वाढलेले आहे.

**आत्महत्येची कारणे :**

कोणत्याही समाजाच्या अगर वर्गाच्या संदर्भात आत्महत्येच्या कारणांचा वेध घेतला असता असे दिसून येते की, आत्महत्या होण्यामागे कौटुंबिक, सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक अशी अनेक कारणे दिसून येतात. परंतु शेतकरी वर्गाच्या बाबतीत आत्महत्येस जबाबदार असणाऱ्या प्रमुख घटकांमध्ये प्रामुख्याने आर्थिक घटकांचा प्रभाव दिसून येतो.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे :**

**१) वाढता कर्जबाजारीपणा :**

शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार असलेल्या घटकांपैकी कर्जबाजारीपणा हा सर्वात प्रमुख घटक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने कृषी वित्त पुरवठ्याला प्राधान्य

देऊनही दूरवर पसरलेल्या खेड्यातील शेतकऱ्यांपर्यंत हा कर्जपुरवठा पुरेशा प्रमाणात पोहोचला नाही. यामुळे खाजगी सावकारांकडून कर्जे घ्यावीच लागतात. अवाजवी व्याजदरांमुळे अशी कर्जे शेतकऱ्यांना परवडत नाहीत. सावकारांकडून कर्ज घेणारे शेतकरी कर्जाच्या सापळ्यात अडकून पडतात. कृषी पतसंस्था, सहकारी बँका व अन्य बँकांकडून कर्ज घेतली तर ती पावसाच्या अनिश्चितपणामुळे व इतर कारणांमुळे अनुत्पादक ठरतात. म्हणून कर्जाची परतफेड वेळेवर होत नाही. व्याजाचा आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत जातो. वाढता कर्जबाजारीपणा ज्यांना असह्य होतो ते आत्महत्येचा आधार घेऊन कर्जमुक्त होतात.

### २) कर्जाचा अनुत्पादक वापर :

अनेकदा शेतीसाठी घेतलेली कर्जे बिगर शेती कामांसाठी वापरली जातात. सण-समारंभ, विवाह, शिक्षण, आजारपण इ. कारणांसाठी वापरली जाणारी कर्जे अनुत्पादक असल्याने कर्ज परतफेडीची क्षमता निर्माण होत नाही. म्हणून कर्ज न फिटल्याने शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढतो.

### ३) उच्च उत्पादन खर्च :

अलीकडील काळात रासायनिक खते, सुधारित बी-बियाणे, कीटकनाशके इ. आदानांच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. महाराष्ट्रातील अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यातील प्रती हेक्टरी उत्पादन २२६८ रुपये इतके आहे, तर उत्पादन खर्च प्रतीहेक्टरी ३२९० इतका आहे. प्रा. हनुमंतराव पाटील यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार परभणी जिल्ह्यात १ रु. मूल्याच्या कापूस उत्पादनासाठी १ रु. १६ पैसे इतका खर्च करावा लागतो. सिद्धार्थ मिश्रा व संगीता श्रॉफ यांच्या अभ्यासानुसार कापूस हे प्रमुख पीक असणाऱ्या राज्यांमध्ये शेतकऱ्यांचा आत्महत्येचा दर अधिक आहे.

### ४) शेतमालाच्या किमतीत चढ-उतार :

शेतमाल साठविण्याच्या अपुऱ्या सोयी आणि आर्थिक अडचण यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल मिळेल त्या किमतीला विकण्याची घाई करावी लागते. शेतमालाच्या किमतीत वाढ झाल्यास त्याचा फायदा बहुदा व्यापारी किंवा दलालांनाच होतो. शेतकरी वर्ग अशा लाभांपासून वंचित राहतो. निसर्गाच्या कृपेने चांगले भरघोस उत्पादन मिळाले तर भाव मिळत नाही. कमी भावाचा फटका शेतकऱ्यांनाच बसतो. शेतमालाच्या किमतीत वाढ असो अगर घट असो शेवटी नुकसान शेतकऱ्यांचेच होते.

### ५) अपुऱ्या सिंचन सुविधा :

भारतात सिंचनाचे प्रमाण ३७% इतके आहे. ६३% शेतकारी मान्सूनवर अवलंबून आहेत. जलसिंचनाचे प्रमाण अनेक राज्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण फक्त १६% आहे. यवतमाळ जिल्ह्यात २.२९% तर अमरावती जिल्ह्यात १.९५% इतकेच आहे. शेतकरी आत्महत्येचा दर साधारणपणे अल्प जलसिंचन भागात अधिक असल्याचे दिसून येते. उदा. अल्प जलसिंचनाचे प्रमाण असलेल्या अमरावती विभागात सर्वात जास्त

७२% इतका आत्महत्येचा दर होता. आत्महत्या करणाऱ्या ९८% शेतकऱ्यांना जलसिंचनाच्या सुविधा नव्हत्या असे अभ्यासावरून दिसून येते. म्हणून अपुऱ्या सिंचन सुविधा हे आत्महत्येचे एक प्रमुख कारण आहे.

## ६) सरकारचे धोरण :

सरकारचे आयात विषयक धोरणही काही अंशी शेतकऱ्यांच्या अडचणी वाढविण्यास जबाबदार आहे. काही वस्तूंच्या बाबतीत आयातीची कोटा पद्धती रद्द करणे, काही वस्तूंच्या बाबतीत आयातीवरील बंदी उठविणे, तर काही वस्तूंच्या बाबतीत आयातशुल्क कमी करणे, या स्वरूपात शासनाने १४३५ शेती वस्तूंवरील संख्यात्मक नियंत्रणे रद्द केली. त्यामुळे परदेशातील धान्य, डाळी, फळे यांसारख्या अनेक वस्तूंची भारतात आयात झाली. त्यामुळे भारतात शेतमालाच्या उत्पादन खर्चात वाढ होऊनही शेतमालाच्या किमतीत वाढ झाली नाही. काही शेतमालाच्या किमती घटल्या. परिणामी शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

जागतिक व्यापार संघटनेचा एक सदस्य या नात्याने भारताला जागतिक व्यापार संघटनेच्या कराराचे पालन करावे लागते. त्यामुळे शेतीला दिली जाणारी अंशदाने कमी करावी लागत आहेत. शेतीला मिळणाऱ्या सरासरी अंशदानाचे प्रमाण अमेरिकेत २६%, युरोपियन संघात, ३६%, जपानमध्ये ७२%, कॅनडामध्ये ३३% तर भारतात केवळ २% आहे. अमेरिकेतील कापूस उत्पादकांना दरडोई ८३ लाख रुपयांची अंशदाने दिली जातात. भारतात हे प्रमाण खूप कमी आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्येच आत्महत्येचे प्रमाण बरेच मोठे आहे. या विवेचनावरून असे दिसून येते, की शासनाचे सदोष धोरणही शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरते.

## नैसर्गिक आपत्ती :

निसर्गाच्या कृपेवर अवलंबून असलेल्या शेती व्यवसायाला वारंवार अल्पवृष्टी, अतिवृष्टी, दुष्काळ, अनियमित पाऊस, पूर, भूकंप, वादळे, प्रतिकूल हवामानामुळे पिकांवर येणारे रोग यांसारख्या आपत्तींना नेहमीच तोंड द्यावे लागते. पिकविम्याचे अपुरे संरक्षण, सरकारकडून मिळणारी नुकसान भरपाई विलंबाने मिळणे इ. मुळेही शेतकऱ्यांना आत्महत्येचा निर्णय घ्यावा लागतो.

## उपाययोजना :

## १) उत्पादन खर्चावर आधारित भाव

कृषी उत्पादनाबाबत मोठ्या प्रमाणात अनिश्चितता असताना निसर्गाच्या कृपेमुळे एखाद्या वर्षी भरघोस उत्पादन आले तरी शेतकऱ्याला त्याचा लाभ मिळत नाही. कारण अशा वेळी शेतमालाचे भाव घसरलेले असतात. अनेकदा ग्राहकांना अन्नधान्य, डाळी, भाजीपाला यांसारख्या उपभोग्य वस्तूंसाठी मोठी किंमत द्यावी लागते. त्याचवेळी शेतकऱ्यांना पुरेशी किंमत मिळालेली नसते. कारण बाजारातील दलाल, व्यापारी इ. मध्यस्थांनी खरेदी-विक्री प्रक्रियेत सहभाग घेऊन अवाजवी मोबदला प्राप्त केलेला असतो. परिणामी शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही. यावर उपाय म्हणजे कृषी विपणन व्यवस्था भक्कम आणि प्रभावी

केली पाहिजे. मध्यस्थांची संख्या मर्यादित ठेवणे, हमी भाव देणे, कृषी विपणन व्यवस्थेतील शेतकरी हिताविरुद्ध नियम आणि प्रथा रद्द करणे इ. उपाय करण्याची आवश्यकता आहे.

### २) सवलतीच्या दराने पुरेसा कर्जपुरवठा :

निसर्गाच्या अवकृपेमुळे झालेल्या नुकसानीची तीव्रता कमी करणे, सावकारांच्या जाचातून शेतकऱ्यांची मुक्तता करणे यासाठी कमीत कमी व्याजदराने शेतीसाठी कर्ज पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. किंबहुना काही प्रमाणात बिगर कृषी विशेषत: निर्वाहासाठीसुद्धा कर्जपुरवठा झाला पाहिजे. कारण निर्वाहाच्या गरजा आपल्या व्यवसायातून अगर मजुरीतून भागविणे शक्य नसते. अशा वेळी जगण्यासाठी सावकारी कर्जाचा आधार घेतला जातो. परंतु बऱ्याचदा जगण्यासाठी घेतलेली सावकारी कर्जे अत्यंत जाचक ठरून मृत्यूस (आत्महत्येस) कारणीभूत ठरतात. म्हणून अल्प व्याजदराने कर्जपुरवठा, प्रसंगी निर्वाहासाठी कर्जपुरवठा याकरिता राष्ट्रीयकृत बँकांनी पुढाकार घेतला पाहिजे. शेतकऱ्यांच्या बँका म्हणून संबोधल्या जाणाऱ्या सहकारी बँकांची कार्यक्षमता सुधारून त्यांना अधिक सक्षम बनविले पाहिजे. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योगदानातून आकस्मिक निधी उभारला पाहिजे.

### ३) सिंचन सुविधेत वाढ :

कोरडवाहू शेती बहुदा किफायतशीर ठरत नाही. म्हणून जलसिंचनाची सुविधा नसलेले शेतकरी नेहमीच आर्थिक विवंचनेत असतात. भारतात सिंचनाचे प्रमाण फक्त ३६% इतकेच आहे. आजही ६३% शेतकऱ्यांचे भवितव्य केवळ निसर्गाच्या हातात असल्याने शेती व्यवसायात खूपच अनिश्चितता आहे. ही अनिश्चितता कमी करण्यासाठी सिंचन सुविधा वाढविल्या पाहिजेत. केवळ मोठ्या प्रकल्पांचा आग्रह न धरता आणि निधीच्या अडचणी पुढे न करता विहिरींचा गाळ काढणे, विहीर पुर्नभरण करणे, लहान लहान बंधारे बांधून पाणी अडविणे जेणे करून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढून सिंचनक्षमता वाढेल. इ. मार्गांचा अवलंब केला पाहिजे.

तसेच कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त जमी सिंचनाखाली कशी येईल यासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन पद्धतींचा वापरास प्रोत्साहन देणे, त्यासाठी अर्थसहाय्य करणे इ. उपाययोजना करणे आवश्यक आहेत.

### ४) स्वस्त, अखंड आणि पुरेसा वीजपुरवठा :

वीजपुरवठा खर्चिक अनियमित किंवा अपुरा असेल तर कोरडवाहू शेतकऱ्यांप्रमाणे बागायतदार शेतकऱ्यांनासुद्धा अनिश्चिततेला तोंड द्यावे लागते. म्हणून ज्यांना विहिरी किंवा कूपनलिकांच्या सहाय्याने पाणीपुरवठा करता येतो त्यांच्यासाठी स्वस्त, नियमित आणि पुरेसा वीजपुरवठा होईल आणि भार नियमन कमी होईल अशी व्यवस्था केली पाहिजे.

### ५) कृषी उत्पादनाचे नियोजन :

ज्या वर्षी कमी लागवडीमुळे अगर नैसर्गिक प्रतिकुलतेमुळे कमी उत्पादन होते त्यावर्षी शेतमालाच्या किमती वाढलेल्या असतात. आणि काही शेतकऱ्यांना विशेषत:

व्यापाऱ्यांना उच्च किमतीचा फायदा मिळतो. परंतु अशा उच्च किमतीच्या प्रेरणेने पुढील हंगामासाठी त्या विशिष्ट कृषीमालाची जास्तीत जास्त लागवड केली जाते. परिणाम असा होतो की, पुढील वर्षी त्या कृषी मालाचे विक्रमी उत्पादन मिळते. पुरवठा वाढतो आणि किमती वेगाने खाली येतात. थोडक्यात मागणीच्या तुलनेत पुरवठा अतिरिक्त होऊन किमती कोसळल्याने बहुतेक शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागते. हे टाळण्यासाठी शेतमालाची मागणी, पाणीपुरवठा, जमिनीची प्रत, हवामान इत्यादी बाबी लक्षात ठेवून योग्य त्याच प्रमाणात ठरावीक पिक लागवडीचे नियोजन करावे जेणेकरून अत्युत्पादन होऊन किमती कोसळण्याचा धोका निर्माण होणार नाही. तसेच पीक विमा योजनेत जास्तीत जास्त लोकांना सामावून घेता आले पाहिजे. अशा प्रकारचे संरक्षणाचे आवरण शेतकऱ्यांसाठी निर्माण केल्यास आत्महत्येचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

**६) नव्या तंत्राचा वापर :**

शेतकऱ्यांच्या अडचणी कमी करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी नव्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर वाढावा म्हणून अलीकडील काळात स्वतंत्र वेबसाईटस् निर्माण करण्यात आल्या आहेत. कृषी मालाची मागणी विविध प्रकारच्या कृषी मालाचे उत्पादन स्थानिक हवामानाची स्थिती, हवामानाबाबतचाअंदाज नवीन कृषी तंत्रज्ञान, कृषी मालाचे चालू बाजारभाव इ. स्वरूपाची माहिती वेबसाईटवर उपलब्ध करून दिली जाते. यामुळे जे शेतकरी आधुनिक शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करू शकतात त्यांच्या तरी अडचणी काही प्रमाणात कमी होऊ शकतील. यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी अशा प्रकारच प्रयत्न झाला पाहिजे.

**७) करार शेतीला उत्तेजन :**

वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी करार शेतीला उत्तेजन देणे हा एक उपाय अलीकडे सुचविला जातो. करार शेतीमुळे शेतकऱ्यांना उत्पादन तंत्र, खते, बियाणे इ. आदान घटकांचा वेळेवर पुरवठा होतो. म्हणून कर्जाची आवश्यकता नसते. तसेच खरेदीदारांकडून वित्तपुरवठ्याबरोबर कृषी उत्पादनासंबंधी योग्य मार्गदर्शन मिळून उत्पादकता वाढण्यास मदत होते. खरेदीदारालाही दर्जेदार कृषीमाल मिळतो. पंजाबमध्ये करार शेतीमुळे जमिनीची प्रतीहेक्टरी उत्पादकता २५ ते ४०% नी वाढल्याचे आढळून आले आहे. म्हणून करार शेतीला उत्तेजन दिल्याने सावकारी कर्जापासून मुक्तता, खात्रीची किंमत, सुधारित आदानांचा वापर यामुळे उत्पादकतेत वाढ होऊन आत्महत्या रोखण्यास मदत होईल.

**८) समुपदेशन केंद्र :**

तज्ज्ञांच्या मते मानसिक दुर्बलता हे एक आत्महत्येचे प्रमुख कारण असते. गावोगावी किंवा काही गावांच्या विभागासाठी समुपदेशन केंद्र चालविल्यास अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला आपल्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी मदत मिळू शकते. समुपदेशन केंद्रात मानसिक आधाराबरोबर आर्थिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी शासनाच्या योजना किंवा अन्य पर्यायांबाबत माहिती दिल्यास आत्महत्येच्या विचारातून परावृत्त होण्यास मदत होऊ शकेल.

### ५.२.५ विशेष आर्थिक क्षेत्र – उद्देश, समस्या आणि उपाय :

(Special Economic Zone-objectives, Problems and Remedies)

परकीय चलनाचा मुबलक साठा हा कोणत्याही राष्ट्राचा जागतिक पातळीवरील आर्थिक सामर्थ्याचा आणि प्रतिष्ठेचा भाग असतो. अशा प्रकारचे सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी निर्यातीत पुरेशी वाढ करता आली पाहिजे. नियोजनकाळात भारताची निर्यात आयातीपेक्षा कधीही जास्त राहिली नाही. १९९१च्या आर्थिक संकटकाळात भारताचा परकीय चलनाचा साठा कमालीचा घटला होता. परंतु आर्थिक सुधारणाकाळात त्यात समाधानकारक वाढ झाली. मार्च १९९१ मध्ये असलेला ५.८ बिलियन अमेरिकन डॉलर साठा मार्च २००७ पर्यंत १९९.२ बिलियन डॉलर इतका वाढला. मे २००८मध्ये ३१४ बिलियन डॉलर इतका वाढला होता. अर्थात या काळात परकीय चलनसाठ्यात झालेली वाढ भारतात झालेल्या विदेशी गुंतवणुकीमुळे होती. विदेशी चलनसाठ्यात दीर्घकालीन हक्काची आणि वास्तव वाढ ही अनुकूल विदेशी व्यापार तोलामुळेच होऊ शकते. त्यासाठी निर्यात उद्योगात वाढ करून निर्यात वृद्धी हाच महत्त्वाचा मार्ग असतो.

भारत सरकारने गेल्या अनेक वर्षांपासून निर्यात वाढविण्यासाठी अल्प व्याजदराने निर्यात उद्योगासाठी कर्जे, निर्यात उत्पन्नावर आयकरात सवलती, माल वाहतुकीसाठी व माल साठविण्यासाठी सवलती इत्यादी उपाय योजना केल्या. निर्यात वाढीच्या योजनांपैकी गेल्या दशकात वादग्रस्त ठरलेली बहुचर्चित अशी योजना म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र (Special Economic Zone)होय.

**विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे काय?**

विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे मुद्दाम निश्चित केलेला शुल्क विरहित प्रदेश. हा प्रदेश व्यापार व्यवहारासाठी आणि शुल्क व करासाठी परदेशी मुलूख म्हणून समजला जातो.

विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे आयात शुल्कात सवलत असलेले इतर करासाठी, परदेशी गुंतवणुकीसाठी आणि अन्य व्यवहारासाठी शिथिल नियम असलेले मुद्दाम निश्चित केलेले क्षेत्र ज्याला औद्योगिक सेवा पुरवठा आणि व्यापार व्यवहारासाठी विदेशी मुलूख मानले जाते.

थोडक्यात विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे व्यापार उद्योग स्थापन करण्यासाठीचे असे खास क्षेत्र की जेथे कोणत्याही प्रकारचे कर नाहीत. उत्पादन शुल्क नाही. कामगार कायदे नसतात किंवा अधिलाभांशाची (बोनस) देखील तरतूद नसते. व असे टापू विकसित करण्यासाठी राज्य सरकारने, केंद्र सरकारने धोरणात्मक अनुमती दिलेली आहे. त्यामुळे या विभागात उद्योग सुरू करण्यासाठी परवान्याची गरज नसेल असे क्षेत्र म्हणजे देशांतर्गत स्वायत्त परकीय मुलूख असणार आहेत.

भारत सरकारने एप्रिल २००० मध्ये विशेष आर्थिक क्षेत्राच्या धोरणाची घोषणा केली. चीनमधील विआक्षेत्राच्या यशाने प्रभावित होऊन भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्राचा स्वीकार केला. त्यानुसार केंद्रसरकारने २३ जून २००५ मध्ये विआक्षेत्रासंबंधी विधेयक पारित केले. फेब्रुवारी २००६ मध्ये विशेष आर्थिक क्षेत्रासंबंधीच्या कायद्याची कार्यवाही सुरू झाली.

**विशेष आर्थिक क्षेत्राची उद्दिष्टे :**

१) अर्थव्यवस्थेचा खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून उद्योग धंद्याचा विस्तार करून रोजगारवृद्धी व आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे.

२) देशाच्या पायाभूत सुविधांचा विकास करणे.

३) विआक्षेत्राच्या माध्यमातून देशात परकीय गुंतवणुकीला आकर्षित करणे.

४) विआक्षेत्र (SEZ) प्रकल्पाद्वारे रोजगार निर्मिती घडवून आणणे.

५) अर्थव्यवस्थेच्या औद्योगिक विकासाला चालना देणे.

६) देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणे.

७) देशाच्या आर्थिक विकासाबाबत क्षेत्रीय असमतोल कमी करणे.

८) देशाचा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढवून परकीय चलन मिळविणे.

९) निर्यात वाढविण्यासाठी अडचणी विरहित वातावरण निर्माण करणे.

**विशेष आर्थिक क्षेत्राचे प्रकार :**

विशेष आर्थिक क्षेत्राचे तीन प्रकार असू शकतात.

**१) विविध उत्पादनांचे विशेष आर्थिक क्षेत्र –** यामध्ये एकाच क्षेत्रातील तीन किंवा जास्त वस्तूंचे उत्पादन अथवा सेवा पुरवठा करण्याचे उद्योग सुरू केले जातात. यालाच बहुविध उत्पादन विशेष आर्थिक क्षेत्र (Multi Product SEZ) असे म्हणतात.

**२) विशिष्ट क्षेत्रासाठी विशेष आर्थिक क्षेत्र –** यामधील उद्योग केवळ एकाच क्षेत्रातील सेवा पुरवठा करण्यासाठी असतात. उदा. आय.टी पार्क, फुडपार्क, ॲटोमोबाईल पार्क इ.

**३) बंदरे, विमानतळ विशेष आर्थिक क्षेत्र –** या प्रकारात बंदर किंवा विमानतळाच्या विकासाबरोबरच विकासकाला विशिष्ट क्षेत्रात पुरविल्या जाणाऱ्या पायाभूत व विकासात्मक सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतात.

**विशेष आर्थिक क्षेत्राच्या समस्या :**

चीनमधील विशेष आर्थिक क्षेत्राच्या यशाने प्रभावित होऊन भारतातही विशेष आर्थिक क्षेत्राचे धोरण आखले गेले. २००६ मध्ये त्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्र कायदा लागू करण्यात आला. या कायद्याअंतर्गत मिळणाऱ्या कर सवलतींच्या आकर्षणातून विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्याचे अनेक प्रस्ताव दाखल झाले. काही कार्यान्वित झाले. परंतु विशेष आर्थिक क्षेत्राच्या धोरणाबाबत अनेक समस्याही निर्माण झाल्या आहेत. त्या समस्या पुढील प्रमाणे.

**१) जमीन संपादन करण्याची समस्या :**

भारतात औद्योगिक विकासाच्या काळात सुपीक जमिनीची बिगर कृषी वापरासाठी मागणी सतत वाढत आहे. विशेष आर्थिक क्षेत्राच्या कार्यवाहीसाठी जमिनीच्या मागणीत आणखीन वाढ झाली. भारतात ३६२ विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी किमान १७२००० हेक्टर जमिनीची गरज आहे. एवढी जमीन उपलब्ध होणे कठीण आहे. तसेच पुरेशी जमीन उपलब्ध

झाली तरी शेतजमिनीसाठी उपयोगात येणारे क्षेत्र आणखी कमी होईल. त्यामुळे कृषी आयोगाने व्यक्त केल्याप्रमाणे अन्न सुरक्षा धोक्यात येईल. भारतात मुळातच धारण क्षेत्राचा आकार लहान असताना शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्यामुळे शेतकरी-शेतमजूर विस्थापित होतात. त्यामुळे बेरोजगारीची समस्या वाढते विशेष आर्थिक क्षेत्राच्या स्थापनेसाठी विकासकांनी अवास्तव जमिनीची मागणी केली. विकासक औद्योगिकीकरणाऐवजी व्यापारी व निवासी संकुले उभारण्यासाठी जमिनीचा वापर करण्याची शक्यता वाढली आहे. विशेष आर्थिक क्षेत्रांतर्गत येणाऱ्या गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा पुरेसा मोबदला न मिळाल्यास विशेष आर्थिक क्षेत्रामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होण्याचा प्रश्न निर्माण होतो. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा पुरेसा न मिळायास आर्थिक शोषक होण्याचा प्रश्न निमार्ण होतो. यावरून असे स्पष्ट होते की जमीन संपादन करणे अत्यावश्यक असतेच. परंतु त्याबरोबर अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते.

### २) प्रादेशिक असमतोल :

१९८० नंतर औद्योगिकदृष्ट्या समतोल प्रादेशिक विकासावर भर देण्याच्या दृष्टीने औद्योगिक धोरणावर भर देण्यात आला. समतोल प्रादेशिक विकासाचे उद्दिष्ट साध्य झाले तर नाहीच, परंतु विशेष आर्थिक क्षेत्राच्या धोरणामुळे प्रादेशिक असमतोल वाढण्याचा धोका आणखी वाढला. या क्षेत्रात स्थापन होणाऱ्या उद्योगांना करविषयक, कच्चा माल विषयक, विपणन विषयक, वाहतूक, दळणवळण, वित्तीय अशा अनेक सवलती मिळत असल्याने त्यांचा उत्पादन खर्च कमी होतो. याउलट विशेष आर्थिक क्षेत्राबाहेरील उद्योगांना कोणत्याही सवलती नसल्याने त्यांना तुलनेने उत्पादन खर्च अधिक येतो. हे उद्योग विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योगांशी स्पर्धा करू शकत नाही. तसेच संपूर्ण देशात विशेष आर्थिक क्षेत्राची निवड करताना महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात, प. बंगाल या विकसित राज्यांवरच भर देण्यात आला. बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, आसाम, उत्तरप्रदेश या राज्यांचा फारसा विचार झाला नाही. परिणामी विशेष आर्थिक क्षेत्र आणि अन्य क्षेत्र यांच्यात औद्योगिक विकासाबाबत मोठी विषमता निर्माण होऊ शकते.

### ३) लघु उद्योग व कुटीर उद्योगांवर होणारा परिणाम :

लघुउद्योग हे श्रमप्रधान उद्योग असल्याने या उद्योगांमध्ये रोजगार पुरविण्याची क्षमता अधिक असते. विशेष आर्थिक क्षेत्रासाठी स्वतंत्र कायदा करण्यात आला असून हा कायदा इतर कायद्यापेक्षा सरस राहील अशी तरतूद आहे. त्यामुळे विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये कोणत्याही वस्तूंचे उत्पादन करण्याची मुभा येथील उद्योजकांना मिळणार आहे. त्यामुळे मोठे उद्योजक लघु उद्योग करीत असलेल्या वस्तूंचे उत्पादन करू शकतात. अनेक मोठे उद्योग लघु आणि कुटीर उद्योगाच्या क्षेत्रात उत्पादन करू लागल्यास लघु व कुटीर उद्योगांचा ऱ्हास होण्याची भीती निर्माण झाली आहे.

### ४) कामगारांवर होणारे परिणाम :

केंद्र व राज्य सरकारांनी विशेष आर्थिक क्षेत्रातील गुंतवणूकदारांना अनेक सवलती दिल्या. मालकांना हवे असलेले कामगार कायद्यातील बदल मान्य केलेले आहेत. प्रचलित

कामगार कायद्यानुसार काम बंद असलेले कारखाने बंद करणे, कामगारांना कमी करणे, टाळेबंदी करणे यासारखे निर्णय कारखानदारांना घेता येत नव्हते. परंतु विशेष आर्थिक क्षेत्र कायद्यानुसार कारखानदार अशा प्रकारचे निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे कामगारांना पूर्वीसारखे संरक्षण राहिले नाही. कंत्राटी कामावर बंधने राहणार नाहीत. कामाचे तास वाढविता येणे शक्य आहे. कामाच्या पाळीचे तास, कामगारांना करावयाची कामे यावर बंधने नाहीत. विविध प्रकारचे औद्योगिक विवाद, औद्योगिक न्यायालय व कामगार आयुक्तांच्या कक्षेत राहिले नाहीत. ते क्षेत्र विकास अधिकाऱ्यांच्या कक्षेत गेल्यामुळे कामगारांना न्याय मिळेल याची खात्री कमी झाली.

**५) शेतकऱ्यांवर होणारे परिणाम :**

विशेष आर्थिक क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात जमिनी ताब्यात घेतल्यानंतर शेतकऱ्यांचे विस्थापन झाल्यावर त्यांचे पुनर्वसन कुठे करावे? त्यांना मोबदला कोणत्या दराने द्यावा? विकासाच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांचे स्थान नेमके कुठे? अनेक प्रश्न उपस्थित होतात. विकास आणि औद्योगिकीकरणाच्या नावावर शेतजमिनी ताब्यात घेऊन शेतकऱ्यांना भूमिहीन करणे हे उचित ठरेल किंवा नाही याचा विचार होत नाही. कारण विशेष आर्थिक क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या सवलतींमुळे अनेक उद्योग समुह शहरांच्या जवळपासच्या परिसरात हजारो एकरांचे प्रस्ताव सादर करीत असून या जमिनी ताब्यात घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. यात शेतकऱ्यांचे जे नुकसान होणार आहे त्या मोबदल्यात नोकरीत प्राधान्य, दुकानाचे गोळे, प्रशिक्षण, नवीन घरे बांधून देणे यांसारख्या तरतुदी करण्यात आल्या असल्या तरी 'कायमचे भूमिहीन होणे' हे नुकसान शेतकऱ्याच्या दृष्टीने कधीही भरून निघणार नाही असे आहे.

**राजकोषीय समस्या :**

कर हेच सरकारच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. विशेष आर्थिक क्षेत्रात उद्योग सुरू करणाऱ्यांना प्राप्तिकर, सीमा शुल्क, सेवा कर मूल्यवर्धित कर इत्यादी करांमध्ये प्रचंड सवलती सरकारमार्फत मिळत असल्याने सरकारला महसूल मोठ्या प्रमाणात बुडतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार २००५-१० या काळात सरकारला १७५००० कोटी रुपयाच्या महसुलाला मुकावे लागणार होते.

सरकारला एवढ्या महसुलाला मुकावे लागले तर अनेक विकासात्मक कार्यासाठी निधींची कमतरता भासते. त्याचा परिणाम अंदाजपत्रकीय तूट वाढून वाढत्या तुटीचा अर्थभरणा आणि पर्यायाने भाववाढीची समस्या निर्माण होणे अटळ असते.

**विशेष आर्थिक क्षेत्राच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना :**

विशेष आर्थिक क्षेत्राच्या धोरणामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. शेतकरी आणि अर्थतज्ञांच्या क्षेत्राला प्रचंड विरोधही केला गेला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत समाविष्ट झालेल्या आणि जागतिक स्पर्धेत उतरलेल्या राष्ट्राला विशेष आर्थिक क्षेत्राच्या धोरणाला विरोध करणेही उचित ठरत नाही. यासाठी सरकारने एक स्थायी संसदीय समिती स्थापन केली. या समितीने, तसेच डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या राष्ट्रीयकृत आयोगाने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्या शिफारशींचा अवलंब केल्यास विशेष आर्थिक क्षेत्रातील समस्या कमी होऊ शकतील.

१) विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी दोन अगर अधिक पिके देणारी बागायती आणि सिंचित जमिनीचा वापर करू नये. अशा जमिनी विशेष आ.क्षेत्रापासून मुक्त ठेवाव्यात. केवळ पडीक, माळरान, क्षारमय दलदलीच्या जमिनींचा वापर करण्यात यावा. जमीन उपजाऊ किंवा सुपीक असल्यास निदान ती वर्षातून फक्त एक पीक देणारी असली पाहिजे. शिवाय त्यासाठी राज्यशासनाची परवानगी असावी.

२) ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी वि.आ.क्षेत्रासाठी संपादित केल्या जातील त्यांना नुकसान भरपाई म्हणून जमिनीचा भाव बाजारदराने मिळाला पाहिजे. शिवाय जे शेतकरी व शेजमजूर विस्थापित होतील त्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी विकासकाने व सरकारने संयुक्तपणे स्वीकारावी. ज्यांच्या शेतजमिनी संपादित झाल्या त्यांना विशेष आर्थिक क्षेत्रात कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून द्यावा.

३) शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला संपूर्णत: रोख स्वरूपात न देता त्याच्या काही भागाचे रोख्यात रूपांतरण करून विस्थापित शेतकऱ्यांना कायमस्वरूपी व्याज, लाभांश रूपाने उत्पन्न मिळेल अशी तरतूद विकासक व सरकारने करावी.

४) संसदीय स्थायी समितीने अशी शिफारस केली आहे की, आजारी, बंद, औद्योगिक संस्थांची जमीन सरकारी वादातून मुक्त करून तेथे विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती करावी.

५) विशेष आर्थिक क्षेत्राच्या नियमामध्ये सरकारने किमान किती जमिनीची आवश्यकता आहे याचा उल्लेख केला. मात्र कमाल किती जमीन ताब्यात घेता येईल याचा उल्लेख केला नव्हता. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा अधिक जमिनी ताब्यात घेतल्या जात होत्या. संसदीय स्थायी समितीने किमान मर्यादेप्रमाणेच कमाल मर्यादाही निश्चित केल्या. समितीने सुचविलेल्या मर्यादांचे काटेकोर पालन झाले पाहिजे.

६) बहु उत्पादन विशेष आर्थिक क्षेत्रातील (विविध उत्पादनाचे विशेष आर्थिक क्षेत्र) विस्थापितांच्या संदर्भात समितीने शिफारस केली आहे की, शेतकऱ्यांची जमीन विकत घेण्यापेक्षा विकासकाने ती भाडेपट्ट्यावर घ्यावी. यातून विस्थापितांना हमीचे उत्पन्न मिळेल. शिवाय विशेष आर्थिक क्षेत्र अयशस्वी झाले तर शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी सहज परत मिळतील.

७) विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योगांना कामगार कायदे लागू नाहीत. त्यांनाही कामगार कायद्यात आणावे. कामगारांना रोजगार उत्पन्न, बोनस, निवृत्तीवेतन, सोयीसुविधा, भत्ते, रजा, कामाचे तास इ. कायद्यानुसारच निश्चित करून सुरक्षितता देण्याचे कार्य सरकार व विकासकाने करावे. कंत्राटी (ठेकेदारी) पद्धती बंद करावी.

८) विकासक विशेष आर्थिक क्षेत्रात जे व्यापारी आणि निवासी संकुल विकसित करतील त्यापैकी काही भाग विस्थापितांना सवलतीच्या दराने उपलब्ध करून द्यावा.

९) विशेष आर्थिक क्षेत्रात विविध प्रकारचे उद्योग सुरू केले जातील असे नाही. त्यामुळे तिनही प्रकारच्या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये ५०% क्षेत्र प्रक्रिया उद्योगासाठी २५% कृषी पूरक उद्योगासाठी व उर्वरित २५% क्षेत्र व्यापारी व निवासी बांधकामासाठी असले पाहिजेत, अशी तरतूद कायद्यांतर्गत केली पाहिजे.

### ५.२.६ नवीन कृषी व्यूहरचना :

भारत कृषीप्रधान देश असूनही स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारताला अन्नटंचाईच्या समस्येला तोंड द्यावे लागले आहे. १९४३ मध्ये बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळामुळे ३ द.ल. लोक मृत्युमुखी पडले. भारताच्या फाळणीनंतरही तीव्र अन्नटंचाईची समस्या उद्‌भवली होती. यावरून अन्नटंचाईच्या समस्येचे गांभीर्य लक्षात येते. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने कृषी उत्पादनवाढीवर लक्ष केंद्रित केले.

पहिल्या तीन पंचवार्षिक योजनाकाळात कृषी उत्पादन वाढीसाठी संस्थात्मक जमीन सुधारणा घडवून आणण्याचा कार्यक्रम हाती घेतला. मध्यस्थांचे उच्चाटन, कुळांना संरक्षण व जमिनीची मालकी, जमिनीच्या धारणक्षेत्राच्या आकारमानात बदल, जमिनीचे फेरवाटप इ. सुधारणांसाठी जमीनदारी निर्मूलन, कुळ हक्क संरक्षण, कमाल जमीनधारणा, तुकडे बंदी व तुकडेतोड कार्यक्रम इ. कायदे पास करण्यात आले. परंतु या कायद्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. म्हणून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून तांत्रिक सुधारणांच्या स्वरूपात उत्पादन वाढीसाठी उपाययोजना करण्यात आल्या. कारण वाढत्या लोकसंख्येबरोबर अन्नधान्याच्या वाढत्या मागणीची पूर्तता करणे तसेच नव्याने सुरू झालेल्या औद्योगिकीकरणासाठी लागणाऱ्या कृषी उत्पादित कच्च्या मालाच्या पुरवठ्याची गरज भागविणे यासाठी कृषी उत्पादनात भरीव वाढ घडवून आणणे आवश्यक होते.

कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी ६०च्या दशकात शासनाने जे जे कार्यक्रम राबविले त्यालाच कृषी विषयक नवीन तंत्रज्ञान किंवा कृषीविषयक नवीन व्यूहरचना असे म्हटले जाते. १९६०-६१मध्ये देशातील निवडक सात जिल्ह्यांमध्ये 'प्रकर्षित शेती जिल्हा कार्यक्रम' (Intensive Agricultural District Programme-IADP) या नावाने एक पथदर्शक कार्यक्रम सुरू करण्यात आला. १९६७-६८ मध्ये कृषी विकासासाठी एक नवीन आराखडा तयार करण्यात आला. या आराखड्यालाच नवीन कृषी व्यूहरचना असे नाव देण्यात आले. या नवीन आराखड्यानुसार सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते, पीक संरक्षणासाठी जंतुनाशके आणि कीटकनाशके यांचा वापर, जलसिंचन सुविधा, नवीन कृषी साधने व अवजारे इ.चा वापर करणे, याशिवाय किमान आधार किंमत, साठवण व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, बाजारविषयक सुविधा इ. सर्वच गोष्टी एकाच वेळी उपलब्ध करून दिल्यास कृषी उत्पादनात वाढ घडवून येण्याची शाश्वती वाढते. कारण पिकांच्या वाढीसाठी आणि भरघोस उत्पादनासाठी ज्या ज्या कृषी आदानांची आवश्यकता असते, त्यापैकी कोणत्याही एका आदानाची उणिव निर्माण झाली तर अपेक्षित कृषी उत्पादन मिळत नाही. उदा. चांगले दर्जेदार बियाणे, खते, कीटकनाशके इ. सर्व उपलब्ध होऊनही पिकांना पुरेसे पाणीच मिळाले नाही तर उत्पादनात फार मोठी घट होते. याउलट मुबलक पाणी असूनही अधिक उत्पादन देणारे सुधारित बियाणे नसेल तर चांगले उत्पादन मिळणार नाही. किंवा सुधारित बियाणे, मुबलक पाणी, खते, योग्य मशागत इ. सर्व काही असूनही हवामानातील बदलामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास जंतूनाशकांचा वापर न झाल्यास उत्पादनात घट होऊ शकते. म्हणून कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्याच्या मार्गात ज्या ज्या अडचणी येतील त्या सोडविण्यासाठी सुसज्जता निर्माण करणे म्हणजे नवीन कृषी

व्यूहरचना होय. यालाच कृषी विषयक डावपेच असेही म्हणतात.

**नवीन कृषी व्यूहरचनेचे घटक :** (Componants of the new agricultural strategy)

नवीन व्यूहरचना अमलात आणण्यासाठी पुढील घटकांचा उत्पादन प्रक्रियेत समावेश केला जातो.

**१) पिकांची घनता :**

कमी काळात जास्तीत जास्त पिके कशी घेता येतील, जमिनीचे क्षेत्र न वाढविता अधिक उत्पादन कसे घेता येईल? वेगवेगळ्या हवामानाला अनुरूप वेगवेगळी पिके कशी घेता येतील? अशा प्रकारचे नियोजन करण्यात आले. त्यासाठी कमी कालावधीत परिपक्व होणारे ज्वारी, बाजरी, मका यांसारख्या अल्पकालिन पिकांवर भर देण्यात आला.

**२) कृषी तंत्रज्ञान :**

उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी तंत्रज्ञानाला एक प्रमुख आदान मानून तांत्रिक विकासावर भर देण्यात आला. यासाठी कृषीविषयक संशोधनावर भर देण्यात आला.

**३) कृषी आदानांचा पुरवठा :**

उत्पादनात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांना सुधारित बियाणे, खते, कीटकनाशके, अवजारे, जलसिंचन साधने इ. प्रमुख आदानांचा पुरवठा करून ही आदाने वापरण्यास शेतकऱ्यांना प्रेरित करणे.

**४) जलसिंचन सुविधांचा विस्तार :**

वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेता येऊन उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी मोठ्या, मध्यम आणि बहुसिंचन योजना कार्यान्वित करण्यात आल्या.

**५) किमान आधार किंमत :**

उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना प्रेरित करण्यासाठी त्यांना उत्पादनात स्थैर्य प्राप्त करून देणे आवश्यक असते. त्यासाठी कृषी उत्पादनाला आधार किंमत देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले. आधार किंमत धोरणाच्या कार्यवाहीसाठी कृषी मूल्य आयोगाची स्थापना करण्यात आली.

**६) सार्वजनिक संस्थांचा सहभाग :**

नवीन आदाने आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी कृषी पतसंस्था, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, कृषी उद्योग महामंडळ, कृषी पुनर्वित्त आणि विकास महामंडळे, कृषी विपणन संस्था इ.ची स्थापना करण्यात आली.

**७) रासायनिक खतांचा पुरवठा :**

उत्पादनात वाढ करण्यासाठी रासायनिक खतांचा वापर करण्यास शेतकऱ्यांना प्रेरित करणे, खतांचा पुरवठा करता यावा यासाठी खतांची आयात करण्यात आली. केंद्र व राज्य सरकारांच्या पुढाकाराने देशात रासायनिक खतांचे कारखाने सुरू करण्यात आले. खतांचा उत्पादनासाठी उद्योजकांनाही प्रोत्साहित करण्यात आले.

१९६६-६७ नंतर वरील सर्व घटकांचा वापर करण्याच्या कृषीविषयक धोरणाचा फलस्वरूप परिणाम म्हणून कृषी उत्पादनात जी उल्लेखनीय वाढ घडून आली त्या वाढीचे वर्णन हरितक्रांती असे केले जाऊ लागले. अशा या हरित क्रांतीची सुरुवात १९६५ मध्ये कृषी संशोधकांनी गव्हाच्या नवीन जातीचा शोध लावला तेव्हापासून झाली. अमेरिकन कृषीतज्ज्ञ प्रा. विल्यम बोरलॉंग यांनी मेक्सिकोमध्ये गव्हाच्या उच्च उत्पादन देणाऱ्या बियाणांचा शोध लावला. या तंत्रज्ञानाचा वापर भारतात १९६६ च्या खरीप हंगामात प्रथम करण्यात आला. डॉ. एम. एस. स्वामीनाथन या भारतीय शास्त्रज्ञाने उच्च कृषी उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जाती शोधून काढण्यास आणि त्यांच्या वापरास प्रोत्साहन देण्यास महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. म्हणूनच डॉ. स्वामीनाथन यांना भारतीय हरित क्रांतीचे जनक मानले जाते.

थोडक्यात हरित क्रांती म्हणजे खते, बियाणे, पाणीपुरवठा, शेती अवजारे इ. आधुनिक आदानांचा वापर करून प्रकर्षित पद्धतीने शेती उत्पादनात वाढ घडवून आणणे होय.

**हरितक्रांतीचा प्रभाव/यश :**

हरितक्रांती ही भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. कारण हरितक्रांतीमुळे पुढीलप्रमाणे महत्त्वाचे बदल घडून आले.

**१) शेती व्यवसायात झालेले परिवर्तन :**

१९६० पर्यंत भारतात सर्वत्र परंपरागत शेती केली जात होती. १९६० नंतर विशेषत: १९६६ नंतर सुधारित बी-बियाणे रासायनिक खते, यंत्रे, जंतुनाशके यांचा वापर वाढू लागला. त्यामुळे परंपरागत भारतीय शेतीचे आधुनिक आणि यांत्रिक शेतीत परिवर्तन झाले.

**२) दृष्टिकोनात बदल :**

हरितक्रांतीपूर्वी भारतीय शेतीकडे जीवनपद्धती म्हणून पाहिले जात होते. शेती हा चरितार्थाबरोबर नफा अगर चांगले उत्पन्न मिळवून देणारा व्यवसाय आहे असे मानले जात नव्हते. परंतु योग्य पद्धतीने आणि कठोर परिश्रमाने शेतीतून लाभ होऊ शकतो. शेतीकडे लाभदायक व्यवसाय म्हणून पाहिले जाऊ लागले. अशा प्रकारचा दृष्टिकोनात झालेला बदल हरितक्रांतीमुळेच घडून आला.

**३) उत्पादकतेत वाढ :**

हरितक्रांतीनंतर शेतीच्या उत्पादकतेत प्रचंड वाढ झाली. विविध पिकांच्या उत्पादनात सातत्याने वाढ झाली. या वाढीचा चांगला परिणाम म्हणजे भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता गाठली.

**४) कच्च्या मालाची उपलब्धता :**

रोखीच्या आणि व्यापारी पिकांच्या उत्पादनात भरपूर वाढ झाल्याने साखर उद्योग, कापड उद्योग, ज्यूट उद्योग यांना लागणारा कच्चा माल पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊन औद्योगिकीकरणाला चालना मिळाली. त्यामुळे उद्योगांचा जलद विकास घडून आला.

**५) कृषी रोजगारात वाढ :**

हरितक्रांती अगर कृषीविषयक नवीन धोरणात जलसिंचन सुविधांचा विस्तार करून

बहुपीक पद्धती अमलात आणणे हे अभिप्रेत असते. जलसिंनाचे प्रमाण वाढल्यास वर्षातून दोन अगर अधिक पिके घेतल्याने शेतकरी व शेतमजूर यांना शेतीव्यवसायात वर्षभर रोजगार उपलब्ध होतो. तसेच यंत्रांचा वापर, रासायनिक खते, सुधारित बी-बियाणे, कीटकनाशके यांचा वापर आवश्यक ठरतो. अशा विविध घटकांच्या वापराबरोबर कृषी क्षेत्रात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या. हा हरितक्रांतीचा रोजगारवाढीबाबत प्रत्यक्ष परिणाम आहे. कृषीविषयक तंत्रज्ञानाच्या कार्यवाहीमुळे ट्रॅक्टर्स, कापणी व मळणी यंत्रे, अवजारे, खते, कीटकनाशके, जलसिंचन साहित्य इत्यादींची मागणी वाढत आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पादनक्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. हरितक्रांतीच्या प्रभावाने व्यापारी पिकांच्या उत्पादनातही वाढ झाली. कृषीमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगधंद्यात उदा. अन्नप्रक्रिया उद्योग, डिनिंग व प्रेसिंग उद्योग, सूतउद्योग इत्यादींमध्ये वाढ झाली. एवढेच नव्हे तर कृषी उत्पादनात झालेल्या वाढीमुळे उद्योगधंदे वाढले. त्यामुळे वाहतूक, दळणवळण व व्यापारक्षेत्राचा विस्तार झाला. या सर्वच प्रकारच्या बदलामुळे एकूणच अर्थव्यवस्थेतील रोजगार पातळीत वाढ होण्यास मदत होते.

### ६) विदेश व्यापारात लाभ :

हरितक्रांतीला सुरुवात होण्यापूर्वी भारताला अन्नधान्याची आयात करावी लागत होती. त्यासाठी मोठ्या प्रमाणात दुर्मीळ असलेले परकीय चलन खर्च करावे लागत असे. १९६०-६१ मध्ये १८१ कोटी रुपयांच्या किमतीच्या अन्नधान्याची आयात करण्यात आली होती. १९६६-६७ ते १९६८-६९ या काळात दुष्काळ पडल्याने १२०१ कोटी रुपयांच्या किमतीच्या धान्याची आयात करावी लागली होती. चौथ्या योजनेच्या काळात अन्नधान्य उत्पादनात वाढ झाल्याने अन्नधान्याच्या आयातीत १९७२-७३ पर्यंत ४८ कोटी रुपयांपर्यंत घट झाली. नंतरच्या काळात अन्नधान्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन अन्नधान्याचा साठा वाढला. २०००-०१ मध्ये गहू व तांदूळ व्यतिरिक्त इतर अन्नधान्याची आयात फक्त ९० कोटी रुपयांची झाली. ती २००६-०६ मध्ये ५९९६ कोटी रुपयांपर्यंत वाढली. परंतु एकूण आयातीत अन्नधान्याची आयात फक्त ०.७ टक्के इतकी होती. गहू व तांदळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. त्यामुळे आयातीवर मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागणाऱ्या, विदेशी चलनाची बचत झाली. हे हरितक्रांतीचेच यश म्हणावे लागेल. याशिवाय फळे, भाजीपाला यांसारख्या कृषी उत्पादनाची निर्यात होऊन परकीय चलनाच्या स्वरूपात उत्पन्नही मिळाले.

### ७) कृषी आणि उद्योगक्षेत्रात परस्पर संबंधात वाढ :

कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान वापरायला सुरुवात केली. म्हणून यांत्रिक अवजारे, साधने, रासायनिक खते, सुधारित बी-बियाणे, जंतूनाशके, कीटकनाशके, वाहतूक साधने, जलसिंचनाची साधने इत्यादी औद्योगिक उत्पादनांची मागणी वाढली. म्हणून संबंधित उद्योगांच्या विकासाला वाव मिळाला. कृषी उत्पादन वाढून शेतकयांच्या उत्पन्नातही वाढ झाली. तसेच कृषी व्यवसायाचे व्यापारीकरण यांत्रिकीकरण होऊन कृषी उत्पादनात वाढ झाल्याने कृषीमालावर आधारित अनेक उद्योगांना

कच्चा माल उपलब्ध होऊन त्या उद्योगक्षेत्रात वाढ झाली. त्याच वेळी कृषी उत्पादित कच्च्या मालाला पुरेशी मागणी आणि चांगली किंमत मिळाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. एकंदरीत हरितक्रांतीमुळे कृषी व उद्योग या दोन्ही क्षेत्रांच्या परस्पर विकासाला मदत झाली.

**हरितक्रांतीचे वास्तव :**

भारतात नवीन कृषी धोरणाच्या फलस्वरूप परिणामाला हरितक्रांती म्हणणे कितपत योग्य आहे असा प्रश्न नेहमीच उपस्थित केला जातो. याची पुढीलप्रमाणे कारणमीमांसा केली जाते.

**१) मर्यादित क्रांती :**

भारतात कृषी उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली असा दावा केला जातो; परंतु फक्त गहू, तांदूळ आणि काही प्रमाणात मका या पिकाच्या बाबतीत हा दावा खरा ठरतो. इतर अन्नधान्य, ज्वारी, बाजरी, डाळी या पिकांच्या बाबतीत समाधानकारक वाढ झालीच नाही.

**२) मर्यादित क्षेत्र :**

संपूर्ण भारतात हरितक्रांती घडून आली असे चित्र दिसत नाही. पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेशातील काही जिल्हे, पश्चिम महाराष्ट्र, तामिळनाडू एवढ्या प्रदेशातच विशेषत: जलसिंचनाच्या सुविधा असलेल्या भागातच हरितक्रांतीचा प्रभाव दिसून येतो. अन्न भागात उत्पादनपातळीत क्रांतिकारक वाढ झालेली दिसून येत नाही.

**३) मोठ्या शेतकऱ्यांपुरती मर्यादित :**

ज्या शेतकऱ्यांकडे पुरेसे धारण क्षेत्र, भांडवल अशा मोठ्या शेतकऱ्यांना आणि जमीनदारांना सुधारित बियाणे, खते, यांत्रिक अवजारे वापरणे शक्य झाल्याने त्यांच्या कृषीउत्पादनात वाढ झाली. परंतु भारतात मोठ्या संख्येने असलेले, अल्पभूधारक, सीमांत शेतकरी यांना भांडवलाअभावी आणि जमिनीच्या लहान धारणक्षेत्रामुळे आधुनिक पद्धतीने शेती करणे शक्य नव्हते अशा शेतकऱ्यांना हरितक्रांतीचा लाभ झाला नाही.

**४) अविश्वासू क्रांती :**

कृषी उत्पादनवाढीच्या संदर्भात क्रांती हा शब्द वापरणे याचा अर्थ उत्पादनात तीव्र आणि सातत्याने वृद्धी अभिप्रेत आहे, पण प्रत्यक्षात असा अनुभव नाही. ज्या वर्षी नैसर्गिक अनुकूलता होती त्या वर्षी मोठी वाढ दिसून आली. परंतु ज्या वर्षी नैसर्गिक प्रतिकूलता निर्माण झाली त्या वर्षी अल्प वाढ झाली. उत्पादनातील चढउताराला क्रांती ही उपाधी लावणे उचित वाटत नाही. आजही शेती व्यवसायाचे यश निसर्गाच्या सहकार्यावरच अवलंबून आहे. म्हणून हरितक्रांतीला अविश्वासू क्रांती मानले जाते.

**५) प्रादेशिक विषमतेत वाढ :**

सर्वच राज्यात हरितक्रांतीचा प्रभाव सारखा नाही. भौगोलिक अनुकूलता, जलसिंचनाच्या सुविधा यामुळे पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, पश्चिम महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, तामिळनाडू या राज्यांत हरितक्रांतीचे लाभ मिळाले, पण उर्वरित राज्यांपैकी

बहुतेक राज्ये हरितक्रांतीच्या लाभापासून वंचित राहिले. म्हणून काही राज्यांत अधिक प्रगती झाली तर काही राज्य अप्रगत राहिली. यातून प्रादेशिक विषमतेत वाढ झाली.

### ६) सदोष विकास धोरण :

भारतातील हरितक्रांतीचे प्रतिमान अमेरिकेच्या प्रतिमानावर अधारित होते. म्हणून अमेरिकेप्रमाणे गव्हाच्या उत्पादनावर लक्ष केंद्रित करण्यात आले, परंतु भारतात गव्हापेक्षा तांदूळ उत्पादनास नैसर्गिक परिस्थिती अधिक अनुकूल आहे. म्हणून कृषीविकासाचे नवीन प्रतिमान अमेरिकेऐवजी जपानी प्रतिमान स्वीकारून तांदूळ उत्पादनावर अधिक भर दिला असता तर हरितक्रांतीचे यश आणखी वाढले असते.

## हरितक्रांतीच्या उणिवा :

हरितक्रांतीच्या यशापयशाचा विचार केल्यास हरितक्रांतीबात पुढील दोष दिसून येतात.

### १) भांडवलशाही शेतीचा विकास :

ज्या आदान घटकांच्या वापराने कृषी उत्पादनात मोठी वाढ घडून येणे अपेक्षित असते अशा आदान घटकांच्या वापरासाठी म्हणजेच सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, जलसिंचन सुविधांची निर्मिती यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. असे भांडवल खर्च करणे हे मोठ्या शेतकऱ्यांनाच शक्य आहे. म्हणून मोठ्या शेतकऱ्यांनाच हरितक्रांतीचा लाभ मिळू शकतो. परंतु संख्येने मोठे असलेले लहान, अल्प भूधारक व सीमांत शेतकऱ्यांना भांडवल उपलब्ध होत नाही. तसेच लहान शेतकऱ्यांना आपल्या लहान आकारमानाच्या जमिनीवर विहीर खोदणे, कूपनलिका तयार करणे, त्यावर विद्युतपंप बसविणे, जमीन समतल करणे, ट्रॅक्टरसारखी यांत्रिक साधने वापरणे या गोष्टी शक्य नसल्याने त्यांना क्रांतीचा लाभ मिळत नाही. म्हणून हरितक्रांती लहान शेतकऱ्यांना लागू पडत नाही.

### २) संस्थात्मक सुधारणांकडे दुर्लक्ष :

नवीन कृषी तंत्रज्ञानाच्या वापरावर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून लक्ष केंद्रित करण्यात आले, परंतु त्यापूर्वी राबविण्यात आलेल्या संस्थात्मक सुधारणांची प्रभावीपणे अंमलबजावणी झली नाही. कुळांना जमिनीची मालकी अगर संरक्षण मिळवून देणे, जमीनदारांचे उच्चाटन करणे, मोठ्या जमीन मालकांकडून अतिरिक्त (कमाल धारणेपेक्षा जास्त) जमीन काढून घेऊन अल्प भूधारक आणि भूमिहीनांना वाटून देणे यांसारख्या उत्पादनवाढीच्या बिनभांडवली उपायांकडे दुर्लक्ष करण्यात आले.

### ३) बेरोजगारीत वाढ :

हरितक्रांतीसंदर्भात यांत्रिक अवजारांचा वापर अभिप्रेत आहे. म्हणजेच श्रमविपुल असलेल्या देशात श्रमप्रधान तंत्राऐवजी भांडवलप्रधान तंत्राचा वापर करून श्रमिकांना शेतीव्यवसायातील रोजगारसंधीचा त्याग करावा लागतो. कारण अनेक श्रमिकांचे काम एक यंत्र करत असल्यास काही श्रमिकांना बेकार व्हावेच लागते.

### ४) आर्थिक विषमतेत वाढ :

ज्यांच्याकडे पुरेशा मोठ्या आकारमानाच्या किंवा पर्याप्त आकारमानाच्या जमिनी होत्या त्यांना हरितक्रांतीचे लाभ मिळाले. त्यांच्या उत्पन्न व संपत्तीत वाढ झाली. परंतु ज्या लहान शेतकऱ्यांना भांडवलाअभावी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करता आला नाही त्यांना हरितक्रांतीचा लाभ न मिळाल्यामुळे त्यांच्या उत्पन्न आणि संपत्तीत वाढ झालीच नाही. म्हणून असे म्हटले जाते की हरितक्रांतीमुळे मोठे जमीनमालक आणि लहान शेतकरी यांच्यातील विषमतेत वाढ झाली.

### ५.२.७ करार शेती :

श्रम आणि भांडवल खर्च करून पुरेसे उत्पादन मिळेल किंवा नाही, उत्पादनखर्च तरी भरून निघेल काय याबाबत शेतकरी नेहमीच साशंक असतात. कारण शेतीचे यश हे निसर्गाच्या सहकार्यावर अवलंबून असते. निसर्ग अनुकूल राहून चांगले भरघोस उत्पादन येऊनसुद्धा शेतमालाला योग्य भाव मिळेल किंवा नाही असा प्रश्न शेतकऱ्यांना नेहमीच सतावत असतो. यासाठी शासनाने नियोजन काळात सहकारी विपणन, नियंत्रित बाजार, हमीभाव, आधार किंमत यांसारखे उपायही योजले आहेत, पण शेतमालाच्या किमतीबाबत शेतकऱ्यांना अद्याप शाश्वती मिळालेली नाही. यावर उपाय म्हणून आणि धार्मिक सुधारणांचा भाग म्हणून करार शेतीची संकल्पना रुजत आहे.

करार शेती याचा अर्थ शेतमाल उत्पादक शेतकरी आणि शेतमाल खरेदी करणार खरेदीदार यांच्यात शेतमालाच्या खरेदी, विक्रीच्या संदर्भात झालेला करार होय. जो शेतकरी आणि खरेदीदार या दोघांना मान्य असतो.

या कराराच्या यशस्वितेसाठी उत्पादक शेतकरी व ग्राहक या दोघांनी विशिष्ट अटी किंवा संकेत पाळावयाचे असतात.

### शेतकऱ्याने पाळावयाचे संकेत/अटी :

१) आपल्या शेतजमिनीतून ज्या कृषीमालाबाबत करार झाला त्याच कृषीमालाचे उत्पादन करावे.

२) आपल्या उत्पादनाचा विशिष्ट दर्जा टिकविण्याचा प्रयत्न करावा.

३) पिकांची देखरेख, कीडनियंत्रण करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे.

४) शेतकऱ्याने ज्या खरेदीदाराबरोबर करार केलेला आहे त्यालाच आपला शेतमाल विकला पाहिजे.

### खरेदीदाराने पाळावयाचे संकेत/अटी

१) शेतकऱ्याने उत्पादित केलेला शेतमाल खरेदीदाराने हमीभावाने खरेदी करावा.

२) शेतकऱ्याला उच्च दर्जाचे बी-बियाणे, खते, अवजारे, कीटकनाशके व भांडवल इत्यादींचा वेळेवर पुरवठा खरेदीदाराने केला पाहिजे.

३) रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून पिकांची देखरेख व कीडनियंत्रण यासाठी तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.

४) गरजेपेक्षा अधिक उत्पादन किंवा कमी उत्पादन होऊ नये यासाठी शेतकऱ्यांना पीकलागवडीचे नियोजन देणे.

५) उत्पादित मालाची साठवणूक करणे, वाहतूक करणे, प्रतवारी करणे इत्यादी व्यवस्था खरेदीदाराने करावयाची असते.

वरील प्रकारच्या अटी करारात सहभागी असलेल्या दोन्ही पक्षांकडून पाळल्या गेल्या पाहिजेत. यातील पहिला पक्ष म्हणजे माल विकणारा उत्पादक (शेतकरी), तर दुसरा पक्ष हा माल खरेदी करणारा (ग्राहक) असतो. माल खरेदी करणारा हा देशातील शेतमालावर प्रक्रिया करणारी कंपनी तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मॉलची साखळी असणारी बहुराष्ट्रीय कंपनी किंवा देशी कंपनी असते. या दोन्ही पक्षांकडून कराराचे कितपत पालन होते यावरच कराराचे यश अवलंबून असते.

कराराचे योग्य पालन झाल्यास पुढील फायदे मिळणे शक्य आहे.

**करार शेतीचे फायदे :**

१) कृषी आदानांवर शेतकऱ्यांना खर्च करावा लागत नाही. म्हणून कर्जासाठी शेतकऱ्यांना बँका विशेषत: सावकार यावर अवलंबून राहावे लागत नाही. त्यामुळे कर्जबाजारीपणाची समस्या कमी होण्यास मदत होईल.

२) पीक लागवडीपासून शेतमाल तयार होईपर्यंत खरेदीदाराने उपलब्ध करून दिलेल्या तज्ज्ञांकडून योग्य वेळी मार्गदर्शन व सल्ला मिळत असल्याने कृषी उत्पादनात वाढ होण्यास मदत होते.

३) शेतमालाला खरेदीदारांकडून हमीभाव मिळत असल्याने शेतमाल उत्पादनातील जोखीम कमी होते. तसेच शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य लाभते.

४) शेतकऱ्यांना खात्रीचा ग्राहक मिळतो. किंमतही चांगली मिळते, तर खरेदीदाराला पुरेसा आणि चांगल्या दर्जाचा माल मिळतो.

५) स्थानिक बाजाराच्या कक्षा विस्तारतात. शेतमालासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते.

६) ग्रामीण भागात साठवण गृहे, वाहतूक दळणवळण सुविधा, जलसिंचन सुविधा इ. पायाभूत सुविधा निर्माण होतात.

७) नियोजनामुळे कृषी उत्पादनाच्या मागणी पुरवठ्यात संतुलन साधले जाते. त्यामुळे न्यून उत्पादन किंवा अत्युत्पादन होत नसल्याने किमतीतील चढ-उतार कमी होतात.

८) खरेदीदार जागेवर शेतमालाची खरेदी करत असल्याने शेतकऱ्याला शेतमालाची वाहतूक साठवण यावर खर्च करावा लागत नाही.

९) शेतमालाला हमी किंमत, योग्य वजन मापांचा वापर, वेळेवर भांडवलाचा व इतर

आदानांचा पुरवठा यामुळे शेतकऱ्यांचे शोषण होत नाही.

करार शेतीमुळे शेतकऱ्यांना आणि खरेदीदाराला वरीलप्रमाणे लाभ होत असले तरी दोन्हीपैकी कोणत्याही एका पक्षाने कराराचे उलंघन केल्यास दुसऱ्या पक्षाचे नुकसान होते. शेतकऱ्यास करारानुसार ठरलेला भाव, आदान सुविधा, भांडवल, मार्गदर्शन इ. खरेदीदाराने पुरविले नाही तर शेतकऱ्याचे नुकसान होते. याउलट शेतकऱ्याने खरेदीदाराला चांगल्या दर्जाचा शेतमाल पुरविला नाही किंवा करारबाह्य व्यक्तीला आपला शेतमाल विकला तर खरेदीदाराचे नुकसान होते. म्हणून करार शेतीचे यश दोन्ही पक्षांनी कराराचे पालन करण्यावरच अवलंबून असते.

अलीकडे भारतात मॉल संस्कृतीचा विकास होत आहे. रिलायन्ससारखे मोठे उद्योगसमूह करार शेतीत सहभागी होत आहेत. म्हणून शेतमालाची बाजारपेठ विस्तारत असून विक्रेय वाढावा निर्माण होऊन शेतीच्या व्यापारीकरणास भविष्यात मोठी संधी आहे.

### ५.२.८ सेंद्रिय शेती :

कृषी उत्पादकतेत वाढ करण्यासाठी भारतात १९६०च्या दशकात नवीन कृषी धोरणाचा प्रयोग करण्यात आला. या प्रयोगानुसार कृषी उत्पादन वाढीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. नवीन तंत्रज्ञानात सुधारित बियाणे, यंत्र सामुग्री, जलसिंचन सुविधा यांच्या वापराबरोबरच रासायनिक खते, आणि कीटक नाशकांचा मोठ्या प्रमाणावर वापर समाविष्ट होता. नवीन तंत्रज्ञानामुळे कृषी उत्पादनात वाढ झाली परंतु त्याचे काही घातक परिणाम दिसून येऊ लागले. म्हणून रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय खतांच्या वापरावर भर देऊन सेंद्रिय शेतीबाबत चर्चा होऊ लागली. अर्थात सेंद्रिय शेती म्हणजे रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय पदार्थांचा वापर एवढा मर्यादित अर्थ नाही.

व्यापक अर्थाने सेंद्रिय शेतीत पुढील घटकांचा वापर समाविष्ट आहे.

१) या पद्धतीत कंपोस्ट खत, जनावरांचे मलमूत्र, हिरवळीचे खत इत्यादी स्थानिक संसाधनांचा वापर करणे अभिप्रेत आहे.

२) नत्रस्थिरीकरण करणाऱ्या द्विदल वर्गीय पिकांचा (उदा. मूग, उडीद, चवळी इ.) पीक रचनेत समावेश करणे.

३) जिवाणू खतांचा, गांडूळ खतांचा वापर करून रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे.

४) पिकांच्या अन्नद्रव्याची (पोषक घटकांची) गरज भागविण्यासाठी नियोजन पद्धतीने एकदल व द्विदल पिके मिश्र पद्धतीने घेणे तसेच पीक रचनेत चक्रीय फेरफार करणे. थोडक्यात अनेक वर्षे एकाच प्रकारचे पीक न घेता वेगवेगळी पिके घेत राहणे.

५) पीक कापणीनंतर शिल्लक राहिलेला पाला-पाचोळा किंवा पिकांचे अवशेष, अच्छादन म्हणून किंवा कंपोस्ट खत निर्मितीकरिता वापरणे.

६) किडी व रोगांचा बंदोबस्त करण्यासाठी एकात्मिक कीड नियंत्रण तंत्राचा अवलंब करणे.

सारांशाने सेंद्रिय शेतीची पुढीलप्रमाणे व्याख्या करता येतील.

१) ''स्थानिक संसाधनांचा वापर, कमी भांडवली खर्च, पर्यावरणीय मूलतत्त्वावर आधारलेली, सेंद्रिय पदार्थांचा सुयोग्य वापराने जमिनीची उत्पादनक्षमता वाढवून ती टिकवून धरण्यावर भर देणारी, जैविक विविधता जोपासणारी, शेतकरी कुटुंबाच्या पोषणविषयक व इतर मूलभूत गरजा पूर्ण करणारी निसर्गपूरक स्वयंपूर्ण शेती पद्धती म्हणजे सेंद्रिय शेती होय.''

२) ''जमिनीच्या अंगी पीक उपज करण्याचा असलेल्या अंगभूत गुणांमध्ये वाढ करण्यासाठी कृषी पर्यावरणातील टाकाऊ पदार्थ, मनुष्य व प्राण्यांचे मलमूत्र, पर्यावरणाला पोषक ठरतील अशा जिवाणूंचे संवर्धन करून त्यांचा वापर करणे होय.''

वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, जमिनीच्या अंगी असलेल्या उपजत गुणांमध्ये वाढ करून उत्पादकता वाढविण्यासाठी सेंद्रिय शेतीपद्धतीचा स्वीकार केला पाहिजे. त्यासाठी खालील बदल घडवून आणले पाहिजे.

### १) हिरवळीच्या खतांचा वापर :

रासायनिक खतांचा वापर करण्याऐवजी कृषी व पर्यावरणात निसर्गत: निर्माण झालेल्या टाकाऊ पदार्थांपासून हिरवळीचे खत तयार करणे. त्यासाठी झाडांचा पाला-पाचोळा, शेतातील तण व इतर टाकाऊ पदार्थांना कुजविणे व त्यांचे सेंद्रिय खतात रूपांतर करून त्याचा वापर करणे.

### २) गांडूळ खतांची निर्मिती व वापर वाढविणे :

गांडूळ खत म्हणजे गांडुळांच्या नैसर्गिक कार्य करण्याच्या सवयींचा उपयोग करून सेंद्रिय पदार्थांपासून तयार झालेले खत होय. यात नत्र, स्फूरद, पलाश, कॅल्शियम इ. पिकांना पोषक घटकांचे प्रमाण शेणखतापेक्षा अधिक असते. गांडूळ खत हे रासायनिक खतांना उत्तम पर्याय ठरते. म्हणून गांडूळ खतांचा वापर वाढविला पाहिजे.

### ३) यंत्रांचा वापर कमी करणे :

शेत जमिनीची मशागत ट्रॅक्टर व इतर आधुनिक साधनांद्वारे न करता पारंपरिक बैलजोडीच्या साहाय्याने करणे. यंत्राचा वापर वाढल्याने पर्यावरणाच्या संतुलनात व्यत्यय निर्माण होण्याचा धोका असतो. म्हणून शेतीच्या विविध कामांसाठी होत असलेल्या यंत्रांचा वापर कमी केला पाहिजे.

### ४) कीटकनाशके व जंतुनाशकांचा वापर कमी करणे :

पिकांवरील रोग आणि किडींचे नियंत्रण करण्यासाठी जंतुनाशके आणि कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्यास अन्नसुरक्षा धोक्यात येते. औषधांचा अंश धान्य, फळे व भाजीपाला इ. कृषीमालात शिल्लक राहतो. म्हणून कृषी उत्पादनाचा दर्जा घसरतो. त्याचा मानवी आरोग्यावर घातक परिणाम होतो. निर्यात होणाऱ्या कृषी मालामध्ये औषधांचा अंश विशिष्ट मात्रेपेक्षा अधिक दिसून आल्यास उत्पादक आंतरराष्ट्रीय मानांकन दर्जा पूर्ण करू शकत नाही. परकीय बाजारपेठेत निर्यात केलेला माल नाकारला जाऊ शकतो. म्हणून

कीटकनाशके, जंतुनाशकांना पर्याय म्हणून कडूनिम पाल्याचा रस, निंबोळी, गोमूत्र इ. पर्यावरणरक्षक नैसर्गिक संसाधनांचा वापर करून पीक संरक्षण केले पाहिजे.

**५) क्षारता कमी करणे :**

पाण्याचा भरमसाठ वापर म्हणजे भरघोस पीक हा गैरसमज दूर केला पाहिजे. पाण्याचा अवाजवी वापर झाल्याने जमिनीची क्षारता वाढते. तसेच दलदलीमुळेही जमिनीची उत्पादकता घटते. म्हणून पिकांना माफक पाणी देऊन त्याबरोबर ओलावा टिकून ठेवण्यासाठी जमिनीवर टाकाऊ पदार्थांचे आच्छादन तयार करावे. जेणेकरून जमिनीची पाण्याची गरज कमी होईल. त्यामुळे कमी पाण्यावर उत्पादन घेणे शक्य होईल. तसेच जमिनीची झीज कमी होण्यास मदत होऊ शकते.

**सेंद्रिय शेतीची आवश्यकता :**

मानवी आरोग्यास घातक ठरणारे रासायनिक खते, कीटकनाशके तसेच पर्यावरण संतुलनात व्यत्यय निर्माण करणाऱ्या खर्चिक व दुर्मिळ इंधनांचा वापर करणारी यंत्रे इ.च्या उपयोगामुळे जे दूरगामी अनिष्ट परिणाम घडून येतात त्या पार्श्वभूमीवर सेंद्रिय शेतीची आवश्यकता पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

१) शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी जमिनीचा पोत सुधारणे तसेच जमिनीची उत्पादकता टिकविणे.

२) रासायनिक खते, कीटकनाशके, जंतुनाशके यांचा मानवी जीवनावरील, प्राणी, पक्षी जीवनावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी सेंद्रिय शेती आवश्यक आहे.

३) पर्यावरणाचे संतुलन टिकवून ठेवण्यासाठी सेंद्रिय शेती उपयुक्त ठरते.

४) उत्पादनाचा दर्जा सुधारून जास्तीत जास्त कृषी उत्पादन निर्यात करणे. त्याद्वारे देशाला परकीय चलन तर शेतकऱ्याला चांगली किंमत मिळवून देण्यासाठी सेंद्रिय शेती आवश्यक ठरते.

**सेंद्रिय शेतीचे फायदे :**

१) शेतजमिनीच्या मशागतीसाठी ट्रॅक्टरसारख्या यांत्रिक साधनांचा वापर करण्याऐवजी मनुष्यबळ व प्राण्यांचा वापर केल्यास जमिनीची धूप कमी होण्यास मदत होते.

२) यंत्राऐवजी श्रमाच्या वापरावर भर दिल्यास बेरोजगारी कमी होण्यास मदत होते.

३) महाग रासायनिक खते व कीटकनाशकांच्या वापराऐवजी सेंद्रिय खते व नैसर्गिक कीटकनाशकांचा वापर केल्यास उत्पादन खर्चात बचत होईल.

४) रासायनिक खते व कीटकनाशकांच्या वापराऐवजी नैसर्गिक खते व कीटकनाशकांचा वापर करून उत्पादन खर्चातही बचत करता येईल. तसेच आज धोक्यात आलेली अन्नसुरक्षा वाचविता येणे शक्य होईल.

५) सेंद्रिय शेतीमुळे कृषी उत्पादनाचा दर्जा व टिकाऊपणा यात सुधारणा होत असल्याने

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजाराचा विस्तार होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य निर्माण करता येईल.

६) ओलावा टिकवून ठेवण्यासाठी पाला-पाचोळ्याचा वापर केल्यास जमिनीची धूप थांबेल तसेच पाण्याची बचत होऊन शेतकऱ्यांचा दुहेरी फायद होईल.

७) सेंद्रिय शेतीमुळे पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. त्यामुळे रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी होऊन उत्पादन खर्चात बचत होते.

८) सेंद्रिय शेतीमुळे पर्यावरणाचे संतुलन टिकवून ठेवण्यास फार मोठी मदत होऊ शकते.

## ५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

### अ) रिकाम्या जागा भरा.

१) भारतीय शेती केवळ ....... नसून ती भारतीयांची ...... आहे.

२) भारतीय शेतीचे यश केवळ मानवी प्रयत्नांवर अवलंबून नसून ...... वर अवलंबून आहे.

३) १९७०च्या (सुधारित) कमाल जमीन धारणा कायद्यानुसार ...... हा घटक जमीन धारणेचा आधार मानला जाऊ लागला.

४) केंद्र सरकारने ...... रोजी विशेष आर्थिक क्षेत्र धोरण पारित केले.

५) अमेरिकन कृषीतज्ञ ...... यांनी उच्च उत्पादन देणाऱ्या गव्हाच्या जातीचा शोध लावला.

६) नवीन कृषी धोरणामुळे कृषी उत्पादनात झालेल्या भरीव वाढीस ...... असे म्हटले जाते.

### ब) चूक की बरोबर ते सांगा.

१) कृषी व्यवसायाचा राष्ट्रीय उत्पन्नातील घटत जाणारा वाटा हे देशाच्या प्रगतीचे लक्षण आहे.

...............................................................................................

२) भारताच्या संदर्भात जमीन उत्पादकतेपेक्षा श्रमिक उत्पादकता अधिक महत्त्वाची आहे.

...............................................................................................

३) कमाल जमीन धारणा कायद्यातील जमीन धारणेच्या कमाल मर्यादेबाबत देण्यात येणाऱ्या सवलतींमुळे कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली नाही.

...............................................................................................

४) नवीन कृषी विषयक धोरण मोठ्या शेतकऱ्यांपेक्षा लहान शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर ठरले.

...............................................................................................

५) विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योगांना कामगार कायदे लागू नसतात.

.............................................................................................

**क) जोड्या जुळवा**

| | | |
|---|---|---|
| १) | हरित क्रांती | अ) शेतमालाच्या किमतीची हमी |
| २) | कमाल जमीनधारणा | ब) प्रतिहेक्टर उत्पादकता कायदा |
| ३) | विशेष आर्थिक क्षेत्र | क) गांडूळ खताचा वापर |
| ४) | जमीन उत्पादकता | ड) करविरहित प्रदेश |
| ५) | करार शेती | इ) डॉ. स्वामीनाथन |
| ६) | सेंद्रिय शेती | फ) कर्जबाजारीपणा |
| ७) | शेतकऱ्यांच्या आत्महत्या | ग) मानवी आरोग्याला घातक |
| | | ह) उत्पादनवाढीचा बिनभांडवली उपाय |

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

अ) १) व्यवसाय, जीवनपद्धती २) निसर्गाचे सहकार्य ३) कुटुंब
४) २३ जून २००५ ५) डॉ. व्युल्यम बोरलॉग
६) हरित क्रांती

ब) १) बरोबर २) चूक ३) बरोबर ४) चूक ५) बरोबर

क) १) इ, २) ह, ३) ड, ४) ब, ५) अ, ६) क, ७) फ

## ५.४ सारांश :

शेती हा अर्थव्यवस्थेतील एक प्रमुख व्यवसाय आहे. परंतु शेती व्यवसाय हा हंगामी आणि अनिश्चित स्वरूपाचा असून शेती परंपरागत पद्धतीने केली जाते. कर्जबाजारीपणा हे भारतीय अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. एक व्यवसाय म्हणून भारतीय शेतीचे स्वरूप प्रतिकूल असले तरी शेतीचे अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. राष्ट्रीय उत्पन्न आणि रोजगार यातील योगदान, औद्योगिक आणि आर्थिक विकासाला पूरक, इत्यादीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेती हा महत्त्वाचा व्यवसाय ठरतो.

शेतीचे अर्थव्यवस्थेतील स्थान लक्षात घेता शेतीची उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. शेतीची उत्पादकता म्हणजे ठराविक प्रदेशातल्या विशिष्ट क्षेत्रफळातल्या जमिनीत प्रचलित तंत्रपद्धतीने प्राप्त होणारे उत्पादन होय. भारतीय शेतीची दर हेक्टरी तसेच प्रति श्रमिक उत्पादकता कमी आहे. जमिनीचा पुरवठा मर्यादित परंतु श्रमिकांची विपुलता यामुळे भारताच्या दृष्टीने प्रति श्रमिक उत्पादकतेपेक्षा जमीन उत्पादकतेत वाढ होणे अधिक महत्त्वाचे

मानले जाते. भारतात जमीन उत्पादकता (दर हेक्टरी उत्पादकता) कमी आहे. शेतीवरील लोकसंख्येचा भार, ग्रामीण भागातील प्रतिकूल वातावरण, पूरक सोयींचा अभाव, धारणक्षेत्राचे लहान आकारमान, जुनाट उत्पादन तंत्र, जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी, कृषीसंशोधन आणि तंत्रज्ञानाचा अपुरा प्रसार आणि वापर ही भारतीय शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे आहेत. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी नियोजन काळात अनेक उपाययोजना करण्यात आल्या. जमीन सुधारणा कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, सुधारित बियाणे, रासायनिक खते, जलसिंचनाच्या सुविधांमध्ये वाढ, पीक संरक्षण इत्यादी उपायांचा अवलंब केलेला आहे.

संस्थात्मक जमीन सुधारणेचा भाग म्हणून शेती उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी, उत्पन्न व संपत्तीच्या वाटपात समानता प्रस्थापित करण्याच्या हेतूने भारतात कमाल जमीनधारणा कायदे करण्यात आले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी तांत्रिक सुधारणांच्या स्वरूपात उत्पादन वाढीसाठी उपाययोजना करण्यात आल्या. १९६७-६८ पासून कृषी विकासासाठी एक नवीन आराखडा तयार करण्यात आला. या आराखड्यालाच नवीन व्यूहरचना किंवा धोरण असे म्हणतात. या नवीन धोरणानुसार सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, जलसिंचनाची साधने यांचा वापर केल्याने उत्पादनात जी वाढ घडून आली त्या वाढीलाच हरितक्रांती असे म्हटले जाते. हरितक्रांती ठरावीक पिकांसाठी देशाच्या काही निवडक भागात विशेषत: सिंचन सुविधा असलेल्या भागात यशस्वी झाली. तसेच ती मोठ्या शेतकऱ्यांनाच अधिक उपयुक्त ठरल्याने हरितक्रांतीचे यश मर्यादित मानले जाते.

शासनाने नियोजन काळात कृषी विकासासाठी अनेक उपाय योजले. परंतु ग्रामीण कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे होणारे नुकसान, कृषी उत्पादनाचे किंमतीत होणारे तीव्र चढ-उतार, कृषी आदानांच्या वाढत्या किमती इ.मुळे शेतकऱ्यांच्या समस्यांनी उग्र रूप धारण करून त्याचे पर्यवसन शेतकरी आत्महत्येत होऊ लागले. कृषी व्यवसायात हल्ली शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या ही प्रमुख समस्या निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून करार शेती आणि सेंद्रिय शेती या नवीन संकल्पना रूजू लागल्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या (उत्पादक) तसेच उपभोक्त्यांच्या (ग्राहकांच्या) हित रक्षण करण्याच्या दृष्टीने करारशेती आणि सेंद्रिय शेती यांचा प्रसार वाढत आहे. आर्थिक आणि औद्योगिक विकासाला गती प्राप्त व्हावी तसेच परकीय चलनाची प्राप्ती व्हावी यासाठी २००६ पासून विशेष आर्थिक क्षेत्रांची कार्यवाही सुरू झालेली आहे. विशेष आर्थिक क्षेत्राच्या धोरणाबाबत समर्थन आणि विरोध या दोन्ही बाजूंनी युक्तिवाद होत असल्याने ते एक वादग्रस्त धोरण ठरले आहे.

## ५.५ पारिभाषिक शब्द - शब्दार्थ

१) **कोरडवाहू जमीन -** पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली किंवा कृत्रीम पाणीपुरवठ्याची सोय नसलेली, वर्षातून एकच पीक देणारी जमीन.

२) **जमीनदारी -** जमिनीची मालकी एक किंवा काही थोड्या लोकांच्या हाती एकवटलेली

असते. शेतसाऱ्याची ठरावीक निश्चित रक्कम सरकारकडे भरण्याची जबाबदारी त्यांचीच असते.

३) **महालवारी –** जमिनीची मालकी शेतकरी वर्गाकडे असणे व संयुक्तपणे शेतसारा भरण्यास तेच जबाबदार असणे. अनेक ठिकाणी गाव प्रमुखामार्फत शेतसारा सरकारकडे भरला जात असे.

४) **रयतवारी –** जमिनीची मालकी खाजगी किंवा वैयक्तिक शेतसारा भरण्याची जबाबदारी व्यक्तिगत.

५) **जमीनसंबंध –** जमीन कसणारा जमिनीचा मालक असणे किंवा कूळ असणे, किंवा जमिनीच्या मालकाने जमीन स्वत: कसणे किंवा कसण्यासाठी खंडाने दुसऱ्याला देणे.

६) **सीमांत शेतकरी –** एक हेक्टरपेक्षा कमी जमिनीचा मालक.

७) **कर्जबाजारीपणा –** कर्जाची परतफेड करण्याची क्षमता नसणे. अवास्तव व्याजदर किंवा व्याजावर व्याज आकारणी होऊन कर्जाचा बोजा सतत वाढत जाणे.

८) **धारणक्षेत्र –** एका व्यक्तीने धारण केलेले जमिनीचे क्षेत्र. स्वत:च्या मालकीची जेवढी जमीन असेल ते मालकीचे धारणक्षेत्र. कसण्यासाठी किती जमीन आहे ते लागवडीचे धारणक्षेत्र. यात स्वत:च्या मालकीची जमीन असू शकते किंवा खंडाने कसण्यासाठी घेतलेली दुसऱ्याच्या मालकीचीही जमीन असू शकते.

९) **श्रमप्रधान उद्योग –** यंत्राचा कमीत कमी आणि श्रमिकांचा जास्तीत जास्त वापर करणारे उद्योग.

## ५.६ संदर्भसूची :


१) देशपांडे श्रीधर, देशपांडे विनायक (२००४ प्रथम आवृत्ती), भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई.

२) प्रा. चव्हाण एन. एल. (२००९ प्रथम आवृत्ती) भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

३) डॉ. देसाई रा. श्री., डॉ. भालेराव निर्मल (१९९१ प्रथम आवृत्ती) कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवस्थापन, निराली प्रकाशन, पुणे.

४) डॉ. कायंदे-पाटील गंगाधर (२००८) शेतीचे अर्थशास्त्र - सिद्धांत आणि धोरण, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

५) डॉ. कानेटकर मेधा (जुलै २०१२ प्रथम आवृत्ती) भारतीय अर्थशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

६) डॉ. कुरूलकर र. पू. (जानेवारी २००१), भारतीय अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

७) डॉ. देशपांडे विनायक श्रीधर, अर्थसंवाद (जानेवारी - मार्च २००८ खंड ३१, अंक ४), कार्यवाह मराठी अर्थशास्त्र परिषद.

८) विशेषांक - विशेष आर्थिक क्षेत्र, अर्थसंवाद (एप्रिल-जून २००७, खंड ३१ अंक - १)

~~९) Datta Ruddr Sundaram K.P.M. (2010) Sixty First Edition, S. Chand &~~ Company Ltd., New Delhi - 110055

१०) Datta Ruddr, Sundaram K.P.M. (2007), Fifty Sixth Edition, S. Chand New Delhi - 110055

११) Agricultural Statistics at a Glana (2008)

१२) डॉ. बोधनकर सुधीर, डॉ. कानेटकर मेधा, भारतीय अर्थशास्त्र (२००१), साईनाथ प्रकाशन, नागपूर.

## ५.७ सरावासाठी स्वाध्याय

**सविस्तर उत्तरे लिहा.**

१) भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे स्थान स्पष्ट करा.

२) शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे सांगा.

३) शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी उपाययोजना सांगा.

४) जमीन धारणेवर कमाल मर्यादा घालण्याची आवश्यकता का होती ते स्पष्ट करा.

५) विशेष आर्थिक क्षेत्राच्या समस्या सांगा.

६) विशेष आर्थिक क्षेत्राच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सांगा.

७) नवीन कृषी धोरणाचे (व्यूहरचनेचे) प्रमुख घटक सांगा.

८) हरितक्रांतीचे यश सांगा.

९) करार शेतीचे फायदे सांगा.

१०)शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे सांगा.

११)सेंद्रिय शेतीचे फायदे सांगा.

**टीपा लिहा.**

१) भारतीय शेतीचे स्वरूप

२) शेतीची उत्पादकता

३) कमाल जमीनधारणा कायद्यातील तरतुदी

४) करारशेती

५) सेंद्रिय शेती

६) हरितक्रांतीच्या उणिवा

# घटक – ६

# कृषी वित्तपुरवठा आणि विपणन

**अनुक्रमणिका**


६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ विषय विवेचन

६.२.१ कृषि वित्तपुरवठा

६.२.२ कृषी विपणन

६.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

६.४ सारांश

६.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

६.६ संदर्भसूची

६.७ सरावासाठी प्रश्न


## ६.० उद्दिष्टे

- कृषी वित्तपुरवठा आणि विपणानाचे अध्ययन करणे.
- कृषी विपणन व्यवस्था समजून घेणे.
- कृषी विपणन व्यवस्थेतील दोष समजून घेणे.
- कृषी किंमत धोरण समजून घेता येईल.
- भारतातील अन्न सुरक्षाविषयक धोरण स्पष्ट करता येईल.

## ६.१ प्रस्तावना

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील सुमारे ५७ टक्के लोकसंख्या शेती या प्रमुख व्यवसायावर अवलंबून आहे. भारतीय शेतीची उत्पादकना खूपच कमी असल्याने शेतकऱ्याचे उत्पन्न कमी आहे. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जादेखील खालच्या पातळीचा आहे. शेतीच्या उत्पन्नात वाढ करावयाची असेल आणि त्यांच्या राहणीमानात सुधारणा करायची असेल तर त्यासाठी कृषी वित्तपुरवठा आणि कृषी मालाचे विपणन हे दोन मार्ग प्रभावी ठरू शकतात.

कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी सुधारित बियाणे, खते, अवजारे, यंत्रसामग्री, कीटकनाशके, साठवणूक, वाहतूक, जमीन सुधारणा इत्यादी कारणांसाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. भारतीय शेतकऱ्याचे उत्पन्न कमी असल्याने त्याची बचत

प्रवृत्ती कमी आहे. त्यामुळे त्याच्याकडे भांडवलाचा अभाव आहे. म्हणून भांडवलाची गरज भागविण्यासाठी त्याला इतरांवर अवलंबून राहवे लागते. कृषीला वित्तपुरवठा करणाऱ्या विविध स्रोतांकडून पुरेसा, वेळेवर आणि कमी व्याजदराने कर्ज पुरवठा झाला तर शेतकरी निश्चितपणे कृषी उत्पादनात वाढ घडवून आणू शकतो. कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्याचा दुसरा मार्ग म्हणजे विपणन व्यवस्था होय. कृषी उत्पादनातील वित्तपुरवठा आणि विपणन यांचे महत्त्व लक्षात घेता या प्रकरणात कृषी वित्तपुरवठ्याची आवश्यकता, प्रकार, स्रोत, कृषी विपणन व्यवस्था इ. घटकांचा अभ्यास करणार आहोत.

**कृषी वित्तपुरवठा आणि विपणन**

## ६.२ विषय विवेचन

### ६.२.१ कृषी वित्तपुरवठा (Agricultural Finance)

अर्थव्यवस्थेतील उद्योग, वाहतूक, व्यापार व दळणवळण, सेवाक्षेत्र या सर्व स्रोतांमध्ये उत्पादन आणि उत्पादनवाढ करण्यासाठी भांडवलाची गरज असते. त्या प्रमाणेच कृषी क्षेत्रालाही उत्पादन कार्यासाठी भांडवलाची गरज भासते. परंतु इतर क्षेत्रातील भांडवलाची गरज व कृषी क्षेत्रातील भांडवलाची गरज यात फरक आहे. इतर क्षेत्रात फक्त उत्पादन कार्यासाठी भांडवलाची गरज असते. त्यातील उत्पादनाबाबत निश्चितता असते. म्हणून बँका व वित्तीय संस्था पुरेशा प्रमाणात कर्ज पुरवठा करतात. परंतु कृषी हा व्यवसाय अनिश्चित आहे. शिवाय शेतकऱ्याला उत्पादक कार्याबरोबरच दैनंदिन गरजा, सण, उत्सव, लग्न इतर क्रियाकर्म इत्यादी अनुत्पादक कार्यासाठीही कर्जाची गरज भासते. तसेच कृषी व्यवसायाची अनिश्चितता आणि अनुत्पादक कर्जे या कारणांनी बँका व वित्तीय संस्था कृषीला कर्ज पुरवठा करण्यास नाखूश असतात.

### १ कृषी वित्तपुरवठ्याची आवश्यकता व महत्त्व (Need of Agricultural Finance)

कृषी उत्पादन आणि उत्पादकतेत वाढ करण्यासाठी आणि इतर अनुत्पादक कार्यासाठी शेतकऱ्यांना कृषी वित्तपुरवठ्याची गरज भासते. प्रगत शेती करण्यासाठी सुधारित बियाणे, रासायनिक व सेंद्रिय खते, अवजारे, यंत्रसामग्री, जमीन सपाटीकरण व बांधबंधिस्ती, विहीर खोदणे व पाइप लाईन टाकणे, मजुरांची मजुरी देणे, कृषी मालाची साठवणूक व वाहतूक करणे इ. उत्पादक कार्यासाठी वित्तपुरवठ्याची गरज भासते. शेती व्यवसायाबरोबरच दुग्ध व्यवसाय, कुक्कुट, वराह व शेळ्या-मेंढ्या पालनाचाही व्यवसाय शेतकरी करतात. यासाठीही शेतकऱ्याला कर्जाची गरज भासते. याबरोबरच सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक रूढी परंपरेनुसार शेतकऱ्याला खर्च करावा लागतो. यासाठीही शेतकऱ्याला कर्जाची आवश्यकता भासते.

शेतकऱ्याच्या उत्पन्नाचा मार्ग कृषी उत्पादन असतो. कृषी उत्पादनाची बाजारात विक्री केल्यानंतर, त्याला उत्पन्नाची प्राप्ती होते. पीक तयार होऊन विक्री करण्यापर्यंत ४ ते ६ महिन्यांचा कालावधी लागतो. या कालावधीत त्याच्याकडे दैनंदिन खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचा दुसरा मार्ग नसल्याने त्याला कर्जाची गरज भासते. हे कर्ज कुटुंबाचे पालनपोषण

करण्यासाठी घेतले जाते. याबरोबरच जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठीही नवीन कर्ज काढण्याची आवश्यकता शेतकऱ्याला भासते.

### २ कृषी वित्तपुरवठ्याचे प्रकार (Types of Agricultural Finance)

कृषी वित्तपुरवठ्याची आवश्यकता व कालावधीनुसार वित्तपुरवठ्याचे तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

### १) अल्पकालीन कर्ज (Short Term Loans)

शेतकऱ्याला कृषी उत्पादन व इतर अनुत्पादक कारणांसाठी १२ ते १५ महिन्यांच्या कालावधीसाठी अल्पकालीन कर्जाची गरज भासते. बी-बियाणे, रासायनिक व सेंद्रिय खते, मजुरांची मजुरी, पशूंचे खाद्य, चारा, दैनंदिन व घरगुती खर्च, आकस्मिक खर्च इत्यादी कारणांसाठी अल्पकालीन कर्जाची गरज भासते.

### २) मध्यमकालीन कर्ज (Medium Term Loans)

जमीन सपाटीकरण, बांधबंदिस्ती, बैलजोडी व गाडी, गाई, म्हशी, बकऱ्या इत्यादी तसेच कृषी अवजारे, पशुधन खरेदी करणे इत्यादी कारणांसाठी १५ महिने ते ५ वर्षांच्या कालावधीपर्यंत मध्यमकालीन कर्जाची शेतकऱ्यांना गरज भासते. या कर्जाचे स्वरूप बहुतांश उत्पादकच असते. या कर्जाची परतफेड टप्प्याटप्प्याने करता येते.

### ३) दीर्घकालीन कर्ज (Long Term Loans)

नवीन शेतजमीन खरेदी करणे, नवीन विहीर खोदणे, पाइपलाइन टाकणे, कापणी, मळणी, फवारणीयंत्रे खरेदी करणे, ट्रॅक्टर खरेदी करणे, साठवणूक, गृह बांधणे इत्यादी कारणांसाठी ५ वर्षांपेक्षा जास्त मुदतीसाठी दीर्घकालीन कर्जाची गरज भासते. दीर्घकालीन कर्जाची परतफेड मासिक, सहामाही व वार्षिक हप्त्यांमध्ये केली जाते.

### ३ कृषी वित्तपुरवठ्याचे स्रोत (Sources of Agricultural Finance)

कृषी वित्तपुरवठ्याच्या स्रोतांचे बिगर संस्थात्मक आणि संस्थात्मक असे दोन भागात वर्गीकरण केले जाते.

### अ) बिगर संस्थात्मक स्रोत (Non Institutional Sources)

या स्रोतात सावकार, सराफी पेढ्या, जमीनदार, व्यापारी, आडते, नातेवाईक व मित्रमंडळी इत्यादींचा समावेश केला जातो. या वर्गाकडून शेतकऱ्याला उत्पादक आणि अनुत्पादक या दोन्ही कारणांसाठी अल्पकालीन कर्जपुरवठा केला जातो. या सर्व घटकांकडून शेतकऱ्याला कोणत्याही तारणाशिवाय, कागदपत्राशिवाय व्यक्तिगत ओळखीच्या आधारावर सहज कर्ज उपलब्ध होते.

१९५१-५२ मध्ये एकूण कृषी कर्जात बिगर संस्थात्मक स्रोत कर्जपुरवठा ९२.७ टक्के होता. त्यात सावकारी कर्जाचे प्राबल्य सर्वाधिक होते. सावकारी कर्जाचा बिगर संस्थात्मक कर्जातील वाटा १९५१-८२ मध्ये ६९.७ टक्के होता. १९८१ मध्ये बिगर संस्थात्मक

कर्जपुरवठ्यात घट होऊन तो ३६.८ टक्के झाला, तर १९९५-९६ मध्ये १६ टक्क्यांपर्यंत खाली आला. परंतु अजूनही बिगर संस्थात्मक स्रोतामार्फत मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केला जातो.

भारतातील संस्थात्मकेतर स्रोताकडून जो कर्जपुरवठा केला जातो त्यात अनेक दोष आहेत. जसे सावकार व इतर वर्गाच्या व्याजाचे दर प्रचंड असतात. ते कमीत कमी ३० टक्के ते १२० टक्क्यांपर्यंत असतात. म्हणजेच एका वर्षात ते दुप्पट रक्कम वसूल करतात. शेतकऱ्यांना कर्ज देतान खोटी कागदपत्रे, दस्तऐवज करून शेतकऱ्यांची फसवणूक करतात. व्यापारी व अडत्यांकडून शेतमालाची कमीत कमी भावात, खोटे वजनमापे वापरून खरेदी केली जाते. या वर्गाकडून शेतकऱ्याची विविध मार्गांनी पिळवणूक व शोषण केले जाते. जमिनी हडप केल्या जातात. शेतकऱ्याला कर्जात आकंठ बुडवतात.

स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने या वर्गाकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक व शोषण थांबविण्यासाठी सावकारी पद्धतीवर कायद्याद्वारे कडक नियंत्रणे आणली आहेत. त्यांना परवाना घेणे सक्तीचे केले आहे. किमान आणि कमाल व्याजदर ठरवून दिले आहेत. तसेच खोटे दावे व फसवणूक करून जमीन हडप करण्याचा प्रयत्न केला तर कडक शिक्षेची तरतूद केली आहे.

असे असले तरी आजही ग्रामीण भागात सावकारी पद्धत अस्तित्वात आहे. ती टिकून राहण्याचे कारण म्हणजे सावकाराची व्यवहाराची सोपी पद्धत, कोणतेही कागदपत्र व तारण नाही. बँकांची कृषी कर्जाबाबत अनुत्सुकता, बँकांचे गुंतागुंतीचे कर्ज धोरण व प्रक्रिया इत्यादी आहेत.

### ब) **संस्थात्मक स्रोत :** (Institutional)

या स्रोतात सरकार, सहकारी पतसंस्था व बँका, व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, नाबार्ड इत्यादींचा समावेश केला जातो.

### १) **सरकार :** (Government)

सरकारद्वारेही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला जातो. या कर्जाला तकावी कर्ज म्हणतात. नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, महापूर यांसारख्या आपत्कालीन स्थितीतच सरकारद्वारे शेतकऱ्यांना ही कर्जे दिली जातात. या कर्जावर आकारला जाणारा व्याजाचा दर ३.६ टक्के असतो. हा कर्जप्रकार फारसा लोकप्रिय होऊ शकला नाही. अपुरा कर्जपुरवठा, कर्जवाटपात विलंब, तारणाचा आग्रह, बेजबाबदार अधिकारी, लाचलुचपतीचे प्रकार, भ्रष्टाचार यामुळे शेतकऱ्यांचा ही कर्जे घेण्याकडे कल नसतो. १९५१-५२ मध्ये सरकारने दिलेल्या कर्जाचे प्रमाण एकूण ग्रामीण पतपुरवठ्याशी ३.३ टक्के होते. ते १९९१-९२ मध्ये १५.५ टक्क्यांपर्यंत वाढले होते, परंतु १९९६ मध्ये सरकारी कर्जाचा हिस्सा ०.५ टक्क्यांपर्यंत घटलेला होता. सध्याच्या बदलत्या परिस्थितीत अशा कर्जांना फारसे महत्त्व राहिले नाही.

### २) **सहकारी पतसंस्था :** (Cooperative Credit Societies)

भारताच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारी एक महत्त्वाची चळवळ म्हणून सहकार चळवळीकडे पाहिले जाते. ग्रामीण भागातील काही लोकांनी सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन सहकारी पतसंस्थांची स्थापना केली. अल्पकालीन आणि मध्यमकालीन कर्जे

देण्यासाठी प्राथमिक कृषी पतसंस्था आणि दीर्घकालीन कर्ज देण्यासाठी भू-विकास बँकांचा विकास ग्रामीण भागात करण्यात आला आहे. भारतात सहकारी बँकांची रचना त्रिस्तरीय आहे. राज्यपातळीवर राज्य सहकारी बँक तिला शिखर बँक असेही म्हणतात. जिल्हा पातळीवर जिल्हा सहकारी बँक आणि ग्रामीण पातळीवर प्राथमिक कृषी सहकारी संस्था असतात. सहकारी पतसंस्थाद्वारे दिल्या जाणाऱ्या कर्जाचे प्रमाण १९५१-५२ मध्ये ३.३ टक्के होते. १९७१-७२ मध्ये ते प्रमाण २२ टक्के होते. २००६-०७ मध्ये एकूण संस्थात्मक वित्तपुरवठ्यात सहकारी पतसंस्था व बँकांचा वाटा २०.८९ टक्के होता.

### ३) भू-विकास बँक : (Land Development Bank)

ही बँक शेतकऱ्यांना दीर्घकाळासाठी पतपुरवठा करते. शेतकऱ्यांना सामान्यत: १५ ते २० वर्षांच्या कालावधीची कर्जे भू-विकास बँकेमार्फत दिली जातात. ही कर्जे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या तारणावर दिली जातात. जमीन खरेदी, पाणीपुरवठ्याच्या सोयी, कृषी यंत्राची खरेदी आणि जमिनीत कायमस्वरूपी सुधारणा करणे इत्यादींसाठी शेतीला दीर्घकालीन पतपुरवठ्याची गरज असते. यासाठी १९२० मध्ये भू-विकास बँकांना सुरुवात झाली. शेतकऱ्यांची सावकारी कर्जाच्या पाशातून सुटका करणे, शेतीची उत्पादकता वाढविणे व एकंदरीत शेतीचा विकास साधणे यासाठी या बँका कर्जपुरवठा करतात. १९५० मध्ये राज्य भू-विकास बँकांची संख्या ०५ होती ती १९८६ मध्ये १९ पर्यंत वाढली. प्राथमिक भू-विकास बँकांची संख्या २८९ होती ती १३३१ पर्यंत वाढली. १९५१ मध्ये या बँकेने फक्त ३ कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले होते ते १९९७-९८ मध्ये ३६४० कोटी रुपयापर्यंत वाढले.

भू-विकास बँकेने आपल्या भांडवलाची उभारणी करण्यासाठी भाग-भांडवलाची, ऋणपत्रांची विक्री करून त्याचबरोबर केंद्र सरकार, राज्य सरकार, नाबार्ड, रिझर्व बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इडिया  आणि आयुर्विमा महामंडळाकडून भांडवलाची उभारणी करते. भू-विकास बँकांनी २०००-०१ मध्ये मध्यम व दीर्घ मुदतीची ४२०९ कोटी रुपयांच्या कर्जाचे वितरण केले होते. एकूण संस्थात्मक कर्जात भू-विकास बँकेचा वाटा ७.८६ टक्के होता. या बँकांनी वितरित केलेल्या कर्जपुरवठ्यापैकी ६० टक्के कर्ज जलसिंचनाच्या कामासाठी दिले. कर्जाची प्रचंड थकबाकी, राज्य सरकारच प्रतिकूल धोरण यामुळे भू-विकास बँका डबघाईस आलेल्या आहेत.

### ४) व्यापारी बँका : (Commercial Banks)

व्यापारी बँका हा सुद्धा कृषी पतपुरवठ्याचा महत्त्वपूर्ण स्रोत आहे. राष्ट्रीयीकरणापूर्वी या बँका प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्राला पतपुरवठा करीत असत. शेती पतपुरवठा करण्यात कमी लाभता व अधिक जोखीम असल्याने बँकांनी याकडे दुर्लक्ष केले होते. १९५०-५१ मध्ये कृषी क्षेत्राला करण्यात आलेल्या पतपुरवठ्यात व्यापारी बँकांचा वाटा जेमतेम १ टक्का होता.  यावरून त्यांनी शेतीकडे केलेले दुर्लक्ष लक्षात येते. १९६९ मध्ये भारतातील प्रमुख १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. यानंतर मात्र व्यापारी बँका कृषी क्षेत्राला पतपुरवठा करू लागल्या. यासाठी ग्रामीण भागात शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. शेतीसाठी अल्पमुदत व मध्यम मुदत कर्ज देण्याचे कार्य व्यापारी बँकांनी सुरू केले आहे. १९६९ पर्यंत व्यापारी बँकांनी ४४ कोटी रुपयांपर्यंत मर्यादित कर्ज दिले होते. २००० मध्ये

कर्जाची रक्कम २२८५४ कोटी रुपयांपर्यंत वाढली. १९९९-२००० मध्ये एकूण संस्थात्मक कृषी कर्जापैकी ५८.७ टक्के कृषी कर्ज व्यापारी व प्रादेशिक ग्रामीण विकास बँकांद्वारे देण्यात आले होते. ते २००५-०६ मध्ये ६९.७ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. याचा अर्थ असा की वर्तमानकाळात व्यापारी बँका ग्रामीण कर्जपुरवठ्यात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. ग्रामीण भागात रोजगार वाढीसाठी व विशेष करून शेतीच्या अधुनिकीकरणासाठी आवश्यक असणारा वित्तपुरवठा व्यापारी बँकांनी उपलब्ध करून दिला. यातून शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, पंपसेट, शेतीसाधने खरेदी करण्यास मदत झाल्याने शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत झाली आहे.

## ५) **प्रादेशिक ग्रामीण बँका :** (Regional Rural Bank)

१९७५ मध्ये नियुक्त करण्यात आलेल्या ग्रामीण बँक कार्यगटाने प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्याची शिफारस केली. समाजातील दुर्बल घटकांना वित्तपुरवठा करण्याच्या उद्दिष्टासाठी एका वेगळ्या संस्थात्मक रचनेची आवश्यकता होती. यातूनच भूमिहीन मजूर, लहान शेतकरी यांना वित्तपुरवठा केला जाणार होता. या उद्देशासाठी ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. १९७५ मध्ये ५ प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्यात आल्या. १९९६ मध्ये १९६ ग्रामीण विकास बँका होत्या. त्यांनी ग्रामीण क्षेत्रातील दुर्बल गटाला दरवर्षी जवळजवळ १५०० कोटी रुपयांची कर्जे दिली आहेत.

प्रादेशिक ग्रामीण बँकेचे अधिकृत भांडवल १ कोटी रुपये होते आणि वसूल भांडवल २५ लाख रुपये होते. या बँकेच्या भांडवलात केंद्र सरकारचा वाटा ५० टक्के आहे. १५ टक्के राज्य सरकारचा आणि ३५ टक्के व्यापारी बँकांचा वाटा आहे. या बँकेची वैशिष्ट्ये इतर बँकांपेक्षा वेगळी आहेत.

१) प्रादेशिक ग्रामीण बँकेचे कार्यक्षेत्र राज्यातील एक किंवा काही जिल्हे एवढेच मर्यादित असते.

२) या बँका ग्रामीण भागातील फक्त सीमांत व लहान शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर यांनाच उत्पादक कार्यासाठी वित्तपुरवठा करते.

प्रादेशिक ग्रामीण विकास बँकांनी २००६-०७ मध्ये १५९२४.५६ कोटी रुपयांचा वित्तपुरवठा केला. एकूण वित्तपुरवठ्यापैकी समाजातील दुर्बल घटकांना ९५ टक्के वित्तपुरवठा केला आहे. १९८२ पर्यंत या बँकांना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून पुनर्वित पुरवठा केला जात होता. १९८२ नंतर नाबार्डमार्फत पुनर्वित पुरवठा केला जातो.

प्रादेशिक ग्रामीण विकास बँकांच्या कार्याचा विचार केला असता रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार ग्रामीण दुर्बल समाजाला मदत करण्यास ही बँक यशस्वी ठरली. पण दिलेली कर्जे वसूल करण्यास अयशस्वी ठरल्या. भारतीय वित्त प्रणालीत सुधारणा करण्यासाठी नरसिंहम समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने प्रादेशिक ग्रामीण बँकांचे मूल्यमापन करताना उल्लेख केला की, या बँका स्थापन करण्याचा उद्देश व्यापारी बँकांना पर्याय निर्माण करणे आणि व्यापारी बँकांच्या व्याजदरापेक्षा कमी व्याजदराने कर्जपुरवठा करणे हा होता, पण याबाबत या बँका यशस्वी झाल्या नाहीत.

## ६) नाबार्ड : (National Bank for Agricultural & Rural Development)

भारतीय सिझर्व्ह बँकेची स्थापना १९३५ मध्ये झाली. तेव्हापासून भारतीय शेती व्यवसायाला अप्रत्यक्ष कर्जपुरवठा करण्याचे काम या बँकेकडे होते. शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी बँकेने पुढाकार घेऊन स्वतंत्र शेती कर्जपुरवठा विभाग स्थापन केला, तसेच शेती पुनर्वित्त विकास महामंडळाची स्थापना केली होती, पण व्यापक प्रमाणावर शेती विकासासाठी व ग्रामीण विकासासाठी कर्जपुरवठा करण्यात अनेक अडचणी येत होत्या. यासाठी रिझर्व्ह बँकेने एक समिती नेमली. त्या समितीची मुख्य शिफारस म्हणजे शेती व ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर बँक स्थापन करावी. त्यानुसार शेती विकासाबरोबर ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर शिखर बँक स्थापन करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. १२ जुलै १९८२ रोजी 'नाबार्ड'ची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय ग्रामीण आणि कृषी विकास बँकेची स्थापना झाल्याने रिझर्व्ह बँकेचे शेती कर्जपुरवठ्याचे कार्य व कृषी पुनर्वित्त विकास महामंडळाचे कार्य या बँकेकडे सोपविण्यात आले.

**नाबार्डची वित्तीय साधने :**

नाबार्डचे अधिकृत भांडवल ५०० कोटी रुपये असून वसूल भांडवल १०० कोटी रुपये आहे. आपल्या वित्तीय गरजा पूर्ण करण्यासाठी नाबार्ड रिझर्व्ह बँक, जागतिक बँक आणि इतर वित्तीय संस्थांकडून कर्जरूपाने मदत प्राप्त करते. नाबार्ड खुल्या बाजारात निधी उभारू शकते. याशिवाय कृषी दीर्घकालीन निधी व स्थिरीकरण निधीतून काही रक्कम नाबार्डकडे वर्ग केली जाते. अल्पकालीन भांडवलासाठी आणि खेळत्या भांडवलासाठी ही बँक रिझर्व्ह बँकेवर अवलंबून असते. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय विकास मंडळ या संस्थांनी पुरस्कृत केलेल्या प्रकल्पांना त्यांच्याकडून अर्थसाहाय्य होते.

**नाबार्ड कार्ये :**

**१) पुनर्वित्त पुरवठा :**

नाबार्ड पुनर्वित्त संस्था म्हणून उत्पादन व गुंतवणुकीसाठी देशातील कृषीक्षेत्र, लघुउद्योग, कुटीर व ग्रामीण उद्योग, हस्तकला व्यवसाय, कारागिरी इ. क्षेत्रांना पुनर्वित्तपुरवठा करते. याद्वारे एकात्मिक ग्रामीण विकासाला उत्तेजन मिळावे हा हेतू असतो.

**२) कर्जपुरवठा :**

रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या राज्य सहकारी बँका, ग्रामीण विकास बँका, भू-विकास बँका आणि इतर संस्थांना नाबार्ड अल्पमुदतीचा, मध्यम मुदतीचा व दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करते.

**३) राज्य सरकारला दीर्घ मुदतीची कर्जे :**

राज्यातील सहकारी पतपुरवठा संस्थांचे भागभांडवल खरेदी करण्यासाठी नाबार्ड राज्य सरकारांना २० वर्षे मुदतीची कर्जे देते.

**४) कृषी व ग्रामीण संस्थांना साहाय्य :**

शेती क्षेत्राशी व ग्रामीण भागाच्या विकासाशी संबंधित पण केंद्र सरकारची परवानगी असलेल्या कोणत्याही संस्थेला नाबार्ड दीर्घ मुदतीचे कर्ज देते. अशा संस्थांचे भागभांडवल

अगर भाग रोखे विकत घेऊन त्यांच्या भांडवल उभारणीस नाबार्ड साहाय्य करते.

### ५) सहकारी संस्थांच्या कृषी व ग्रामीण विकास कार्यात समन्वय साधणे :

देशातील शेतीक्षेत्र, लघुउद्योग, कुटीरोद्योग, ग्रामीण हस्तोद्योग, लघुत्तम उद्योग आणि अन्य विकेंद्रित उद्योगांच्या विकासाच्या दृष्टीने केंद्र सरकार, राज्य सरकार, नियोजन मंडळ, आणि अखिल भारतीय व राज्य पातळीवर इतर संस्था यांच्या कार्यात समन्वय साधून सुसूत्रीकरण करण्याचे काम नाबार्ड करते.

### ६) तपासणीचे कार्य :

प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा सहकारी बँका, राज्य सहकारी बँका यांच्या कार्याची तपासणी करण्याचे अधिकार नाबार्डला आहेत. या संस्थांच्या कार्याविषयी सूचना करणे व मार्गदर्शन करण्याचे कार्य नाबार्डला करावे लागते.

### ७) संशोधनास सहकार्य :

शेतीक्षेत्रात अधिक संशोधन व्हावे, ग्रामीण विकासाचे प्रकल्प तयार करावे व त्यामधून ग्रामीण विकासाला प्रोत्साहन मिळावे यासाठी आर्थिक मदत करण्यासाठी नाबार्डने संशोधन व विकास निधीची स्थापना केली आहे.

### ८) ग्रामीण सुविधांना मदत :

ग्रामीण विभागातील पतपुरवठ्याच्या दृष्टीने शिखर संस्था म्हणून नाबार्ड कार्य करते. शेतीचे यांत्रिकीकरण, लघुपाटबंधारे प्रकल्प, वृक्षसंवर्धन व फलोद्यान प्रकल्प इत्यादींसाठी नाबार्ड कर्जपुरवठा करते.

## नाबार्डच्या कार्याची प्रगती

### १) नाबार्डकडून पुनर्वित्त पुरवठा :

नाबार्डकडून ग्रामीण सहकारी पतसंस्था, सहकारी बँका, राज्य सहकारी बँका, व्यापारी बँका आणि ग्रामीण विकास बँकांमार्फत शेतकरी, लघुउद्योजक, कारागीर, व्यावसायिक इत्यादींना अप्रत्यक्षरीत्या कर्जपुरवठा केला जातो. शेतकऱ्यांना शेती व्यवसायाबरोबरच दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, वराह, ससे पालन, शेळ्या-मेंढ्या पालन, मासेमारी इत्यादी जोड व्यवसायासाठी अप्रत्यक्ष कर्ज दिले जाते. नाबार्डने यासाठी २००१-०२ मध्ये १२००० कोटी रुपयांचा पुनर्वित्त पुरवठा केला होता.

### २) ग्रामीण पायाभूत संरचना विकास निधी :

ग्रामीण भागात पायाभूत संरचना निर्माण करण्यासाठी १९९५-९६च्या अंदाजपत्रकात २००० कोटी रुपयांचा ग्रामीण पायाभूत संरचना विकास निधी उभारण्यात आला. यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी साहाय्य केले. या निधीचा उद्देश ग्रामीण भागात पायाभूत संरचना जसे लघू जलसिंचन प्रकल्प, रस्ते विकास, पाणी आडवा व जिरवा, मार्केट यार्ड व गोदामे, शीतगृहे, मासेमारी, वनविकास, आंतरदेशीय जलमार्ग इत्यादींचा विकास करणे हा आहे. २००७ पर्यंत या कार्यासाठी ६१५४० कोटी रुपये खर्चाला मंजुरी देण्यात आली. प्रत्यक्षात मात्र ३७५६० कोटी रुपयांची साहाय्यता करण्यात आली.

### ३) सूक्ष्म वित्तीय क्षेत्रात नवीन प्रयोग :

आजही भारतातील दारिद्र्याचे प्रमाण सुमारे २१ टक्के आहे. गरीब लोकांकडे तारण देण्यासाठी काहीही नसल्याने बँका त्यांना वित्तीय साहाय्य करण्यास असमर्थ असतात. अशा लोकांना विनातारण वित्तीय साहाय्य करण्यासाठी बांगलादेशाच्या धर्तीवर सूक्ष्म वित्तीय साहाय्य योजना भारतात सुरू करण्यात आली.

नाबार्ड स्वयं साहाय्यता गटाला मदत करून गरिबांना अप्रत्यक्ष वित्तपुरवठा करण्यास मदत करत आहे. ३१ मार्च २००७ पर्यंत नाबार्डने ४.१० कोटी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना २९.२ लाख स्वयं साहाय्यता गटाच्या माध्यमातून १८०४० कोटी रुपयांची मदत केली आहे.

### ४) किसान क्रेडिट कार्ड योजना :

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्याच्या हेतूने प्राधान्यक्रमाने कर्जपुरवठा करण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड योजना संपूर्ण भारतात सहकारी व व्यापारी बँकांच्या सहकार्याने १९९८-९९ मध्ये सुरू करण्यात आली. सहकारी, व्यापारी व ग्रामीण बँकांना किसान क्रेडिट कार्डमार्फत पुनर्वित्त पुरवठा करण्याचे काम नाबार्ड करते. नोव्हेंबर २००७ पर्यंत ७०५.५५ लाख शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डाचे वितरण करण्यात आले आहे. २००६-०७ मध्ये कार्डाच्या माध्यमातून ४६७२९ कोटी रुपयांच्या कर्जाला मंजुरी देण्यात आली.

### ५) सुवर्ण जयंती ग्राम स्वयं रोजगार योजनेमार्फत पुनर्वित्त पुरवठा :

दारिद्र्यनिर्मूलन आणि गरिबांच्या उत्थानासाठी केंद्र सरकारने १९९९ मध्ये सुवर्ण जयंती ग्राम स्वयं रोजगार योजना सुरू केली. देशातील सहकारी, व्यापारी व ग्रामीण बँकांमार्फत स्वयं रोजगारासाठी वित्तपुरवठा केला जातो. याचे दिशानिर्देशन करण्याचे कार्य नाबार्डमार्फत केले जाते.

अशा प्रकारे नाबार्ड ग्रामीण आणि कृषी विकासात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे.

## ६.२.२ कृषी विपणन :

कृषीमाल विपणन व्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे शेतकऱ्याने उत्पादित केलेला माल एकत्रित करून त्याची साठवणूक व वाहतूक करण्याची योग्य व्यवस्था करून ग्राहकांपर्यंत शेतमाल पोहोचविणे हे असते. यात शेतातील पिकाची कापणी केल्यानंतर शेतमालाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी अपेक्षित बाजारापर्यंत माल पोहोचविण्याच्या सोयी करणे, मालाची प्रतवारी व साठवणुकीच्या सोयी करणे, शेतमाल पुरवठा, किंमत, दर्जा आदींबाबत सर्व माहिती शेतकरी व ग्राहकांना अद्ययावतरीत्या कळविणे, शेतमालावर प्रक्रिया करणे, शेतमालाची जाहिरात करून विक्री वाढविणे, पतपुरवठा करणे इत्यादी सोयींचा समावेश होतो.

विपणनाच्या प्रक्रियेमध्ये व्यापारी, आडत्ये, दलाल इत्यादींना विशेष महत्त्व असते. हा मध्यस्त वर्ग शेतकऱ्याचे व ग्राहकांचे एक प्रकारे शोषण करीत असतो. तेव्हा अशा वर्गाचे उच्चाटन करणे आवश्यक असते. तरच शेतकऱ्यांना आर्थिक व सामाजिक न्याय मिळू शकेल.

## १ कृषी विपणन व्यवस्थेतील दोष

### १) शेतमाल साठवणूक सुविधांचा अभाव :

शेतमालाचे उत्पादन आणि विक्री यामध्ये काही काळ जातो. दरम्यानच्या काळात शेतमाल गोदामामध्ये साठवून ठेवावा लागतो. कित्येक ठिकाणी गोदामाची व्यवस्था नाही. जेथे गोदाम आहेत ते शास्त्रीय पद्धतीने बांधलेले नाहीत. त्यामुळे शेतमालाची बरीच नासाडी होते. खेड्यापाड्यात शेतकरी आपला माल परंपरागत पद्धतीने कसातरी साठवून ठेवतात. उंदीर, घुशी, कीड, ओल इत्यादींमुळे शेतमालाची नासाडी होते. दरवर्षी सुमारे १० ते १५ टक्के मालाची नासाडी होत असते.

### २) कर्जपुरवठ्याची अपुरी सोय :

शेतीमध्ये पिके निघाल्यानंतर त्या पिकाची विक्री होऊन हातात पैसा मिळेपर्यंतच्या काळात शेतकरी सतत पैशांच्या अडचणीत असतो. या काळात शेतकऱ्याला कर्ज मिळण्याच्या सोयी अजूनही अत्यंत अपुऱ्या आहेत. शेतकऱ्यांची, विशेषत: लहान शेतकऱ्यांची, बचतशक्ती नगण्य असल्यामुळे त्यांची या काळात तग धरून राहण्याची क्षमता नसते. या स्थितीत त्याला मिळेल त्या भावात शेतमाल विकणे त्याला भाग पडते. हंगामाच्या काळात बहुतांश शेतकरी माल विकायला प्रवृत्त झाल्यामुळे बाजारात मालाचा पुरवठा वाढवून भाव घसरू लागतात. माल खरेदी करणारे दलाल व सावकार शेतकऱ्यांच्या अगतिकतेचा फायदा घेतात व कमी भाव देतात.

### ३) वाहतुकीची अपुरी साधने :

शेती उत्पादनाची बाजारात विक्री करण्यासाठी वाहतूक करावी लागते. ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातून मोठ्या गावात आणि तेथून शहरातील मोठ्या बाजारात मालाची ने-आण करावी लागते. परंतु दुर्दैवाने जलद व कार्यक्षम वाहतुकीच्या सोयींचा अभाव आहे. अद्यापही अनेक खेड्यांना जोडणारे रस्ते कच्चे आहेत. अनेक रस्त्यांवर पूल नसल्यामुळे पावसाळ्यात रहदारी बंद असते. जलमार्गाचाही पुरेसा विकास झालेला नाही. शेतकऱ्यांना आपला माल शेतावरून घरी आणि गावातून बाजारपेठेत नेणे अत्यंत गैरसोयीचे असते. यामुळे वाहतूक खर्च वाढत जातो. बराचसा माल रस्त्यातच खराब होतो. परिणामत: शेतकऱ्यांचे नुकसान येते.

### ४) मध्यस्थाची लांबलचक साखळी :

भारतात उत्पादक शेतकरी आणि उपभोक्ता या दोघांमध्ये मध्यस्थांची साखळी खूप मोठी आहे. व्यापारी, अडत्ये, दलाल, ठोक व किरकोळ व्यापारी या व्यतिरिक्त सावकार, मोठे शेतकरी इत्यादी विपणनात सहभागी होतात. मध्यस्थांकडून वजन मापात शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होते.

### ५) मालाच्या प्रमाणीकरणाचा आणि प्रतवारीचा अभाव :

शेतकऱ्यांमध्ये माहितीचा अभाव असतो. त्यामुळे मालाची प्रतवारी कशी करायची

याबाबत त्याला शास्त्रीय माहिती नसते. बऱ्याचदा शेतकरीच चांगल्या आणि खराब मालाची सर-मिसळ करतात. पण याचाच फायदा व्यापारी घेतात आणि शेतमालाला निकृष्ट दर्जा म्हणून भाव कमी देतात.

### ६) बाजारविषयक माहितीचा अभाव :

उत्पादित शेतमालाच्या बाजारातील किमती, मालाची आवक, मालाची मागणी इत्यादी माहिती पूर्वी शेतकऱ्यांना उपलब्ध होत नव्हती, पण आज दररोज विविध प्रसारमाध्यमांतून माहितीचे प्रसारण केले जाते, पण या माहितीचा फायदा शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांनाच जास्त होतो.

### ७) बाजारातील वाईट प्रथा व अवैध कपात :

देशातील वेगवेगळ्या कृषी बाजारात अनेक लबाड लोक कार्यरत असतात. याचबरोबर वजनमाप करणारे मापाडी, हमाल, मालाची प्रतवारी ठरविणारे ग्रेडर शेतकऱ्यांकडून वर मिळकतीची अपेक्षा करतात. शेतकऱ्याने देण्यास नकार दिल्यास तर वजनमापांमध्ये, ग्रेडमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक करतात. मालाच्या विक्रीनंतर आडत्ये, दलाल नियमानुसार कमिशन कापून घेतात, पण याबरोबरच कधी देणगीच्या नावाने तर कधी मदतीच्या नावाने अवैध कपात करतात.

### ८) असंघटित शेतकरीवर्ग :

बाजारातील मध्यस्थ थोडे असल्याने ते संघटित असतात. शेतमाल खरेदी करावयाचा की नाही, किंमत किती द्यावयाची, किती आणि कोणता माल कोणी खरेदी करायचा याबाबत त्यांच्यात ताबडतोब संगनमत होते. शेतकरी मात्र असंघटित असतो. त्याच्या समोर अनेक अडचणी असतात. त्यांच्यात अज्ञान असते. त्यांच्या असंघटितपणाचा फायदा व्यापारी घेतात. असंघटितपणामुळे त्यांची सौदाशक्ती कमी असते.

## २ शेतमाल विपणन व्यवस्थेतील सुधारणा शेतमाल विक्री व्यवस्था सुधारण्यासाठी उपाययोजना

शेतमालाच्या बाजारव्यवस्थेतील व्यापारी व मध्यस्थांचे वर्चस्व दूर करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना मालाला योग्य किंमत मिळवून देण्यासाठी नियंत्रित बाजारपेठांची आवश्यकता राज्य सरकारच्या विशिष्ट कायद्याने स्थापन होणाऱ्या व त्यानुसार कार्य करणाऱ्या बाजारपेठेला नियंत्रित बाजार म्हणतात. नियंत्रित बाजार व्यवस्थेत शेतकरी, दलाल, स्थानिक स्वराज्य संस्था व सरकार यांच्या प्रतिनिधींची एक समिती असते. ही समिती शेतमालाच्या व्यवहाराबाबतचे नियम तयार करून ते काटेकोरपणे अमलात आणते. बाजारातील गैरप्रकारांना आळा घालणे, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य व वाजवी किंमत मिळवून देणे इत्यादी दृष्टीने नियंत्रित बाजारपेठा अधिक उपयुक्त ठरत आहेत. अशा नियंत्रित बाजार संस्था १९५१ मध्ये २६५ होत्या. ३१ मार्च २००५ पर्यंत या संस्था ७५२१ पर्यंत वाढल्या.

### २) साठवणुकीच्या सोयीत व सुधारणात वाढ :

शास्त्रोक्त पद्धतीने शेतमालाची साठवणूक शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना करता यावी या दृष्टीने अनेक समित्यांनी पाहणी करून गाव, राज्य व राष्ट्रीय पातळीवर गोदामे व

साठवणूकगृहे यांची स्थापना करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार राष्ट्रीय पातळीवर मध्यवर्ती वखार महामंडळ, राज्य पातळीवर राज्य वखार महामंडळे स्थापन करण्यात आली. १९६०–६१ मध्ये केंद्रीय वखार महामंडळ, भारतीय खाद्य निगम आणि राज्य वखार महामंडळ या तिघांची साठवणूक समता फक्त १ लाख टन होती आणि त्यांची संख्या ४० होती. १९९३–९४ मध्ये या तिघांची साठवणूक क्षमता ३२२ लाख टन पर्यंत वाढली. साठवणूक गृहांबरोबरच शीतगृहांचीही उभारणी करण्यात आली. यात नाशवंत माल जसे कांदा, बटाटे, फळे, भाजीपाला, मांस, मासे, दुग्ध पदार्थ इत्यादींची साठवणूक करता येते. साठवणूक सोयी, सुविधांत वाढ झाल्याने शेतमालाची नासाडी काही प्रमाणात कमी होत आहे.

### ३) प्रमाणित वजनमापांचा वापर :

पूर्वी निरनिराळ्या प्रदेशात निरनिराळ्या प्रकारची व आकारमानाची वजने–मापे अस्तित्वात होती. त्यात शेतकऱ्यांचे नुकसान होत असे. मात्र भारत सरकारने १९५८ मध्ये कायदा करून संपूर्ण देशभरासाठी एकच प्रकारची मेट्रिक पद्धतीनुसार तयार केलेली वजनमापे वापरण्याची सक्ती केलेली आहे. दिल्ली येथील राष्ट्रीय भौतिकी प्रयोगशाळेतून व मुंबई येथील भारत सरकारच्या टाकसाळीतून ही प्रमाणित वजनमापे तयार केली जातात व देशात त्यांचा पुरवठा केला जातो.

### ४) प्रमाणीकरण व प्रतवारीच्या सोयीची उपलब्धता :

शेतकऱ्याने आपल्या मालाचा दर्जा काय आहे हे लक्षात घेऊन त्याची प्रतवारी केल्यास त्याला प्रतवारीनुसार योग्य किंमत मिळू शकते. त्यासाठीच सरकारने १९३७ साली ॲग्रिकल्चर प्रोड्यूस ॲक्ट हा कायदा केला. या कायद्यानुसार शेतकी खाते शेतमालाची प्रत ठरविण्यासाठीची व्यवस्था करते. सरकारने प्रतवारी केंद्रे स्थापन केलेली आहेत. नागपूर येथे केंद्रीय ॲगमार्क प्रयोगशाळा स्थापन केलेली आहे. तेथे मालाचा दर्जा तपासून मिळतो. तसेच उत्तम दर्जाच्या शेतमालाला ॲगमार्क हे चिन्ह दिले जाते. देशांतर्गत उपभोगाच्या १४८ वस्तूंचे प्रमाणीकरण ॲगमार्ककडून केले जाते. डाळी, तांदूळ, गहू, मध, लोणी, तूप, अंडी, खाद्यतेले आदी वस्तूंचा त्यात समावेश आहे. सबंध देशात २०२ प्रयोगशाळांची स्थापना केली गेली आहे.

### ५) बाजारविषयक माहितीचे प्रसारण :

शेतकरी आणि बाजारपेठेत काम करणाऱ्या सर्व व्यक्तींना बाजारातील परिस्थिती, शेतमालाच्या किमतीत देशातील व विदेशातील मागणी इत्यादी विश्वसनीय माहिती शीघ्र आणि नियमितपणे उपलब्ध होणे आवश्यक असते. या दृष्टीने सरकारद्वारे योग्य पावले उचलण्यात आली आहेत. बाजारसंबंधी माहिती रेडिओ, वर्तमानपत्रे आणि दूरदर्शनद्वारे प्रसारित केली जाते. आज देशातील १००० बाजारपेठांमधून विपणी अहवाल प्रसारित करण्याची सोय झाली आहे. या माहितीमुळे शेतकरी शेतमालाच्या खरेदी–विक्रीसंबंधी योग्य निर्णय घेऊ शकतात.

### ६) बाजार संशोधनाला उत्तेजन :

बाजारपेठाविषयक, संशोधनविषयक माहितीसाठी डायरेक्टरेट ऑफ मार्केटिंग अँड

इन्स्पेक्शनची स्थापना केली. या संस्थेमार्फत बाजार संशोधन व नियोजनाचा कार्यक्रम हाती घेण्यात येतो. त्यात शेतीमाल फळबागांतील उत्पादने, पशू उत्पादने इत्यादींच्या विक्रीव्यवस्थेचा अभ्यास केला जातो. तसेच मार्केटिंग, प्लॅनिंग अँड डिझाइन सेंटर या संस्थेद्वारे निवडक फळ व भाजीपालाविषयक पॅकिंग, प्रतवारी व वाहतूक यांचा अभ्यास केला जातो व त्यासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शनही केले जाते.

### ७) पतपुरवठा सुविधांमध्ये वाढ

शेतकऱ्याची प्रतीक्षा क्षमता वाढावी यासाठी शेतमाल तयार झाल्यापासून ते चांगली किंमत येईपर्यंत विक्री थांबवण्यासाठी मधल्या काळात त्याला असलेली पैशाची गरज भागविण्यासाठी तसेच ते पैसे पुरेसे वेळेवर व स्वस्तदराने त्याला उपलब्ध व्हावे यासाठी देशातील शेतकऱ्यांना शासनाकडून विविध बँका, तसेच सहकारी संस्थांमार्फत सुलभ व स्वस्त दराने पतपुरवठा केला जात आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सावकारी कर्जाच्या पाशातून शेतकऱ्यांची सुटका होत असून कृषी उत्पादनात वाढ होत आहे.

### ३ नियंत्रित बाजार (Regulated Market)

भारतात नियंत्रित बाजार स्थापन करण्याची कल्पना स्वातंत्र्यपूर्व काळात १८९७ मध्ये मांडण्यात आली होती. त्यानुसार 'बेरार डॉटन अँड ग्रेन्स ॲक्ट' करण्यात आला. पण त्यानंतर बाजाराच्या स्थापनेसाठी फारसे प्रयत्न करण्यात आले नाहीत. पण स्वातंत्र्योत्तर काळात बहुतेक सर्व राज्यांनी नियंत्रित बाजार स्थापण्यासाठी प्रयत्न केलेत.

**नियंत्रित बाजाराचे उद्देश :**

१) शेतकऱ्याच्या मालास योग्य किंमत मिळवून देणे.

२) बाजारातील मध्यस्थांची संख्या कमी करणे व त्यांच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे.

३) शेतमाल खरेदी विक्रीत केल्या जाणाऱ्या गैर प्रकारांना आळा घालणे.

४) बाजारात शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबविणे.

**नियंत्रित बाजाराची रचना व कार्य :**

कायद्यानुसार बाजारातील व्यवहार चालविण्यासाठी राज्यसरकारकडून बाजार समिती स्थापन केली जाते. या बाजार समितीत राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, व्यापारी, दलाल, आडत्ये आणि शेतकऱ्यांचे प्रतिनिधी असतात. या बाजारात सर्व गटांना प्रतिनिधित्व असल्याने ती सर्वसमावेशक समिती असते. सर्व प्रतिनिधींची नियुक्ती सरकारमार्फत विशिष्ट काळासाठी केली जाते. बाजार समिती पुढील कार्ये पार पाडीत असते.

१) बाजारातील विविध दरांची निश्चिती करणे.

२) दलालांना परवाना देणे आणि त्यांना अधिकृत म्हणून मान्यता देणे.

२) प्रमाणित वजन मापे वापरात आणणे, तसेच मालाची प्रतवारी करणे.

४) शेतमालाच्या विक्रीत खुल्या लिलाव पद्धतीचा वापर करणे.

५) उपस्थित झालेल्या विवादामध्ये तटस्थपणे निर्णय देणे.

६) गैरव्यवहारांचा अवलंब करणाऱ्यांवर कडक कारवाई करणे.

७) बाजारात साठवणूक गृहे, गुरांसाठी शेड, उपाहार गृहे, विश्रांती गृहे इ. सोई करणे.

८) बाजार विषयक माहितीचे प्रसारण करणे.

९) बजारातील अवैध प्रकारांना आळा घालणे.

वरील कामे करण्यासाठी पूर्णवेळ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असते.

१९५४ मध्ये २०० नियंत्रित बाजारपेठा होत्या. मार्च १९९८मध्ये ही संख्या ७०६० इतकी झाली तर ३१ मार्च २००५ पर्यंत ही संख्या ७५२१पर्यंत वाढली.

नियंत्रित बाजारात कापूस, तंबाखू, ताग, भुईमूग इ. व्यापारी पिकांच्या प्रतवारीस, इतर व्यवहारास आर्थिक साहाय्य दिले जाते. सर्व प्रकारच्या शेतमाल व्यवहारांसाठी अशा बाजारपेठा प्रस्थापित केल्या जात आहेत. फळे, भाजीपाला, मासे, जनावरे यांच्या व्यवहारासाठी स्वतंत्र बाजारपेठा स्थापन केल्या जात आहेत. एकूण बाजार योग्य शेतमालापैकी ८० टक्के शेतमाल नियंत्रित बाजारपेठांमधून विकला जात आहे.

### ४ कृषी किंमत विषयक धोरण : (Agricultural Price Policy)

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात बाजारातील अनिश्चितता टाळण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य निर्माण करण्यासाठी कृषी किंमत धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करण्यात आली आहे.

कृषी उत्पादनाच्या किमतीत मोठे चढ-उतार निर्माण झाल्यास त्याचे अर्थव्यवस्थेवर दुहेरी परिणाम होतात. पहिला परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो. किमतीत वाढ झाली तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते आणि किमतीत घट झाली तर उत्पन्नात घट होते. यामुळे कृषी उत्पादन व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनिश्चितता आणि अस्थैर्य निर्माण होते. दुसरा परिणाम बाजारातील उपभोक्त्यांवर होतो. कृषी उत्पादनाच्या किमती वाढल्या तर त्याचा थेट परिणाम उपभोक्त्यांवर होतो. उपभोक्त्याला इतर वस्तूंचा उपभोग कमी करावा लागतो.

### १) कृषी किंमत धोरणाचे उद्देश : (Objective of Agricultural Price Policy)

१) कृषी उत्पादनाला किमान आधार किंमत आणि कृषीमाल खरेदी किंमत देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य निर्माण करून त्यांना कृषी उत्पादन वाढ करण्यास प्रेरित करणे.

२) कृषी उत्पादनाच्या किंमतीतील चढ-उतारांचा उपभोक्त्यावर परिणाम होऊ नये म्हणून रास्त दराने कृषी मालाचा पुरवठा करण्यासाठी सार्वजनिक वितरण प्रणालीचा अवलंब करून उपभोक्त्यांच्या हिताचे रक्षण करणे.

३) कृषी उत्पादनाच्या किमतीत स्थैर्य निर्माण करणे.

वरील उद्देश साध्य करण्यासाठी सरकारने कृषी किंमत धोरणामार्फत पुढील प्रयत्न केले आहेत.

### १) कृषी उत्पादनाची किमान आधार किंमत निश्चित करणे :

(Minimum Support Price)

नैसर्गिक परिस्थितीच्या अनुकुलतेमुळे कृषी उत्पादनात वाढ झाली तर खुल्या बाजारात कृषी उत्पादनाच्या किमती घसरतात. याचा विपरीत परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो. रास्त किंमत न मिळाल्याने शेतकरी अडचणीत येतो. त्याला उत्पादन वाढीची प्रेरणा राहत नाही. असे होऊ नये म्हणून भारत सरकारने १९६५ मध्ये स्थापन केलेल्या कृषीमूल्य आयोगाकडून व १९८५मध्ये कृषी उत्पादन खर्च आणि मूल्य आयोग असे नामकरण झालेल्या आयोगाकडून २४ प्रमुख कृषी उत्पादनाच्या किमान आधार किमती जाहीर केल्या जातात.

अती उत्पादनामुळे खुल्या बाजारात कृषी उत्पादनाच्या किमती आयोगाने निश्चित केलेल्या किमान आधार किमतीपेक्षा खाली आल्या तर सरकार किमान आधार किंमत दराने स्वत: खरेदी करते. किमान आधार किमतीद्वारे सरकार शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य निर्माण करते आणि त्यांना उत्पादन वाढीस प्रेरित करते. खुल्या बाजारात आधार किमतीपेक्षा जास्त किंमत मिळत असेल तर शेतकरी आपला माल खाजगी व्यापाऱ्याला विकून आपला फायदा करून घेऊ शकतो. अशाप्रकारे किमान आधार किंमत धोरणाद्वारे सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करते.

### २) बफर स्टॉक धोरण :

शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य निर्माण करण्यासाठी आणि उपभोक्त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सरकार गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका इत्यादी अन्नधान्यांची किमान आधार किंमत व खरेदी किंमत दराने खरेदी करून ते धान्य भारतीय खाद्य महामंडळ, राज्य वखार महामंडळाच्या गोदामांमध्ये जमा करते. यालाच बफर स्टॉक म्हणतात. खुल्या बाजारातील किमतीत जेव्हा वाढ होते तेव्हा सरकार किंमत स्थैर्य निर्माण करण्यासाठी कमाल दर ठरवून त्या दराने धान्याचा पुरवठा करते. एखाद्या वेळेस सरकारकडील धान्याचा साठा वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अपुरा पडत असेल तर सरकार धान्याची आयात करून मागणी पुरवठ्यात संतुलन निर्माण करून किंमत स्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करते. याउलट एखाद्या वेळेस धान्याची अतिरिक्त खरेदी आणि साठा होत असेल तर त्याची निर्यात करून किंमत स्थैर्य निर्माण केले जाते.

भारतात जून २००२ या कालावधीत गहू आणि तांदूळ या धान्याचा ६४.७ दशलक्ष टन एवढा विक्रमी साठा होता. २००४ मध्ये २० दशलक्ष टनापर्यंत खाली आला व २००८ मध्ये तो १९.२ दशलक्ष टन इतका होता.

### ३) सार्वजनिक वितरण प्रणाली :

खरीप हंगामात पिकवलेल्या खाद्यान्नाची विक्री ऑक्टोबर-डिसेंबर या काळात आणि रब्बी हंगामात पिकलेल्या खाद्यान्नाची विक्री मार्च-जून कालावधीत मोठ्या प्रमाणावर

केली जाते. या कालावधीत  बाजारातील पुरवठ्यात वाढ होते. त्यामुळे किमती कमी होतात व इतर काळात किमती वाढतात. याचा  फायदा शेतकऱ्यांना होत नाही किंवा उपभोक्त्यांना होत नाही. वाढत्या किमतीला गरीब व सामान्य लोकांना खाद्यान्नाची खरेदी परवडत नाही. त्यांना धान्याची खरेदी करता यावी म्हणून सरकारने निर्माण केलेल्या सार्वजनिक वितरण प्रणालीच्या स्वस्त धान्य दुकानांच्या साखळीद्वारे सरकारने ठरवून दिलेल्या रास्त दराने शिधा वाटप केले जाते. सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे खाद्यान्नाचे जे वितरण केले जाते त्यामुळे बाजारात किंमत स्थैर्य निर्माण होण्यास मदत होते.

### **६.२.८ भारतातील अन्न सुरक्षितता** (Food Security in India)

स्वांतत्र्य प्राप्तीनंतर बऱ्याच कालावधीपर्यंत देशातील जवळजवळ ५० लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत होती. आज हे प्रमाण २१ पर्यंत खाली आले आहे. दारिद्र्यामुळे लोकांना आपल्या जीवनमानाची किमान निर्वाह पातळीही गाठता येत नाही. त्यामुळे बालमृत्यू, भूकबळीचे वाढते प्रमाण, बाळ जन्माच्या वेळेस कमी वजन, रक्ताची कमतरता, आयोडिन व लोह कमतरता या समस्यांची तीव्रता लक्षात घेऊन सरकारने देशात अन्न सुरक्षितता निर्माण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले आहेत.

### **अन्न सुरक्षितता म्हणजे काय?**

''देशातील सर्व लोकांना सक्रिय आणि आरोग्यसंपन्न जीवन जगण्यासाठी सदासर्वदा पर्याप्त प्रमाणात अन्नाची उपलब्धता करून देणे म्हणजे अन्न सुरक्षितता होय.''

''अन्न आणि कृषी संघटनेच्यानुसार 'सर्व लोकांना सदासर्वदा आवश्यक अन्नासाठी भौतिक आणि आर्थिक उपलब्ध करून देणे म्हणजे अन्न सुरक्षितता होय.''

अन्न सुरक्षितता निर्माण करण्यासाठी सरकारने पुढील प्रयत्न व उपाय केले आहेत.

१) अन्नधान्य स्वयंपूर्णता आणि स्वावलंबित्व निर्माण करणे.

२) सार्वजनिक वितरण प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करणे.

३) बफर स्टॉक योजना राबविली जात आहे.

४) एकात्मिक बालविकास योजनेची अंमलबजावणी केली.

५) दुपारच्या भोजन योजनेची अंमलबजावणी.

६) राष्ट्रीय अन्न सुरक्षितता मिशन हाती घेतले.

अशाप्रकारे सरकारने अन्न सुरक्षितता निर्माण करण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केले आहेत. सरकारच्या या प्रयत्नांना बऱ्यापैकी यशही आले आहे. तरी आजही भारतात कुपोषण, भूकबळी, आयोडिन व रक्ताची कमतरता असणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे.

अन्नसुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून केंद्र सरकारने 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३' नुकताच संसदेत मंजूर केला.

### **राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३**

केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३ नुकताच संसदेत मंजूर केला असून

५ जुलै २०१३ पासून तो अंमलात आला आहे. या कायद्यामुळे देशातील ६७ म्हणजेच ८० कोटी जनतेला माफक दरात अन्नधान्य पुरविण्याची हमी देण्यात आली आहे. या धोरणात एका कुटुंबात ३५ किलो धान्य-त्यात तांदूळ प्रतिकिलो तीन रुपये, गहू प्रतिकिलो दोन रुपये आणि भरड धान्य प्रतिकिलो एक रुपये प्रमाणे दिले जाणार आहे. त्यासोबत १४ वर्षे वयोगटातील बालकांना सकस आहार देण्याची तरतूद आहे.

## ६.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**प्र.१ एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कृषी वित्तपुरवठ्याचे प्रकार सांगा.

२) कृषी वित्तपुरवठ्याचे स्रोत सांगा.

३) नाबार्डची स्थापना केव्हा झाली ते सांगा.

४) नाबार्डची प्रमुख दोन कार्ये सांगा.

५) कृषी-विपणन म्हणजे काय?

६) अन्नसुरक्षा म्हणजे काय?

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) कृषी वित्तपुरवठ्याची आवश्यकता सांगा.

२) संख्यात्मक कृषी वित्तपुरवठ्याचे प्रकार सांगा.

३) नाबार्डची कार्ये सांगा.

४) भारताचे अन्नसुरक्षा धोरण.

५) नियंत्रित बाजार.

**प्र.३ दीर्घोत्तरी प्रश्न**

१) कृषी वित्तपुरवठ्याचे महत्त्व व प्रकार सांगा.

२) कृषी वित्तपुरवठ्याच्या संस्थात्मक स्रोतांची चर्चा करा.

३) कृषी विपणन व्यवस्थेतील दोष सांगा.

४) कृषीमाल विपणन व्यवस्थेतील सुधारणा किंवा उपाय सांगा.

५) भारतातील कृषी किंमत धोरणाची चर्चा करा.

## ६.४ सारांश :

भारत हा कृषीप्रधान देश आहे. ग्रामीण भागातील बहुतांश लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. शेती व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करायची असेल तर त्यासाठी कृषी वित्तपुरवठा आणि कृषीमाल विपणन व्यवस्थेला अनन्यासाधारण महत्त्व आहे. कृषी उत्पादकता वाढण्यासाठी आधुनिक पद्धतीने शेती करणे

# घटक – ७

# उद्योग (INDUSTRIES)


७.० घटकाची उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ विषय विवेचन

औद्योगिकीकरण

- ७.२.१ औद्योगिकीकरणाचा कार्यभाग
- ७.२.२ १९९१ चे औद्योगिक धोरण
- ७.२.३ १९९१च्या औद्योगिक धोरणाचे मूल्यमापन
- ७.२.४ लघुउद्योगांचे महत्त्वभूमिका
- ७.२.५ लघुउद्योगांच्या समस्या
- ७.२.६ लघुउद्योगांबाबत सरकारी धोरण
- ७.२.७ भारतातील सार्वजनिक क्षेत्र
- ७.२.८ भारतीय अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्राची भूमिका
- ७.२.९ भारताच्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या समस्या
- ७.२.१० निर्गुंतवणूक धोरण
- ७.२.११ निर्गुंतवणूक धोरणाचे फलित

७.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

७.४ सारांश

७.५ पारिभाषिक शब्द–शब्दार्थ

७.६ संदर्भ सूची

७.७ सरावासाठी प्रश्न


## ७.० घटकाची उद्दिष्टे :

- औद्योगिकीकरणाचा अर्थ व स्वरूप समजून घेता येईल.
- औद्योगिकीकरणाची भूमिका स्पष्ट करता येईल.
- औद्योगिक धोरणांची उद्दिष्टे स्पष्ट करता येतील.
- लघु उद्योगांचे स्वरूप व समस्या स्पष्ट करता येतील.

- सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्पांचे महत्त्व व समस्या जाणून घेणे.
- भारताचे निर्गुंतवणूक धोरण समजावून घेता येईल.

## ७.१ प्रस्तावना :

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात अत्यंत कुशल कारागीर अस्तित्वात होते. वेगवेगळ्या प्रांतामध्ये वेगवेगळ्या वस्तूंचे हस्तकलेच्या साहाय्याने उत्पादन केले जात होते. त्या काळात भारतात अत्यंत तलम कापड उत्पादित केले जात होते. त्याची जगात विविध देशांत मागणी होती. भारतीय वस्तूंच्या आकर्षणामुळेच पाश्चिमात्य देशातील लोक व्यापार उदिम निमित्ताने भारतात आले. ब्रिटिशांनी भारतात आपल्या वसाहती स्थापन केल्या व संपूर्ण भारतावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले. ब्रिटिशांच्या काळात भारतातील हस्तोद्योग आणि कुटिरोद्योगांचा ऱ्हास झाला. ब्रिटिशांनी भारतात औद्योगिकीकरण व्हावे यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. त्यांनी भारताकडे एक कच्च्या मालाची हक्काची बाजारपेठ आणि पक्क्या मालाची विक्रीची हमी बाजारपेठ या दृष्टीनेच पाहिले.

असे असले तरी भारतात आधुनिक उद्योगांची स्थापना १८५०च्या जवळपास झाली. १९१८च्या औद्योगिक आयोगाच्या अहवालानुसार देशातील काही उद्योगांना संरक्षण देण्यात आले. त्यामुळे सुती कापड, ताग, साखर, लोह-पोलाद, रंग, कागद इत्यादी उद्योगांचा काही प्रमाणात विकास झाला. पुढे १९२९-३०मध्ये जागतिक महामंदी आली आणि त्याचा फटका भारतीय उद्योगांनाही बसला. दुसऱ्या महायुद्धानंतर भारताचा औद्योगिकीकरणाचा वेग काहीसा वाढला.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेस औद्योगिकदृष्ट्या एक मागास अर्थव्यवस्था अशीच स्थिती भारतीय अर्थव्यवस्थेची होती. भांडवली वस्तू व काही उपभोग्य वस्तूंच्याबाबत पूर्णत: दुसऱ्यावर अवलंबून असलेली कृषी अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख होती. पण आज भारताने बऱ्यापैकी बऱ्यापैकी औद्योगिक विकास साध्य केलेला आहे. भारतीय अर्थव्यवस्था औद्योगिकदृष्ट्या प्रगत नसली तरी औद्योगिक विकासात सातत्य आहे.

## ७.२ विषय विवेचन :

### औद्योगिकीकरण (Industrialisation)

औद्योगिकीकरण म्हटल्यानंतर आपल्या डोळ्यासमोर लहान-मोठे कारखाने उभे राहतात. कारखान्यांमध्ये यंत्रसामग्री, अवजारे आणि मानवी श्रमांचा वस्तूंच्या उत्पादनासाठी वापर केला जातो. कारखान्यांमध्ये या साधनसामग्रीच्या साहाय्याने कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्यांचे उपभोग्य किंवा भांडवली वस्तूंमध्ये रूपांतरण केले जाते. यालाच मर्यादित अर्थाने औद्योगिकीकरण म्हटले जाते.

**पॅ कँग चँग** यांच्या मते - ''ज्या प्रक्रियेद्वारे उत्पादनफलामध्ये बदल घडवून आणले जातात अशी प्रक्रिया म्हणजे औद्योगिकीकरण होय.''

औद्योगिकीकरणात वस्तूच्या मूलभूत स्वरूपात बदल घडवून आणले जातात. वस्तूंना उपभोग्य योग्य केले जाते. म्हणजे वस्तूच्या उपयोगितेत वाढ केली जाते. हा बदल घडवून आणण्यासाठी यंत्रसामग्री, अवजारे, कारखान्याची इमारत, कामगार, ऊर्जा इत्यादींचा वापर केला जातो. उत्पादनात वाढ करण्यासाठी नव-नवीन तंत्रज्ञान, यंत्रसामग्री विकसित केली जाते. त्यामुळे शोध-संशोधन कार्य वाढते. वाढीव

उत्पादनाची विक्री करण्यासाठी बाजारपेठांच्या कक्षा विस्तारल्या जातात. वाहतूक दळणवळण सुविधांचा विकास होतो.

देशात जसजसा औद्योगिकीकरणाचा वेग वाढतो तसतसे उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाबरोबरच भांडवलीवस्तूंच्या उत्पादनात वाढ होते. औद्योगिक क्षेत्रात नवनवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतात. रोजगारात वाढ होते. लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. उपभोग्य वस्तूंची मागणी वाढते. ती मागणी पूर्ण करण्यासाठी भांडवली वस्तूंची मागणी वाढते. गुंतवणुकीत वाढ होते. उत्पन्न आणि उत्पादनात वाढ होऊन देशातील लोकांचे राहणीमान उंचावते आणि आर्थिक विकास घडून येतो. यालाच औद्योगिकीकरण असे म्हणतात.

## ७.२.१ औद्योगिकीकरणाचा कार्यभाग/भूमिका :
## (Role of Industrialisation)

औद्योगिकीकरणामुळेच आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान होते. या दृष्टीने देशाच्या अर्थव्यवस्थेत औद्योगिकीकरणाचा कार्यभाग व महत्त्व पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

### १) उत्पादनात वाढ :

आर्थिक विकासासाठी राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ होणे अवश्यक असते. कृषी क्षेत्राची उत्पादकता कमी असल्याने दरडोई व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्यासाठी औद्योगिकीकरणाचा कार्यभाग महत्त्वाचा असतो. औद्योगिकीकरणात वाढ होत असताना श्रम विभागणी व विशेषीकरणातून श्रमिकांची उत्पादकता वाढते. उत्पादन प्रक्रियेत स्वयंचलित यंत्रांचा वापर केल्याने मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे शक्य होते. यामुळे उत्पादनात वाढ घडून येते व देशाच्या आर्थिक विकासाची गती वाढते.

### २) रोजगारात वाढ :

औद्योगिक क्षेत्राच्या विकासाबरोबर रोजगार संधीत वाढ होते. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या देशात नवीन उद्योगांच्या स्थापनेबरोबर रोजगार संधी वाढून बेरोजगारी दूर व्हायला मदत होते. वाढत्या औद्योगिकीकरणातून वाहतूक, दळणवळण, वित्तीय सेवा, विमा सेवा, व्यापार यांचाही विकास होतो. या पायाभूत क्षेत्रातही रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात. रोजगाराच्या संधीत वाढ होत असताना देशातील साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होऊन उत्पादन आणि उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे दरडोई उत्पन्नात वाढ होते.

### ३) राहणीमानात सुधारणा :

आर्थिक विकासाचा मूळ उद्देश देशातील लोकांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणून राहणीमानाचा दर्जा उंचावणे हा असतो. जगातील अपवादात्मक काही देश सोडले तर सर्व विकसित देशांचा आर्थिक विकास हा जलद औद्योगिकीकरणामुळेच झाला आहे. औद्योगिकीकरणामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतात. लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. लोकांच्या उपभोगात विविधता येते. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो.

### ४) बचत आणि गुंतवणुकीत वाढ :

औद्योगिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात उत्पादनात वाढ होते, त्याचबरोबर दरडोई उत्पन्न वाढते. त्यामुळे लोकांची बचत प्रवृत्ती वाढते. यातून भांडवलाची उभारणी होते. बँका व वित्तीय संस्था लोकांच्या

बचती गोळा करून औद्योगिक क्षेत्राला भांडवल पुरवठा करतात. यातून भांडवल टंचाई दूर होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती वाढते.

## ५) सुदृढ व संतुलित अर्थव्यवस्थेची निर्मिती :

औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून देशाची अर्थव्यवस्था मजबूत करता येते. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी, देशातील दारिद्र्याचे दुष्ट चक्र छेदण्यासाठी आणि संतुलित विकास करण्यासाठी औद्योगिकीकरण आवश्यक ठरते. औद्योगिकीकरण जसजसे वाढत जाते तसतसा देशाचा संतुलित आर्थिक विकास होत जातो. देशातील दारिद्र्य, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता या तीन प्रश्नांची सोडवणूक करण्यास औद्योगिकीकरण महत्त्वाची भूमिका पार पाडते.

## ६) शेती व इतर प्राथमिक व्यवसायांचा विकास :

शेती तसेच दुग्धव्यवसाय, मत्स्योद्योग, कुक्कुटपालन, जंगल उत्पादने इत्यादी प्राथमिक व्यवसायांचा विकासही उद्योगांच्या विकासावर अवलंबून असतो. औद्योगिकीकरणामुळे शेती क्षेत्रात तयार होणाऱ्या ऊस, कापूस, तंबाखू इत्यादी औद्योगिक कच्च्या मालाची मागणी वाढते. तसेच प्राथमिक क्षेत्रातील इमारती लााकूड, दूध, अंडी वगैरे वस्तूंना औद्योगिक कामगारांकडून मागणी वाढते. त्यामुळे या व्यवसायाच्या विकासाला चालना मिळते. तसेच शेती व इतर प्राथमिक व्यवसायांच्या आधुनिकीकरणाला आवश्यक असणारी ट्रॅक्टरसारखी यंत्रे, खते, कीटकनाशके, वाहतुकीची साधने, यंत्रे, शीतगृहांची सामग्री इत्यादी पुरवून औद्योगिक क्षेत्र मदत करते. म्हणून औद्योगिकीकरण कृषी विकासाला साहाय्यक ठरते.

## ७) आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ :

श्रम विभागणी आणि विशेषीकरणातून तुलनात्मक उत्पादन खर्चात तफावत निर्माण होते. त्यामुळे व्यापारात लाभप्रगता निर्माण होते. देशात एखाद्या वस्तूचे विपुल प्रमाणात उत्पादन होत असेल, तर त्याची निर्यात करून मोठ्या प्रमाणत विदेशी चलन प्राप्त करत येते. यातून परकीय चलन मिळते, परकीय चलनाच्या साहाय्याने विदेशातून प्रगत यंत्रसामग्री, तंत्रज्ञान आयात केले तर औद्योगिकीकरणाचा वेग वाढतो. यातून उत्पादन, रोजगार, उत्पन्न वाढून आर्थिक विकासाचा वेग वाढतो.

## ८) देशाची संरक्षण व्यवस्था मजबूत होते :

औद्योगिकीकरणामुळे देशातील महत्त्वाचे उद्योग जसे लोह, पोलाद, जहाजबांधणी, विमान बांधणी, संरक्षण साहित्य इत्यादींचा विकास होतो व त्यायोगे देशाची संरक्षण व्यवस्था मजबूत व्हायला मदत होते.

## ९) स्वयं निर्भरता प्राप्त होते :

देशाला स्वयंपूर्ण बनवण्यासाठी, आत्मनिर्भर बनवण्यासाठी औद्योगिकीकरण आवश्यक आहे. विविध महत्त्वपूर्ण वस्तूंचे व आयातीसाठी पर्यायी वस्तूंचे उत्पादन यामुळे परकीय देशांवरील अवलंबित्व कमी होते व यामुळे देशाच्या परकीय चलनाची बचत होते.

## १०) अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल

औद्योगिकीकरणामुळे अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडून येतात. उत्पादन प्रक्रियेत सतत बदल घडून येतात. या बरोबरच वाहतूक, दळणवळण, बँका, वित्तीय संस्था, ऊर्जास्रोत, व्यवस्थापन पद्धती यात

बदल घडून येतात. पायाभूत सुविधांची यातून निर्मिती होते. या आर्थिक बदलाबरोबरच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक बदल देखील घडून येतात. परंपरागत दृष्टिकोन बाजूला सारून आधुनिकतेचा स्वीकार केला जातो.

वरील सर्व मुद्द्यांवरून असे स्पष्ट होते की देशाच्या आर्थिक विकासासाठी आणि सुख-समृद्धीसाठी औद्योगिकीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे.

## ७.२.२ १९९१ चे औद्योगिक धोरण :

श्री. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे सरकार १९९१ साली अस्तित्वात आल्यावर २४ जुलै १९९१ रोजी नवे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. पूर्वीच्या धोरणांद्वारे सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करण्यात आला होता, पण अकार्यक्षमता, वित्तीय साधने उभारण्यात अपयश, प्रचंड तोटा, अपुऱ्या क्षमतेचा वापर, पैशाची उधळपट्टी इ. दोष सरकारी क्षेत्रात निर्माण झाले. १९९० पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेत प्रचंड शैथिल्य निर्माण झाले होते. औद्योगिक क्षेत्र, कृषिक्षेत्र विकासाचा वेग मंदावलेला होता. आंतरराष्ट्रीय व्यापार घटलेला होता. व्यवहारतोलातील तूट मोठ्या प्रमाणात वाढली होती. परकीय चलन गंगाजळी नाममात्र शिल्लक होती. भारतावर एक प्रकारे आर्थिक संकट आले होते.

अशी परिस्थिती का निर्माण झाली याचा मागोवा घेतला असता असे आढळून आले की औद्योगिक परवाना, भांडवल गुंतवणूक आणि विस्तारावरील नियंत्रणे, मक्तेदारी, नियंत्रणात्मक कायदा आणि फेरा कायद्याची अंमलबजावणी, आयातीवर बंधने असल्याने यंत्रसामग्री, तंत्रज्ञान, कच्चा माल, आयात कमी, वाढते करांचे दर, औद्योगिक घराण्यांचा प्रभाव त्यामुळे त्यांच्याकडे झुकणारे धोरण यासारखी परिस्थिती होती.

### औद्योगिक धोरणांची उद्दिष्टे :

१) राष्ट्रीय आणि जागतिक बदलत्या परिस्थितीचा विचार करून त्या दृष्टीने उद्योगांची पुनर्रचना करणे.

२) भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढवून त्यांची निर्यात क्षमता वाढविणे.

३) आर्थिकवृद्धी दरात वाढ घडवून आणणे.

४) भारतीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी जोडणे.

५) सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती मर्यादित करून खाजगीकरणाला अधिक वाव देणे.

६) तांत्रिक ज्ञानात वाढ घडवून आणणे व उद्योगांची जागतिक स्पर्धा वाढविणे.

७) औद्योगिक परवाना पद्धती रद्द करणे.

८) मक्तेदारी नियंत्रण कायदा शिथिल करणे.

९) थेट विदेशी गुंतवणुकीवरील नियंत्रण कमी करणे.

### औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये व त्यातील तरतुदी :

### १) औद्योगिक परवाना धोरणात शिथिलता :

१९५१ च्या उद्योगविकास आणि नियमन कायद्यामुळे कोणते उद्योग सुरू करावेत, त्यांची स्थापना

कुठे करावी, उत्पादन किती करावे, कारखाना हलवायचा असल्यास तो कोणत्या ठिकाणी हलवावा इ. बाबत परवाना घ्यावा लागत होता. ही बाब अत्यंत त्रासदायक होती. शिवाय सरकारी नोकरशाहीमुळे दप्तर दिरंगाई, लाचलुचपत इत्यादींना तोंड द्यावे लागत होते. नवीन औद्योगिक धोरणाप्रमाणे देशाच्या संरक्षणाच्या दृष्टिने महत्वाचे उद्योग पर्यावरणाच्या दृष्टीने आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने असे १८ उद्योग वगळता इतर कोणताही उद्योग सुरू करण्यासाठी आता सरकारकडून परवाना मिळविण्याची गरज नाही. कोळसा, अल्कोहोल, पेट्रोलियम, साखर, सिगारेट, मोटारकार, हानिकारक रसायने, औषधी, ॲस्बेस्टॉस, कागद, वृत्तपत्र कागद, इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण साहित्य, स्फोटके व कच्ची चामडी वगैरे या उद्योगांसाठी सरकारी परवाना घ्यावा लागेल. हे उद्योग सोडून इतर उद्योगांना त्यांची भांडवल गुंतवणूक कितीही असली तरी परवाना लागणार नाही. असे उद्योग खाजगी क्षेत्रात कुठे सुरू करायचे हे उद्योजकानेच ठरवायचे आहे.

## २) परकीय भांडवलाची मुक्त गुंतवणूक :

ज्या उद्योगात नवीन उच्च तांत्रिक भांडवलाची गरज असून भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण जास्त आहे अशा निवडक अग्रक्रम उद्योगात परकीय गुंतवणूकदारांना ५१ टक्क्यांपर्यंत भागभांडवलात सहभागी होता येईल. या अग्रक्रम उद्योगांत एकूण ३४ उद्योगांचा समावेश करण्यात आला आहे. उदा. वाहतूक, अन्नप्रक्रिया उद्योग, हॉटेल, पर्यटन, खते, कृषी अवजारे, रसायने, वीज उपकरणे इ. या भागभांडवलातून परदेशातून यंत्रसामग्रीची आयात करायची असेल, तर त्यालाही परवानगीची आवश्यकता राहणार नाही.

## ३) विदेशी तंत्रज्ञानासाठी मुक्त परवाने :

उच्च व प्रगत तंत्रज्ञानाशिवाय औद्योगिक प्रगतीचा वेग वाढणार नाही. तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती व्हावी म्हणून सरकारने विदेशी तंत्रज्ञानाची आयात खुली केली. विदेशी तंत्रज्ञानाच्या आयातीसाठी योग्य ते करार करण्यासाठी मुक्तपणे परवानगी दिली जाईल. निर्यात व्यवहाराला प्रोत्साहन मिळेल. अशा तंत्रज्ञानविषयक करारांना सरकारच्या मंजुरीची आवश्यकता राहणार नाही. अर्थात विदेशी तंत्रज्ञानाचे स्वागत करीत असतानाच विदेशी चलनाच्या साठ्यावर त्याचा प्रतिकुल परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली जाईल असे स्पष्ट करण्यात आले.

## ४) मक्तेदारी कायद्यात सुधारणा :

पूर्वी मक्तेदारी प्रतिबंधक कायद्यानुसार मोठ्या उद्योगांवर अनेक नियंत्रणे बसविण्यात आली होती. मक्तेदारी निश्चित करण्यासाठी गुंतवणूक मर्यादा ३५ कोटी रुपये इतकी होती. नंतर २० कोटी रुपये इतकी कमी करण्यात आली. १९८५ पासून ती १०० कोटी रुपये करण्यात आली. १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक असणाऱ्या उद्योगांना नवे प्रकल्प सुरू करणे, उत्पादन क्षमता वाढविणे इ. साठी सरकारची संमती घ्यावी लागत असे. या नव्या धोरणात या सर्व अटी काढून टाकण्यात आल्या. मक्तेदारी प्रतिबंधक कायदा शिथिल करण्यात आला. गुंतवणुकीची कोणतीही महत्तम मर्यादा ठरविण्यात आली नाही. उद्योगांना नवे उत्पादन सुरू करणे, उत्पादन क्षमतेचा विस्तार करणे, इतर उद्योगांवर ताबा मिळविणे, उद्योगांचे एकत्रीकरण व विलीनीकरण यासाठी सरकारच्या परवानगीची गरज राहणार नाही.

## ५) सार्वजनिक क्षेत्राचा संकोच :

सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षमतेमुळे सार्वजनिक उद्योग तोट्यात गेलेत. ही बाब सरकारला परवडणारी नाही. हे लक्षात घेऊन नवीन औद्योगिक धोरणात सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व कमी करण्यात आले. नवीन धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रालाही फक्त ८ उद्योग राखून ठेवण्यात आले आहेत. हे उद्योग

म्हणजे शस्त्रास्त्र निर्मिती, दारूगोळा, अणुशक्ती, रेल्वे वाहतूक, कोळसा व लिग्नाईट, लोखंड, जस्त, मँगेनीज इ. असून बाकी उद्योग खाजगी क्षेत्रासाठी मुक्त करण्यात आले आहेत.

### ६) सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उद्योगांचे खाजगीकरण :

कायम तोट्यात चालणारे सार्वजनिक क्षेत्रातील कारखाने खाजगी क्षेत्राला चालविण्यासाठी देण्यात येतील. सार्वजनिक क्षेत्रातील जे उद्योग अकार्यक्षम व सतत आजारी असतात अशा उद्योगासंबंधीचे निर्णय घेण्यासाठी औद्योगिक व पुनर्रचना मंडळाची नियुक्ती करण्यात आली. हे मंडळ आजारी उद्योगांच्या पुनर्स्थापनेसाठी योजना तयार करील. अशा उद्योगांत काम करणाऱ्या कामगारांच्या हिताची जोपासना करण्यासाठी या उद्योगांची पुनर्स्थापना केली जाईल. त्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात २०० कोटी रूपये राष्ट्रीय नूतनीकरण निधीची स्थापना करण्यात आली आहे.

### ७) निर्यातीला प्रोत्साहन :

भारताचा निर्यात व्यापार वाढावा म्हणून सरकार प्रयत्नशील राहील. भारतात विदेशी गुंतवणूक वाढल्यास निर्यातक्षम उद्योगांच्या वाढीस मदत होईल. या भूमिकेतून विदेशी व्यक्तींना त्यांच्या नफ्यातील हिस्सा दिला जाईल. उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या तत्त्वांमुळे विदेशी गुंतवणूक वाढण्यास हातभार लागेल. परिणामी भारताचा निर्यात व्यापार वाढेल व देशाला बहुमूल्य असे परकीय चलन प्राप्त करता येईल.

### ८) लघु व कुटीरोद्योगाबाबत धोरण :

भारतीय अर्थव्यवस्थेतील लघु व कुटीरोद्योगाची भूमिका लक्षात घेऊन या उद्योगांना उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. लघु व कुटीरोद्योगांमध्ये पूर्वीच्या तुलनेत जादा भांडवल गुंतवण्याची गरज लक्षात घेऊन या उद्योगातील गुंतवणुकीची मर्यादा वाढविण्यात आली. लघु उद्योगामधील गुंतवणुकीची मर्यादा ३५ लाख रुपयांवरून ६० लाख रुपये करण्यात आली. पूरक व साहाय्यक उद्योगातील गुंतवणुकीची मर्यादा ७५ लाख रु. करण्यात आली. तसेच अती लहान उद्योगातील गुंतवणूक मर्यादा २ लाख रुपयांवरून वाढवून ५ लाख रुपये करण्यात आली. भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण वाढल्याने या उद्योगांना आधुनिक व उच्च तंत्रज्ञानाचा स्वीकार करता येईल. त्यामुळे या उद्योगांची उत्पादनक्षमता वाढून हे उद्योग स्पर्धेत टिकतील.

## ७.२.३ – १९९१ च्या औद्योगिक धोरणाचे मूल्यमापन

१) परवाना धोरण जवळजवळ संपुष्टात आल्याने परवानाराज मधील नोकरशाहीचे वर्चस्व कमी होईल. मुक्त परवाना मिळाल्यामुळे उद्योग स्थापनेत, विस्तारीकरणात, आधुनिकीकरणान आणि विविधीकरणात वाढ होईल. उत्पादनात वाढ होईल. पण याचा रोजगारावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात आली. आधुनिकीकरण आणि विस्तारीकरणासाठी आधुनिक यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढेल. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात कामगारांची गरज कमी होईल. नवीन रोजगार संधी निर्माण होणार नाहीत.

२) विदेशी गुंतवणूक आमंत्रित केल्यामुळे देशातील भांडवलाची टंचाई दूर होईल आणि विदेशी चलनाचे आगमन होऊन विदेशी चलन साठ्यात वाढ होईल. निर्यातीत वाढ होईल आणि विदेशी गुंतवणुक देशाच्या विकासाला पोषक ठरेल अशी अपेक्षा केली गेली. पण या धोरणामुळे परावलंबित्व वाढेल. विदेशी गुंतवणुकीमुळे देशात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्राबल्य वाढेल, विदेशी गुंतवणूकदार नफ्याचा हिस्सा मायदेशात नेतील. त्यामुळे परकीय चलन गंगाजळीवर ताण पडेल.

३) विदेशी तंत्रज्ञान सहयोग करारामुळे देशात नवीन तंत्रज्ञान येईल. उत्पादनात वाढ होईल. पण यामुळे देशी उद्योजकांमध्ये विदेशी तंत्रज्ञानावरील अवलंबित्व वाढेल, आयते तंत्रज्ञान मिळाल्यामुळे शोध आणि संशोधनाकडे दुर्लक्ष होईल. शिवाय तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल रॉयल्टी द्यावी लागेल. त्याचा विदेशी चलन साठ्यावर ताण पडेल.

४) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची कामगिरी समाधानकारक नसल्याने तोट्यात चालणाऱ्या व कमी नफा मिळविणाऱ्या उद्योगांमधील भांडवल सरकार काढून घेणार आहे. या धोरणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील कामगारांमध्ये मोठ्या प्रमाणावर कपात होईल, बरोजगार कामगारांबाबत सरकारकडे कोणतेही ठोस धोरण नाही. आजारी उद्योग किंवा कमी नफा देणारे उद्योग विक्री केल्यास बड्या उद्योजकांना फायदा होईल. यात आणखी एक शंका उपस्थित केली गेली की खाजगी उद्योजक, सरकारी अधिकारी संगनमत करून सरकारच्या खाजगीकरणाच्या धोरणाचा गैरफायदा घेतील यात शंका नाही.

## ७.२.४ लघुउद्योगांचे महत्त्व / भूमिका : (Role of Smallscale Industries)

### अ) लघुउद्योगांची व्याख्या :

१९५१ च्या औद्योगिक विकास व नियंत्रण कायद्यानुसार ''एखाद्या उद्योगात विजेचा वापर होत असेल आणि श्रमिकांची संख्या ५० पेक्षा कमी असेल किंवा विजेचा वापर होत नसेल आणि श्रमिकांची संख्या १०० पेक्षा कमी असेल तर अशा उद्योगांना लघुउद्योग मानण्यात यावे.''

१९९१च्या नवीन औद्योगिक धोरणानुसार लघुउद्योगांचे तीन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे.

### अ) अति लघुउद्योग :

ज्या उद्योगात जमीन यंत्रसामग्री आणि संयंत्रात स्थिर भांडवल म्हणून ५ लाख रुपयांपर्यंतची गुंतवणूक झालेली आहे. तो उद्योग म्हणजे अति लघुउद्योग होय. १९९७ मध्ये अबिद हुसेन समितीच्या शिफारशीनुसार ही मर्यादा २५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली.

### ब) लघुउद्योग :

ज्या उद्योगात भांडवल गुंतवणूक ६० लाख रुपयांपर्यंत आहे त्यांना लघुउद्योग मानण्यात यावे. १९९७ च्या अबिद हुसेन समितीच्या शिफारशीनुसार ही मर्यादा ३ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली तर सद्यस्थितीत ही मर्यादा ५ कोटी रुपयांपर्यंत आहे.

### क) साहाय्यक उद्योग :

जर एखादा लघुउद्योग इतर उद्योगांना साहाय्यक असेल, तर भांडवल गुंतवणूक मर्यादा ३ कोटी रुपये होती, परंतु २०००च्या धोरणात ती १ कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात आली.

### ब) लघुउद्योगाचे महत्त्व/भूमिका :

भारतीय अर्थव्यवस्थेतील दारिद्र्य, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेत लघुउद्योगांनी खूपच महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे आणि पाडत आहे. लघुउद्योगांचे महत्त्व पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

## लघुउद्योगांची प्रगती

| वर्ष | उदयोग संख्याची संख्या (लाखात) | | | उत्पादन (कोटी उत्पादन) | | रोजगार |
|---|---|---|---|---|---|---|
| | नोंदणीकृत | अनोंदणीकृत | एकूण | किंमतीनूसार | | |
| २००२-०३ | १६.०३ | ९३.४६ | १०९.४९ | ३०६७७१ | २६३.६८ | ८६०१३ |
| २००३-०४ | १७.१२ | ९६.८३ | ११३.९५ | ३३६३४४ | २७५.३० | ९७६४४ |
| २००४-०५ | १८.२४ | १००.३५ | ११८.५९ | ३७२९३८ | २८७.५५ | १२४४१७ |
| २००५-०६ | १९.३० | १०४.१२ | १२३.४२ | ४१८८८४ | २९९.८५ | १५०२४२ |
| २००६-०७ | २०.३२ | १०८.१२ | १२८.४४ | ४७१६६३ | ३१२.५७ | |

**स्रोत : आर्थिक सर्व्हेक्षण (२००७-२००८) पृष्ठ क्र. १९८**

### १) लघुउद्योगांच्या संख्येतील वाढ :

भारतात लघुउद्योग व कुटीरोद्योग नोंदणीकृत आणि अनोंदणीकृत असे दोन प्रकारचे आहेत. लघुउद्योगाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. १९८०-८१ मध्ये लघुउद्योगांची संख्या ८.७४ लाख होती. ती १९९०-९१ मध्ये १९.३८ लाखांपर्यंत वाढली. २००२-२००३ मध्ये ही संख्या १०९.४९ लाख झाली. २००२-०३ ते २००६-०७ या काळात लघुउद्योगांच्या संख्येत दरवर्षी सरासरीने ४.१ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

### २) रोजगार निर्मितीतील स्थान :

भारतातील लघुउद्योग व कुटीरोद्योग क्षेत्रात रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी निर्माण होतात. २००२-०३ मध्ये या क्षेत्रात २६३.६८ लाख लोकांना रोजगार मिळाला. २००६-०७ मध्ये ही संख्या ३१२.५२ लाखांपर्यंत वाढली आहे.

या वाढत्या रोजगारसंधीवरून लघुउद्योग क्षेत्राचे महत्त्व लक्षात येते.

### ३) उत्पादनातील वाढ :

भारतातील लघुलद्योग क्षेत्रात एकूण औद्योगिक निर्माण क्षेत्रातील वाटा ३९ टक्क्यांपर्यंत आहे. लघुउद्योग क्षेत्राच्या उत्पादनात दहाव्या योजनेत सातत्याने वाढ झालेली आहे. २००२-०३ मध्ये लघुउद्योग क्षेत्राचे उत्पादन ३०६७७१ कोटी रुपयांचे होते. २००१-०२ या वर्षाच्या उत्पादनाशी तुलना करता यातील वाढ ८.७ टक्के झाली. २००६-०७ मध्ये उत्पादन ४७९६६३ कोटी रुपयांचे झाले.

### ४) निर्यातीतील स्थान :

लघुउद्योग क्षेत्राने निर्यात क्षेत्रात सातत्याने भरीव कामगिरी केल्याने भारताला मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त झाले आहे. भारतातील लघुउद्योगांनी निर्माण केलेले तयार कपडे, चामडी वस्तू, लोकरीचे कपडे, खेळाचे साहित्य, रसायने, अभियांत्रिकी वस्तू, हस्तकला, दागदागिने इत्यादींची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जात आहे. २००२-०३ मध्ये ८६०१३ कोटी रुपयांची निर्यात झाली, तर २००५-०६ मध्ये १५०२४२ कोटी रुपयांपर्यंत निर्यातीत वाढ झाली.

## ५) स्थानिक भांडवल आणि उपक्रमशीलतेचा वापर :

या उद्योगांचे उत्पादनाचे प्रमाण लहान असते. अशा उद्योगांसाठी भांडवल कमी प्रमाणात लागते. कारण या उद्योगात भांडवलप्रधान तंत्राऐवजी श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जातो. या उद्योगांसाठी स्थानिक पातळीवर उपलपब्ध असलेले भांडवल उपयोगात आणले जाते. त्यामुळे भांडवलाची फारशी टंचाई निर्माण होत नाही. या उलट मोठ्या उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवल लागते.

## ६) अल्पकाळात उत्पादन :

मोठ्या उद्योगांच्या उभारणीसाठी बराच काळ लागतो. वेळेवर पुरेसे भांडवल उपलब्ध होत नाही. यंत्रसामग्री उपलब्ध करण्यातही बऱ्याच अडचणी येतात. यंत्रसामग्री कारखान्यापर्यंत आणण्यास बराच काळ लागतो व अडचणी येतात. त्यामुळे उद्योगातून प्रत्यक्ष उत्पादन होण्यास बराच काळ लागतो. या उलट लघुउद्योगासाठी लहान आकारमानाची इमारत लागते, तिची उभारणी लवकर होते. यासाठी स्थानिक साधनसामग्रीचा वापर केला जातो. यंत्रसामग्री लवकर उपलब्ध होते. स्थानिक पातळीवर भरपूर कच्चा माल उपलब्ध असतो. त्यामुळे प्रत्यक्ष उत्पादनाला लवकर सुरुवात होते.

## ७) कमी औद्योगिक संघर्ष :

मोठ्या आणि मध्यम आकारमानाच्या उद्योगात मालक व व्यवस्थापन आणि कामगार यांचे संबंध फारसे चांगले नसतात. कधी मालक वर्गाकडून कामगारांचे शोषण केले जाते, तर शोषित कामगार वर्ग संघटित होऊन मालकवर्गाकडे वेतनवाढ मागतात. बोनस, इतर भत्ते यांची मागणी करतात. यातून संप,धरणे, मोर्चा, निदर्शने केली जातात. तर मालकांकडून टाळेबंदी जाहीर केली जाते. यातून उत्पादनात अडचणी येतात. उत्पादन घटते. लघुउद्योगात कामगारांची संख्या खूपच कमी असते. मालक व कामगारांचे संबंध सलोख्याचे असतात. त्यामुळे संघर्ष होत नाहीत.

## ७.२.५ लघुउद्योगाच्या समस्या : (Problems of Small Scale Industries)

भारतीय अर्थव्यवस्थेत लघुउद्योगांच्या विकासात अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे या क्षेत्रासमोर अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्याप्रश्नांचा व समस्यांचा आपण पुढीलप्रमाणे विचार करू.

## १) वित्तपुरवठ्याची समस्या :

वित्तपुरवठ्याचा अभाव ही लघुउद्योगांची प्रमुख समस्या आहे. लघुउद्योगांचा भांडवली आधार मुळात कमकुवत असतो. लघुउद्योगांना जमीन, कारखान्याची इमारत, यंत्रसामग्री, कच्चा माल, कामगार पगार, इंधन, वाहतूक व दळणवळण, मालाची साठवणूक, विक्री इत्यादी कारणांसाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज असते. मोठ्या उद्योगांप्रमाणे भांडवल बाजारातून भांडवल उभारण्याची क्षमता त्यांची नसते. अशा वेळेस त्यांच्यासमोर बँका आणि वित्तीय संस्था हा एकच मार्ग असतो. बँका व वित्तीय संस्थांकडून पुरेसा व वेळेवर आणि सवलतीच्या व्याजदरात वित्तपुरवठा मिळविण्यात अनेक अडचणी येतात. पहिली अडचण तारणाची व भरभक्कम जामीनदारांची निर्माण होते.

आज व्यापारी बँका, सहकारी बँका, वित्तीय महामंडळ, भारतीय लघुउद्योग विकास महामंडळ, औद्योगिक विकास बँक, नाबार्ड यांच्यामार्फत वित्तपुरवठा केला जातो. परंतु अजूनही लघुउद्योगांची वित्तपुरवठ्याची समस्या सुटलेली नाही.

## २) कच्च्या मालाची समस्या :

लघुउद्योगांसमोर कच्च्या मालाच्या अनेक समस्या आहेत. कृषी उत्पादित मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना हंगामात कच्चा माल मिळतो. हंगामात कच्चा माल स्वस्त असतो. यात काही शेतमाल नाशवंत असतो. उदा. फळे भाजीपाला, मांस, मासे यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांसमोर माल साठवण्याचा प्रश्न निर्माण होतो. यंत्राचे लहान-मोठे सुटे भाग बनविणाऱ्या लघुउद्योजकांसमोर लोखंड-पोलाद, ॲल्युमिनियम, जस्त यासारख्या धातूंच्या उपलब्धतेविषयी समस्या निर्माण होतात. काही लघुउद्योजकांना उत्पादनासाठी आयात कच्चा माल लागतो. आयातीत अडचणी निर्माण झाल्या तर कच्चा माल वेळेवर उपलब्ध होत नाही. त्यामुळे उत्पादनात अडचणी निर्माण होतात.

## ३) जुनाट आणि परंपरागत यंत्रसामग्री, तंत्रज्ञान :

बऱ्याचशा लघुउद्योगात जी यंत्रसामग्री वापरली जाते ती बरीच जुनाट झालेली आहे. जुनाट यंत्रसामग्रीमुळे उत्पादनात बरेच व्यत्यय निर्माण होतात. जुनाट यंत्रसामग्रीमुळे होणाऱ्या उत्पादित वस्तू सुमार दर्जाच्या असतात. तसेच परंपरागत वस्तूंचे उत्पादन केले जाते. भांडवलाच्या अभावाने आधुनिकीकरणात अडचणी येतात.

## ४) ऊर्जेची समस्या :

लघुउद्योगांना ऊर्जेची मोठी समस्या आहे. लघुउद्योगांत श्रमाऐवजी यंत्राचा वापर केला जातो. तेव्हा ती यंत्रे चालविण्यासाठी ऊर्जा साधनाची गरज भासते. आज बहुतांश यंत्रे विजेवर चालतात. भारतात वीजपुरवठ्यात अनियमितता आणि अनिश्चितता असल्याने उत्पादनात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे पूर्ण कार्यक्षमतेने उत्पादन केले जात नाही. उत्पादन कमी होते. त्यामुळे नफ्याचे प्रमाण कमी होते.

## ५) उत्पादन क्षमतेचा अपुरा वापर :

जुनाट आणि परंपरागत यंत्रसामग्रीच्या वापरामुळे उत्पादन क्षमतेचा कार्यक्षमपणे वापर होत नाही. कच्चा माल वेळेवर न मिळाल्याने, जुनाट यंत्र तंत्राच्या वापराने पुन्हा पुन्हा यंत्रात बिघाड होतो. तसेच बाजारात मागणी अभावाने उत्पादन कमी करावे लागते. या कारणांमुळे उत्पादनक्षमता पूर्ण कार्यक्षमतेने वापरली जात नाही. त्यामुळे सरासरी उत्पादन खर्चात वाढ होते.

## ६) अकार्यक्षम व्यवस्थापक आणि कामगार :

लघुउद्योगांचे व्यवस्थापन बहुदा मालकांच्या हातात असते. या उद्योगातील व्यवस्थापक बऱ्याचदा अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असतात. त्यांना बाजारपेठेची फारशी माहिती नसते. श्रम विभागणी व विशेषीकरण करण्यात तो अपयशी ठरतो. कच्च्या मालाच्या बाजारपेठांविषयी फारशी माहिती नसते. यामुळे तो व्यवसायात यशस्वी होत नाही. अकुशल व्यवस्थापनाबरोबरच अकुशल कामगार, त्यांच्याकडे कौशल्याचा अभाव व ते परंपरागत तंत्रानेच काम करतात त्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी असते.

## ७) विपणनविषयक समस्या :

भारतीय लघुउद्योगांपुढे सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे विपणनाची समस्या होय. त्यांना बाजारात मोठ्या उद्योगांशी स्पर्धा करावी लागते. मोठ्या उद्योगांनी मोठ्या प्रमाणात उत्पादन केल्याने त्यांचा उत्पादन खर्च कमी असतो. मालाचा दर्जा उच्च, किंमत कमी यापुढे लघुउद्योग त्यांच्यासमोर टिकाव धरू शकत नाहीत. तसेच बाजारविषयक माहितीचा अभाव हीदेखील समस्या लघुउद्योगात असते.

## ८) मोठ्या उद्योगाकडून शोषण :

मोठे उद्योजक लघुउद्योगांकडून यंत्रांचे सुटे भाग खरेदी करतात. लघुउद्योगात तयार झालेल्या या वस्तूंना मोठा उद्योजक हा एकमेव ग्राहक असतो. त्यामुळे त्यांची मक्तेदारी निर्माण होते. त्यामुळे कमी किमतीला वस्तू खरेदी केली जाते. मालाचा निकृष्ट दर्जा म्हणून लघुउद्योगाच्या वस्तूंना कमी किंमत दिली जाते. लघुउद्योगांनी विकलेल्या मालाची किंमत मोठे उद्योग वेळेवर देत नसल्याने अडचणी निर्माण होतात.

## ७.२.६ लघुउद्योग–सरकारी धोरण :

## (Government Policy towards Small Scale Industries)

भारतातील लघुउद्योगांसमोर अनेक समस्या आहेत. भारतात लघुउद्योगांचा विकास व्हावा त्यांच्या समस्या कमी व्हाव्यात म्हणून सरकारने लघुउद्योगांबाबत वेळोवेळी धोरणांची आखाणी करून औद्योगिक विकासात लघुउद्योगांचा विकास व्हावा यासाठी या सरकारी धोरणाची वेळोवेळी अंमलबजावणी करण्यात आली आहे. त्याचा पुढीलप्रमाणे विचार करू.

## अ) लघुउद्योगासाठी औद्योगिक धोरण १९९१ :

श्री नरसिंहराव सरकारने ६ ऑगस्ट १९९१ मध्ये लघुउद्योग क्षेत्रासाठी औद्योगिक धोरण जाहीर केले. नवीन धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

## १) पायाभूत सुविधा :

लघुउद्योगांचे उत्पादन आणि स्पर्धा क्षमता उंचावण्यासाठी लघुउद्योग विकास संघटनेच्या अंतर्गत तांत्रिक विकास केंद्र स्थापित करण्यात आले.

## २) वित्तपुरवठ्यासंबंधी उपाय :

लघुउद्योगांना सवलतीच्या व्याजदरात जी कर्जे दिली जातात व जी अनुदाने दिली जातात त्याऐवजी नवीन धोरणात्मक निर्णयात बाजारदरानुसार पुरेशा प्रमाणात वित्तपुरवठा केला जाईल. याबरोबरच भांडवलबाजारातून भांडवल उभारता येईल. आधुनिकीकरण आणि तांत्रिकीकरण यासाठी दुसऱ्या उद्योगांना लघुउद्योगांमध्ये २४ टक्क्यांपर्यंत भांडवल गुंतवणूक करता येईल.

## ३) अति लघुउद्योग :

नवीन धोरणाच्या अगोदर, १९९० मध्ये या उद्योगांतील स्थिर भांडवल गुंतवणूक मर्यादा वाढविण्यात आली होती. निर्यातप्रधान उद्योगांसाठी ७५ लाख रुपये लघुउद्योग ६० लाख रुपये आणि साहाय्यक लघुउद्योग ७५ लाख रुपये तर अति लहान उद्योगांसाठी ५ लाख रुपये मर्यादा करण्यात आली. हीच मर्यादा नवीन धोरणात कायम ठेवली.

## ४) ग्रामोद्योग आणि हातमाग क्षेत्र :

हातामागावर जे कापड विणले जाते त्यातून जवळ जवळ ३५ टक्क्यांपर्यंत उत्पादन होते. नवीन धोरणानुसार हातमाग क्षेत्र प्रोत्साहित करून रोजगारात वाढ करणे आणि ग्रामीण कारागिरांच्या जीवनमानात सुधारणा करणे. ग्रामीण विणकरांना आधुनिकतेचे प्रशिक्षण देण्यात येईल. त्यांना रंग, डिझाइन याबाबत मार्गदर्शन केले जाईल आणि विपणनात मदत करण्यात येईल.

## ५) हस्तकला क्षेत्र :

हस्तकला क्षेत्रामार्फत ग्रामीण विकास घडवून आणणे, त्यांना शिक्षण, प्रशिक्षण देणे, उत्पादन आणि विपणनात साहाय्य करण्यात येईल.

या नवीन धोरणात लघुउद्योग क्षेत्रांना जिवंत क्षेत्र संबोधण्यात आले आहे. आणि या क्षेत्राच्या विकासात निर्माण होणाऱ्या सर्व अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## ब) आबीद हुसेन समिती – १९९७ :

भारतातील लघु उद्योगांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यांच्या विकासाविषयी उपाययोजना सुचविण्यासाठी उद्योग मंत्रालयाने डिसेंबर १९९५ मध्ये डॉ. आबीद हुसेन यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती करण्यात आली. समितीने आपला अहवाल २७ जानेवारी १९९७ मध्ये सादर केला. या समितीच्या शिफारशी पुढीलप्रमाणे

१) लघु उद्योगातील विदेशी भांडवल गुंतवणूक मर्यादा २४ टक्के आहे. ती समाप्त करण्यात यावी.

२) लघु उद्योगांच्या हितासाठी येत्या पाच वर्षासाठी सरकारकडून २५०० कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात यावे.

३) अती लघु उद्योगांना जास्तीत जास्त सहकार्य करण्यासाठी फिरता निधी स्थापन करण्यात यावा.

४) व्यापारी बँकांनी लघु उद्योजकांना एकत्रित कर्ज मंजूर करावे.

५) लघुउद्योगांच्या वित्तपुरवठ्याबाबत नायक समितीच्या शिफारशी लवकर लागू करण्यात याव्यात.

६) लघुउद्योगांच्या विकासावर लक्ष ठेवण्यासाठी उद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात यावी.

७) लघु व साहाय्यक उद्योगातील स्थिर भांडवल गुंतवणूक मर्यादा अनुक्रमे ६०, ७५ लाख रुपयांवरून ३ कोटी रुपये करण्यात यावी.

८) अती लघुउद्योग गुंतवणूक मर्यादा ५ लाखावरून २५ लाख रुपये करण्यात यावी.

९) एकाच प्रकारच्या आणि एकाच ठिकाणी केंद्रित झालेल्या लघुउद्योग समुहांसाठी क्रेडिट रेटिंग 'पतदर्जा' पद्धती विकसित करण्यात यावी.

## क) लघुउद्योगांसाठी धोरणात्मक पॅकेज – २००० :

मा. पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी यांनी लघुउद्योगांसाठी एक व्यापक धोरणात्मक पॅकेज ३० ऑगस्ट २००० मध्ये जाहीर केले. या धोरणातील तपशील पुढील प्रमाणे –

१) लघुउद्योगांची उत्पादन शुल्क मर्यादा ५० लाख रुपयांवरून एक कोटी रुपये करणे.

२) लघुउद्योगांशी संबंधित सेवा आणि व्यवसायात भांडवल गुंतवणूक मर्यादा ५ लाखांपासून १० लाखांपर्यंत वाढविणे.

३) एकत्रित कर्ज मर्यादा १० लाखावरून २५ लाख करणे.

४) लघु उद्योग परीक्षणासाठी प्रयोगशाळांचा विकास आणि संचालनासाठी खर्चाच्या ५०टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येईल.

५) लघुउद्योग मंत्रालयाकडून १२ वर्षांच्या अंतरानंतर लघुउद्योगांची तिसरी गणना करणे.

६) प्रधानमंत्री रोजगार योजनेअंतर्गत अति लघुउद्योग स्थापन करण्यासाठी कुटुंब वार्षिक उत्पन्न मर्यादा २५००० रुपयांवरून ४०,००० रुपये करण्यात आली.

## ड) लघुउद्योगातील नवीन सुधारणा :

१) उत्पादन शुल्क सूट मर्यादा ३ कोटी रुपयांवरून ४ कोटी रुपये करण्यात आली.

२) गुंतवणूक मर्यादा २००६ पूर्वी १ कोटी रुपये होती ती ५ कोटी रुपयांपर्यंत वाढविली आहे.

३) लघु व कुटीरोद्योगांच्या उत्पादनाच्या बाजारकक्षा विस्तारण्यासाठी बाजार विकास मदत योजना सुरू करण्यात आली.

४) कर्ज मर्यादा ५० लाखांवरून १ कोटीपर्यंत वाढविण्यात आली. विनाजामीन कर्ज मर्यादा रु. १५ लाखांवरून रु. २५ लाखांपर्यंत वाढविण्यात आली. तसेच क्रेडिट कार्ड कर्जमर्यादा २ लाखावरून १० लाख रुपये करण्यात आली.

५) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ - भारतातील सुक्ष्म, लघु आणि मध्यम आकाराच्या उद्योगांच्या विकासाचा कायदा २००६ मध्ये संमत करण्यात आला.

६) तांत्रिक सुधारणा करण्यासाठी भांडवली अनुदान व मदत योजना सुरू करण्यात आली. यासाठी बँका व वित्तीय संस्थांकडून १ कोटी रुपयापर्यंतच्या कर्जावर १५ टक्क्यांपर्यंत अनुदान मिळणार.

७) एकात्मिक पायाभूत विकास योजनेचा विस्तार करून ती संपूर्ण देशात लागू करण्यात आली.

## ७.२.७ भारतातील सार्वजनिक क्षेत्र :

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने आर्थिक विकासासाठी संमिश्र अर्थव्यवस्थेचा मार्ग स्वीकारला. या संमिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र या दोहोंचे सह अस्तित्व असते. स्वातंत्र्योत्तर काळात सार्वजनिक उद्योगांनी भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

### सार्वजनिक क्षेत्र म्हणजे काय? :

सार्वजनिक क्षेत्राची मालकी सरकारकडे असून या क्षेत्रातील उपक्रमांचे संचालन आणि व्यवस्थापन सरकारकडे असते. अशा उपक्रमांची मालकी सरकारची म्हणजे पर्यायाने जनतेची असते. सरकारकडून त्यांचे व्यवस्थापन पाहिले जाते. ते उद्योग सरकारकडून संचलित केले जातात.

देशातील मूलभूत आणि अवजड उद्योग व सेवा क्षेत्र सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आले. यात प्रामुख्याने युद्ध साधनसामग्री, अवजड यंत्रसामग्री, परमाणू ऊर्जा, लोह-पोलाद, वीजनिर्मिती, कोळसा, खनिज तेल, लोह-धातू - तांबे, शिसं, जस्त या बरोबरच विमान निर्मिती, विमान वाहतूक, रेल्वे वाहतूक, दूरसंचार, तार, पोस्टखाते, ॲल्युमिनियम उद्योग, अलोह धातू, यंत्रसामग्री व उपकरणे, रसायन उद्योग, औषध उद्योग, रासायनिक खते उद्योग, रबर, रस्ते व जलवाहतूक इत्यादी उद्योग व सेवा सार्वजनिक क्षेत्रात समाविष्ट करण्यात आल्यात. भारतात १९५१ मध्ये सार्वजनिक उद्योगांची संख्या ५ होती. ती २००६ मध्ये २३९ झाली. भारतात सार्वजनिक उद्योग केंद्र सरकारबरेबर राज्य सरकारकडूनही चालविले जातात.

## ७.२.८ भारतीय अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्राची भूमिका :

१९५६च्या औद्योगिक धोरणामध्ये भारत सरकारने समाजवादी समाज रचनेच्या तत्त्वानुसार सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. देशाच्या विकासात सार्वजनिक क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे पुढील मुद्यांवरून लक्षात येते.

## १) पायाभूत संरचनेचा विकास :

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास हा पायाभूत, संरचनेच्या विकासावर अवलंबून असतो. कृषीक्षेत्रात जलसिंचन व वीज पुरवठा, औद्योगिक क्षेत्रात वाहतुक, दळणवळण, बँका व वित्तीय संस्था, विमा, पाणीपुरवठा, वीज उत्पादन इ. पायाभूत सुविधांची आवश्यकता असते. संपूर्ण आर्थिक विकासातील पायाभूत संरचनेचे महत्त्व लक्षात घेऊन भारतात सार्वजनिक क्षेत्रामार्फत पायाभूत संरचना निर्माण करण्यात आली. त्यामुळे आर्थिक विकासाची गती वाढण्यास मदत होते. भारतात पायाभूत संरचना निर्मिती व विकासात सार्वजनिक क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहेत.

## २) सार्वजनिक क्षेत्र आणि भांडवल निर्मिती :

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग संस्था व सेवा संस्था केवळ बचती गोळा करण्याचेच काम करीत नाही तर स्वत: बचती करून गुंतवणुकीसाठी भांडवल उपलब्ध करून देतात. म्हणजे भांडवल निर्मिती करतात. भारतातील बहुतांश लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. देशातील ग्रामीण आणि शहरी भागातून बचत कर्जरोखे, युनिटच्या रूपाने भांडवल गोळा करून ते कृषी उद्योग, व्यापार व इतर क्षेत्रांना उपलब्ध करून देण्याचे कार्य सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी बँका, वित्तीय महामंडळे, यूटीआय व आयसीआयसीआयसारख्या गुंतवणूक बँका, आयुर्विमा महामंडळ, राज्य वित्तीय महामंडळ, औद्योगक विकास बँका इत्यादी बँका, वित्तीय संस्था, महामंडळे व विमा कंपन्या करीत आहेत. सहाव्या योजनेत एकूण देशांतर्गत बचतीत सार्वजनिक क्षेत्राचा वाटा १९.६ टक्के होता तो २००५-०६ मध्ये ७.७ टक्क्यांपर्यंत कमी झाला. भांडवल निर्मितीत सार्वजनिक क्षेत्राचा वाटा सहाव्या योजनेत ४४.६ टक्के होता तो दहाव्या योजनेत २३.७ टक्के झाला. बचत व भांडवल निर्मितीतील वाटा घटत असला तरी आजही सार्वजनिक क्षेत्राची भूमिका अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

## ३) मूलभूत व पायाभूत उद्योगांची उभारणी :

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकास मूलभूत आणि अवजड उद्योगांच्या विकासावर अवलंबून असतो. देशातील लोह-पोलाद, अभियांत्रिकी, कोळसा, वीजनिर्मिती उपकरणे, खनिज तेल, नैसर्गिक वायू, रसायने, औषधे, रासायनिक खते इत्यादी उद्योगांच्यासाठी उभारणीकरिता प्रचंड भांडवल लागते व त्याच्यापासून लाभ उशिरा मिळतो. म्हणून देशातील खाजगी उद्योजक यात गुंतवणूक करण्यास तयार नसतात. भारतात सर्व मूलभूत आणि अवजड उद्योगात सरकारने स्वत: गुंतवणूक करून मजबूत औद्योगिक पायाची निर्मिती केली आहे. या उद्योगाबरोबरच सरकारने रस्ते, रेल्वे, विमान व जहाज वाहतूक, वीजनिर्मिती, माहिती संचारण इत्यादी मूलभूत सेवा उद्योगातही प्रचंड गुंतवणूक केली आहे. याचा परिणाम म्हणून भारताच्या विकासाची गती वाढली आहे.

## ४) आयात पर्यायीकरण व निर्यात प्रोत्साहन :

भारतासारख्या विकसनशील देशांना नेहमीच परकीय चलनाची समस्या भेडसावते. यावर पर्याय म्हणून भारताने आयात पर्यायीकरण व निर्यात प्रोत्साहनाला प्राधान्य दिले. अवजड यंत्रसामग्री, उपकरणे, रसायने, पेट्रोलजन्य पदार्थ विदेशातून आयात करण्याऐवजी त्यांचे सार्वजनिक क्षेत्रात देशातच उत्पादन घेण्याचा निर्णय झाला. भारत इलेक्ट्रॉनिक्स, हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स, इंडियन ऑईल, ओएनजीसी इत्यादी कंपन्या आयात पर्यायीकरणाच्या हेतूने स्थापन झाल्या. या सर्व कंपन्या यशस्वी झाल्याने आयातीवर खर्च होणाऱ्या विदेशी चलनाची बचत झाली. दुसरीकडे हिंदुस्थान स्टील, हिंदुस्थान मशिन

टूल्स, भारत इलेक्ट्रॉनिक्स, स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन, मिनरल अँड मेटल ट्रेडिंग कॉर्पोरेशन स्थापन करून निर्यातीला प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे निर्यातवाढ झाली.

### ५) मोठ्या प्रमाणवरील उत्पादनाच्या बचती :

उत्पादनाचे प्रमाण जितके मोठे असेल तेवढ्या अंतर्गत व बाह्य बचती निर्माण होऊन सरासरी उत्पादन खर्च कमी येतो. भारतात सार्वजनिक क्षेत्रात ज्या उद्योगांची उभारणी करण्यात आली आहे ते आकारमानाने आणि उत्पादनाच्या मानाने प्रचंड आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे ते मिळवून देत आहेत. त्यामुळे देशाचा लाभ होत आहे.

### ६) प्रादेशिक असमतोल दूर करण्याची भूमिका :

प्रादेशिक असमतोल दूर करण्यात सार्वजनिक क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील लोह-पोलाद उद्योग, रसायने व औषधे उद्योग, रासायनिक खत उद्योग, अवजडयंत्रसामग्री व उपकरणे उद्योग, वीजनिर्मिती उपकरणे, वाहतूक साधने इ. उद्योगांची स्थापना बिहार, ओरिसा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड, छत्तीसगढ, आसाम या औद्योगिकदृष्ट्या मागास राज्यांत करण्यात आली. त्यामुळे प्रादेशिक असमतोल दूर होण्यास मदत झाली आहे.

## ७.२.९ भारताच्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या समस्या :

## (Problems of Public Enterprises in India)

भारतीय सार्वजनिक उद्योगांच्या समस्या आणि उणिवा पुढीलप्रमाणे आहेत.

### १) प्रचंड भांडवली गुंतवणूक :

१९५१ मध्ये सार्वजनिक उद्योगात सरकारने २९ कोटी रुपये गुंतवणूक केली होती. ती २००५-०६ मध्ये ३९३०५७ कोटी रुपयांपर्यंत वाढली. परंतु या उद्योगांमध्ये अदान-प्रदान गुणोत्तर प्रतिकूल आहे. हे गुणोत्तर ३:१ ते ६:१ या दरम्यान आहे. याचा अर्थ एक रुपया किमतीचे उत्पादन करण्यासाठी ३ ते ६ रुपयांपर्यंत गुंतवणूक झाली आहे. भारतासारख्या विकसनशील देशाला भांडवलाचा अपव्यय महाग पडत आहे.

### २) प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब :

बरेच सार्वजनिक उद्योग निर्धारित वेळेत पूर्ण झाले नाहीत. प्रकल्प पूर्ण होण्यास १८ ते २४ महिने जास्त लागले. निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण न झाल्याने खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. ही वाढ १० टक्के ते ९० टक्क्यांपर्यंत झाली.

### ३) उत्पादन क्षमतेचा अपूर्ण उपयोग :

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग चालू करताना तांत्रिक बाबींचा विचार न करता उत्पादन क्षमतेचे लक्ष्य निश्चित करताना काही तरी भव्यदिव्य निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. असे प्रचंड उद्योग चालविण्यासाठी आवश्यक असे तांत्रिक ज्ञान, तंत्रकुशल कामगार, पुरेसे भांडवल आहे की नाही याचा विचार केला जात नाही. त्यामुळे भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योग आपल्या उत्पादनशक्तीचा पुरेपूर उपयोग करू शकत नाहीत. १९९९-२००० मध्ये देशातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांपैकी जवळ जवळ १३ टक्के कारखाने आपल्या क्षमतेचा फक्त ५० ते ७५ टक्के वापर करीत होते, तर २९ टक्के कारखाने उत्पादन शक्तीच्या

५० टक्क्यांपेक्षा कमी वापर करत होते. अकार्यक्षम व्यवस्थापन, कामगार कलह, दैनंदिन व्यवहारात राज्यकारण्यांची ढवळाढवळ व इतर कारणांमुळे हे घडत आहे.

### ४) कार्यक्षम व्यवस्थापनाचा प्रश्न :

सार्वजनिक उद्योगात अनुभवी, तज्ज्ञ व योग्य व्यवस्थापनाचा अभाव जाणवतो. व्यवस्थापनशास्त्राचे ज्ञान, कार्यक्षम, प्रशिक्षित पुरेसे अनुभवी असे व्यवस्थापक सार्वजनिक क्षेत्रासाठी मिळत नाही. अनुभवी नोकरशाही मिळत नाही. त्यामुळे सार्वजनिक प्रकल्पांची कार्यक्षमता व उत्पादकता कमी होते. सरकारी उद्योगात तज्ज्ञ व्यवस्थापकाऐवजी सरकारी नोकर, वशिल्याचे लोक, राजकीय पुढारी यांचा भरणा केल्यामुळे व्यवस्थापन चांगले होत नाही.

### ५) सरकारचा हस्तक्षेप :

या प्रकल्पांच्या दैनंदिन कामकाजात सरकारचा हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे कंपन्यांचे व्यवस्थापन स्वंतत्रपणे निर्णय घेऊ शकत नाही. कामगारांची व अधिकाऱ्यांची नियुक्ती, कच्चा माल खरेदी या सर्वच बाबतीत सरकारी हस्तक्षेप वाढलेला दिसून येतो.

### ६) अतिरिक्त नोकरभरती :

सार्वजनिक उद्योगांना नेमक्या किती कामगारांची गरज आहे, तंत्रज्ञानाची गरज आहे, व्यवस्थापकांची गरज आहे याचा योग्य अभ्यास न करता राजकीय दबावामुळे बहुतांश सार्वजनिक उद्योगांमध्ये अतिरिक्त कामगार भरती झाली. त्यातही असे कामगार घेतले गेले की त्यांनी कोणतेही शिक्षण, प्रशिक्षण घेतलेले नव्हते. त्यामुळे त्यांचा दर्जा सुमार होता. अतिरिक्त कामगारांच्या वेतन, भत्ते, बोनस, निवास व्यवस्था व इतर सवलतींवर प्रचंड खर्च होत राहिल्याने उत्पादन खर्चात वाढ होत गेली.

### ७) वाढता तोटा :

सार्वजनिक क्षेत्रातील बरेच उद्योग तोट्यात चालत आहेत. १९८०-८१ मध्ये सार्वजनिक उद्योगांचा एकूण तोटा २०३ कोटी रुपये होता. आर्थिक सुधारणाकाळात सार्वजनिक उद्योगांनी समाधानकारक प्रगती केल्याने तोट्यात घट झाली. २०००-०१ मध्ये तोटा १२८४१ कोटी रुपयांचा होता. तो २००५-०६ मध्ये ५९५२ कोटी रुपयांपर्यंत कमी झाला. अर्थात तोटा कमी होण्याचे कारण सरकारने किमतीवरील नियंत्रण हटविणे आणि किंमत वाढ करणे हे आहे.

### ८) इतर समस्या :

सार्वजनिक उद्योगांवर सरकारचे संपूर्ण नियंत्रण असल्याने शासकीय यंत्रणेतील सर्व दोष या उद्योगांमध्ये शिरले. निर्णय घेण्यातील विलंब, लालफितीचा कारभार, अंमलबजावणीतील विलंब, स्वायत्ततेचा अभाव, राजकीय शक्तीचा प्रभाव, नोकरभरती, उत्पादन विक्रीतील भ्रष्टाचार इत्यादींमुळे सार्वजनिक उद्योगांसमोर समस्या निर्माण झाल्या आहेत.

## ७.२.१० निर्गुंतवणूक धोरण : (Disinvestment Policy)

### निर्गुंतवणुकीचा अर्थ

निर्गुंतवणुकीचा मर्यादित अर्थ घेतल्यास सार्वजनिक मालकी असलेल्या उद्योगातील सरकारच्या मालकीचे भांडवल टप्प्याटप्प्याने कमी करणे होय. सरकारी भांडवलाचा वाटा २६ टक्के, ४९ टक्के आणि शेवटी ७४ टक्क्यांपर्यंत कमी करणे होय. जे उद्योग महत्त्वाचे वाटतील त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि

व्यवस्थापकीय निर्णय वर्चस्व ठेवण्यासाठी सरकारी भांडवलाचा वाटा ५१ टक्क्यांपर्यंत ठेवला जातो. निर्गुंतवणूक माध्यमातून खाजगी क्षेत्राचा वाटा २६ टक्के, ५१ टक्के आणि ७४ टक्क्यांपर्यंत वाढविला जातो.

## निर्गुंतवणुकीकरणाचे हेतू :

१) सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रात निकोप स्पर्धा वाढीस लागण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात खाजगी क्षेत्राचा वाटा वाढविणे यातून सार्वजनिक क्षेत्राची कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढण्यास मदत ठरणे.

२) सरकारी भांडवलाचा वाटा कमी झाल्यास सार्वजनिक उद्योगांना संयुक्त भांडवली कंपन्यांचे स्वरूप येईल. त्यातून त्यांची बाजारातील गतिशीलता वाढण्यास मदत ठरणे.

३) सार्वजनिक उद्योगांचे सरकारवरील अवलंबित्व कमी करणे.

४) सार्वजनिक उद्योगांवरील सरकारी नियंत्रणे कमी करून त्यांच्या कामगिरीत सुधारणा करणे.

५) निर्गुंतवणूक माध्यमातून जे भांडवल उभारले जाईल ते सरकारची वित्तीय तूट भरून काढण्यासाठी वापरणे किंवा विकासात्मक योजना राबविण्यासाठी उपयोगात आणणे.

## निर्गुंतवणूक आयोगाची स्थापना :

१९९१ च्या धोरणात कोणत्या सार्वजनिक उद्योगातील किती सरकारी भागभांडवलाचा वाटा कमी करावाचा या बाबत धोरण, नियम आणि अटी ठरविण्यासाठी केंद्र सरकारमार्फत निर्गुंतवणूक आयोगाची ऑगस्ट १९९६ मध्ये स्थापना करण्यात आली.

डिसेंबर २००२ मध्ये मा. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी सरकारने आपले निर्गुंतवणूक धोरण जाहीर केले.

मा. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी सरकारचे निर्गुंतवणूक धोरण :

डिसेंबर २००२ मध्ये हे धोरण जाहीर करण्यात आले. त्याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१) सार्वजनिक उद्योगांचे आधुनिकीकरण आणि विकास करणे.

२) नवीन मालमत्तेची निर्मिती करणे.

३) रोजगार निर्मितीस प्राधान्य देणे.

४) सरकारी कर्जे समाप्त करणे.

५) निर्गुंतवणूक उत्पन्न निधी स्थापन करणे.

६) नैसर्गिक मालमत्ता कंपनीच्या निर्गुंतवणुकीसाठी दिशा निर्देश तयार करणे.

## मा. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग सरकारचे निर्गुंतवणूक धोरण :

जुलै १९९१ पासून सुरू झालेले निर्गुंतवणुकीचे धोरण डॉ. मनमोहनसिंग सरकारने पुढे चालू ठेवले. मे २००४ मध्ये हे धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणात पुढील निर्णय घेण्यात आले.

१) खाजगीकरण आणि निर्गुंतवणूक धोरणात संपूर्ण पारदर्शकता असेल.

२) लाभ प्राप्त करणाऱ्या उद्योगांना नवरत्नांचा दर्जा बहाल करणे. त्यांना अधिक स्वायत्तता प्रदान करणे.

३) आजारी उद्योगांची पुनर्उभारणी व आधुनिकीकरण करणे. ज्यांची पुनर्बांधणी शक्य नाही ते उद्योग बंद करणे.

४) खाजगीकरण आणि निर्गुंतवणूक धोरणात संपूर्ण पारदर्शकता निर्माण करणे.

### ७.२.११ निर्गुंतवणूक धोरणाचे फलीत :

**सार्वजनिक उपयोगातील निर्गुंतवणूक (कोटी रुपयात)**

| वर्ष | शेअरची विक्री करण्यात आलेल्या उद्योगांची संख्या | गुंतवणूक लक्ष्य | प्रत्यक्षातील प्राप्ती |
|---|---|---|---|
| १९९१-९२ | ४७ | २५०० | ३०३७.७४ |
| १९९२-९३ | २९ | २५०० | १९१२.५१ |
| १९९३-९४ | - | ३५०० | ०० |
| १९९४-९५ | १७ | ४००० | ४८४२.१० |
| १९९५-९६ | ०५ | ७००० | १६८.४८ |
| १९९६-९७ | ०१ | ५००० | ३७९.६७ |
| १९९७-९८ | ०१ | ४८०० | ९१०.०० |
| १९९८-९९ | ०५ | ५००० | ५३७१.०० |
| १९९९-२००० | ०५ | १०,००० | १८६०.१४ |
| २०००-२००१ | ०५ | १०,००० | १८७१.२६ |
| २००१-०२ | ०८ | १२००० | ५६५७.६९ |
| २००२-०३ | ०८ | १२००० | ३३४७.९८ |
| २००३-०४ | ०२ | १४५०० | १५५४७.४१ |
| २००४-०५ | ०३ | ४००० | २७६४.८७ |
| २००५-०६ | - | लक्ष्य नाही | १५६९.६८ |
| २००६-०७ | - | लक्ष्य नाही | - |
| २००७-०८ | - | - | २३६६.९३ |
| एकूण | - | ९६८०० | ५१६०८.५८ |

**स्रोत भारतीय अर्थव्यवस्था - मिश्रा, पुरी**

जुलै १९९१ ते मार्च २००८ पर्यंत भारतातील सार्वजनिक उद्योगांमधील ९६८०० कोटी रुपये भांडवलाची निर्गुंतवणूक करण्याचे लक्ष्य होते. प्रत्यक्षात मात्र ५१६०८.५८ कोटी रुपयांची निर्गुंतवणूक झाली. निर्धारित लक्ष्याच्या ५३.३१ टक्के निर्गुंतवणूक झाली. आर्थिक सुधारणा काळात सरकारने निर्गुंतवणूक करण्याचा सपाटाच लावला, परंतु सरकारला यात फारसे यश आले नाही.

## ७.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

### प्र.१ एका वाक्यात उत्तरे द्या.

१) औद्योगिकीकरण म्हणजे काय?

२) लघुउद्योग म्हणजे काय?

३) लघुउद्योगाच्या दोन समस्या सांगा.

४) सार्वजनिक क्षेत्र म्हणजे काय?

५) निर्गुंतवणूक म्हणजे काय?

### प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा.

१) लघुउद्योगांच्या समस्यांची चर्चा करा.

२) १९९१च्या औद्योगिक धोरणांची उद्दिष्टे सांगा.

३) आबिद हुसेन समिती.

४) निर्गुंतवणूक धोरणाची चर्चा करा.

### प्र.३ दीर्घोत्तरी प्रश्न.

१) औद्योगिकीकरणाचा कार्यभाग, भूमिका विषद करा.

२) लघुउद्योगांचा कार्यभाग सांगा.

३) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची भूमिका व कार्यभागाची चर्चा करा.

४) लघुउद्योगांबाबत सरकारच्या धोरणाचा आढावा घ्या.

## ७.४ सारांश

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारतात सोन्याचा धूर निघत होता अशी सुबत्ता व संपन्नता होती असे म्हटले जाते. पूर्वी भारतात अत्यंत कुशल कारागीर अस्तित्वात होते. त्या काळात भारतात अत्यंत तलम कापड उत्पादित केले जात होते. त्याला जगात विविध देशांकडून मागणी होती, परंतु बिटिशांच्या काळात भारतातील हस्तोद्योग आणि कुटीरोद्योगांचा ऱ्हास झाला. ग्रामीण कारागिरी संपुष्टात आली. कारण ब्रिटनच्या कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तूंशी भारतीय वस्तूंना स्पर्धा करावी लागली. त्यामुळे भारतीय उद्योग या स्पर्धेत टिकू शकले नाहीत. ब्रिटिशांनी भारताकडे कच्च्या मालाची हक्काची बाजारपेठ आणि पक्क्या मालाच्या विक्रीची हमीची बाजारपेठ या दृष्टीनेच पाहिले.

भारतात आधुनिक उद्योगांची स्थापना १८५०च्या जवळपास झाली होती. ब्रिटिशांनी भारतीय उद्योगांचा फारसा विकास केला नाही. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर भारताच्या औद्योगिकीकरणाचा वेग वाढला. स्वातंत्र्यप्राप्ती वेळेस औद्योगिकदृष्ट्या एक मागास अर्थव्यवस्था, भांडवली व काही उपभोग्य वस्तूंच्या बाबत पूर्णत: दुसऱ्यावर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था, कृषिप्रधान अर्थव्यवस्था होती. पण आज बऱ्यापैकी औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेली अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेकडे पाहिले जाते. जरी भारतीय अर्थव्यवस्था पूर्णत: औद्योगिकदृष्ट्या प्रगत नसली तरी औद्योगिक विकासात सातत्य आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात मोठ्या तसेच सार्वजनिक उद्योगांबरोबर लघुउद्योगांचेही महत्त्व औद्योगिक विकासात अनन्य साधारण आहे. औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेत श्रमप्रधान असणाऱ्या लघुउद्योगांना अनेक समस्यांना, अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अनेक लघुउद्योग बंद किंवा आजारी पडत आहेत. सरकारने हे उद्योग स्पर्धेत टिकून राहावेत म्हणून अनेक सवलती दिल्या आहेत. तरीही लघुउद्योगांच्या विकासाला अनुकूल परिस्थिती आजही दिसत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्पांचा मोठ्या प्रमाणात विकास व विस्तार करण्यात आला. या उद्योगांची निर्मिती प्रामुख्याने मूलभूत व पायाभूत सेवा सुविधा निर्माण करण्यासाठी करण्यात आली, परंतु हे उद्योग देखील दफ्तरदिरंगाई, निर्णय क्षमतेचा अभाव, प्रचंड भांडवल गुंतवणूक, तोट्याचे वाढते प्रमाण, अतिरिक्त कर्मचारी भरती, अकार्यक्षम व्यवस्थापन इत्यादी कारणांमुळे अडचणीत आले आहेत. त्यामुळे १९९१च्या नवीन आर्थिक सुधारणांनुसार या उद्योगांपैकी जे उद्योग तोट्यात आहेत त्यांचे निर्गुंतवणुकीकरण केले जात आहे. खाजगी क्षेत्राला हे उद्योग गुंतवणुकीसाठी खुले केले जात आहेत. यासाठी सरकारने निर्गुंतवणूक आयोगाची स्थापना केली आहे. निर्गुंतवणुकीतून मिळणारे भांडवल देशातील विकासासाठी खर्च केले जाणार असल्याने आर्थिक विकासाची गती वाढण्यास मदत होईल यात शंका नाही.

भारत सरकारने औद्योगिक विकासाची गती वाढावी यासाठी नियोजन काळात औद्योगिक धोरणाची आखणी केली हे जरी असले तरी आजही भारताच्या औद्योगिक विकासाची गती मंद आहे, हे मात्र सत्य आहे.

## ७.५ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

- औद्योगिकीकरण – कारखान्यामध्ये यंत्रसामग्रीच्या साहाय्याने उत्पादन करणे.
- औद्योगिकीकरणाचा कार्यभाग – अर्थव्यवस्थेतील औद्योगिकीकरणाची भूमिका.
- औद्योगिक धोरण – देशातील उद्योगांच्या विकासासाठी व विस्तारासाठी आखलेले सरकारी धोरण.
- निर्गुंतवणूक – सरकारी उद्योगातील सरकारी गुंतवणूक म्हणजे भांडवल काढून घेणे, कमी करणे.

## ७.६ संदर्भसूची (Bibliography)

१) डॉ. वसुधा पाटील (२००८) 'भारतीय अर्थव्यवस्था', औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स, पृष्ठ क्र. ३०१, ३१९, ३२४, ३२५.

२) प्रा. एन. एल. चव्हाण (२००३) 'भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग १', जळगाव, प्रशांत पब्लिकेशन, पृष्ठ क्र. ३३२, ३३३, ३७९.

३) डॉ. मुकुंद महाजन (१९९८) 'भारताची अर्थरचना', जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र. १०२, १०३.

४) प्रा. एन. एल. चव्हाण (२००९) 'भारतीय अर्थव्यवस्था', जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र. २१८, २२, २४६, २४७, २४९ ते २५६, २६१ ते २६३.

५) मिश्रा पुरी (२००८) इंडियन इकॉनॉमी, मुंबई, हिमालयाज पब्लिकेशन, पृष्ठ क्र. ४२०

## ७.७ सरावासाठी प्रश्न

१) औद्योगिकीकरण म्हणजे काय? भारतीय अर्थव्यवस्थेत औद्योगिकीकरणाचे महत्त्वा कार्यभाग सांगा.

२) लघुउद्योगांचा अर्थ सांगून लघुउद्योगाच्या समस्यांची चर्चा करा.

३) सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्पाच्या समस्या व महत्त्व स्पष्ट करा.

४) निर्गुंतवणूक धोरणाची चर्चा करा.

# घटक : ८
# भारतातील नियोजन
# (Planning in India)

**अनुक्रमणिका**

८.० **उद्दिष्टे** (Objectives)
८.१ **प्रस्तावना** (Introduction)
८.२ **विषय विवेचन** (Suject Explanation)
८.२.१ **नियोजनाची उद्दिष्टे** (Objective of Planning)
८.२.२ **नियोजनाचे यशापयश** (Acievements and failures of Planning)
८.२.३ **पंचवार्षिक योजना (११वी)**
**अ) उद्देश**
**ब) इष्टांक**
**क) अकराव्या योजनेतील संसाधनांचे वाटप**
८.३ **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न** (Questions for self Learning)
८.४ **सारांश** (Summary)
८.५ **पारिभाषिक शब्द शब्दार्थ** (Glossary)
८.६ **संदर्भ सूची** (Bibliography)

## ८.० उद्दिष्टे –

या घटकाच्या अध्ययनानंतर आपणास
१. नियोजनाचा अर्थ सांगता येईल.
२. नियोजनाची आवश्यकता का आहे ते समजेल.
३. नियोजनाची उद्दिष्टे कोणती ते सांगता येईल.
४. नियोजनाला कितपत यश मिळाले याबाबत माहिती मिळेल.
५. नियोजनाला आलेल्या अपयशाची जाणीव होईल.
६. अकराव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे आणि इष्टीक कोणते आहेत, ते सांगता येईल.
७. अकराव्या पंचवार्षिक योजनेत साधनसामग्रीचे वाटप कसे झाले आहे याबाबत माहिती मिळेल.

## ८.१ प्रस्तावना(Introduction)

जगात प्रचलित असलेल्या भांडवलशाही आणि समाजवादी या दोन्ही अर्थव्यवस्थांचे मिश्र प्रारूप भारतीय अर्थव्यवस्थेने स्वीकारलेले आहे. म्हणून भारताची अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. समाजवादी अर्थव्यवस्थेत नियोजनाच्या मार्गाचा अवलंब केला जात असून नियोजन अपरिहार्य असते. परंतु नियोजन असलेली अर्थव्यवस्था समाजवादी असतेच असे मात्र मुळीच नाही. समाजवादी अर्थव्यवस्थेत संपूर्ण

अर्थव्यवस्थेचा आढावा घेऊन उत्पादन विषयक निर्णय घेण्याचे काम नियोजन मंडळ करत असते. कारण उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या मालकीची असल्याने सरकारलाच उत्पादनासंबंधी, विभाजनासंबंधी आणि अन्य आर्थिक निर्णय घ्यावे लागतात. अशा प्रकारचे निर्णय घेण्यासाठी व त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी समाजवादी अर्थव्यवस्थेत नियोजन मंडळ आवश्यक असते.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मात्र नियोजनाला फार महत्त्वाचे स्थान नाही. पूर्वीच्या अॅडम स्मिथप्रणित भांडवलशाहीत सरकारी हस्तक्षेप, नियंत्रण आणि नियोजनाला थारा नव्हता. कारण प्रत्येक व्यक्ती स्वहिताच्या प्रेरणेतून योग्य निर्णय घेऊ शकते. व आपले हित साधू शकते. समाज व्यक्तीं मिळून बनलेला असतो म्हणून व्यक्ती हितातून समाजहित साधले जाईल, असा विश्वास होता. व्यक्तीचे खाजगी निर्णय आणि नियोजन यातच स्वहिताबरोबर समाजहित साधले जात असल्याने भांडवलशाहीत नियोजन आणि नियंत्रणाची आवश्यकता मानली जात नव्हती. अशा अनियंत्रित आणि अनियोजित अर्थव्यवस्थेचा स्वीकार अनेक भांडवलशाही राष्ट्रांनी केला होता. परंतु आज कोणतेही भांडवलशाही राष्ट्र नियंत्रण किंवा नियोजन रहित नाही. कारण नियोजनरहित आणि नियंत्रणरहित अर्थव्यवस्थेत अनेक दोष अनुभवास आले. आर्थिक विषमता, बेकारी, आर्थिक अस्थैर्य असे प्रश्न वारंवार निर्माण होत राहीले. १९२९ च्या जागतिक महामंदीच्या संकटामुळे निर्हस्तक्षेपी किंवा अनियंत्रित आणि अनियोजित भांडवलशाहीवरचा विश्वास उडाला. आणि नियंत्रित किंवा नियोजित भांडवलशाहीचा उदय झाला. आज जगातील भांडवलशाही राष्ट्रांनीही समाजवादी अर्थव्यवस्थांप्रमाणे नियोजनाचा स्वीकार केला आहे. अर्थात समाजवादी अर्थव्यवस्थांच्या नियोजनापेक्षा भांडवलशाही अर्थव्यवस्थांचे नियोजन वेगळे आहे.

तात्पर्य, समाजवादी आणि भांडवलशाही या दोन्ही प्रकारच्या अर्थप्रणालीत नियोजनाला स्थान असताना दोन्ही अर्थव्यवस्थांचे मिश्रण असलेल्या भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेतही नियोजन अपरिहार्य ठरते.

प्रस्तुत प्रकरणात नियोजन म्हणजे काय? स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेऊन भारताला नियोजन का आवश्यक होते? भारतीय नियोजनाची उद्दिष्टे कोणती? संपूर्ण आर्थिक नियोजनाचे योगयानिहाय डावपेच इ. गोष्टींवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. तसेच भारताच्या नियोजनाला साठ वर्षांपेक्षा अधिक कालावधी लोटलेला आहे. या काळात भारताच्या नियोजनाने काय साधले याबाबतचा आढावा नियोजनाचे यशापयश या स्वरूपात मांडलेला आहे. नुकत्याच पूर्ण झालेल्या अकराव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे व इष्टिक तसेच योजनेच्या संसाधनाचे अगर एकूण खर्चाचे वाटप विविध क्षेत्रात कसे झाले, कोणत्या क्षेत्रावर अधिक भर देण्यात आला या संबंधी चर्चा सदर प्रकरणात करण्यात आलेली आहे.

## ८.२ **विषय विवेचन** (Subject Explanation)

### ८.२.१ **नियोजनाची उद्दिष्टे** (Objectives of Planning)

नियोजनाची उद्दिष्टे समजून घेण्याआधी नियोजन म्हणजे काय? नियोजनाची आवश्यकता काय? विशेषत: भारताला नियोजन आवश्यक का आहे? या गोष्टी प्रथम समजून घेणे आवश्यक आहे.

प्रत्येक व्यक्ती आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी काही उद्दिष्टे ठरविते. ती उद्दिष्टे ठराविक काळात पूर्ण करण्यासाठी जे शिस्तबद्ध प्रयत्न करते त्यास नियोजन असे म्हणतात.

जसे व्यक्तीचे आपल्या भविष्यकालीन यशस्वी जीवनासाठी खाजगी नियोजन असते तसेच राष्ट्रीय पातळीवरही सरकारला आर्थिक स्थैर्य आणि आर्थिक विकास यासाठी नियोजन आवश्यक असते.

आर्थिक नियोजन म्हणजे काय? हे पुढील व्याख्यांवरून स्पष्ट करता येईल.

१) **प्रा. रॉबिन्सची व्याख्या –** संपूर्ण आर्थिक जीवन नियोजनाने व्यापलेले आहे. नियोजन करणे म्हणजे विशिष्ट अभिवचनाने, उद्देशाने कार्य करणे आणि निवड करणे होय. निवड हे आर्थिक क्रियांचे सार होय.

२) **एच.डी. डिकीन्सनची व्याख्या –** आर्थिक नियोजन म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेचा तपशीलवार आढावा घेऊन कोणत्या वस्तू व सेवांचे किती प्रमाणात, कोठे आणि कसे उत्पादन करावयाचे, ते कोठे वितरित करावयाचे असे महत्त्वाचे आर्थिक निर्णय निश्चित अशा सत्ताधारी समितीने जाणिवपूर्वक घेणे होय.

३) **भारतीय नियोजन मंडळाची व्याख्या –** आर्थिक नियोजन म्हणजे निश्चित केलेल्या सामाजिक उद्देशाच्या संदर्भात महत्तम हितासाठी साधनांची जुळवाजुळव आणि वापर करण्याचा एक मार्ग होय.

वरील व्याख्यांचा संदर्भ लक्षात घेऊन आर्थिक नियोजनाची सोपी व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येईल.

विशिष्ट कालावधीत ठराविक उद्दिष्टे साध्य करण्याच्या हेतूने राष्ट्रातील एकंदर साधन संपत्तीचा जास्तीत जास्त फायदेशीर उपयोग करून घेण्यासाठी योजना आखणे व त्यांची अंमलबजावणी करणे म्हणजे आर्थिक नियोजन होय.

**नियोजनाची आवश्यकता –**

सर्वच राष्ट्रांना कमी अधिक प्रमाणात पुढील निरनिराळ्या कारणांसाठी नियोजनाची आवश्यकता असते.

१) देशातील उपलब्ध साधनसामुग्रीचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करून महत्तम उत्पादन करणे.

२) काही थोड्या लोकांच्या हातात देशाच्या आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ न देणे.

३) उत्पन्न आणि संपत्तीची विषमता कमी करून लोकांना आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळवून देणे.

४) लोकांना किमान राहणीमानाचा दर्जा मिळवून देऊन त्यांच्या राहणीमानात उत्तरोत्तर सुधारणा घडवून आणणे.

५) रोजगाराच्या संधीत वाढ करणे.

६) देशातील उत्पादक साधनांचा अपव्यय टाळून आर्थिक विकासाची गती वाढविणे.

७) अर्थव्यवस्थेत स्थैर्य निर्माण करणे.

मुक्त अर्थव्यवस्थेत संपत्तीचे केंद्रीकरण, आर्थिक विषमता, बेरोजगारी, साधनांचा अपव्यय व आर्थिक अस्थिरता असे विविध दोष आढळून येतात. ते दूर करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता असते.

**भारताला नियोजनाची आवश्यकता –**

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले त्यावेळी भारताची स्थिती मागासलेली होती. दारिद्र्य ही अत्यंत गंभीर समस्या होती. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी होते. देशातील जनतेला अन्न, वस्त्र, निवारा या किमान आवश्यक गरजा भागविणे देखील कठीण होते. शेतीची उत्पादकता अत्यंत कमी होती. ८०% पेक्षा अधिक लोक शेतीवरच अवलंबून होते. शेतीवर अतिरिक्त भार पडल्यामुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न पुरेसे नव्हते. एकंदरीत देशातील लोकांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची होती. लोकसंख्येबरोबर बेरोजगारीतही वाढ होत होती. ४०% पेक्षा अधिक लोक दारिद्र्येरेषेखाली जीवन जगत होते. या सर्व संकटातून देशाला बाहेर काढण्यासाठी भांडवलशाही अर्थव्यवस्था (ज्यात नियोजनाला वाव नसतो) असमर्थ होती. जनतेच्या राहणीमानात वाढ करून आपल्या देशाची आर्थिक सामाजिक आणि नैतिक उन्नती करण्याची शक्ती केवळ सर्वव्यापी नियोजनात आहे. यावर सर्वच विद्वानांचे एकमत झाले. त्यानुसार भारतीय नियोजनाची आखणी करण्यात आली.

## भारतातील आर्थिक नियोजनाची पार्श्वभूमी :

स्वातंत्र्यपूर्व काळातही भारताच्या आर्थिक नियोजनाची आवश्यकता वेळोवेळी विद्वानांनी व्यक्त केलेली दिसून येते.

श्री. एम. विश्वेश्वरैया यांनी १९३४ मध्ये भारतासाठी नियोजित अर्थव्यवस्था (Planned Economy for India) हे पुस्तक लिहून भारतासाठी आर्थिक नियोजनाची आवश्यकता असल्याचे प्रथम प्रतिपादन केले. यानंतर १९३८ मध्ये नियोजनाचे देशातील महत्त्व ओळखून राष्ट्रीय नियोजन समितीची (National Planning Committee) स्थापना करण्यात आली होती. दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाल्यानंतर तत्कालीन भारत सरकारने १९४१ पासूनच युद्धानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्बांधणी कशी करावी याबाबत अंशिक स्वरूपाच्या योजना आखण्यास सुरुवात केली होती. इ.स. १९४४ मध्ये सर अदैशिक दलाल यांच्या नेतृत्वाखाली 'नियोजन आणि विकास' हे नवीन खाते भारत सरकारने सुरू केले. प्रादेशिक सरकारांना देखील नियोजन संघटनांची स्थापना करून स्वत:च्या पंचवार्षिक योजना तयार करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु देशासाठी समग्र स्वरूपाची आणि सर्वांगीण अशी योजना तयार करण्याच्या दृष्टीने मात्र या कालावधीत प्रयत्न करण्यात आले नाहीत. काही खाजगी संस्थांनी देशव्यापी नियोजनाची योजना तयार करण्याचा प्रयत्न केला होता. यात पंधरा वर्षांत दरडोई वार्षिक उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने तयार केलेली उद्योगपतींची 'मुंबई योजना', मानवी मूल्यांवर भर देणारी आणि उद्योगांचे विकेंद्रीकरण करून ग्रामराज्याची स्थापना करण्याची उद्दिष्टे समोर ठेवून श्री. अगरवाल यांनी तयार केलेली 'गांधी योजना', उद्योग आणि शेती यांचे राष्ट्रीयीकरण करून कामगारांचा आणि देशाचा आर्थिक विकास साधणारी श्री. रॉय यांची 'जनता योजना' अशा काही प्रमुख योजनांचा उल्लेख करता येईल. अर्थात या योजनांना सरकारचा पाठिंबा न मिळण्याने त्यांची कार्यवाही झाली नाही. परंतु या सर्व प्रयत्नांमुळे आणि विविध योजना जनतेसमोर आल्यामुळे देशातील जनतेला नियोजनाचे महत्त्व पटले. पुढे स्वातंत्र्यानंतर नियोजन मंडळाची स्थापना होऊन देशात नियोजनाचे पर्व सुरू झाले.

## नियोजन मंडळाची स्थापना –

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियोजनाच्या मागणीला सर्वच पातळीवरून प्रयत्न होऊ लागले. देशाच्या नवनिर्मित सरकारने देखील यात लक्ष घातले. १९ जानेवारी १९५० रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीने भारताच्या आर्थिक विकासाची योजना आखण्यासाठी नियोजन मंडळ (Planning Commission) नेमण्याची शिफारस भारत सरकारला केली. नियोजन मंडळ हे सरकारी प्रेरणेने आणि सरकारी पाठिंब्यावरच कार्य करीत असल्याने काँग्रेस कमिटीने केलेली ही मागणी सरकारने मान्य केली. त्यानुसार तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची स्थापना १५ मार्च १९५० रोजी करण्यात आली. २८ मार्च १९५० रोजी या मंडळाची पहिली बैठक होऊन नियोजन मंडळाच्या कार्याला सुरुवात झाली.

## भारताच्या आर्थिक नियोजनाची वैशिष्ट्ये

**१) नियोजन मंडळ –** देशाचे पंतप्रधान हे नियोजनमंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. उपाध्यक्ष्यांसह पूर्णवेळ काम करणारे चार सदस्य आणि केंद्रसरकारातील नियोजन, अर्थ आणि संरक्षण या चार खात्यांचे मंत्री नियोजनमंडळाचे सदस्य असतात. याशिवाय नियोजन मंत्र्यांना साहाय्य करण्यासाठी एक उपमंत्री व संसदीय सेक्रेटरी असतात. मंत्रिमंडळाचे सांख्यिकीय सल्लागार हे सुद्धा नियोजन मंडळाचे सदस्य असतात. घटनेत नियोजन मंडळाचा कुठेही उल्लेख नाही. म्हणून भारतीय नियोजन मंडळाचे स्वरूप असंवैधानिक किंवा घटनाबाह्य असे असून सभासद संख्या किती असावी हे निश्चित नाही.

**२) उद्दीष्ट –** नियोजनाची आखणी करताना प्रथम उद्दिष्टे ठरविली जातात. कृषी विकास, औद्योगिक विकास, ग्रामीण विकास, समतोल प्रादेशिक विकास, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे, पायाभूत सुविधांची निर्मिती करणे, पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे, दारिद्र्य निर्मूलन करणे अशी उद्दिष्टे निश्चित केली जातात.

**३) इष्टांक –** उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी इष्टांक ठरविले जातात. राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, कृषी विकास औद्योगिक विकास, ग्रामीण विकास, दारिद्र्य निर्मूलन यांचा विकास कोणत्या दराने करावयाचा याबाबत इष्टांक ठरविले जातात.

**४) योजनेची आखणी –** उद्दिष्टे आणि इष्टांक ठरविल्यानंतर नियोजनमंडळाकडून घटकराज्यांना तसेच जिल्हा पातळीवर आपआपल्या योजनांचा आराखडा तयार करण्यात सांगण्यात येतो. राज्यांकडून आलेल्या आराखड्यांच्या आधारे राष्ट्रीय पातळीवर योजनेची आखणी केली जाते.

**५) योजनेला परवानगी –** योजनेचा आराखडा तयार झाल्यानंतर राज्य सरकारे आपल्या राज्यातील साधनसामुग्री, अग्रक्रम विचारात घेतात. तसेच जिल्ह्यांकडून आलेल्या योजनांचा अभ्यास करतात. जिल्हा योजनांमध्ये आवश्यक ते बदल करून राज्यासाठी योजनेचा आराखडा तयार केला जातो. राज्यांचा हा आराखडा नियोजन मंडळाकडे पाठविला जातो.

**६) योजनेची कार्यवाही –** नियोजन मंडळ ही संघटना फक्त सल्ला देण्याचे कार्य करते. योजनेची कार्यवाही मंत्रालयाकडून केली जाते. केंद्र सरकार त्यासाठी कर्जे, सोयी, सुविधा, अनुदान, आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देत असते. भारतात नियोजनाचा कालावधी पाच वर्षाचा असतो. निश्चित केलेली उद्दिष्टे पाच वर्षांत पूर्ण करावयाची असतात.

## आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे –

सर्वसाधारणपणे सर्वच देशांच्या आर्थिक नियोजनाची आर्थिक विकास, पूर्ण रोजगार व आर्थिक स्थैर्य इ. उद्दिष्टे देशाच्या गरजेनुसार, कालावधीनुसार, आर्थिक प्रश्नांच्या स्वरूपानुसार आणि तीव्रतेनुसार तसेच साधनसामुग्रीच्या उपलब्धतेनुसार भिन्न असतात. भारतात सर्वसाधारणपणे पुढील उद्दिष्टांना प्राधान्य दिले जाते.

**१)राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे –** राष्ट्रीय उत्पन्न उच्च पातळीला असणे किंवा दरडोई उत्पन्न अधिक असणे हे आर्थिक विकासाचे निकष मानले जातात. म्हणून उपलब्ध साधनसामुग्रीचा जास्तीत जास्त वापर करून उत्पादनात आणि उत्पन्नात वाढ घडवून आणणे हे देशाच्या आर्थिक नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट असते. दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे हे उपउद्दिष्ट निश्चित केले जाते.

**२)बेरोजगारी कमी करणे –** पूर्ण रोजगार प्राप्त करणे हे कोणत्याही अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. साधनसामुग्रीच्या वापरातूनच आर्थिक विकास घडून येतो. केवळ श्रम हा घटकच नव्हे तर कोणतीही उत्पादनाची साधने निष्क्रिय अवस्थेत पडून राहणे म्हणजे ती साधने बेकार राहणे किंवा साधनसामुग्रीचा अपव्यय होय. लोकसंख्या वाढीतून श्रमपुरवठ्यात, तसेच मानवी संसाधनात वाढ होत जाते. वाढत्या श्रमिकांना अन्य उत्पादनाचे घटक वापरून रोजगार पुरविणे, त्यात वाढ करणे हे नियोजनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट असते.

**३)दारिद्र्याचे निर्मूलन करणे –** दारिद्र्याचे मूळ बेरोजगारीत असते. बेरोजगारी कमी करण्यात जसजसे यश मिळत जाते तसतसे दारिद्र्यही कमी होते. दारिद्र्याचा आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होतो. म्हणून दारिद्र्याचे निर्मूलन करणे हे आर्थिक नियोजनाचे उद्दिष्ट ठरविले जाते.

**४) आर्थिक विषमता कमी करणे –** साधनसामग्रीच्या मालकी हक्कामुळे अर्थव्यवस्थेत गरीब आणि श्रीमंत असे दोन वर्ग निर्माण होतात. या दोन वर्गातील अंतर कमी करणे हे नियोजनाचे उद्दिष्ट मानले जाते. यासाठी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना आणि बेरोजगारांना रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्यास गरीब आणि श्रीमंतामधील अंतर कमी होऊन आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.

**५) आर्थिक स्थैर्य निर्माण करणे –** मागणी पुरठयातील असमतोलामुळे किंमतीत सतत चढउतार होत असतात. व्यापार चक्रे निर्माण होऊन अर्थव्यवस्थेत अस्थैर्य निर्माण होते. कारण व्यापार चक्राचा देशातील उत्पादन पातळी, रोजगार पातळी यावर विपरीत परिणाम होतो. तसेच लोकांच्या मौद्रिक आणि वास्तव उत्पन्नावरही परिणाम होतो. हे टाळण्यासाठी आर्थिक स्थैर्य आणि किंमत स्थैर्य हे नियोजनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट मानले जाते.

**६) स्वयंपूर्णता आणि स्वावलंबन निर्माण करणे –** आर्थिक विकासाबाबत इतर देशांवरील अवलंबित्व कमी करून यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान, कच्चा माल, अन्नधान्य, उपभोग्य वस्तू, संरक्षणसाहित्य इत्यादी बाबत देशाला स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी करणे हे नियोजनाचे उद्दिष्ट असते.

**७) प्रादेशिक असमतोल दूर करणे –** देशातील कृषीक्षेत्र, उद्योगक्षेत्र, वाहतूक व दळणवळण विमा व वित्तक्षेत्र या सर्वांचा संतुलीत विकास घडवून आणणे तसेच देशातील विविध प्रदेश घटक राज्ये व केंद्रशासीत प्रदेश यांचाही संतुलीत विकास घडवून आणणे.

**८) आधुनिकीकरण –** आजच्या जागतिकीकरणाच्या युगात जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवीन संशोधन यांच्या साहाय्याने उत्पादन क्षमतेत वाढ घडवून आणणे, लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे यासाठी सातव्या पंचवार्षिक योजनेपासून आधुनिकीकरण घडवून आणणे हे एक आर्थिक नियोजनाचे उद्दिष्ट मानण्यात येऊ लागले.

**९) पर्यावरणाचे संरक्षण करणे –** जलद आर्थिक विकासासाठी आणि लोकांच्या भौतिक सुखासाठी नैसर्गिक साधनसामुग्रीचा अमर्याद वापर केला जातो. त्यातून पर्यावरणाचा नैसर्गिक समतोल बिघडत जातो. पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे आणि पर्यावरणाचे संवर्धन करणे हे अलीकडील काळात नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट समजले जाते.

## पंचवार्षिक योजनांचे डावपेच

भारतात १९५१ पासून नियोजनाला सुरुवात झाली आतापर्यंत अकरा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या. १२ व्या योजनेला सुरुवात झाली. २०१२ ते २०१७ असा १२ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी आहे. भारतात योजनेचा कालावधी ५ वर्षांसाठी निश्चित करण्यात आलेला आहे. नियोजनाला सुरुवात होऊन ६२ वर्षांचा कालावधी होऊनही ५ वर्षांप्रमाणे १२ योजना पूर्ण होऊन १३ व्या योजनेला सुरुवात झाली असती. परंतु सलग योजना सुरू न झाल्यामुळे १२ वी योजना एप्रिल २०१२ पासून सुरू झाली आहे.

३ री पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्यानंतर १९६२ मध्ये चीनबरोबर व १९६५ मध्ये पाकिस्तान बरोबर झालेले युद्ध, तसेच १९६५-६६ मधील दुष्काळ यामुळे ४ थी योजना सुरू करता आली नाही. १९६६ ते १९६९ या कालावधीसाठी तीन वार्षिक योजना राबविण्यात आल्या. ४थी योजना त्यामुळे तीन वर्षे उशिरा राबविण्यात आली. तसेच राजकीय सत्तेत झालेल्या बदलामुळे १९७४ ते १९७९ या कालावधीसाठी सुरू

झालेली ५ वी योजना एक वर्ष आधीच (१९७४-१९७८) पूर्ण करण्यात आली. केंद्रात सत्तेवर आलेल्याला नवीन जनता सरकारने दोन वर्षासाठी (१९७८ते१९८०) सरकती योजना राबविली. म्हणून ६ वी योजना (१९८०-८५) दोन वर्षे उशिरा सुरू झाली. सातवी योजना (१९८५-९०) नियमितपणे सलग राबविण्यात आली. परंतु राजकीय अस्थैर्यामुळे सातवी योजना संपल्यानंतर लगेच आठवी योजना सुरू करता आली नाही. त्याऐवजी (१९९०-९१ व १९९१-९२) दोन वार्षिक योजना राबविण्यात आल्या. आठव्या योजनेनंतर (१९९२-९७), नववी, १०वी, ११वी योजना या नियमितपणे राबविण्यात येऊन १२ वी योजना २०१२ पासून सुरू झालेली आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत तत्कालीन परिस्थिती व गरजेनुसार काही उद्दिष्टे ठरविण्यात आली. ती उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी विशिष्ट क्षेत्रांवर भर देण्यात येऊन काही डावपेच आखण्यात आले. त्यातील योजना निहाय डावपेच संक्षिप्त रूपाने पुढील तक्त्यात दाखविलेले आहेत.

**तक्ता क्र. ८.१**

| योजना | कालावधी | मुख्यभर | आर्थिक वृद्धी दर संकल्पित | आर्थिक वृद्धी दर साध्य |
|---|---|---|---|---|
| १ ली | १९५१-५६ | कृषी क्षेत्रावर मुख्य भर देण्यात आला. कृषीनंतर जलसिंचन आणि जलविद्युत या क्षेत्राला प्राधान्य | २.१% | ३.६% |
| २ री | १९५६-६१ | औद्यागिकीकरण घडवून आणण्यासाठी अवजड आणि पायाभूत उद्योगांच्या विकासावर भर | ४.५% | ४.१% |
| ३री | १९६१-६६ | कृषी आणि औद्योगिक विकास | ५.६% | २.८% |
| तीन वार्षिक | १९६६-६९ | स्थैर्य आणि स्वावलंबन | ५.०% | ३.७% |
| ४ थी | १९६९-७४ | स्थैर्याधिष्ठित विकास व स्वावलंबन | ५.७% | ३.३% |
| ५ वी | १९७४-७९ | दारिद्र्य निर्मूलन आरोग्य व समाजकल्याणाला प्राधान्य | ४.४% | ४.८% |
| सरकती | १९७८-८० | लघु व कुटीर उद्योगांवर भर देवून रोजगार निर्मिती | - | - |
| ६ वी | १९८०-९५ | दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मिती | ५.२% | ५.७% |
| ७ वी | १९८५-९० | उत्पादक रोजगार निर्मिती उपभोग्य वस्तू व सेवांच्या उत्पादनाला प्राधान्य | ५.०% | ६.०२% |
| वार्षिक | १९९०-९२ | (राजकीय अस्थैर्यामुळे १९९०-९१ व १९९१-९२ या दोन वार्षिक योजना राबविण्यात आल्या) | - | ०.९% |
| ८ वी | १९९२-९७ | मनुष्यबळ विकासावर मुख्य भर शिक्षण आरोग्य रोजगार निर्मितीला प्राधान्य | ५.६% | ६.८% |
| ९ वी | १९९७-०२ | कृषी व ग्रामीण विकास. सामाजिक न्याय आणि समानतेसह आर्थिक वाढ | ६.५% | ५.५% |
| १० वी | २००२ ते २००७ | मानवी संसाधनाचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षणावर भर तसेच सामाजिक न्याय व समता यावर भर | ८.०% | ७.८% |
| ११ वी | २००७ ते २०१२ | जलद आणि सर्वसमावेशक वृद्धीवर भर, | ९.०% | ७.९४% |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दारिद्र्यात कपात, रोजगार संधीत वाढ, सर्वांना समान संधी, शैक्षणिक दर्जा उंचावणे, महिला व बालकल्याण, पायाभूत संरचना पर्यावरण रक्षण | |
| १२ वी | २०१२ ते २०१७ | दारिद्र्य निर्मूलन, अन्नसुरक्षा, सामाजिक समता आणि न्याय, आरोग्य व शिक्षण | ८.०% |

## ८.२.२ आर्थिक नियोजनाचे यश अपयश

(Achievments and Failure of Planning)

आतापर्यंत ११ पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या असून १२ वी योजना सुरू आहे. आर्थिक नियोजनामुळेच अर्थव्यवस्थेत काही चांगले बदल घडून आले. अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्र, द्वितीय क्षेत्र आणि तृतीय क्षेत्र (सेवा क्षेत्र) यांचे महत्त्व बदलले. प्राथमिक क्षेत्रातील महत्त्व अर्थात निसर्गावरील परावलंबन कमी होऊन द्वितीय व तृतीय क्षेत्राचे महत्त्व वाढले. औद्योगिकीकरण आधुनिकीकरण यात वाढ होऊन अर्थव्यवस्था विकासाकडे वाटचाल करीत आहे. दारिद्र्यात घट, कृषी उत्पादकतेत वाढ, मानवी संसाधनात सुधारणा, पायाभूत संरचनेचा विकास, संदेशवहन आणि संगणक क्षेत्रात झालेली क्रांती इ. अनेक अुनकूल बदल अर्थव्यवस्थेत झाले आहेत. हे बदल म्हणजे आर्थिक नियोजनाचे यश सांगता येईल. अर्थात आर्थिक नियोजनाला काही बाबतीत आलेले अपयशही दृष्टिआड करता येण्यासारखे नाही. म्हणून आर्थिक नियोजनाच्या यशापयशांचा आढावा उचित ठरेल.

**आर्थिक नियोजनाचे यश** (Achievments of Economic Planning)

**विविध उद्दिष्टांच्या संदर्भात आर्थिक नियोजनाचे यश पुढीलप्रमाणे सांगता येईल.**

**१)राष्ट्रीय उत्पन्नात वाढ –** आर्थिक नियोजनामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली. नियोजनाच्या पहील्या ३० वर्षात म्हणजे १९५०-५१ ते १९८०-८१ याकाळात राष्ट्रीय उत्पन्न सरासरी ३.४% वार्षिक दराने वाढले. तर त्या पुढील १० वर्षात १९८०-८१ - १९९०-९१ याकाळात ५.३% वार्षिक दराने वाढले. १९९०-९१ ते २०००-०१ या काळात राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीचा सरासरी दर ५.५% झाला. दहाव्या पंचवार्षिक योजनेत आर्थिक वृद्धीचा दर ७.६ इतका होता. संपूर्ण दशकाचा (२००१ ते २०१०) आर्थिक वृद्धीचा दर वार्षिक ७% इतका होता.

**२)दरडोई उत्पन्नातील वाढ –**आर्थिक नियोजनामुळे दरडोई उत्पन्नातही वाढ झाली. परंतु राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत दरडोई उत्पन्नातील वाढ कमी आहे. कारण देशाच्या लोकसंख्यावाढीचा परिणाम दरडोई उत्पन्नावर होतो. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात दरडोई उत्पन्न वाढीचा दर १.७% दुसऱ्या योजनेच्या काळात १.९% इतका होता तर तिसऱ्या व चौथ्या योजनेच्या काळात तो अनुक्रमे ०.५% व ०.९% पर्यंत कमी झालेला होता. ५ व्या योजनेत २.६% पर्यंत सुधारला. सातव्या, आठव्या योजनेत तो अनुक्रमे ३.६% आणि ४.९% पर्यंत वाढला. २००४ ते २०१२ या काळात दरडोई उत्पन्नातील वाढ ६.७% ने झालेली दिसून येते.

**३)बचत गुंतवणूक भांडवल निर्मितीत वाढ –** १९५०-५१ मध्ये चालू किंमतीवर स्थूल देशांतर्गत बचत स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या १०.४% होती. १९९२-९३ मध्ये ती २२.३% पर्यंत वाढली म्हणजेच नियोजनाच्या ४०-४२ वर्षांच्या काळात बचतीच्या दरात दुप्पट वाढ झाली. १० व्या योजनेत बचत दरात

३०.८% पर्यंत वाढ झाली. भांडवल निर्मितीचा दर १९५०-५१ मध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या १०.२% होता. तो १९९२-९३ पर्यंत २४.५% पर्यंत वाढला. याचा अर्थ बचतीप्रमाणेच भांडवलनिर्मितीच्या दरातही दुपटीपेक्षाही जास्त वाढ झाली.

१० व्या पंचवार्षिक योजनेत गुंतवणुकीच्या दरात २५.२% वरून ३५.९% पर्यंत वाढ झाली.

**४)कृषी विकास –** नियोजन काळात कृषी विकासात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. कृषी उत्पादन निर्देशांक १९५०-५१ मध्ये ४६.२% होता. तो २००१-०२ मध्ये १७७.१ पर्यंत वाढला. अन्नधान्य उत्पादनात १९५०-५१ ते २००१-०२ याकाळात ५०.८ द.ल टनावरून २१२ द.ल टनांपर्यंत वाढ झाली.

१९८० पर्यंत भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी नव्हता. अन्नधान्याची आयात करावी लागत असे. परंतु १९८० पासून भारत केवळ अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण तर आहेच. परंतु अन्नधान्य आणि अनेक कृषी उत्पादनांची निर्यातही करू लागलेला आहे.

**५)औद्यागिक विकास –** नियोजन काळात भारताच्या औद्योगिक क्षेत्राने पुरेशी प्रगती केली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आलेली आहे. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात भारतीय उद्योगांचा विकास वार्षिक ८% दराने झाला. १९९५-९६ मध्ये तो १२% पर्यंत पोहचला. २००१-०२ मध्ये हा दर २.५% पर्यंत खाली आला होता. दहाव्या योजनेच्या काळात या दरात पुन्हा ८.९% दरापर्यंत वाढ झाली.

१९५१ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात औद्योगिक क्षेत्राचा वाटा फक्त १३.३०% होता. तो २००६-०७ पर्यंत २४.६% पर्यंत वाढला. स्थूल देशांतर्गत उत्पादनात प्राथमिक क्षेत्राचा वाटा कमी होऊन उद्योग क्षेत्राचा वाटा वाढणे हे आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते. नियोजन काळात विशेषत: १९८० नंतर औद्योगिक संरचनेत मोठ्या प्रमाणावर बदल झाला. पहिल्या योजनेच्या प्रारंभी औद्योगिक उत्पादनात खाद्य पदार्थ, कापड उद्योग, लाकूड व लाकडी फर्निचर आणि मूलभूत धातू या उद्योगांचा वाटा ६७.४% होता. तो १९९० च्या दशकात ३३% पर्यंत कमी झाला. याउलट या काळात इतर उद्योगांच्या वाट्यात वाढ झाली. औद्योगिक उत्पादनात यंत्रसामग्रीचा वाटा १९५० ते १९९० या काळात १.२% वरून १२.७% पर्यंत वाढला. याच काळात रसायन उद्योगांचा वाटा ३.४% वरून ६.५% पर्यंत वाढला. यावरून स्पष्ट होते की भारताच्या औद्योगिक क्षेत्रात विविधीकरण होत आहे.

**६)पायाभूत सोयींची निर्मिती –** नियोजन काळात पायाभूत सोयींच्या निर्मितीवर विशेष भर देण्यात आला. वाहतूक, दळणवळण, विजनिर्मिती, जलसिंचन या पायाभूत सोयी निर्माण करण्यासाठी प्रचंड प्रमाणावर खर्च करण्यात आला. त्यामुळे देशात रस्ते, रेल्वे, हवाई व जलवाहतूक संदेशवाहन शिक्षण संशोधन, वीज इ. पायाभूत सुविधांमध्ये समाधानकारक प्रगती झालेली दिसून येते. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे अर्थव्यवस्थेच्या कृषी उद्योग आणि सेवा इ. विविध क्षेत्रांच्या विकासाला मदत झाली आहे.

**७)आयात पर्यायीकरण आणि निर्यातीचे विविधीकरण –** प्रतिकूल व्यवहार तोलाची समस्या दूर करण्यासाठी नियोजन काळात आयात पर्यायीकरणावर भर देण्यात आला. देशातच अनेक उपभोग्य वस्तू, अवजड यंत्रसामुग्री, रसायने, औषधे, रासायनिक खते यांचे उत्पादन होऊ लागले. त्यामुळे आयातीचे अवलंबन काही प्रमाणात कमी झाले. विविध निर्यात वस्तूंच्या उत्पादनावर भर देण्यात आला. विशेष आर्थिक क्षेत्राच्या माध्यमातून निर्यात उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे भारताच्या निर्यात व्यापाराची रचना आणि दिशा यात अनुकूल बदल होत आहे.

**८)विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास –** नियोजन काळात सरकारने विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी आय.टी.आय 'केंद्रीय विद्यापीठ' कृषी व कृषीतर विद्यापीठ संशोधन संस्था इ. ची स्थापना केल्यामुळे तंत्रज्ञानाचा दर्जा उंचावला. तंत्रज्ञानाची अनेक देशात निर्यात झाली. संगणक क्षेत्रात भारताचे जगात स्थान प्राप्त झाले. अवकाश संशोधन क्षेत्रातही भरीव प्रगती केली. चांद्रमोहिमे बरोबरच मंगळ मोहिमेतही यशस्वी सहभाग नोंदविला. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्त्रो) नोव्हेंबर २०१३ मध्ये मंगळ मोहिमेत यशस्वी पदार्पण केले त्यामुळे मंगळावर पोहचणारी इस्त्रो ही अमेरिका, रशिया आणि युरोपीय समुदायानंतर जगातली चौथी अंतराळ संस्था ठरणार आहे.

**९) संरचनात्मक बदल –** आर्थिक नियोजनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल झाले. पूर्वी भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा वाटा अधिक होता. द्वितीय आणि तृतीय क्षेत्राचा वाटा कमी होता. परंतु नियोजन काळात राष्ट्रीय उत्पन्नात द्वितीय आणि तृतीय क्षेत्राचा वाटा बराच वाढलेला आहे. प्राथमिक क्षेत्राचा वाटा कमी होऊन द्वितीय व तृतीय क्षेत्राचा वाटा वाढणे हे आर्थिक विकासाचे लक्षण आहे.

**१०) मानवी संसाधनाच्या दर्जात सुधारणा –** नियोजन काळात शासनाने शिक्षण आरोग्य, निवारा, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, स्वच्छता या बाबींवर प्रचंड खर्च केल्यामुळे मानवी संसाधनाच्या दर्जात सुधारणा झाली. बालमृत्यु व प्रसूतीकाळात मृत्यु पावणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण घटले. सरासरी आयुर्मानात वाढ झाली. साक्षरतेच्या प्रमाणात उच्च शिक्षितांच्या प्रमाणात वाढ झाली. रोजगारात वाढ झाल्यामुळे लोकांच्या उत्पन्नात आणि राहणीमानाच्या दर्जातही सुधारणा झाली.

## नियोजनाचे अपयश (Failures of Planning)

आर्थिक नियोजनाला विविध बाबतीत यश मिळाले असले तरी नियोजनातील काही उद्दिष्टे त्या त्या पंचवार्षिक योजनेत पूर्ण झालेली नाहीत. काही महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करता आली नाही. एकंदरीत नियोजनाला पुढील बाबतीत अपयश आलेले दिसून येतात.

**१) इष्टांकपूर्तीत अडथळे** – पंचवार्षिक योजनांमध्ये विविध क्षेत्रांसाठी जे इष्टांक ठरविण्यात आले होते, त्यातील बरेचसे इष्टांक पूर्ण झाले नाही. दरडोई उत्पन्नात फारशी वाढ झाली नाही. कृषी, उद्योग, व्यापार, सेवा, माहिती व तंत्रज्ञान इ. क्षेत्रांसाठी वृद्धीचे जे दर ठरविण्यात आले होते ते दर साध्य झाले नसल्याने ते नियोजनाचे अपयशच सांगितले जाते.

**२) दारिद्र्यात अपेक्षित घट झाली नाही –** आर्थिक नियोजनाला सुरुवात झाल्यापासून सर्वच पंचवार्षिक योजनांमध्ये दारिद्र्य निर्मूलनावर भर देण्यात आला. परंतु दारिद्र्याचे प्रमाण फारसे कमी झाले नाही. १९७३-७४ मध्ये दारिद्र्याचे प्रमाण ५६.४% होते. २००० पर्यंत हे प्रमाण २७.१% पर्यंत कमी झाले. प्रत्येक नागरिकाला सरकारने किमान राहणीच्या दर्जाची हमी देणे आवश्यक असताना २००१ मध्ये केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अंदाजानुसार भारतात २६ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते. हे नियोजनाचे अपयशच आहे.

**३) रोजगार निर्मितीत अपयश –** प्रत्येक पंचवार्षिक योजनेत रोजगार निर्मितीवर भर देण्यात आला आहे. रोजगार पुरविणारे विशेष कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत. अशाही परिस्थितीत बेरोजगारांची संख्या ५३ लाख होती. वाढत्या लोकसंख्येबरोबर श्रमशक्तीत वाढ होऊन काम मागणाऱ्यांची संख्या वाढत गेली. आर्थिक विकासाबरोबर रोजगाराच्या संधीत वाढ होऊन बेरोजगार कमी होईल ही अपेक्षा खोटी ठरली. म्हणून ५ व्या योजनेनंतर रोजगारात वाढ घडवून आणण्यासाठी अनेक रोजगार कार्यक्रम आणि योजना राबविण्यात आल्या. त्यासाठी प्रचंड खर्च करण्यात आला. पण बेरोजगारांच्या संख्येत मात्र वाढच होत गेली. तिसऱ्या

योजनेच्या शेवटी बेरोजगारांची संख्या ९६ लाख होती. ती आठव्या योजनेत ११२ लाख पर्यंत वाढली. २००४–०५ पर्यंत ही संख्या ३४७ लाखांपर्यंत वाढली. यावरून बेरोजगार लोकांना रोजगार देण्यात नियोजनाला अपयश आलेले आहे.

**४) आर्थिक विषमता कायम आहे –** आर्थिक विषमता कमी करणे हे नियोजनाचे एक प्रमुख उद्दिष्ट असतांना आर्थिक विषमता मात्र कमी झाली नाही. आर्थिक विकास होत असला तरी आर्थिक विकासाचा फायदा श्रीमंतांनाच अधिक होतो. श्रीमंत अधिक श्रीमंत होतात, गरीब गरीबच राहतात. भारताच्या बाबतीतही विकासाचे लाभ श्रीमंतांना मिळाले. कृषी क्षेत्रातील प्रगतीचे लाभ मोठे शेतकरी आणि शेतमालाच्या व्यापाऱ्यांना मिळाले. संख्येने अधिक असलेले लहान शेतकरी गरीबच राहीले.

**५) किंमतींवर नियंत्रण ठेवण्यात अपयश –** नियोजन काळात आर्थिक विकास झाला. उत्पादनात वाढ झाली. अर्थव्यवस्थेच्या उत्पादन क्षमतेतही वाढ झाली. परंतु असे असतानाही किंमतीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. आर्थिक नियोजनात किंमत स्थैर्याचे उद्दिष्ट निश्चित करूनही किंमतीत स्थैर्य राखण्यात भारतीय नियोजनाला अपयश आले.

**६) लोकसंख्या नियंत्रणात अपयश –** भारतात लोकसंख्या अतिरिक्त असून भारतातील लोकसंख्या आकाराने जगात २ ऱ्या क्रमांकाची आहे. भारतातील दारिद्र्य, बेरोजगारी, कनिष्ठ जीवनमान, यांसारख्या प्रश्नांचे मूळ भारताची प्रचंड लोकसंख्या हेच असल्याने नियोजनात लोकसंख्या नियंत्रणावर भर देण्यात आला. लोकसंख्या धोरण राबविण्यासाठी प्रचंड खर्च करूनही लोकसंख्येवर अपेक्षित नियंत्रण ठेवण्यात नियोजनाला अपयश आलेले आहे. चीन मध्ये लोकसंख्या वाढीचा दर १% असताना (चीनची लोकसंख्या जगात सर्वांत जास्त आहे). भारताच्या लोकसंख्या वाढीचा दर १.७% पेक्षा अधिक आहे.

**७) सामाजिक सेवांचा अपुरेपणा –** नियोजनकाळात शासनाने सामाजिक सेवा विकसित करण्यावर भर दिला. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, वीजपुरवठा, पाणीपुरवठा इ. सेवा पुरविण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला. शिक्षणावर प्रचंड खर्च होऊनही आजही १०० टक्के साक्षर भारताचे स्वप्न पूर्ण झाले नाही. आरोग्यावर खर्च होऊनही विकसित देशांच्या तुलनेत भारतीयांचे सरासरी आयुर्मान कमी आहे. विजेचा तुटवडा नेहमीच भासत असतो. हजारो गावांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध होऊ शकत नाही. सामाजिक सेवा पुरविण्यासाठी नियोजनात अग्रक्रम देऊनही सामाजिक सेवांचा पुरेसा पुरवठा न होणे म्हणजे नियोजनाचे अपयशच म्हणावे लागेल.

**८) समांतर अर्थव्यवस्थेचे अस्तित्व –** आर्थिक नियोजनाच्या अंमलबजावणीच्या निमित्ताने प्रत्येक पंचवार्षिक योजनेकाळात दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, आरोग्य व इतर अनेक कल्याणाच्या योजना राबविल्या जातात. या योजनांवर जो पैसा खर्च केला जातो त्यापैकी बऱ्याचशा पैशाचे रूपांतर काळ्या पैशात होते. भ्रष्टाचार, लाचलुचपत, कर आकारणी, साठेबाजी, सट्टेबाजी, कोटा व परवाना पद्धती सारखे शासनाचे नियमन यामुळे काळा पैसा (बेहिशोबी) निर्माण होतो. त्याचा भाववाढ, आर्थिक विषमता, दुर्मिळ साधनसामुग्रीचा दुरुपयोग या स्वरूपात विपरीत परिणाम दिसून येतो. काळ्या पैशाचे प्रमाण एवढे प्रचंड वाढले आहे की नियमित अर्थव्यवस्थेबरोबरच समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. कारण काळ्या पैशावर नियंत्रण मिळविणे यात नियोजनाला अजिबात यश मिळाले नाही.

## ८.२.३ अकरावी पंचवार्षिक योजना (Current Five Year Plan)

१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २०१२ हा अकराव्या पंचवार्षिक योजनेचा काळ होता. १० व्या योजनेच्या काळात वार्षिक वृद्धी दर ७.८% होता. यापूर्वी कोणत्याही योजनेत एवढा वृद्धीदर गाठला गेला नव्हता. जलदगतीने विकास पावणारी अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेची प्रतिमा तयार झाली होती. अर्थात दुसऱ्या बाजूला आर्थिक विकासात अनुसूचित जाती जमाती आणि अल्पसंख्यांक पुरेशा संख्येने समाविष्ट नसणे, स्त्री-पुरुष असमानता, यांसारख्या उणिवा अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या होत्या. या परिस्थितीत अकराव्या योजनेला सुरुवात झाली.

१७ ऑक्टोबर २००६ रोजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या योजना आयोगाच्या बैठकीमध्ये अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टिकोन पत्रास (Approach Paper) स्विकृती देण्यात आली. ९ नोव्हेंबर २००७ रोजी योजनेच्या मसुद्याला नियोजन मंडळाने मंजुरी दिली. तर कॅबिनेटने योजनेच्या मसुद्याला ३० नोव्हेंबर २००७ रोजी संमती दिली. ११ डिसेंबर २००७ रोजी राष्ट्रीय विकास परिषदेने ११ व्या योजनेला संमती दिली.

### अकराव्या योजनेची व्यूहरचना

अकराव्या योजनेत 'जलद आणि सर्वसमावेशक वृद्धि' वर भर देण्यात आला. योजनेच्या काळात वार्षिक ९% आर्थिक वृद्धिदराचे लक्ष्य ठेवण्यात आले. आर्थिक वृद्धीचा फायदा व्यापक स्वरूपात आणि सर्वांना समान संधी मिळण्यात व्हावा असे अपेक्षित होते. या योजनेत दारिद्र्यात कपात आणि रोजगाराच्या संधीत वाढ करण्यावर भर देण्यात आला. सर्वांना विशेषत: गरिबांना आवश्यक अशी आरोग्य आणि शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे, तसेच सर्वांना समान संधी, शिक्षण आणि कौशल्याचा विकास करून लोकांना सक्षम करणे, रोजगाराची संधी, पर्यावरणीय शाश्वता, स्त्री संस्थांना उत्तेजन, चांगले प्रशासन इत्यादी बाबींवर भर देण्याचे ठरविले होते.

### ८.२.३ अ) अकराव्या योजनेची उद्दिष्टे –

अकराव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१) आर्थिक विकास करणे – संपूर्ण देशासाठी स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) ९% इतके वार्षिक वृद्धिदराचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

२) रोजगार निर्मितीत वाढ करणे.

३) दारिद्र्य निर्मूलन करणे.

४) आरोग्य सुविधांचा विस्तार करणे.

५) महिला आणि बालकल्याण योजना राबविणे.

६) पायाभूत संरचना निर्माण करणे.

७) पर्यावरणाचे रक्षण करणे.

८) लैंगिक असमतोल कमी करणे.

## ८.२.३ ब) इष्टांक (Targets)

आर्थिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी ११ व्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय पातळीवर २७ लक्ष्ये ठरविण्यात आली. या लक्ष्यांची ६ प्रमुख गटांमध्ये विभागणी करण्यात आली.

**१) उत्पन्न आणि दारिद्र्य –**

i) अकराव्या योजनाकाळात दरसाल सरासरी स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा (GDP) वृद्धि दर ९% ठरविण्यात आला.

ii) दरवर्षी कृषी उत्पादनाचा वृद्धी दर २ते४% ठरविण्यात आला.

iii) ५.८ कोटी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे.

iv) सुशिक्षित बेकारांच्या संख्येत ५ टक्क्यांपर्यंत कपात करणे.

v) अकुशल कामगारांच्या वास्तव वेतन दरात २७% नी वाढ करणे.

vi) दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांच्या संख्येत १०% कपात करणे.

**२) शिक्षण**

i) प्राथमिक शाळेतील मुलांच्या शाळा सोडणाऱ्यांच्या संख्येत २००२-०३ च्या ५२.२% वरून २०११-१२ पर्यंत २०% घट करणे.

ii) प्राथमिक शाळेतील शिक्षणाचा दर्जा किमान पातळीपर्यंत वाढवून शिक्षणाच्या गुणवत्तेची हमी घेणे.

iii) ७ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या लोकांचा साक्षरतेचा दर २०११-१२ पर्यंत ८५% पर्यंत वाढविणे.

iv) २०११-१२ पर्यंत साक्षरतेची लैंगिक दरी १०% पर्यंत घटविणे.

v) उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या गटात सध्याच्या १०% वरून २०११-१२ पर्यंत १५% ने वाढ करणे.

**३) आरोग्य**

i) शिशू मृत्यु (Infant Mortality Rate)दर दरहजारी २८ पर्यंत आणि बाळंत माता मृत्यु दर हजारी एक पर्यंत कमी करणे.

ii) एकूण प्रजनन दर २०११-१२ पर्यंत २% वर आणणे.

iii) २००९ पर्यंत सर्व खेडेगावांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरविणे.

iv) ० ते ३ वयोगटातील मुलांचे कुपोषण सध्याच्या तुलनेत निम्म्यापर्यंत खाली आणणे.

v) महिला आणि मुलींमधील रक्तक्षय (Anaemia) चे प्रमाण निम्म्यावर खाली आणणे.

**४) महिला आणि बालके** (Women and Children)

i) ० ते ६ वयोगटातील लिंग प्रमाण २०११-१२ मध्ये दरहजारी ९३५ पर्यंत आणि २०१६-१७ मध्ये ९५० पर्यंत वाढविणे.

ii) सरकारी योजनांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लाभ किमान ३०% स्त्रिया आणि मुलींना मिळेल अशी व्यवस्था करणे.

iii) कामाची सक्ती न करता सर्व बालकांना बालपणाचा आनंद उपभोगण्याची संधी उपलब्ध करणे.

५) **पायाभूत संरचना** (Infrastructure)

i) सन २००१ पर्यंत भारतातील सर्व खेड्यांना आणि दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना विजेने जोडणे आणि योजनेनुसार सर्वांना विद्युतशक्ती पुरविणे.

ii) १००० किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या (आदिवासी आणि वनवासी भागातील ५०० किंवा अधिक लोकसंख्या असणाऱ्या) वस्त्यांना बारमाही रस्त्याने २००९ पर्यंत जोडणे.

iii) २०१२ पर्यंत प्रत्येक खेडे दूरध्वनीने जोडणे.

iv) २०१२ पर्यंत सर्व लोकांना घर बांधण्यासाठी जागा देणे आणि २०१६-१७ पर्यंत ग्रामीण भागातील सर्व गरीब लोकांसाठी घरे उपलब्ध करून देणे.

६) **पर्यावरण** (Environment)

i) जंगलाच्या क्षेत्रफळात ५% नी वाढ करणे.

ii) सर्व प्रमुख शहरांना २०१२ पर्यंत जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार हवेची गुणवत्ता मिळवून देण्याची व्यवस्था करणे.

iii) नागरी भागातील अशुद्ध किंवा टाकाऊ पाण्यावर प्रक्रिया करून नद्यांचे पाणी २०११-१२ पर्यंत शुद्ध करणे.

iv) २०१६-१७ पर्यंत ऊर्जा क्षमतेत २०% नी वाढ करणे.

**११ व्या पंचवार्षिक योजनेत संसाधनाचे क्षेत्रनिहाय वाटप**

२००६-०७ च्या किंमतीनुसार अकरावी पंचवार्षिक योजना एकूण ३६४४७१८ कोटी रुपयांची आहे. यात केंद्रसरकारचा हिस्सा २१,५६,५७१ कोटी रुपयांचा असून केंद्रशासित प्रदेशांसह राज्यांचा हिस्सा १४८८१४७ कोटी रुपये इतका आहे. ह्या रकमा केंद्र शासनामार्फत चालू महसुली शिल्लक, कर्ज उचल, सार्वजनिक उद्योगांचे योगदान या मार्गाने उभारण्यात आल्या आहेत तर राज्य शासनाकडून चालू महसूली शिल्लक, कर्जउचल, राज्यांच्या मालकीचे उद्योग, केंद्राकडून मिळणारी मदत इत्यादी मार्गानी उभारण्यात आले आहेत.

केंद्र आणि राज्य व केंद्रशासित प्रदेश मिळून ११ व्या पंचवार्षिक योजनेसाठी खर्च करावयाची एकूण रक्कम (रु. ३६ लाख ४४ हजर ७१८ कोटी) विविध क्षेत्रात कशी वाटली जाणार आहे याचे स्पष्टीकरण पुढील तक्त्यात देण्यात आले आहे.

**तक्ता ८.२**

संसाधनाचे क्षेत्र निहाय वाटप (कोटी रू. २००६-०७ च्या किंमतीनुसार)

| अ.क्र. | क्षेत्र | १०वी योजना एकूण खर्च | एकूण खर्चाशी टक्केवारी | ११वी योजना एकूण खर्च | एकूण खर्चाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | कृषी आणि तत्सम क्षेत्र | ६०,७०२ | ३.७५ | १,३६,३८१ | ३.७४ |
| २. | ग्रामीण विकास | १,३७,७१० | ८.५१ | ३,०१,०६९ | ८.२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | विशेष क्षेत्र कार्यक्रम | १६,४२३ | १.०१ | २६,३२९ | ०.७२ |
| ४. | सिंचन आणि पूर नियंत्रण | १,१२,४१५ | ६.९५ | २,१०,३२६ | ५.७७ |
| ५. | ऊर्जा | ३,६३,६३५ | २२ .४७ | ८,५४,१२३ | २३.४३ |
| ६. | उद्योग आणि खाणी | ६४,६५५ | ३.९९ | १,५३,६०० | ४.२१ |
| ७. | वाहतूक | २,६३,९३४ | १६.३१ | ५,७२,४४३ | १५.७१ |
| ८. | दळणवळण | ८२,९४५ | ५.१२ | ९५,३८० | २.६२ |
| ९. | विज्ञान तंत्रज्ञान व पर्यावरण | २८,६७३ | १.७७ | ८७,९९३ | २.४१ |
| १०. | सामान्य आर्थिक सेवा | ३०,३४९ | १.८७ | ६२,५२३ | १.७१ |
| ११. | सामाजिक सेवा | ४,३६,५२९ | २६.९७ | ११,०२,३२७ | ३०.२४ |
| १२. | सामान्य सेवा | २०,४८९ | १.२७ | ४२,२८३ | १.१६ |
| | **एकूण** | **१६,१८,४६०** | **१००.००** | **३६,४४,७१८** | **१००.००** |

स्त्रोत – डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे, डॉ. विनायक देशपांडे, भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) सुधारित आवृत्ती २०१० पृ.क्र. १४७

तक्ता क्र. ८.२ वरून १० व्या आणि ११ व्या योजनेबाबत पुढील गोष्टी ठळकपणे निदर्शनास येतात.

१) एकूण खर्चाशी क्षेत्र निहाय खर्चाचे प्रमाण या आधारावर पुढील क्षेत्रांवर क्रमशः अधिक भर देण्यात आलेला आहे.

| क्षेत्र | १० वी योजना | ११ वी योजना |
|---|---|---|
| १) सामाजिक सेवा | २६.९७% | ३०.२४% (+) |
| २) उर्जा | २२.४७% | २३.४६% (+) |
| ३) वाहतूक | १६.३१% | १५.७१% (–) |
| ४) ग्रामीण विकास | ८.५१% | ८.२६% (–) |
| ५) सिंचन व पूरनियंत्रण | ६.९५% | ५.७७% (–) |
| ६) दळणवळण | ५.१२% | २.६२ %(–) |
| ७) उद्योग आणि खाणी | ३.९९% | ४.२१% (+) |

(१० व्या योजनेच्या तुलनेत ११ व्या योजनेत वाढ (+) घट (–) दर्शविली आहे)

दोन्ही योजनांच्या बाबतीत सर्वात जास्त खर्च क्रमशः सामाजिक सेवा, ऊर्जा आणि वाहतूक क्षेत्रावर केलेला दिसून येतो. त्या खालोखाल ग्रामीण विकास, सिंचन व पूरनियंत्रण, दळणवळण आणि उद्योग व खाणी या क्षेत्रांचा क्रमांक लागतो.

२) १० व्या योजनेच्या तुलनेत ११ व्या योजनेचा खर्च १२५% नी जास्त आहे. १०व्या आणि ११ व्या योजनेत एकूण खर्च अगर योजनेचा आकार १६,१८,४६० कोटी रु. वरून ३६,४४,७१८ कोटी रु. पर्यंत वाढला.

३) १० व्या योजनेच्या तुलनेत अकराव्या योजनेत सर्वच क्षेत्रांच्या बाबतीत खर्चात निरपेक्ष वाढ झालेली आहे.

४) १० व्या योजनेच्या तुलनेत ११ व्या पंचवार्षिक योजनेत सामाजिक सेवांवर होणाऱ्या खर्चाच्या टक्केवरीत वाढ झालेली आहे. ही वाढ २६.९७% वरून ३०.२४% अशी झालेली आहे. सामाजिक सेवांवर होणाऱ्या खर्चापैकी सर्वात जास्त खर्च शिक्षणावर (एकूण खर्चाच्या ९.५%) व त्याखालोखाल वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्यावर खर्च (नियोजित) होता.

५) ऊर्जा क्षेत्रावर होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणातही १% ने वाढ दिसून येते.

६) दळणवळण, उद्योग आणि खाणी या क्षेत्रावरील खर्चात निरपेक्षपणे वाढ दिसून येत असली तरी एकूण खर्चाशी त्या त्या क्षेत्राच्या खर्चाची टक्केवारी मात्र घटलेली आहे.

७) उर्वरित सर्वच क्षेत्रात ११ व्या योजनेतील खर्चात निरपेक्ष वाढ दिसून येत असली तरी एकूण खर्चाशी असलेल्या प्रमाणात झालेला बदल नगण्य आहे.

११व्या पंचवार्षिक योजना इतर योजनांच्या तुलनेत महत्त्वाकांक्षी योजना म्हणून तयार करण्यात आली. इतर योजनांच्या तुलनेत या योजनेचे उद्देश, इष्टांक अधिक महत्त्वाचे होते. परंतु सर्वच इष्टांक अपेक्षेप्रमाणे पूर्ण झालेले नाहीत.

## ८.३ स्वयंअध्ययानासाठी प्रश्न

**अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा**

१) राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

२) पहिल्या पंचवार्षिक योजनेत मुख्यभर कोणत्या क्षेत्रावर देण्यात आला?

३) अकाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी सांगा?

४) भारताच्या नियोजन मंडळाचे अध्यक्ष कोण असतात?

५) अकराव्या पंचवार्षिक योजनेत सर्वात जास्त नियोजित खर्च कोणत्या क्षेत्रावर ठरविण्यात आला आहे?

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) नियोजन मंडळाची स्थापना .... रोजी करण्यात आली.

२) १० व्या पंचवार्षिक योजनेचा प्रत्यक्ष वृध्दी दर .......... इतका आहे.

३) भारताच्या आर्थिक नियोजनाला प्रारंभ ........... या वर्षी झाला.

४) जनता सरकारने १९७८ ते १९८० या काळात राबविलेली योजना म्हणजे ............ योजना होय.

५) अकराव्या पंचवार्षिक योजनेचा नियोजित वृद्धिदर ........... होता.

**क) जोड्या जुळवा.**

| | |
|---|---|
| १) उद्योगपतींची योजना | अ) गांधी योजना |
| २) श्री. अगरवाल यांची योजना | ब) जनता योजना |
| ३) श्री. रॉय यांची योजना | क) सरकती योजना |

४) नियोजन मंडळाची योजना ड) मुंबई योजना

इ) पंचवार्षिक योजना

**उत्तरे**

**अ) एका वाक्यात उत्तरे.**

१) १९३८ २) कृषी क्षेत्र ३) १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २०१२

४) पंतप्रधान ५) सामाजिक सेवा

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) १५ मार्च १९५० २) ७.८% ३) १९५१ ४) सरकती ५) ९%

**क) जोड्या जुळवा.**

१) ड २) अ ३) ब ४) इ

**सरावासाठी प्रश्न**

**अ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) नियोजन म्हणजे काय?

२) भारतीय नियोजनाची वैशिष्ट्ये सांगा

३) भारताला आर्थिक नियोजनाची आवश्यकता का होती?

**ब) टिपा लिहा.**

१) अकराव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे

२) आर्थिक नियोजनाचे अपयश

**क) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) भारताच्या आर्थिक नियोजनाखाली उद्दिष्टे स्पष्ट करा.

२) भारताच्या आर्थिक नियोजनाचे यशापयश सांगा.

किंवा

भारताच्या आर्थिक नियोजनाचे मूल्यमापन करा.

३) अकराव्या पंचवार्षिक योजनेचे इष्टांक सांगा.

## ८.४ सारांश

समाजवादी अर्थव्यवस्थांप्रमाणे भांडवलशाही अर्थव्यवस्थेतही नियोजनाला स्थान असल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेतही नियोजनाची भूमिका आणि स्थान महत्त्वाचे ठरते.

विशिष्ठ कालावधीत ठराविक उद्दिष्टे साध्य करण्याच्या हेतूने राष्ट्रातील एकंदर साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त फायदेशीर वाटप करून घेण्यासाठी योजना आखणे व त्यांची अंमलबजावणी करणे म्हणजे आर्थिक नियोजन होय.

स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी भारताची स्थिती अत्यंत मागासलेली होती. दारिद्र्य, बेरोजगारी, अल्पराष्ट्रीय उत्पन्न, शेतीची अल्प उत्पादकता, किमान आवश्यक गरजांची पुर्तता न होणे या प्रश्नांच्या सोडवणुकीसाटी

नियोजनाची आवश्यकता होती.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळातच अनेक विचारवंतांनी आणि तज्ज्ञांनी भारतासाठी नियोजनाचा आग्रहधरला होता. मुंबई योजना, गांधी योजना, जनता योजना यांसारख्या योजनांच्या संकल्पना मांडण्यात आल्या होत्या. १९३८ मध्येच राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना करण्यात आली होती. परंतु तत्कालीन सरकारचे या योजनांना पाठबळ न मिळाल्यामुळे त्या योजनांची कार्यवाही होऊ शकली नाही. स्वातंत्र्यानंतर योजनेच्या कार्यवाहीला गती मिळाली. १५ मार्च १९५० रोजी तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. भारताच्या राज्यघटनेत नियोजन मंडळाबाबत कुठेही उल्लेख नसल्यामुळे भारताचे नियोजन मंडळ घटनाबाह्य अगर असंवैधानिक अशा स्वरूपाचे आहे. देशाचे पंतप्रधान हेच नियोजन मंडळाचे अध्यक्ष असतात.

भारताच्या आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे.

२) बेरोजगारी कमी करणे.

३) दारिद्र्याचे निर्मूलन करणे.

४) आर्थिक विषमता कमी करणे.

५) स्वयंपूर्णता आणि स्वावलंबन निर्माण करणे.

६) आधुनिकीकरण घडवून आणणे.

७) पर्यावरणाचे संरक्षण करणे.

भारतात १९५१ पासून नियोजनाला सुरुवात झाली. भारताच्या नियोजनाचा कालावधी पाच वर्षांचा असून आतापर्यंत ११ पंचवार्षिक योजना, तीन वार्षिक योजना (१९६६-६९), सरकती योजना (१९७८ ते ८०) व दोन वार्षिक योजना (१९९० ते १९९२) पूर्ण झाल्या. १२ व्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात झालेली आहे. १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१७ हा १२ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी आहे.

प्रत्येक पंचवार्षिक योजनेत तत्कालीन परिस्थिती आणि गरजेनुसार काही उद्दिष्टे ठरविण्यात आली. ही उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी विशिष्ट क्षेत्रांवर भर देण्यात येऊन डावपेच आखण्यात आलेले आहेत.

भारताच्या नियोजनाला संमिश्र यश मिळालेले आहे. कारण काही क्षेत्रात यश मिळालेले असले तरी काही क्षेत्रात अपेक्षित यश मिळाले नाही. अनेक उद्दिष्टे अद्यापही अपूर्ण आहेत.

**भारतीय नियोजनाचे यश –** खालील बाबतीत नियोजनाला यश मिळालेले आहे.

१) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ

२) दरडोई उत्पन्नात वाढ

३) बचत व गुंतवणूकदरात वाढ

४) कृषी उत्पादनात वाढ

५) औद्योगिक विकास

६) पायाभूत सोयींची निर्मिती

७) आयात पर्यायीकरण व निर्यातीचे विविधीकरण

८) विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात विकास

९) अर्थव्यवस्थेच्या रचनेत बदल

१०) मानवी संसाधनाच्या दर्जात सुधारणा.

### भारतीय नियोजनाचे अपयश –

दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक विषमता, भाववाढ, लोकसंख्या वाढ, सामाजिक सेवांचा अपुरेपणा काळ्यापैशाचा प्रश्न इत्यादी आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यात नियोजनाला अपयश आलेले आहे.

अकरावी पंचवार्षिक योजनाः १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २०१२ हा अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी आहे. या योजनेत जलद आणि सर्वसमावेशक वृद्धिदरावर भर देण्यात आला. या योजनेत ९% वार्षिक आर्थिक वृद्धिदराचे लक्ष्य ठरविण्यात आले होते.

**अकराव्या योजनेची उद्दिष्टे –**

१) आर्थिक विकास

२) रोजगार निर्मितीत वाढ

३) आरोग्य सुविधांचा विस्तार

४) महिला व बाल कल्याण

५) पायाभूत संरचना निर्मिती

६) पर्यावरणाचे रक्षण

७) लैंगिक असमतोल कमी करणे.

या उद्दिष्टांना अनुरूप अशी राष्ट्रीय पातळीवर २७ इष्टांक ठरविण्यात आली. या इष्टांकांचे उत्पन्न आणि दारिद्र्य, शिक्षण, आरोग्य, महिला व बालके, पायाभूत संरचना आणि पर्यावरण याप्रमाणे ६ गटात विभागणी करण्यात आली. ही एक अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना होती. या योजनेलाही संमिश्र स्वरूपाचे यश मिळाले आहे. या योजनेचा नियोजित खर्च ३६,४४,७१८ कोटी रु. इतका होता. या योजनेत सामाजिक सेवा (विशेषतः शिक्षण), ऊर्जा वाहतूक या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला होता.

## ८.५ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

### १) पदसिद्ध –

एखाद्या व्यक्तीला त्याच्या विशिष्ट पदाधिकारामुळे एखाद्या संस्थेचे अगर मंडळाचे पद आपोआप प्राप्त होणे. उदा. पंतप्रधानपदी असलेली व्यक्ती आपल्या पदामुळे नियोजन मंडळाची अध्यक्षा असते.

### २) सरकती योजना – ( Rolling Plan )

या योजनेलाच साखळी योजना असेही म्हणतात. प्रा. गुन्नार मिर्डल यांनी ही संकल्पना मांडली असून जनता पक्षाचे सरकार सत्तेवर असताना तत्कालीन नियोजन आयोगाचे अध्यक्ष डॉ. डी.टी. लकडावाला यांनी ही योजना भारतात लागू केली होती. प्रचलित पंचवार्षिक योजनेचे १ले वर्ष पूर्ण झाल्यानंतर योजनेचे शेवटचे वर्ष एक वर्षाने पुढे सरकते. एक वर्ष संपूनही योजना ५ वर्षांचीच राहते. मार्च १९७९ मध्ये संपणारी

५ वी योजना जनता सरकारने एक वर्ष आधी म्हणजे १९७८ ला संपविली व सहावी योजना सरकती योजना म्हणून (१९७८ ते १९८३ ) लागू केली. सहावी योजना १९७८ ते १९८३ अशी असताना योजनेचे पहिले वर्ष पूर्ण झाल्यावर ही योजना एक वर्षाने पुढे जाऊन १९७९ ते १९८४ अशी कार्यान्वित झाली. परंतू १९८० मध्ये पुन्हा काँग्रेस सरकार सत्तेवर आल्यवर सरकती योजना बंद करण्यात येऊन नव्याने १९८० – १९८५ या कालावधीसाठी सहावी योजना राबविण्यात आली.

### ३) आयात पर्यायीकरण –

आयात कराव्या लागणाऱ्या वस्तूंना पर्याय ठरणाऱ्या वस्तूंचे उत्पादन देशातच करणे व आयातीवर नियंत्रण ठेवणे.

### ४) संरचनात्मक बदल –

अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचे (कृषी, उद्योग, सेवा इ.) अर्थव्यवस्थेतील महत्त्व विकासाबरोबर कमी अधिक होते. उदा. शेतीचे महत्त्व कमी होऊन उद्योग व सेवा योगाचे महत्त्व वाढणे हा संरचनात्मक बदल असून तो विकासाचे निदर्शक आहे. अनुकूल आहे.

### ५) राष्ट्रीय विकास परिषद –

पंचवार्षिक योजना तयार करण्याच्या प्रक्रियेत घटक राज्यांना सहभागी करून घेण्यासाठी ६ ऑगस्ट १९५२ रोजी राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना करण्यात आली. नियोजन मंडळाच्या सर्व सदस्यांसह सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक व सर्व केंद्रीय कॅबिनेट मंत्री, राष्ट्रीय विकास परिषदेचे सदस्य असतात. नियोजन मंडळापेक्षा रा. वि. परिषद ही व्यापक असून पंतप्रधान हेच रा. वि परिषदेचे अध्यक्ष असतात.

### ६) समांतर अर्थव्यवस्था –

काळापैसा किंवा बेहिशेबी पैशांवर आधारलेली अर्थव्यवस्था. अशा अर्थव्यवस्थेमुळे सरकारचे, कर उत्पन्न बुडून नुकसान होते. बेनामी किंवा अवैधव्यवहारामुळे काळा पैसा निर्माण होतो. अवैधमार्गाने निर्माण झालेल्या पैशाचे प्रमाण खूप मोठे असेल तर देशाच्या अर्थव्यवस्थेत एक प्रकारे समांतर अर्थव्यवस्था कार्यरत होऊन ती देशाला घातक ठरते.

## ८.६ संदर्भ सूची


१) देशपांडे श्रीधर, देशपांडे विनायक (२००४ प्रथमावृत्ती) भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लिकेशन्स हाऊस, मुंबई

२) देशपांडे श्रीधर, देशपांडे विनायक (२०१० सुधारित आवृत्ती) भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लिकेशन हाऊस मुंबई.

३) डॉ. कानेटकर मेधा (जुलै २०१२ प्रथम आवृत्ती) भारतीय अर्थशास्त्र श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

४) प्रा. चव्हाण एन. एल. (२००९ प्रथम आवृत्ती) भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन जळगांव.

५) प्रा. डी. आर. जगताप, प्रा. सौ. नीता दाणी – डॉ. जंगले, प्रा.डी.जी. पाटील, (आवृत्ती २०११)

भारतीय अर्थव्यवस्था -एक दृष्टिक्षेप - प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव.

६) डॉ. मेधा कानेटकर (प्रथम आवृत्ती २००७) भारतीय नियोजनाची पन्नास वर्षे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

७) देव, सामरे (जानेवारी २००१) भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

८) श्री रंजन कोळंबे, भारतीय अर्थव्यवस्था (सातवी आवृत्ती २०१०) भगीरथ प्रकाशन, पुणे.

९) राजगुरू आगरकर, सुधाकर सरमोकदम, (प्रथम आवृत्ती १९९१) आर्थिक प्रणाली, सेठ पब्लिकेशन, मुंबई

१०) Datta Ruddar, Sundaram K.P.M. (2010) Sixty first Edition S. Chand and Co. Ltd. New Delhi

११) Datta Ruddar Sundaram K.P.M. (2007) Fifty Sixth Edition S. Chand New Delhi